**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

**<u>संबंधित खात्याचे कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबाबत</u>**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बी.टी.कॉटन बियाणांसंबंधीचा अतिशय महत्वाचा विषयावर सभागृहात चर्चा होणार आहे. आपल्याला या संदर्भातील निर्णय करावयाचा आहे. या महत्वाच्या विषयावरील चर्चेसाठी कॅबिनेट दर्जाचे मंत्री महोदय उपस्थित असण्याची आवश्यकता आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, हा नेहमीचाच प्रश्न आहे. विधानसभेत कृषी मंत्री महोदयांचे कामकाज आहे. हा प्रश्नही तेवढाच महत्वाचा आहे. तथापि, सभागृहात आता माननीय कृषी राज्यमंत्री आहेत, मी स्वत: आहे, आम्ही विषय समजून घेऊ आणि निर्णय मात्र मंत्री पातळीवरच होईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हा विषय एका तालुक्याचा नाही. हे शासन संवेदनशील राहिलेले नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, हा विषय संपूर्ण राज्याचा आहे, याची मला कल्पना आहे. हा विषय गंभीर आहे, याबद्दलही दुमत नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांना जे काही मांडावयाचे आहे, ते त्यांनी मांडावे, त्यांचे मार्गदर्शन राज्याला गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचे मुल्यमापन होत असते, त्यांच्या सूचनांचा शासन पातळीवर विचार केला जातो. परंतु, सन्माननीय सदस्य कॅबिनेट मंत्र्यांचा आग्रह धरत असतील तर अडचण निर्माण होईल.

**तालिका सभापती :** माननीय कृषी राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, कॅबिनेट दर्जाचे मंत्री देखील उपस्थित आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री सभागृहात असते तर निर्णय करणे सोयीचे गेले असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून मांडण्यात येणाऱ्या प्रत्येक मुद्याचे टिपण घेतले जाईल आणि त्याची लेखी उत्तरे सुध्दा त्यांना शासनाकडून दिली जातील. त्यामुळे मला वाटते, त्यांनी चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती :** माननीय कृषी मंत्र्यांना निरोप देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, विधानसभेतील कृषी मंत्री महोदयांशी संबंधित कामकाज आटोपल्यानंतर ते येथे येतील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी हरकत केवळ कृषी मंत्री महोदयांबाबत नाही तर कृषी विभागाचा सचिव दर्जाचा किंवा वरिष्ठ दर्जाचा एकही अधिकारी उपस्थित नाही. संसदीय कार्य मंत्री महोदयांना अशा प्रकारे हे टाळावयाचे असेल तर माझी हरकत नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, अधिकाऱ्यांचा सभागृहातील कामकाजाशी प्रत्यक्ष संबंध नसतो. ते जरी गॅलरीत उपस्थित असले तरी सभागृहासाठी ते अदृष्य असतात. तथापि, मी जाणीवपूर्वक सांगतो की, सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांची नोंद केली जाईल, कृषी राज्यमंत्री महोदय सभागृहात आहेत, मी आहे, अधिकारी देखील गॅलरीत उपस्थित आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांचा एवढा अट्टाहास असेल तर ते बरोबर नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, प्रथा, परंपरेप्रमाणे सांगावयाचे झाले तर अधिकारी गॅलरीत उपस्थित आहेत. आता जर सन्माननीय सदस्य त्यांचे नांवे, हुद्दा वगैरे बाबतीत आग्रह धरणार असतील तर ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांचे मुददे लिहून घेऊन त्यांना लिखित स्वरुपाची उत्तरे मिळतील. त्यांचे सर्व म्हणणे मान्य आहे. त्यांनी कामकाजाला सुरुवात करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, एकही सचिव दर्जाचा अधिकारी उपस्थित नसावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-3

SRR/ ST/ AKN/ 10:00

**तालिका सभापती :** सभागृहाचा वेळ वाया जात आहे. सभागृह सुरु होऊन तीन मिनिटे होऊन गेली आहेत. या चर्चेसाठी 1 तास 15 मिनिटांचा कालावधी दिलेला आहे. वेळ वाया न घालविता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्री महोदयांचा अट्टाहास कायम आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, सन्माननीय सदस्यांच्या प्रत्येक शब्दाची नोंद घेतली जात आहे. सभागृहात कॅबिनेट दर्जाचे मंत्री, संबंधित खात्याचे राज्यमंत्री उपस्थित आहेत आणि गॅलरीमध्ये अधिकारी देखील उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांच्या सूचनांची नोंद केली जात आहे. त्यामुळे आता ही कोणती नवीन पध्दत आपण सुरु करीत आहात ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी शासनाकडून सापत्नभावाची वागणूक दिली जात आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, यामध्ये सापत्नभावाच्या वागणुकीचा काय संबंध आहे ? सभागृहात सर्व व्यवस्था केली आहे, मंत्री आहेत, अधिकारी आहेत, आम्ही बसलो आहोत, सभागृह सुरु झाले आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हा विषय एवढा गंभीर असताना तो जर शासन गांभीर्याने घेणार नसेल तर आम्ही येथे डोके आपटून काय होणार आहे ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, शासनाने हा विषय गांभीर्यानेच घेतलेला आहे. पलीकडील बाकावर देखील काय गांभीर्य आहे, हे आपण बघावे. हा विषय नाही. परंतु, आपल्याला एकत्रितपणे काम करावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्यांच्या सर्व मुद्यांची नोंद घेतली जात आहे. सभापती महोदय, मी आपल्याला अशी विनंती करतो की, आपण सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया आपली अर्धा-तास सूचना मांडावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

--------------



18-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-4

SRR/ ST/ AKN/ 10:00

**पृ.शी.:** बोगस किटकनाशक आणि जैविक किडनाशक यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान

**मु.शी.:** बोगस किटकनाशक आणि जैविक किडनाशक यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान या विषयावर सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, सुनील तटकरे, जयवंतराव जाधव यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 1 तास 15 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात किटकनाशक आणि जैविक किडनाशक यांच्या विक्रीवर शासनाचे निर्बंध नसल्यामुळे शेतकऱ्यांचे 5 हजार कोटी रुपयांचे नुकसान होणे, बोगस जैविक पिक वाढ संजिवीके (पीजीआर), जैविक किडनाशके व किटकनाशकांच्या वापरामुळे राज्यातील भाजीपाला व फळे यांच्या निर्यातीवर युरोपीय समुह आणि इतर देशांनी बंदी घालणे, यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे, सीआयबीआरसी संस्थेकडे नोंदणीकृत नसलेली जैविक किडनाशके राज्यात मोठ्या प्रमाणात विक्री होणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर बॅन केलेल्या व अनधिकृत जैविक किडनाशकांच्या वापरामुळे सन 2015 च्या द्राक्ष हंगामातील अनेक नमुने निर्यातीसाठी अपात्र ठरणे, यामुळे भाजीपाला, फळे आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, बीटी कॉटन बियाणांचे दरही इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात अधिकचे असणे, अनेक ॲग्री-हर्बल-आर्युवेद औषधे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित........

उत्पादनात भरघोस नफा कमावून देण्याच्या नावाखाली अनेक व्यावसायीक कंपन्यांकडून शेतकऱ्यांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक होणे, कृषी विभागाकडून याबाबतच्या तक्रारींची कोणतीही दखल घेण्यात न येणे, कृषी निविष्ठा व गुण नियंत्रण विभागातील अधिकारी आणि व्यापाऱ्यांच्या संगनमताने राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक होणे, यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला शासन विरोधी तीव्र असंतोष, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीचे कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल प्रथमतः मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, बी.टी.कॉटन बियाणांचा हा अतिशय महत्वाचा विषय आहे. बी.टी.कॉटनच्या दराविषयी आणि कसल्याही प्रकारची परवानगी न घेता विकण्यात येणाऱ्या जैविक औषधे आणि किटकनाशके या विषयी राज्यातील परिस्थिती आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न मी या माध्यमातून करणार आहे.

सभापती महोदय, कसलीही मान्यता नसताना जैविक औषधे आणि किटकनाशके बाजारात कोणत्याही दराने विकली जातात आणि शेतकऱ्यांची प्रचंड प्रमाणावर लुट केली जाते. देशातील 9 राज्यांमध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते आणि साधारणपणे बी.टी.कॉटन बियाणांची 4 कोटी पाकिटे विकली जात असतात. त्यापैकी 1 कोटी 60 लक्ष पाकिटे अथवा डबे महाराष्ट्रात विकली जातात. याचे कारण असे आहे की, कमी पडणाऱ्या पावसामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना कापसाचे उत्पादन घेण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात बी.टी.कॉटन बियाणांची किंमत 830 ते 930 रुपये आहे. कालच मी या अतिशय महत्वाच्या विषयावर राज्याच्या महसूल व कृषी मंत्री महोदयांकडे गेलो होतो आणि त्यांच्यासमोर हा विषय मांडला होता. त्यांनी असे सांगितले की, गेल्या वर्षी 10

जुनच्या अगोदर ज्या शेतकऱ्यांनी बियाणे विकत घेतली त्या शेतकऱ्यांना 730 ते 830 रुपयांपर्यंत बियाणे विकली आहेत आणि साधारणपणे 100 रुपये या बियाणांचा दर कमी केलेला आहे.

...6....

18-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-6

SRR/ ST/ AKN/ 10:00

श्री.अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, मध्यंतरी मध्य प्रदेश सरकारने त्यांच्या राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील अल्पभूधारक आणि आदिवासी शेतकऱ्यांना मोफत बी.टी.कॉटन बियाणे देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी बियाणे उत्पादक कंपन्यांकडून निविदा घेण्यात आल्या. अनेक कंपन्यांनी 450 ते 700 रुपयांपर्यंतच्या निविदा दाखल केल्या व हे सर्व रेकॉर्डवर आहे. निविदा देत असताना आपण प्रिबिडला बोलाविले अ तर 700 रुपयांपेक्षा काही कमीने आल्या असत्या, 550 ते 600 रुपये हे दर आले असते. मध्य प्रदेशातील आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागातील लोकांना पुरविण्यासाठी बी.टी.कॉटन बियाणांच्या 450 ते 700 रुपयांपर्यंतच्या निविदा त्यांना प्राप्त झाल्या. आंध्र प्रदेश सरकारने 730 रुपयाने बियाणे घेतले आणि गोरगरीबांना त्याचे वाटप केले आहे. परंतु, आज आपल्या राज्यात बियाणांचा दर 830 रुपये आहे. शासनाने या बियाणांचा दर 100 रुपयांनी कमी केला असला तरी त्याचा पुरेसा परिणाम उत्पादकांवर होत आहे, असे नाही. उत्पादकांचे फार नुकसान झालेले आहे, असेही नाही. 450 ते 700 रुपयापर्यंतच्या निविदा त्या ठिकाणी दिल्या जातात. आपल्याकडे मात्र 830 रुपयांने निविदा का दिल्या जातात ?

सभापती महोदय, दुसरी गोष्ट ही आहे की, एमआरपीवर बियाणे विकली जात नाहीत. या ठिकाणी माननीय कृषी राज्यमंत्री प्रा.राम शिंदे आणि सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर उपस्थित आहेत. त्यांना हे सर्व माहीत आहे. सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांना माहीत नसावे. (अडथळा.....) आपल्याला कापसाचा दर माहीत नाही, सन्माननीय श्री.बापट साहेब आपण आग्रह धरु नका.

...B-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मला माहिती आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेबांनी आग्रह धरु नये. मी एलबीटीबद्दल काही बोललो काय ? मला कापसाचे देखील कळते असा तुमचा हट्ट आहे तर ते थोडे अतीच होत आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी माझ्या शेतात 15 एकर कापूस, सोयाबीन, तूर इत्यादी पिकांची लागवड केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना माहिती नसेल तर त्यांनी कृपया बोलू नये.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेबांना एकरी बियाण्यांच्या किती बॅग लागल्या, हे त्यांनी सांगावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना खूप कळते आणि दुसऱ्याला काहीच कळत नाही, असा ते जो आरोप करतात तो बरोबर नाही. मी आपल्याला सविस्तर माहिती देणार नाही. मीशेती विषयावर आपल्या बरोबर 10 तास चर्चा करु शकतो. परंतु, मोघम बोलण्याची जी स्टाईल झालेली आहे, ती आपण करु नये. तुम्हाला जेवढे ज्ञान आहे तेवढे ज्ञान आम्हाला नाही. परंतु, माहितीच नाही असे म्हणणे चुकीचे आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आता दुष्काळग्रस्त भागात बीटी कॉटनशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही याची माननीय कृषी राज्यमंत्री प्रा.राम शिंदे यांना निश्चितपणे जाणीव आहे. विहिरीला थोडे फार पाणी असेल तर शेतकरी सोयाबीनचे पीक घेतात. परंतु, जेथे दुष्काळ आहे, सहा-सात महिन्यात पीक घेता येईल, अशा ठिकाणी आता बीटी कॉटनशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. बीटी कॉटनचे बियाणे एमआरपीने विकले जात नाही. तुम्ही हे मान्य कराल की, 830 रुपये किंमतीचे बियाणे 1200 ते 1300 रुपये किंमतीपेक्षा कमी भावाने विकले जात नाही. एमआरपी 150 रुपयांनी कमी केली आणि बीटी कॉटन बियाण्याची किंमत 650 रुपयांपर्यंत खाली आली तर कदाचित ते बियाणे बाजारात 800 रुपयांपर्यंत मिळेल. ॲडव्हान्स बुकींग करणाऱ्या शेतकऱ्यांनाच 830 रुपये किंमतीने बियाणे मिळते. एखाद्या शेतकऱ्याने ऐनवेळी बियाणे घेतले तर बाजारात 830 रुपये किंमतीने बियाणे मिळत नाही. त्याला एमआरपीपेक्षा जास्त किंमत द्यावी लागते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..........

मग 100 रुपयांची काय किंमत आहे ? शेतकऱ्याला ऐनवेळी सावकाराकडून अथवा शेजाऱ्याकडून 830 रुपये किंवा 1 हजार रुपये उसने घेऊन बियाणे विकत घ्यावे लागते. शेतकऱ्याला ऐनवेळी 830 रुपयांना बियाणे मिळत नाही. याचे मोल काय आहे हे मी समजून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, आता कापसाचे पीक केवळ खरीप हंगामापुरते मर्यादित राहिलेले नाही. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील नाशिकच्या अलीकडच्या दुष्काळी भागात बहुतांश लोक कापसाचे पीक घेतात. आता मराठवाडा, बीड जिल्ह्यात कापसाचे पीक केवळ खरीप हंगामापुरते मर्यादित राहिलेले नाही. कापसाचे पीक थेट रब्बी हंगामापर्यंत म्हणजे मार्च महिन्यापर्यंत घेतले जाते. थोडे फार पाणी उपलब्ध असेल तर पिकाला पाणी द्यायचे आणि पहिला उपटा झाल्यानंतर आम्ही पुन्हा एकदा खोडव्यापर्यंत जातो. कापसाचे पीक थेट मार्च महिन्यापर्यंत घेतले जाते. कापसाच्या पिकाचे एवढे महत्व आहे की, आता आमच्या भागात रब्बी हंगाम राहिलेला नाही. दुष्काळग्रस्त भागात कापसाशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. माननीय कृषी मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब सभागृहात आलेले आहेत. मी त्यांचे आभार मानतो. माननीय कृषी मंत्र्यांनी काल मला त्यांच्या दालनात सांगितले की, हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयात आहे आणि त्याला स्थगिती मिळाली आहे. स्थगिती वगैरे आहे हे सर्व मला मान्य आहे. परंतु, आजची दुष्काळग्रस्त परिस्थिती लक्षात घेता मराठवाडा, मराठवाड्याला लागून असेला दक्षिण विदर्भ आणि पूर्व उत्तर महाराष्ट्रातील काही भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या सोईसाठी आपण माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून 100 रुपये बीटी कॉटन बियाण्याची किंमत कमी करावी, अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. (...अडथळा....) आपण केले हे मला मान्य आहे. त्यामुळे बीटी कॉटन बियाण्याचे भाव 930 रुपयांवरुन 830 रुपयांवर आलेले आहेत. यासाठी 130 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम लागणार नाही. कालचे पॅकेज देत असताना यदाकदाचित तुम्हाला कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहून देता येत नसले तर शासनाने 100 रुपये बेअर करावेत आणि 730 रुपये किंमतीत बीटी कॉटन बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा एक धाडशी निर्णय घ्यावा, अशी मी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..........

आपल्याला कळकळीची आणि आग्रहाची विनंती करतो. (...अडथळा...) 500 रुपये करणार असाल तर आम्ही तुमचे मनापासून अभिनंदन करु.

सभापती महोदय, किटकनाशकांच्या किंमतीवर शासनाचे निर्बंध नाहीत. उत्पादन खर्च आणि विक्री किंमत यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. भारतीय कंपन्या आणि परदेशी कंपन्या यांच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. उदाहरणार्थ इमिडा किटकनाशक भारतीय कंपन्या 700 ते 800 रुपये दराने विकतात आणि हेच किटकनाशक परदेशी कंपन्या 2500 ते 2800 रुपये दराने विकतात. यातील इन्ग्रेडिएंट्स एकच आहेत. परंतु, किटकनाशकांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. तसेच, डायथेन किरॉन हे किटकनाशक भारतीय कंपन्या 1800 रुपये प्रती किलो दराने विकतात आणि परदेशी कंपन्या ते 3800 रुपये प्रती किलो दराने विकतात. किटकनाशकांच्या किंमतींवर नियंत्रण नसल्यामुळे हे प्रकार संपूर्ण राज्यात सुरु आहेत. याला कोणीही मॉनिटर करीत नाही. संपूर्ण राज्यात प्रत्येक वर्षी 2800 ते 30,000 हजार कोटी रुपयांचे किटकनाशक विकले जाते आणि त्यामुळे या उद्योगात शेतकऱ्यांची प्रत्येक वर्षी 10 हजार कोटी रुपयांची लूट केली जाते. आता स्थानिक पातळीवर आदेश दिलेले आहेत. मला कृषी विभागातील एका जबाबदार कर्मचाऱ्याने सांगितले की, आम्हाला 15 दिवसापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत की, अधिवेशन संपेपर्यंत या किटकनाशकची विक्री करण्यात येऊ नये. मी हे जबाबदारीने सांगतो. औरंगाबाद येथील राम इंटरनॅशनल हॉटेलमध्ये किटकनाशक कंपन्यांच्या उत्पादकांची आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यांनी त्या बैठकीत निर्णय घेतला की, कोणत्याही परिस्थितीत हे किटकनाशक अधिवेशन संपेपर्यंत बाजारात आणावयाचे नाही. या संदर्भात नियम नाहीत, बंधने नाहीत. देशातील जेष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ.सी.डी.माई यांनी केलेल्या पाहणीत 20 किटकनाशक कंपन्यांपैकी 19 कंपन्या बोगस आहेत. डॉ.माई यांनी केलेल्या सर्वेक्षणातून, त्यांनी घेतलेल्या माहितीतून, त्यांच्या अभ्यासातून त्यांनी हे निष्कर्ष काढलेले आहेत. सेंट्रल इन्सेक्टिसाईड बोर्ड ऑफ रजिस्ट्रेशन या संस्थेकडे किटकनाशकांची अधिकृत नोंदणी होणे आवश्यक आहे. परंतु,

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..........

किटकनाशक उत्पादक कंपन्यांची कोठेही नोंदणी झालेली नाही. ज्या कंपन्या बाजारात किटकनाशकाची विक्री करतात त्यांची साधी नोंदणी देखील झालेली नाही. याचा परिणाम काय होतो, हे आपण बघावे.

सभापती महोदय, शेतकरी जैविक किटकनाशक वापरुन भाजीपाला किंवा फळांचे उत्पादन घेतात. ज्यावेळी हे उत्पादन परदेशी बाजारपेठेत पाठविले जाते तेथे भारतातून आलेल्या मालाला रिजेक्शन दिले जाते. फळे आणि भाजीपाला पिकांच्या संदर्भात हीच परिस्थिती आहे. शेतकरी काबडकष्ट करतो, नॉर्म्स नुसार पात्र ठरण्याचा प्रयत्न करतो, शास्त्रोक्त पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करतो. परंतु, शेवटी त्याचे अज्ञान आड येते. कित्येक शेतकऱ्यांना अद्याप याचे भान नाही, जाणीव नाही. शेतकऱ्यांना या संदर्भात प्रशिक्षण देण्याची कोणती संकल्पना नाही. शेतकऱ्यांनी अज्ञानापोटी जैविक किटकनाशकांचा वापर केल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतातील भाजीपाला, फळे रिजेक्ट केली जातात. आपण वर्तमानपत्रात अशा अनेक बातम्या बाचतो. आपण मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत स्वत: हे अनुभवले आहे. तुमचा आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचा अतिशय जवळचा संबंध आहे. मागील वर्षी आपण निर्यात केलेला आंबा दोन वेळा परत आला आणि त्याचा परिणाम आपण भोगलेला आहे. त्यामुळे या संदर्भात विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन 2014 मध्ये जैविक पीक संरक्षण उद्योगाची देशातील स्थानिक बाजारपेठेत 2.3 अब्ज डॉलर्सची उलाढाल झाली. सन 2018-19 पर्यंत ही उलाढाल 4.2 अब्ज डॉलर्स पर्यंत जाण्याची शक्यता आहे. ही बाब क्रॉप ऑफ इंडिया या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलेली आहे. मी वर्तमानपत्रातील बातमी वाचून हे बोलत नाही. जैविक उत्पादन प्रत्यक्ष भारतात तयार होण्याचे प्रमाण खूप कमी आहे. परदेशातून औषधी आयात करून त्याचे केवळ भारतात रिपॅकिंग केले जाते.

..C-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

परदेशातून आयात करुन ही औषधी आता 3200 ते 3800 रुपयांना विकली जात आहे, ते रिपॅकिंग केल्यानंतर तीच औषधी 1800 ते 2000 रुपयांना विकली जाते. चुका कोठे होत आहेत ते शोधायला पाहिजे. रिपॅकिंग केलेली तीच औषधी 1800 रुपयांना विकण्यात येते. त्यांच्या मूळ पॅकिंगमध्ये औषधी घेतली तर ती 3800 रुपयांना घ्यावी लागते.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी दोन विषय निदर्शनास आणून माझे भाषण संपविणार आहे. जैविक पीक वाढ संजिवीकेची विक्री राज्यात साडेचार हजार कोटी रुपयांची होत आहे. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या विक्रीची बाजारपेठ इतकी मोठी असताना राज्यात एकही पीजीआर नोंदणीकृत नाही. तरी देखील बाजारात याची खुलेआम विक्री होत आहे, यावर कोणाचेही बंधने राहिले नाही. शेती विषयाची आपली आस्था, त्याचे भान व गांभीर्य माननीय मंत्री महोदयांना आहे, माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना देखील आहे. यासंदर्भातील निर्णय घेणे गरजेचे आहे, जैविक उत्पादनाची विक्री करताना त्यावर ब्रँडनेम नाही, उत्पादकाचे नाव नाही, त्यात असलेल्या घटकद्रव्यांचे प्रमाण व नावे नाहीत, अशा परिस्थितीत विक्री केली जात असेल तर त्या औषधाचे महत्व शेतकऱ्याला कसे कळणार ?

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी मंत्री महोदयांना अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, मी खालील पाच विषय मांडत आहे, त्याचे स्पष्टीकरण आपण उत्तरात द्यावे. उत्पादन खर्चावर आधारित बियाणाच्या किंमतीचा निर्णय आपणाला करता येणार नाही काय ? बीटी कॉटनचे बियाणे कसे तयार होते हे मी आपणाला सांगतो, मी सदन शेतकरी आहे, चांगले उत्पादन घेतो, माझ्याकडे 50 एकर शेती बागायती आहे. तो विक्रेता सांगतो की, अमरसिंह पंडित यांच्याकडे चांगली 50 एकर जमीन आहे, त्यांच्याकडे ड्रीप आहे, त्यांचे दर एकरी उत्पादन चांगले आहे, त्यांच्याकडील कापसाचे बियाणे विकत घेऊन त्यावर थोडाफार प्रोसेसिंग खर्च करुन ते बियाणे मार्केटमध्ये विकण्यात येते, अशी ही पध्दत आहे. म्हणून उत्पादन खर्चावर आधारित बीटी कॉटन बियाणाची किंमत असावी, त्यासंदर्भातील दर निश्चित करावे अशी मी विनंती करतो.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, अल्पभूधारक व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोफत बियाणे यावर्षी वाटप करावे असा मी आग्रह धरणार आहे. मराठवाड्यातील सर्वच गावे दुष्काळग्रस्त आहेत, या गावांसाठी मोफत बियाणे वाटता आले नाही तरी किमान या दुष्काळग्रस्त भागासाठी केवळ मराठवाडाच नव्हे तर ज्या गावांची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी आहे त्या गावांना न्याय देण्यासाठी किमान 100 रुपये दर कमी करावा. मंत्री महोदयांनी मघाशी सांगितल्याप्रमाणे 500 रुपयाच्या आत दर आणले जातील. असा निर्णय झाला तर मी या सभागृहातून उठून मंत्री महोदयांचे त्यांच्या जागेवर जाऊन दर्शन घेईन. 500 रुपये बीटी कॉटन बियाणाचे दर मी स्वप्नात पाहिले नाही. मंत्री महोदय 500 रुपये दर करणार असतील तर फार चांगली गोष्ट आहे, असे आपण करुन दाखवा.

सभापती महोदय, पीजीआर जैविक किडनाशक आणि जैविक उत्पादने यांच्या विक्रीच्या किंमतीवर नियंत्रण असणे गरजेचे आहे. घातक रासायनिक द्रव्यांचा समावेश असणाऱ्या उत्पादनाची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर व उत्पादकांवर कठोर कारवाई करावी अशी मी नम्र विनंती करतो. केवळ नोंदणीकृत असणाऱ्या उत्पादक व व्यावसायिकांना विक्री करण्याची परवानगी द्यावी. शेवटची मागणी अशी करतो की, यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी आणि जॉईंट डायरेक्टर यांची समिती गठीत करावी. एखाद्या जिल्ह्यात जैविक किडनाशक, जैविक औषधी, बोगसपणे विक्री होत असेल तर त्या दुकानदाराचे लायसन्स रद्द करुन तातडीने त्याच्यावर कठोर कारवाई किंवा क्रिमिनल अफेन्स नोंदविण्याचा निर्णय त्या समितीला घेता यावा. असे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीला देण्याची घोषणा मंत्री महोदयांनी करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या निदर्शनास मी याबाबी यासाठी आणून देत आहे की, दुष्काळग्रस्त भागाला आता दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही. सोयाबीन पिकविण्यासाठी कापसापेक्षा जास्त पाणी लागते. कापसाच्या पिकाला सप्टेंबर महिन्याच्या पुढे तीन पाणी दिले तर काही प्रमाणात कापसाचे उत्पादन होऊ शकते. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये दुष्काळग्रस्त भागाला दिलासा देण्याच्या हेतून असा धाडसी निर्णय करण्यात येईल काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, आज नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने मला माझे मत मांडण्याची संधी दिली. सर्वात महत्वाचे म्हणजे नियम 97 ची चर्चा या विषयावर उपस्थित करण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर चर्चा करण्याची अनुमती व माझे मत मांडण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, भारतीय शेतीचे सिंहावलोकन काल, आज आणि उद्या केले तर माझ्या मते भारतीय शेतकऱ्यांनी प्राप्त परिस्थितीवर मात करुन शेती व्यवसायात आमुलाग्र बदल केलेला आहे. शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करीत शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. हे प्रयोग करीत असताना कधी शासनाची मदत मिळाली किंवा प्रोत्साहन मिळाले. त्यांनी स्वत:ची प्रवृत्ती जागरुक करुन शेतीत नंदनवन फुलविण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागात अशी म्हण आहे की, चांगल्याबरोबर वाईट देखील उगविले जाते. बीटी कॉटन संदर्भात आमचे ज्येष्ठ सन्मानीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी विचार व्यक्त केले आहेत. त्यावर मी जास्त भाष्य करणार नाही. आमचा नाशिक जिल्हा कांदा आणि द्राक्ष उत्पादनाच्या बाबतीत अतिशय नावारुपाला आलेला आहे. (..अडथळा..) भाऊंना आमचे म्हणणे थोडे ऐकू दिले तर आम्ही आपले आभार व्यक्त करु आपण कोणत्या आरतीला जावे व कोणत्या पुजेला जावे याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांची प्रामाणिक भावना आहे. महसूल व कृषी खाते आपणाकडे आहे, इतर खात्याबाबत आम्हाला माहिती नाही पण बांधावरचा खरा शेतकरी नाथाभाऊ आहे व नाथाभाऊंनी याची झळ सोसली आहे, म्हणून आम्हाला आज आपणाकडून जास्त अपेक्षा आहेत.भाव कमी होणार हे मी आपणाला निश्चितपणे सांगतो. परवाच्या दिवशी लॉबीत जाऊन आम्ही नाथाभाऊ यांचे अभिनंदन केले. महसूल खात्यात त्यांनी अतिशय क्रांतीकारी निर्णय घेतले आहेत. आज देखील आम्ही आपले अभिनंदन करण्यास येणार आहे, याबाबत माझ्या मनात शंका नाही. बीटी कॉटन संदर्भात सन्माननीय सदस्यांनी भाष्य केले. नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष पिकांचा विषय दरवेळी ऐरणीवर येतो. नाशिक जिल्ह्यातील शेतकरी द्राक्ष उत्पादन करावयास लागले तेव्हा उत्पादन चांगल्या पध्दतीने येत होते. नाशिक येथील द्राक्ष उत्पादक शेतकरी त्याचा माल सातासमुद्रापार विकावयास लागला. त्यावेळी त्याला असे वाटले होते की, आता आपले दिवस बरे आले आहेत, अचानक एके दिवशी नाशिक येथून गेलेले एक्सपोर्टचे कंटेनर युरोपमध्ये रिजेक्ट करण्यात आले.

....D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

सभापती महोदय, ज्यावेळी हा माल रिजेक्ट झाला त्यावेळी असे लक्षात आले की, आपली जी एक्स्पोर्टची पध्दत आहे त्या संदर्भात अपेडा संस्थेच्या लॅबमध्ये द्राक्षांचे सॅम्पल तपासणीसाठी पाठविण्यात येतात. अपेडाच्या लॅबने सॅम्पल मान्य केले तर तो माल एक्स्पोर्टला लायक असल्याचे मान्य केले जाते आणि ते प्रॉडक्ट एक्स्पोर्टला पाठविण्यात येते. ज्यावेळी नाशिकची द्राक्षे युरोपमधून रिजेक्ट झाली, त्यावेळी अपेडा या संस्थेने द्राक्षाच्या नमुन्याची लॅबमध्ये तपासणी केली होती, तो माल योग्य असल्याचे प्रमाणपत्र देखील दिले होते. असे असताना परदेशात तो माल गेल्यानंतर आमच्या देशातील नागरिकांना खाण्यास अपायकारक असल्याने सांगून त्या देशाने तो माल रिजेक्ट केला.

प्रश्न असा निर्माण होतो की, अपेडा ही मान्यताप्राप्त संस्था आहे. त्यांची लॅब अतिशय चांगली आहे. त्यांची मान्यता मिळाली असेल तर परेदशात माल रिजेक्ट कसा झाला, याची जबाबदारी कोणी घ्यायची? सभापती महोदय, ही जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. पेस्टीसाईड ॲक्टमध्ये आपल्याला आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. 1968 साली केंद्र सरकारने तयार केलेल्या कायद्याची आपल्या राज्यात अंमलबजावणी केली जात आहे. या कायद्यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे.

माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितल्याप्रमाणे बाजारामध्ये जी किटकनाशके विकली जातात त्याचे रजिस्ट्रेशन झालेले नाही. बायॉलॉजिकल म्हणून विक्री होत असताना त्यामध्ये कोणते घटक आहेत याची शेतकऱ्यांना माहिती नसते. तो शेतकरी मोठया विश्वासाने ते बायॉलॉजिकल प्रॉडक्ट बाजारातून विकत घेतो आणि शेती पिकावर त्याची फवारणी करतो. अपेडा संस्थेमध्ये प्रॉडक्ट तपासणीसाठी येते त्यावेळी ते प्रॉडक्ट योग्य आहे की नाही हे तपासणीनंतर सांगण्यात येते. अशा परिस्थितीत अपेडा आणि शासनाची जबाबदारी नाही का? बाजारात विक्री होत असलेले प्रॉडक्ट खरोखर बायॉलॉजिकल आहे की नाही याची चौकशी किती कृषी अधिकाऱ्यांनी केली, किती दुकानांवर कारवाई केली, किती दुकानांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला, किती दुकानदारांचे परवाने निलंबित केले? याचे उत्तर शून्य टक्के असेच आहे.

मोठया हॉटेलमध्ये कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली असे सांगण्यात येते. हे एक मोठे रॅकेट आहे. ते उद्ध्वस्त करण्याची गरज आहे. अधिकारी सुध्दा यामध्ये बरबटले आहेत. ज्या अधिकाऱ्यांना वाटते की, खरोखर कारवाई करणे आवश्यक आहे, त्यांना 1968 च्या कायद्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

तरतुदीनुसार अधिकार दिलेले नाहीत. जर अधिकाऱ्यांना अधिकार नसतील तर कारवाई होणे शक्य नाही. अपेडा संस्था एक्स्पोर्ट होणारा माल योग्य आहे की नाही हे ठरवित असते, ती एक अधिकृत संस्था आहे. ती संस्था याचे अधिकार स्वतःकडे ठेवत असताना बाजारात उपलब्ध असलेल्या औषधांची योग्यता ठरविण्याची जबाबदारी सुध्दा राज्य शासनाने स्वीकारली पाहिजे, असे माझे मत आहे. मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा. या प्रॉडक्टमध्ये जे रेसिड्यू उपलब्ध असतात ते सुध्दा विचारात घेतले पाहिजेत. नाशिकचे कन्टेनर युरोपमध्ये रिजेक्ट झाल्याबद्दल शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला त्याची दाहकता जाणवली नाही. बाजारात कोणती औषधे वापरली जातात, ज्या प्रॉडक्टवर बंदी आहे अशी प्रॉडक्ट बाजारात उपलब्ध आहेत का याची कुठेही नोंद नाही. करोडो रुपयांचा माल फेकून द्यावा लागला. अपेडा ही संस्था सांगते की, हा माल एक्स्पोर्ट करण्यास योग्य नाही. कारण परदेशातील लोकांना खाण्यासाठी तो योग्य नाही. मग तोच माल देशांतर्गत स्थानिक बाजारामध्ये विकला जातो. एक्स्पोर्टसाठी रिजेक्ट झालेला माल आपल्या देशातील माणसे खातात, त्यांच्या आरोग्याला अपाय होत नाही का? त्यामुळे याची जबाबदारी अपेडा या संस्थेने स्वीकारली पाहिजे. शासनाचे अधिकारी काय करतात याबद्दल मंत्री महोदयांनी लेखाजोखा मांडला पाहिजे. मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणामध्ये याचा खुलासा होईल अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दोन दिवसांपूर्वी महसूल मंत्री या नात्याने काही महत्वाचे निर्णय जाहीर केले. राज्य शासनाने किटकनाशकांबाबत कठोर कायदा तयार केला पाहिजे. शासनाच्या अधिकाऱ्यांना कारवाई करण्याबाबत पुरेसे अधिकार दिले पाहिजेत. कृषी सहाय्यक आणि मोहीम अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचतात की नाही याची शहानिशा केली पाहिजे. राज्य शासनाने, केंद्र शासनाने व विविध एनजीओ यांनी या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे.

जगामध्ये रोज बदल होत आहेत. हापूस आंब्याचे किती तरी प्रकार आले आहेत. वेळोवेळी अधिकाऱ्यांना सक्तीने प्रशिक्षण देण्याची राज्य शासनाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे. प्रशिक्षण दिले जाते असे कदाचित मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु ते प्रशिक्षण परिपूर्ण नाही. याकरिता वेगवेगळे संशोधन होऊन कृषी खात्याची स्वतःची लॅब आणि संशोधन केंद्र निर्माण केले तर अधिकाऱ्यांना योग्यप्रकारे प्रशिक्षण देता येईल. कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक व मोहीम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D.3

SGB/ AKN/ ST/ 10:30

श्री.जयवंतराव जाधव.....

अधिकारी प्रशिक्षित झाले तर बांधापर्यंत जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करु शकतील. त्यामुळे बाजारात होणारे चुकीचे प्रकार आणि शेतकऱ्यांची दुर्दशा थांबण्याकरिता मदत होईल, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील)** : मंत्री महोदयांनी या चर्चेवरील उत्तराचे भाषण 11.15 वाजेपर्यंत पूर्ण करावयाचे आहे. ज्या माननीय सदस्यांची नावे आली आहेत त्यांना प्रथम बोलण्याची संधी दिली जाईल व वेळ शिल्लक असल्यास इतर माननीय सदस्यांना बोलण्याकरिता संधी देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सकाळी 11.15 वाजता अर्धातास चर्चेला सुरुवात करावयाची आहे याची मी आठवण करुन देते.

तालिका सभापती : होय. आता माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण आपले विचार मांडतील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री हे शेतकरी आहेत. त्यांच्याकडून आमच्या फार अपेक्षा आहेत. खासदार श्री.राजू शेट्टी यांनी 1 डिसेंबर, 2015 रोजी आपल्याला एक पत्र लिहिले आहे, त्या पत्राची प्रत मी आपल्याला सादर करतो. चांगल्या कंपन्यांवर अन्याय होत आहे आणि गैरकृत्य करणाऱ्या कंपन्यांच्या उत्पादनामुळे शेतकरी अडचणीत येत आहेत. चांगल्या कंपन्या कोणत्या आहेत आणि गैरकृत्य करणाऱ्या कंपन्या कोणत्या आहेत त्यांची नावे मंत्री महोदयांनी जाहीर करावीत. महाराष्ट्रात असे झालेले आठवत नाही. ॲग्रोवन संदर्भात वाचकांच्या प्रतिक्रिया आलेल्या आहेत, त्या मी आपल्याकडे पाठवितो.

इ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण....

याच बाबतीत दिनांक 16.8.2010 रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या शासन निर्णयानुसार एक समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. बिगर नोंदणीकृतांना परवानगी देताना करावयाची अंमलबजावणीचा उल्लेख या शासन निर्णयामध्ये आहे. या निमत्ताने माझा एकच प्रश्न आहे की, या समितीच्या आता पर्यंत किती बैठका झाल्या आहेत ? या समितीची दर तीन महिन्यांनी बैठक झाली पाहिजे असे नमूद करण्यात आलेले आहे. तेव्हा या सर्व गोष्टींचा आपण खुलासा करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती हुस्नबानू खलिफे)**

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदया, मला मोठे भाषण करावयाचे नाही. कोकणातील हापूस आंबा आणि काजू प्रसिद्ध आहे. कोकणातील आंबा बागायतदारांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. आंबा बागायतदारांच्या आंबा पिकविण्याच्या पद्धतीवर देखील आक्षेप घेतला जात आहे. मला येथे एक-दोन सूचना करावयाच्या आहेत. आज आंबा बागायतदार तोट्यात चालले आहेत. डिसेंबर पासून आंब्याचा मोहर यायला पाहिजे. परंतु, थंडी न पडल्यामुळे आंब्याला मोहर येत नाही आंब्यावर फवारणी करणे आवश्यक असते. परंतु, या फवारणीच्या औषधांची किंमत शेतकऱ्यांना परवडणारी नसते. आज ऑर्गेनिक फुडस्‌चा मोठा गवगवा आहे. कडुलिंबाच्या कडवट पानापासून रस केला जातो. त्याचा वापर फवारणीसाठी केला तर अळ्या व किटकांना नियंत्रित ठेवता येते. शासनाची अनेक ठिकाणी कृषि विद्यापीठे आहेत. पाच हजार रूपयांची फवारणीची बाटली दहा झाडांना देखील पुरत नाही अशी स्थिती आहे. अशी फवारणी केल्यानंतर ते आंबे खाण्यास चांगले नाही, ते खाऊ नये असे देखील सांगितले जाते. हा माल परदेशातून रिजेक्ट केला जातो. आज ऑर्गेनिकचा गवगवा असल्यामुळे कृषि विद्यापीठांनी शरीराला अपायकारक ठरणार नाही असे उत्पादन तयार करून शेतकऱ्यांना देणे आवश्यक आहे. अशाने शेतकऱ्यांचा फवारणीचा खर्च देखील कमी होईल. तेव्हा यासंबंधी दापोली कृषि विद्यापीठ सहाय्य करू शकेल काय व तसे आदेश आपण देणार आहात काय ?

........

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, मी फक्त दोन मिनिटेच बोलणार आहे. सभागृहाचे नेते आणि कृषि मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या निदर्शनास मी एक-दोन गोष्टी आणून देणार आहे. निसर्गाची अवकृपा शेतकऱ्यांवर आहेच. आमच्या शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या ज्या काही कंपन्या असतील मग त्या फर्टिलायझरच्या कंपन्या असतील, बियाणांच्या कंपन्या असतील, एक्सपोर्ट करणाऱ्या कंपन्या असतील, शेतीमालाची क्वालिटी कंट्रोल तपासणारी कंपनी असेल त्यांना आपण ब्लॅकलिस्ट करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. नफा कमवून देण्याच्या नावाखाली व्यवसायी कंपन्या शेतकऱ्यांच्या कोट्यवधी रूपांची फसवणूक करीत आहेत. आपल्या राज्यात 4 कृषि विद्यपीठे आहेत. आपल्याकडे मोठमोठे कृषि अधिकारी आहेत. ग्रामसेवकापासून, तलाठ्यांपासून वरच्या कृषि अधिकाऱ्यांपर्यंतची आपली साखळी आहे. ती साखळी असताना आमच्या शेतकऱ्यांची अशा प्रकारची फसवणूक का केली जाते, याचे उत्तर आपले सरकार शोधून काढणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. गुण नियंत्रण विभागातील अधिकारी आणि गुण नियंत्रण मंडळातील अधिकारी यांचे संगनमत आहे. याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले मत व्यक्त केले आहे. औरंगाबादमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये त्यांच्या बैठका होतात. त्यात कुणाला लुटायचे, फसवायचे याची योजना तेथे तयार करतात. असे जे नेक्सेस आहे ते मोडण्यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहात काय असा माझा सरकारला प्रश्न आहे ? आधीच दुष्काळाने पीडित असलेला शेतकरी अत्यंत हवालदिल झालेला आहे. त्यांची होणारी फसवणूक टाळले हे सर्वात महत्त्वाचे काम आहे.

सभापती महोदया, सर्वात आनंदाची गोष्ट अशी आहे की, आमचे सभागृहाचे नेते माननीय कृषि मंत्री श्री.एकनाथरावजी खडसे हे देखील अत्यंत उत्कृष्ट शेती करणारे शेतकरी आहेत. तेव्हा शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना आणि दु:ख त्यांच्या शिवाय दुसरे कोणीही चांगले समजू शकणार नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्याकडून अपेक्षा करीत आहोत. आज शेतकऱ्यांची सर्वच क्षेत्रात फसवणूक होत आहे. ती टाळण्यासाठी आमचे मंत्री महोदय निश्चितपणे प्रयत्न करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी म.वि.प.नियम 97 अन्वये खूप चांगली अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेतील विषय महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. कापसाची तसेच इतर पिकांची चर्चा होणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना केमिकल्सच्या माध्यमातून शेती करावी लागते म्हणून त्यासंबंधातील दुखणे त्यांनी येथे मांडले आहे. नवी मुंबई येथून महाराष्ट्रातील सर्व माल हा एक्सपोर्ट होतो. आज परदेशात 100 टक्के जो भाजीपाला जातो तो ऑर्गेनिक असतो. आमचे नवी मुंबईचे व्यापारी गेले वर्षभर दुबईला ऑर्गेनिक आणि नॉन ऑर्गेनिक माल पाठवित होते. परंतु, त्या देशाने युके, ऑस्ट्रेलियाच्या देशाप्रमाणे ऑर्गेनिक माल वापरण्याचा अचानकपणे निर्णय घेतला. मधल्या काळात त्याचा ताण शेतकऱ्यांवर पडला. परंतु, आज परदेशात 100 टक्के भाजीपाला हा मुंबई, पुणे, नाशिक येथून जात आहे. हा माल पूर्णपणे ऑर्गेनिक असतो. आज परदेशातील लोक स्वतःच्या आरोग्य व्यवस्थे विषयी चांगली काळजी घेतात. आपल्या राज्यातील शेतकऱ्याचे पोट हे शेतीवर असते. आपल्या येथे भारतातील व राज्यातील विविध कंपन्या येऊन कमी वेळमध्ये चांगले उत्पादन देणाऱ्या प्रोडक्टची जाहिरात करतात. त्यासाठी ते अमूक एक केमिकल टाकावे असे देखील सांगतात. मी लांबलचक बोलण्यापेक्षा मुद्यावर येतो. महाबळेश्वरला स्ट्रॉबेरीची शेती होते. स्ट्रॉबेरी हे फळ उंचीवर जेथे थ्रंड वातावरण आहे तेथे होते. स्ट्रॉबेरी आपण वाईमध्ये करायला गेला तर ती चवदार होत नाही. स्ट्रॉबेरीच्या छोट्याशा रोपापासून ते शेवटचे प्रोडक्ट हातामध्ये येईपर्यंत केमिकलचा वापर होतो. स्ट्रॉबेरी लावताना केमिकलची फवारणी होते, ते फळ मोठे होण्यासाठी केमिकलचा वापर केला जातो. अचानक पाऊस पडला किंवा धुके पडले तर त्या फळावर आजार पसरतो. त्यासाठी वेगळ्या केमिकलची फवारणी करावी लागते. त्यानंतर त्याला रंग येण्यासाठी देखील केमिकलचा वापर करावा लागतो. स्ट्रॉबेरीचा नॅचरल रंग हा हिरवा आणि जरासा लालसर असतो. परंतु, ते फळ लालसर येण्यासाठी त्यावर केमिकलची फवारणी करावी लागते. स्ट्रॉबेरी हे फळ बाजारपेठेमध्ये येते तेव्हा ते कुठेही धुतले जात नाही. आपण ते फळ खातानाच धुतो. स्ट्रॉबेरीमध्ये मोठ्या प्रमाणावर केमिकल वापरण्यात येते. अशी ही स्ट्रॉबेरी खाल्ल्यानंतर माणसांना देखील त्रास होऊ शकतो. ..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

सभापती महोदया, या महाराष्ट्रामध्ये आधुनिक शेती करताना ऑर्गेनिक शेतीवर जास्त भर दिला पाहिजे. आज महाराष्ट्रात आपण पाहतो की, गोदरेज सारखी प्रायव्हेट कंपनी आपला स्वतःचा माल एपीएमसी मार्केटमध्ये न आणता डायरेक्ट नेतात. ते म्हणतात की, आम्ही ऑर्गेनिक शेती करतो. आज ऑर्गेनिक शेतीचे महत्व सगळीकडे वाढत असल्याचे आपण बघतो.

F-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

सभापती महोदय, आता ऊसाची शेती सुध्दा ऑरगॅनिक होऊ लागलेली आहे, गुळाचे उत्पादन सुध्दा ऑरगॅनिक होऊ लागले आहे. तसेच आमचा माल ऑरगॅनिक आहे असे स्टँपिग करुन प्रॉडक्ट विकले जात आहे. भविष्यात जे लोक ऑरगॅनिक शेती करतील अशा शेतकऱ्यांना सन्मान राज्य सरकारच्या माध्यमातून होण्याची आवश्यकता आहे. तालुका शेती अधिकाऱ्याच्या माध्यमातून जे शेतकरी ऑरगॅनिक शेती करतात त्यांना पहिला क्रमांक द्यावा असे मला वाटते. भविष्यामध्ये सरकारने, मंत्री महोदयांनी आणि कृषी विभागाने ऑरगॅनिक जास्तीत जास्त कशी होईल यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन केले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी मांडलेल्या मुद्याप्रमाणे आपण केमिकल औषध निर्माण करणाऱ्या कंपन्यावर काही बंधणे घालणार आहोत की, नाही ? या कंपन्यावर भविष्यात बंधणे घातले नाही तर आपल्याला फार मोठया संकटांना तोड द्यावे लागणार आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव हे शाकाहारी आहेत, नागपूरला आल्यापासून त्यांचा गळा बसला आहे. ते आज या ठिकाणी जे काही भाजीपाला खातात ती ऑरगॅनिक आहे की, केमिकलयुक्त आहे, जे पाणी पितो ते बिसलरीचे आहे की, नळाचे आहे याची काही सुध्दा माहिती मिळत नाही. त्यामुळे यासंदर्भात आपल्या सर्वांना यासंदर्भात विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय,आपल्या राज्यातील शेतकरी बलवान झाला पाहिजे, आपल्यावर त्याला उभे राहता आले पाहिजे, त्याला अर्थसहाय्य द्या, दुष्काळाच्या माध्यमातून निधी द्या. परंतु शेतकऱ्याने आता ऑरगॅनिक शेतीकडे वळावे यासाठी त्यांचे प्रबोधन करण्याची जरुरी आहे. टप्प्या टप्प्याने शेतकरी ऑरगॅनिक शेती वळला पाहिजे. यदाकदाचित राज्य सरकारला कायदा करावा लागला व त्या कायद्याच्या अंतर्गत केमिकल कंपन्यानी 100 टक्के केमिकलचा वापर करता कामा नये. आपल्याला काही केमिकल कंपन्यावर बंदी घालावी लागणार आहे. तंबाखूमुळे, सिगारेटमुळे मोठया प्रमाणात कॅन्सर होत आहे. कॅन्सर होत असतांना सुध्दा व्यसन करण्याचे ते सोडत नाही. परंतु ते जेव्हा आजारी पडतात तेव्हा ते व्यसन सोडून देतात. परंतु राज्य सरकारने ज्या कंपन्यामध्ये केमिकल औषधाचे उत्पादन होते त्यांच्यावर बंदी घालण्याचा कठोर निर्णय घेतला तर

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

महाराष्ट्रातील नागरिकांचे,शेतकऱ्यांचे आणि शेतीचे नुकसान होण्यापासून आपण वाचवू शकू. केमिकल फवारणीमुळे आता शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होण्यास सुरुवात झाली आहे. केमिकलच्या फवारणीमुळे जमिनीची ग्रॅव्हीटी आता संपुष्टात आलेली आहे. केमिकल तयार करणाऱ्या कंपनीवर शासनाने बंदी घालण्याचा कठोर निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ऑरगॅनिक फार्मिंगकडे वळविण्याची वेळ आलेली आहे व हे कार्य नवीन सरकारच्या, मंत्री महोदयांच्या हातून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमतरसिंह पंडित व त्यांच्या सहकार्यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, भारतामध्ये शेती पिकावर केमिकलचा मोठया प्रमाणात वापर होत असल्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. कोकणामध्ये आंब्याचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. परंतु आंब्यावर जेव्हा फवारणी होते त्यावेळेस पडलेल्या कणांमुळे कोंबडया, पक्षी मरत असतात. त्यामुळे ही केमिकल किती पॉवरफूल आहेत याचा आपल्याला अंदाज येईल.

सभापती महोदय, कोकणामध्ये आंब्याचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते परंतु हव्यासापोटी, पीक लवकर यावे, जास्त यावे यासाठी आंब्यावर कल्टार वापरले जाते. कल्टार एकदा वापरल्यानंतर त्या झाडाचं उत्पादन कमी होण्यास सुरुवात होत असते.

सभापती महोदय, पूवी पंजाबला गव्हाचे कोठार म्हटले जात होते. परंतु त्या ठिकाणी गव्हावर कमिकल फवारणी होऊ लागल्यामुळे येथील गव्हाचे उत्पादन कमी झाले आहे. पूर्वी पूर्ण देशाला पंजाब गहू पुरवत असे परंतु आता तसे राहिलेले नाही.

सभापती महोदय, दोपोली कृषी विद्यापीठात ऑरगॅनिक शेतीचे संशोधन होण्याची आवश्यकता आहे. केमिकल कंपन्या आमचे प्रॉडक्ट वापरले तर पीक जास्त येईल, कमी कालावधीत येईल व चांगल्या दर्जाचे येईल अशा प्रकारची जाहीरात करीत असतात परंतु ते खरे नाही.

सभापती महोद, मुंबईच्या लोकलमधून आपण जेव्हा प्रवास करतो तेव्हा ट्रॅकच्या दोन्ही बाजूला घाण पाण्यामध्ये भाजीपाला लावल्याचे दिसून येते. परंतु यावर कोणाचेही नियंत्रण नाही. घाण पाण्यातील भाजीपाला हा शरीराला हानिकारक असतात. शेती पिकावर, भाजीपाल्यावर,फळांवर केमिकलचा वापर कमीत कमी झाला तर आपल्या जनतेचेसाठी ते चांगले राहील.

सभापती महोदय, केमिकल फवारणीमुळे आंब्याची निर्यात बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुसान झालेले आहे. अमेरिकेने तर आपल्या देशातील आंबा इम्पोर्ट करण्यावर बंदी घातलेली आहे. आपल्याकडील सर्व शेतमाल ऑरगॅनिक होण्यासाठी संशोधन करुन शेतकऱ्यांना प्रबोधन करण्याची वेळ आलेली आहे. कमिकल भाजीपाला खाल्ल्यामुळे आपल्याकडे कॅन्सरचे प्रमाण मोठया

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर.....

प्रमाणात वाढले आहे त्यामुळे आपली शेती ऑरगॅनिक करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवा.

-----

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, या ठिकाणी अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. खरे म्हणजे हेल्थ इज वेल हीच खरी संपदा आहे. शरीर स्वस्थ असले तर जगणे सोपे जाते म्हणून आपल्या शरीराकडे जास्त लक्ष देत असतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यात हवामानानुसार किंवा जमिनीच्या सुपीकतेनुसार पीक घेलले जाते. हापूस आंबा, काजू कोकणात पिकवला जातो तर नाशिकमध्ये द्राक्ष पिकवले जातात. नागपूरमध्ये संत्रा तर जळगावमध्ये केळी पिकवली जाते. पश्चिम महाराष्ट्रात भाजी-पाला आणि ऊसाचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. स्ट्रॉबेरीचे पीक महाबळेश्वर मध्ये मोठया प्रमाणात घेतले जातात. WHO ने आपल्या निष्कर्षात असे म्हटल् आहे की, शेती पिकावर व फळांवर ज्या काही केमिकल फवारण्या केल्या जातात त्यामुळे 100 माणसांच्या मागे 20 माणसे कॅन्सरमुळे मरतात ही वस्तुस्थिती आहे. असे जर होत असेल तर या राज्यामध्ये नेमके काय सुरु आहे ? जे बोगस बियाणे किंवा बोगस किटकनाशके तयार करुन ते जनतेच्या जीवनात विष कालवण्याचे काम करतात. त्यामुळे अशा कंपन्यावर शासन फौजदारी कारवाई करणार आहे काय ? हे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही असे आम्हाला वाटत होते परंतु बोगस कीटक नाशकांमुळे 50 हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान होत असेल तर या राज्यातील जनता या सरकारला माफ करणार नाही.

आपल्या राज्याला चांगले कृषी मंत्री मिळाले हे आपले भाग्य आहे. माननीय कृषी मंत्र्यांना शेतीचे चांगल्या प्रकारचे ज्ञान आहे. आपल्या राज्यातील कृषी संशोधन केंद्र आहे त्यांनी आपल्या राज्यातील जमीन सुपीक कशी होईल याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. शेणखतामुळे,कंपोस्ट खतामुळे जमिनीचा पोत सुधारुन पीक सुध्दा चांगले येते.

सभापती महोदय, मुंबईतील लोकलच्या दोन्ही साईडला गटारीच्या पाण्यामध्ये भाजीपाला पिकवला जातो. खरे म्हणजे हा भाजीपाला नसून तो विषयुक्त भाजीपाला असून तो भाजीपाला मुंबईची जनता खात असते. या खराब भाजीपाल्यामुळे मुंबईतील किती तरी लोकांना कॅन्सर व इतर रोग होत असतात त्यामुळे हे कोठे तरी थांबले पाहिजे. लोकांच्या जीवाशी जो खेळ खेळला जात आहे तो थांबण्याची आवश्यकता आहे. या सर्व प्रकाराकडे राज्य शासनाचे संपूर्ण दुर्लक्ष आहे.

श्री.प्रकाश गजभिये.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी ऑरगॅनिकचा विषयावर चर्चा उपस्थित केल्यामुळे या विषयावर शासनाने काही तरी निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदय, पपई लवकर पिकावी म्हणून तिच्यामध्ये इंजक्शनने केमिकल सोडले जाते.हरभऱ्याला हिरवा रंग यावा म्हणून त्याच्यावर केमिकल फवारली जातात अशी परिस्थिती आहे.

G-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

जे लोक दर्जेदार कीटकनाशके तयार करतात त्यांचा सन्मान झाला पाहिजे. परंतु राज्यामध्ये हजारो नागरिक कॅन्सरने मरत असतील तर त्यासाठी सरकारला जबाबदार धरुन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचा किंवा अन्य कोणता गुन्हा दाखल करणार याचा निर्णय आजच करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे ( कृषी व फलोत्पादन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंवतराव जाधव, सतीश चव्हाण, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री भाई गिरकर व प्रकाश गजभिये यांनी आपली मते मांडली.

सभापती महोदय, कीटकनाशके आणि जैविक कीडनाशके संदर्भात केंद्र सरकारचा 1968 चा अधिनियम आहे. या अधिनियमानुसार तयार करण्यात आलेल्या कीटकनाशकांच्या संदर्भात राज्य सरकारनेसुद्धा जी काही कारवाई करणे आवश्यक आहे ती निश्चितपणे केलेली आहे. या संदर्भात नागपूर आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठात एक पीटीशन दाखल करण्यात आली होती आणि त्या पीटीशनच्या अनुषंगाने न्यायायालने जे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार देखील कार्यवाही केलेली आहे. त्या शिवाय कृषी आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली दिनांक 16.8.2010 रोजी समिती गठीत करण्यात आली. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी केला. या समितीमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. या समितीने काही कठोर निर्णय देखील घेतलेले आहेत. शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. अलीकडेच केंद्र सरकारने दिनांक 7 डिसेंब, 2015 रोजी कापूस - बियाणांच्या संदर्भात आदेश पारीत केले आहेत. या संदर्भात एक मॅन्युअल किंवा एक नियम किंवा एक कायदा आणावा जेणेकरुन शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही त्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे निश्चितपणे पाठपुरावा करील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बीटी कॉटनचा मुद्दा मांडला. मागील अनेक वर्षापासून बीटी कॉटनचे बियाणे अतिशय लोकप्रिय होत आहे. दुष्काळी भागामध्ये कमी पावसावर येणारे बीटी कॉटनचे बियाणे हे जास्तीचे लोकप्रिय होत आहे. या बियाणांचा पुरवठा कमी होत असल्यामुळे गेल्या काही कालखंडामध्ये खास करुन बीड जिल्ह्यामध्ये बीटी कॉटनचे बियाणे घेण्यासाठी इतकी गर्दी झाली की, त्या ठिकाणी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला आणि शेतकऱ्यांना बियाणे द्यावी लागली. त्यावेळी बीटी कॉटन बियाणांच्या पाकिटाची किंमत दोन ते अडीज हजार रुपयांपर्यंत गेली. तेव्हा या संदर्भात सरकारने हस्तक्षेप केला. या वर्षी बीटी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे.....

कॉटन बियाणांची मागणी 1 कोटी 70 लाख पाकिटांची होती परंतु आपल्याकडे 1 कोटी 90 लाख पाकिटे प्राप्त झालेली आहेत. वितरकाकडे बियाणांची पाकिटे प्राप्त झाली त्यातील 25 लाख पाकिटे कंपन्यांकडे पाठविण्यात आली. तेव्हा लॉ ॲण्ड ऑर्डरचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या फसवणुकीचा प्रश्न, जास्तीची किंमत देण्याचा प्रश्न असे जे काही प्रश्न निर्माण होत होते तसे प्रश्न आता बहुतांश ठिकाणी झालेले नाहीत.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या बियाण्यांची किंमत कमी झाली पाहिजे. तेव्हा राज्य शासनाने दिनाक 8.6.2015 रोजी एका अधिसूचनेद्वारे प्रत्येक पाकिटामागे 100 रुपये कमी करण्याची सूचना जारी केली. अशाप्रकारे बियाणांची किंमत कमी करण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी या ठिकाणी आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेश राज्याची तुलना केली. मी त्यांना सांगू इच्छितो की, इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यात बियाणांची किंमत कमी आहे. दिनाक 8.6.2015 च्या अधिसूचनेद्वारे प्रत्येक पाकिटामागे 100 रुपये कमी केली तसेच कोणत्याही वितरकाने एमआरपीपेक्षा जास्त किंमत घेऊ नये अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. विविध कंपन्याच्या माध्यमातून बीटी कॉटनची बियाणे तयार करण्यात आलेली आहेत. त्या अनुषंगाने दिनांक 7.12.2015 रोजी कापूस बियाणे किंमत नियंत्रण आदेश 2015 नुसार केंद्र सरकारने बियाण्यांच्या बाबतीत देशपातळीवर एकच किंमत असावी या संदर्भात अधिसूचना जारी केलेली आहे. हा कायदा केंद्र सरकारचा आहे. त्यामुळे राज्य सरकारला निश्चितपणे मर्यादा येतात. असे असताना सुद्धा राज्य सरकारने कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. त्या समितीच्या माध्यमातून कीटकनाशके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. या समितीने कीटकनाशकांचे 4 हजार 874 नमुने तपासले, चार प्रकरण्ांमध्ये पोलीस केस करण्यात आली, 30 प्रकरणांमध्ये विक्री परवाना निलंबित करण्यात आला, 43 प्रकणांमध्ये विक्री परवान रद्द केले, 9 प्रकरणांमध्ये जप्ती करण्यात येऊन त्यामध्ये 35 लाख रुपयांचे किटकनाशके जप्त करण्यात आली. या वर्षामध्ये 96 प्रकरणांमध्ये न्यायालयात दावे दाखल करण्यात आलेले आहेत.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे.....

सभापती महोदय, बीटी कॉटन बियाण्यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. बीटी कॉटनचे पीक कमी पावसावर येत असल्यामुळे आणि जास्त उत्पादन देत असल्यामुळे ते जास्त लोकप्रिय होत आहे. तेव्हा येणाऱ्या हंगामामध्ये या बियाण्यांच्या किंमती कमी करण्यासाठी राज्य शासन निश्चितपणे आश्वासित करील एवढे मी या निमित्ताने सांगतो. गेल्या हंगामामध्ये प्रत्येक पाकिटामध्ये 100 रुपये कमी केले होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळी परिस्थित्ी निर्माण झालेली आहे, शेतकरी मेटाकुटीला आलेले आहेत...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील )**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझी अशी माहिती आह की, यावर्षी ते पेटंट संपत आहे. मॉनसेंटो कंपनीस एका पाकिटामागे 300 रुपये द्यायचे होते ते आता द्यावे लागणार नाहीत. 300 रुपये कमी करावे अशी आमची मागणी नाही. किमान या वर्षीची दुष्काळजन्य परिस्थिती पाहता किमान 100 रुपये कमी करावेत. माननीय मंत्री म्हणाले होते की,ते 500 रुपयांपर्यंत आणण्याचा विचार करीत आहोत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या चर्चेमध्ये हस्तक्षेप करावा अशी विनंती आहे.

.........H-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी सुरुवातीलाच सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. सेंद्रिय शेती, जैविक औषधे, बियाणे इत्यादी विषयाच्या संदर्भात या सभागृहात कमी चर्चा होते. परंतु आज मात्र या विषयावर चर्चा उपस्थित करुन काही प्रश्न विचारण्यात आले किंवा काही प्रश्न निर्माण करण्यात आले. महोदय, ही चर्चा खरोखरच स्वागतार्ह आहे. या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने तीन-चार महत्त्वाचे प्रश्न निदर्शनास आले आहेत.

सभापती महोदय, बीटी कॉटन बियाण्यांच्या संदर्भात मागच्या वर्षी मी निर्णय घेतला होता की, एका किलोमागे किमान 250 रुपये किंमत कमी केली पाहिजे. तसेच थैलीमागे 100 रुपये कमी करण्याचा निर्णय घेत असताना बियाणे कंपन्यांसोबत मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला. तद्नंतर हे प्रकरण न्यायालयात गेले. माननीय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला की, सरकारने घेतलेला निर्णय योग्य आहे. त्यामुळे या बियाण्यांची किंमत किलोमागे 250 रुपयांनी कमी करता आली. आता या वर्षी ही किंमत 500 रुपयांपर्यंत कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने 15 दिवसांपूर्वी काही कायद्यांमध्ये बदल केले आहेत. वास्तविक पाहता बियाणे नियंत्रक कायदा, औषधी नियंत्रक कायदा किंवा खते नियंत्रक कायदा इत्यादी कायदे हे केंद्र सरकारचे आहेत. त्यामुळे या कायद्यांतर्गत केंद्र सरकार दर ठरविणार आहे. आम्ही केंद्र सरकारला विनंती केली आहे की, मागच्या वर्षी न्यायाललयात संघर्ष करुन किंमत कमी केली आणि आता या वर्षी सुध्दा अपेक्षा आहे की, या किंमती किलोमागे 500 रुपयांनी कमी झाल्या पाहिजे. सभापती महोदय, केंद्र सरकारचा आग्रह आहे की, देशातील सर्व राज्यांमध्ये खते व बियाण्यांच्या सारख्या किंमत राहील्या पाहिजे. मी स्वत: या बाबत केंद्रीय स्तरावर चर्चा करीत आहे. देशात सर्व राज्यांमध्ये सारख्या किंमती राहतील हे ठीक आहे. परंतु देशातील चार राज्यांमध्ये बीटी बियाण्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यात महाराष्ट्र राज्य हे एक आहे. त्यामुळे अन्य राज्यात किंमती कमी झाल्या काय किंवा जास्त झाल्या काय यात फारसा फरक पडत नाही. परंतु ज्या ठिकाणी बीटी बियाण्यांची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे त्या ठिकाणी केंद्र सरकारने रिलीफ



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

दिला पाहिजे. केंद्र सरकार सर्व राज्यात सारखे दर ठेवत असेल तर या बियाण्यांच्या मागे 50 ते 100 रुपयांपर्यंत सबसिडी दिली पाहिजे. हे बियाणे शेतकऱ्यांना कमी किंमतीत देण्याचा आग्रह आम्ही केंद्र सरकारकडे धरत आहोत. त्यामुळे या किमती केंद्र सरकारच्या माध्यमातून निश्चितपणे कमी होतील. यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, सेंद्रिय शेतीच्या संदर्भात बऱ्याच जणांनी चिंता व्यक्त केली. जैविक औषधे, सेंद्रिय शेती किंवा रासायनिक खतांची फवारणी असे अनेक विषय आहेत. शेतीमध्ये रासायनिक खतांचा अमर्याद वापर होत असल्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केल्या आहेत. हे खरे आहे की, शेती करीत असताना अलीकडच्या कालखंडात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा वापर होऊ लागला आहे. या रासायनिक खतांचे दुष्परिणाम आपल्याला आता जाणवू लागले आहेत. पूर्वी आपल्याला अन्नधान्यासाठी परदेशावर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे त्या कालखंडात रासायनिक खतांचा वापर करणे गरज बनली होती. आताच्या कालखंडात रासायनिक खतांचा वापर करण्याची गरज नाही. राज्यात आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, रासायनिक खताचा अतिवापर केल्यामुळे, काही ठिकाणी धरणाच्या क्षेत्रात पाण्याचा अतिवापर केल्यामुळे जमिनीची उपजक क्षमता कमी होऊ लागली आहे. सभापती महोदय, बीटी बियाणे असे आहे की, त्यांचा असाच वापर होत राहिला तर पुढील कालखंडात राज्यातील शेती वाळवंट होईल की काय अशी भीती वाटू लागली आहे. त्यामुळे मागच्या वर्षापासून सेंद्रिय खतांचा सेंद्रिय शेतीमध्ये अधिकाधिक वापर झाला पाहिजे, सेंद्रिय शेतीवर जोर दिला पाहिजे म्हणून शासन प्रयत्न करीत आहे. मागच्या सरकारच्या कालखंडात याकडे लक्ष वेधण्यात आले होते. परंतु त्या काळात निधीची तरतूद नव्हती. आता केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून असे सुचवित आहोत की, राज्य सरकारने सेंद्रिय शेतीच्या संदर्भातील प्रकल्प तयार केला आहे. त्यानुसार 50 शेतकऱ्यांनी एकत्र येऊन समूह सेंद्रिय शेती करावी. अशा समूह शेतीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या वर्षी 65 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. ही तरतूद प्रथमच करण्यात येत आहे. यासाठी अधिक तरतूद करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढील कालखंडात रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय शेतीवर अधिक भर देण्यासाठी शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सभापती महोदय, जैविक खतांच्या बाबतीत राज्य सरकारवर मर्यादा आहेत. बियाणे किंवा खतांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक मोठ्या प्रमाणावर होते हे खरे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे, असे शासनाचे मत आहे. परंतु या संदर्भातील प्रकरणे न्यायालयात गेल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदेश दिले आहेत की, या संदर्भात कठोर कारवाई करु नये. माननीय न्यायालयाने बिगर नोंदणीकृत कृषी उत्पादनाच्या बाबतीत हा आदेश दिला आहे. त्यामुळे राज्य सरकारला शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या उत्पादकांवर कठोर कारवाई करण्यावर मर्यादा येतात. मला वाटते शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई केल्याशिवाय या परिस्थितीत बदल होणार नाही. त्यामुळे या बाबत माननीय न्यायालयाला विनंती करण्यात येणार आहे. राज्य सरकारचे मत आहे की, अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्याला क्षमा करता कामा नये. शेतकऱ्यांची फसवणूक होत असेल, बियाणे, खते, फवारणी औषधी इत्यादींच्या बाबतीत जर व्यापाऱ्यांनी फसवणूक केली तर त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई केली पाहिजे. तसेच हा गुन्हा अजामिनपात्र असावयास पाहिजे. यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस केली आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारकडे असलेल्या अधिकारानुसार राज्याने 96 कोर्ट केसेस पीक संरक्षण औषधांच्या संदर्भात दाखल केल्या आहेत. तसेच 30 परवाने निलंबित करण्यात आले आहेत, 43 परवाने रद्द केले आहेत आणि 9 परवान्यांवर जप्तीची कारवाई सुरु केली आहे. खताच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या प्रकरणी 123 कोर्ट केसेस असून, 9 पोलीस केसेस आहेत. 70 परवाने निलंबित केले असून, 65 परवाने रद्द केले आहेत आणि 539 ठिकाणी विक्री बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच 41 ठिकाणी जप्तीची कारवाई केली असून, 592 मे.ट. साठा अलीकडेच जप्त करण्यात आला आहे. बियाण्यांच्या संदर्भात 163 कोर्ट केसेस आहेत. तसेच 92 पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारची कारवाई राज्य सरकारच्या माध्यमातून सातत्याने होत आहे. पण ही कारवाई पुरेशी नाही. राज्य सरकारच्या माध्यमातून जी कारवाई केली जाईल तिचा संबंधितांना धाक वाटला पाहिजे. मानवी जीवनाच्या दृष्टीने कायदे करीत असताना शेतीच्या संदर्भात सुध्दा कायदे केले पाहिजे. या संदर्भात दिल्ली

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

येथील दोन्ही बैठकीत राज्य सरकारने आग्रह धरला की शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे या संदर्भातील कायदे अधिक कठोर केले पाहिजे. केंद्र सरकारने हे कायदे कठोर करण्याची भूमिका स्वीकारली आहे. आता केंद्र सरकारने हे सर्व अधिकार स्वतःकडे घेतले आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडे या किंमती कमी-जास्त करण्याचा अधिकार राहिलेला नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या मध्यस्थीने या किंमती कमी करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ठिबक सिंचनाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. राज्यात विदर्भात वगळता उर्वरित ठिकाणी ठिबक सिंचनाच्या संदर्भात 15 ऑक्टोबर ते 15 नोव्हेंबर या दरम्यान ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविले होते. त्यामुळे आता या मुदतीत वाढ करणे अवघड आहे. परंतु विदर्भातील 11 जिल्ह्यात अर्ज प्राप्त करुन घेण्याची मुदत दि.8 डिसेंबर, 2015 ते 27 जानेवारी, 2016 या कालावधीपर्यंत सुरु ठेवली आहे. त्यामुळे उपरोक्त कालावधीत ई-ठिबकची आज्ञावली विदर्भापुरती सुरु राहणार आहे. कारण विदर्भामध्ये विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम सुरु आहे. केंद्र सरकारकडून सदरहू कार्यक्रमाच्या माध्यमातून पैसा मिळत आहे. त्यामुळे विदर्भासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत वाढविता आली आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आमचे म्हणणे एवढेच आहे की, या संदर्भात सर्वत्र एकच निकष निश्चित केले पाहिजे. आपण दुष्काळी भागातील आणेवारी लक्षात घ्यावी. त्यानुसार 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या सर्व गावांना या कार्यक्रमात समाविष्ट करुन घ्यावे. केंद्र सरकारचा निधी केवळ विदर्भालाच कसा येतो येतो, हा निधी अन्य दुष्काळी भागाला का येत नाही ? या संदर्भातील निर्णय घेत असताना काही तरी निकष ठरविले पाहिजे. सभापती महोदय, राज्य सरकारने आणेवारीचे काही निकष ठरविले तर राज्यातील उत्तर महाराष्ट्रातील काही भाग, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग सुध्दा या कार्यक्रमात समाविष्ट करता येतील.

..आय...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, फार पूर्वीपासून हा कार्यक्रम घेतलेला आहे. जवळपास 4-5 वर्षांपासून विदर्भाच्या संदर्भातील हा कार्यक्रम आधीच घेतला आहे. हा कार्यक्रम नव्याने विदर्भासाठी घेतला आहे अशी स्थिती नाही. संपूर्ण् राज्यभरात किती आवश्यकता आहे आणि किती अर्ज येऊ शकतात याचा अंदाज घेऊ. शेवटी अनुदानावर मर्यादा आहेत. सर्वांनाच अनुदान देणे शक्य नाही. टंचाईग्रस्त तालुके, गावे जाहीर केले आहेत अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांसाठी काही मदत करता येत असेल तर राज्य शासन जरूर विचार करेल. जैविक खतांवर बंधन घालण्याबाबत सांगितले आहे. बऱ्याचदा झाईम वापरतात, जैविक खते वापरतात, शेतकऱ्यांची फसवणूक करतात. शेतकरीही असा वेडा असतो की, त्याला फवारणी करून नुसते हिरवे दिसले की चांगला परिणाम झाला असे त्याला वाटते. आम्ही त्या संदर्भातील संपूर्ण अहवाल केंद्र सरकारला पाठवित आहोत की, याचा सारासार विचार करून, योग्य आणि अयोग्य या संदर्भातील भूमिका घेताना, फसवणूक होत असेल तर त्याबाबतीत तत्काळ त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. आता हे सर्वच अनरजिस्टर आहेत, त्यांना काहीही नाही. बरेच जण यामध्ये असे आहेत की, कुणीही येतो, तिकडे शेवाळे करतो, ते इकडे तयार करतो आणि विकायला लागतो. नेमके काय चालले आहे, काय नाही, या संदर्भातील माहिती घेताना त्या संदर्भात कायद्यामध्ये कठोर कारवाई करण्याचे बंधन नाही. माननीय न्यायालयामध्ये गेल्यानंतर माननीय न्यायालय सांगत आहे की, यामध्ये कठोर कारवाई करू नका. इतक्या मर्यादा घालून ठेवल्या आहेत, या मर्यादांच्य अधीन राहून सरकार कार्यवाही नक्कीच करेल. सन्माननीय सदस्यांनी चांगली चर्चा केली, खूप विषय मांडले आहेत. सभापती महोदय, द्राक्ष उत्पादकांचाही विषय मांडला की, द्राक्षांच्या संदर्भात नुकसानभरपाई गरजेची आहे. रासायनिक खतांचे काही अंश राहिल्यामुळे युरोपियन कंट्रीजमध्ये आपली द्राक्षे नाकारली. आपल्याकडून अपेडाकडे जात असताना द्राक्षांचे निकष बरोबर होते, ते त्यांनी दिले त्या प्रमाणात होते. परंतु युरोपियन युनियनकडे ज्यावेळी ते गेले, त्यांनी तेथे त्याचे निकष बदलले. मधल्या ट्रँझिट पिरिएडमध्ये आपले द्राक्ष सापडल्यामुळे त्या काळात ते परत आले. आता आपण निर्यातक्षम द्राक्षांसाठी ग्रेपनेटची प्रणाली वापरत आहोत, आंबा निर्यातीसाठी मँगोनेट संगणक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

प्रणालीचा वापर करत आहोत, डाळिंबासाठी अनारनेट संगणक प्रणाली वापरत आहोत, भाजीपाला निर्यातीसाठी व्हेजनेट प्रणाली वापरत आहोत, अशा 4 संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत आणि त्याद्वारे शेतकऱ्यांना खालील बाबींवर मार्गदर्शन केले जाते, निर्यात करावयाच्या कृषी उत्पादनाच्या प्लॉटची कृषी विभागाकडून नोंदणी करणे, केवळ नोंदणीकृत व कृषी विद्यापीठांची शिफारस केलेल्या किटकनाशकांचा वापर करणे, निर्यात होणाऱ्या मालाची तपासणी केली जाणे व निर्यातीस योग्य असेल तसे प्रमाणपत्र दिले जाणे, शेतकऱ्यांना निर्यातक्षम कृषी उत्पादन करण्यासाठी कृषी विभाग, पणन विभाग, अपेडा इत्यादीमार्फत मार्गदर्शन करणे, शेतकरी कर्मचारी यांना निर्यातक्षम कृषी उत्पादन घेण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण वर्ग आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करणे, नियंत्रित अशा स्वरूपाचे किडनियंत्रणाचे, रासायनिक खतांच्या संदर्भात किती मर्यादेपर्यंत कार्यवाही करावी याचे उपाय सांगणे, सेंद्रिय शेतीकडे जाण्याच्या संदर्भात प्रोत्साहन देणे, जैविक औषधांचा वापर करताना नेमक्या कोणत्या जैविक औषधांचा कोणत्या ठिकाणी वापर करणे याचे प्रशिक्षण देणे आणि प्रत्यक्ष शेती करताना ठिब सिंचनाच्या माध्यमातून किंवा योग्य पाण्याचा वापर करून शेतीची उपजकक्षमता कशी वाढेल या दृष्टीने प्रयत्न करणे. आता यासाठीचा एक कार्यक्रम तयार केला आहे. शेतकऱ्यांना त्या संदर्भात नक्कीच फायदा होईल असा मला विश्वास आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी आम्ही सहमत आहोत. शेवटी शेती टिकली पाहिजे, वाढली पाहिजे आणि आरोग्याला घातक असणाऱ्या बाबी कमी करता आल्या पाहिजेत अशा स्वरूपाचा प्रयत्न सरकार करत आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अतिशय समर्पक उत्तर दिले आहे. आता बायोलॉजिकल प्रॉडक्टला प्रोत्साहन देऊ असे सांगितले. प्रॉडक्ट बायोलॉजिकल आहे म्हणून शेतकरी विकत घेतो. परंतु ज्यावेळी प्रॉडक्ट टेस्टिंगला जाते त्यावेळी सर्व गोष्टी त्यामध्ये आढळत आहेत. शासनाने याबाबत काही तरी कठोर भूमिका घेतली पाहिजे. आपण नेहमी म्हटले आहे की, सदर बाबतीत न्यायालयाचे आदेश आहेत. आपल्याकडून अशा प्रॉडक्टचे टेस्टिंग सुध्दा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ....

होत नाही. बायोलॉजिकल प्रॉडक्ट आहे म्हणून शेतकरी मार्केटमधून विकत घेत आहे. परंतु त्याचे टेस्टिंग नाही, त्यावर काहीच निर्बध नाही, यावर काही तरी निर्बंध असले पाहिजेत ही विनंती आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, बारामतीमधून भाजीपाला निर्यात करण्यात येतो. आता निर्यातक्षम भाजीपाल्यांच्या संदर्भातील टेस्टिंग युनिट, लॅबची संख्या वाढवत आहोत. आता बारामतीला भाजीपाल्याच्या संदर्भातील युनिट घेत आहोत. नाशिकला द्राक्ष, डाळिंब याच्या संदर्भात इंडो-इस्त्रायलच्या मायमायतून सहकार्य करण्याचा प्रयत्न आहे. केळी,, संत्रे, आंबा यांच्या बाबतीत इंडो-इस्त्रायलबरोबर कमिटमेंट झाली आहे. आता यापुढे अशाच लॅब विकसित करून, तेथे कोणत्या संदर्भात कोणती खते आहेत, नियंत्रण आहे यासाठीचे संशोधन, इस्त्रायलने यशस्वीरित्या केले ते तंत्रज्ञान स्वीकारून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा आता आपण प्रयत्न करत आहोत. लॅब आहेत. संशयास्पद नमुन्यांची तपासणी करण्याच्या संदर्भात सूचना दिल्या आहेत. भेसळीच्या संदर्भात एफसीओ किंवा इनसेक्टिसाईड ॲक्टनुसार कारवाईच्या सूचना दिलेल्या आहेत. पण ही गोष्ट खरी आहे की, आपल्याकडे असलेल्या लॅबची संख्या वाढविल्याशिवाय आपल्याला जास्त काही करता येणार नाही. आता आपण मोठ्या प्रमाणात निर्यातीकडे वळू लागलो आहोत. परंतु माल तेथे गेल्यावर जर रिजेक्ट झाला तर करोडो रूपयांची हानी होते. त्यामुळे आता या लॅब सक्षम करण्याच्या दृष्टीने आपला प्रयत्न आहे. द्राक्ष, ऊस, ज्वारी, केळी, संत्रा संशोधन केंद्र तसेच औरंगाबादला असणारे विज्ञान कॉलेजमधील आंबा संशोधन केंद्र अशा सर्व संशोधन केंद्रांचा एक विशेष कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. काही काळ लॅब मजबूत करण्यासाठी जाणार आहे. आपण प्रयत्न करत आहोत. केंद्र सरकारने आग्रही भूमिका घेतली आहे. सॉईल हेल्थ कार्ड देण्याच्या संदर्भात निर्णय मागच्या वर्षी, एक वर्ष झाले, केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे. आपल्या राज्यात सॉईल हेल्थ कार्ड दाखवून मातीचे परिक्षण करणे, मातीमध्ये कोणती खते वापरतात, कोणते परीक्षण केले जाते, कोणती पिके आहे याची माहिती घेणे आणि त्याचा सरळ संपर्क या विभागाशी असावा म्हणून मोबाईलद्वारे प्रशिक्षण देणे गरजचे आहे. मला आनंद आहे आणि अभिमान वाटतो की, आपल्या राज्यामध्ये 14 लाख शेतकऱ्यांनी या वर्षी सॉईल हेल्थ कार्ड घेतले आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

देशात आपल्या राज्याचा पहिला क्रमांक आला आहे. दुसरी राज्ये साडे चार लाखापर्यंत गेली आहेत. आपण 14 लाखापर्यंत गेलो आहोत आणि यावर्षी 14 लाखांची संख्या 40 लाखांपर्यंत नेण्याचा आपला प्रयत्न आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांना सरळ मदत होऊ शकेल. सभापती महोदय, डायरेक्ट 24 तास संपर्क करू शकता यावा म्हणून एक टोल फ्री नंबर देखील शेतकऱ्यांना आता दिला आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, जैविक किडनाशकाच्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी सांगितले की, न्यायालयाने स्टे दिल्यामुळे कोणताही कोर्स ऑफ ॲक्शन घेता येत नाही. मला मान्य आहे. पण या संदर्भातील इंटरव्हेंशन करणे गरजेचे आहे. माननीय मंत्र्यांनी मान्य केले आहे की, चुकीच्या पध्दतीने शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. माननीय मंत्र्यांनी मान्य केले आहे म्हणून याचे तातडीने इंटरव्हेंशन करणे शासनाच्या वतीने गरजेचे आहे. मी माननीय मंत्र्यांना या संदर्भात विनंती करतो.

सभापती महोदय, बियाणे, बीटी बियाणे व खते खरेदीविक्री संघ, को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांमध्ये मागणीनुसार उपलब्ध करून देण्याच्या संदर्भातील मार्गदर्शक सूचना शासनाने कृषी विभागाला द्याव्यात ही नम्र विनंती मी करत आहे.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, आंबा, सिताफळ व केळी पिकविण्याच्या तंत्रज्ञानाचे एक युनिट आहे. पणन मंडळाने दिलेली एक योजना आहे, ती थांबलेली आहे. ती योजना चालू केली, मराठवाड्यासारख्या मागासलेल्या ठिकाणी या सबसिडाईज्ड योजनेचे तंत्रज्ञान उभे करता आले तर लोकांच्या दृष्टीने ते अधिक सोयीचे होईल. कारण भट्टयांद्वारे केळी व आंबा ही फळे पिकविले जातात. ती अतिशय चुकीची पध्दत आहे. आरोग्यावर निश्चित परिणात होतो. हे टाळण्यासाठी हे तंत्रज्ञान अतिशय सोयीचे असून ते उपलब्ध करून दिले तर मराठवाड्यातील, महाराष्ट्रातील काही को-ऑपरेटिव्ह सोसायट्या उभ्या करण्यासाठी अडचणीचे होणार नाही. त्यामुळे तो निर्णय शासन घेईल का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अलाहिदा सरकारने या संदर्भातील निर्णय घेतला आहे. केळी, आंबा रॅपिंग सेंटर तेथे केमिकलचा उपयोग न करता अधिक चांगल्या रितीने केळी, आंबा पिकविता येईल या दृष्टीने पावले उचलली आहेत. पहिला उपक्रम जळगाव जिल्ह्यातील सौद्याला सुरु केला आहे. राज्यात जेथे अशी मागणी येईल तेथे तेव्हा पणन मंडळाच्या माध्यमातून मार्केट डिव्हिजनच्या माध्यमातून त्याला अनुदान देऊन .... जवळपास 50 टक्यांवर अनुदान देण्याची योजना आहे, ज्या संस्था पुढे येतील, पुढाकार घेतील त्यांच्या अशा प्रकारच्या प्रस्तावांना मंजुरी देऊ.

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. नियम 92 अन्वये अर्धा तास चर्चा सुरू करण्यात येत आहेत.

....J

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देणे

**मु. शी.** : बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देणे या संबंधी श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.सतिश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात सेवायोजन कार्यालयात नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे, नोकरीची संधी प्राप्त होत नसल्याने गोवा शासनाने सुक्षिक्षित बेरोजगारांसाठी रुपये 1200/- प्रति महिना देण्याचा निर्णय घेतला असणे, तथापि, प्रगत अशा महाराष्ट्र शासनाने गोवा शासनाच्या निर्णयाप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांसाठी आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, बेरोजगारांचा गंभीर प्रश्न या अर्धा-तास चर्चेतून उपस्थित करण्यात आला आहे. आज आनंद या गोष्टीचा आहे की, आम्हाला सकारात्मक उत्तर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सन्माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे पदवीधर मतदारसंघातून निवडून आले आहेत आणि ते आज मंत्री म्हणून या चर्चेला उत्तर देणार आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे हे देखील पदवीधर मतदारसंघातून निवडून आले आहेत आणि ते या चर्चेत सहभागी होणार आहेत.

सभापती महोदय, प्रत्येक बेरोजगाराला नोकरी हवी असते किंवा उद्योग उभा करावयाचा असतो. एखादा पदवीधर महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडला आणि त्याने उद्योग उभा करण्यासाठी बँकेकडे अर्ज केला तर त्याला जामीन देण्यासाठी कोणी पुढे येत नाही किंवा जामिनकीपोटी काही मालमत्ता ठेवण्यासाठी त्याच्याकडे काही नसेल तर बँक त्या युवकाला कर्ज देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सरकारने युवकांसाठी कितीही योजना जाहीर केल्या तरी काही उपयोग होत नाही. काल सन्माननीय उद्योग राज्यमंत्री श्री.प्रवीण पोटे-पाटील यांनी सभागृहात

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण.........

असे सांगितले की, एवढे रोजगार उपलब्ध होतील, तेवढे रोजगार उपलब्ध होतील. परंतु, वस्तुस्थिती वेगळी आहे.

सभापती महोदय, एखाद्या युवकाकडे उद्योग सुरु करण्याविषयी काही नवीन कल्पना असेल तर ती शासनाने तपासून घ्यावी आणि मान्य झाली तर त्या युवकाची पदवी प्रमाणपत्रे किंवा अन्य प्रमाणपत्रे जामिनासाठी ग्राह्य धरावीत. तशा प्रकारची अधिसूचना शासनाने काढावी आणि हे शक्य नसेल तर शासनाने 5 लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी त्या युवकाला जामीन रहावे.

सभापती महोदय, सातत्याने आम्ही बेरोजगार भत्त्याची मागणी शासनाकडे करीत आहोत. यापूर्वी शासनाकडून बेरोजगारांना 300 रुपये बेरोजगार भत्ता मिळत होता. परंतु, नंतर ही योजना शासनाने बंद केली. गोव्या सारख्या लहान राज्याकडून तेथील बेरोजगारांना 1200 रुपये बेरोजगार भत्ता दिला जात आहे. ही योजना त्यांनी पाच वर्षांपूर्वी सुरु केली आहे व आजही ती सुरु आहे.

सभापती महोदय, बेरोजगार भत्ता आम्ही कशासाठी मागत आहोत ? आम्ही हा भत्ता मोबाईल बिले भरण्यासाठी मागत नाही. बेरोजगाराला नोकरीसाठी अर्ज करीत असताना एका परिक्षेसाठी 300 ते 400 रुपयांचा डी.डी.भरावा लागतो. आता तर सर्व स्पर्धा परिक्षांचे अर्ज ऑनलाईन भरले जातात व त्यामध्ये त्याला अधिक त्रास होतो. फॉर्मसाठीचा खर्च, लेखी परीक्षा किंवा मुलाखतीसाठी प्रवासाचा खर्च, प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स काढण्यासाठी खर्च त्याला करावा लागत असतो. हा खर्च त्याला परवडत नाही आणि तो जर शेतकऱ्याचा मुलगा असेल तर त्याला अशा स्पर्धा परिक्षांना मुकावे देखील लागते. त्यामुळे शासनाने बेरोजगार युवकांना पदवीधर झाल्यानंतर पुढील 3 वर्षे 1500 रुपये भत्ता द्यावा, अशी माझी पहिली मागणी आहे.

सभापती महोदय, बिहार राज्यात नुकतीच विधानसभेची निवडणूक पार पडली आणि पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी बिहारमधील बेरोजगार युवकांना 1500 रुपये बेरोजगार भत्ता देण्याची पहिली घोषणा केली. तशाच प्रकारचा निर्णय आपल्याही मंत्रिमंडळाने घेतला पाहिजे. देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वीच्या प्रचारात अनेक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण.........

भाषणे केली, प्रपोगंडा केला. त्यावेळी इलेक्शनचे जुमले खूप होते. आता त्यांची 'मन की बात' सुरु आहे. यामुळे राज्यातील सर्व बेरोजगारांच्या मनात आशा निर्माण झाली आणि त्यांनी आपल्याला भरघोस मतदान केले. त्याच लाटेवर राज्यातील सरकारही आरुढ झाले आणि सन्माननीय डॉ.रणजित पाटील यांच्यासारख्या अत्यंत कार्यक्षम पदवीधर आमदाराला मंत्री पद प्राप्त झाले.

सभापती महोदय, माझी या माध्यमातून शासनाला अशी विनंती राहील की, उद्योग उभा करण्यासाठी जामीन आणि बेरोजगार भत्ता या विषयी शासनाने त्वरित निर्णय घ्यावा आणि त्याबाबतची घोषणा या सभागृहात करावी. सर्व राज्याला बेरोजगार भत्ता लागू करणे शक्य नसेल तर किमान दुष्काळग्रस्त, आत्महत्याग्रस्त 14 जिल्ह्यांसाठी तरी आजच्या आज शासनाने निर्णय जाहीर करावा. सर्व महाराष्ट्रातील बेरोजगार आज या चर्चेकडे लक्ष लावून बसले आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी याबाबत सकारात्मक उत्तर द्यावे, अशी विनंती करतो आणि थांबतो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी अतिशय महत्वाच्या मुद्याला या चर्चेच्या माध्यमातून हात घातला आहे. अनेक वेळा या विषयावर या सभागृहात चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील सेवायोजन कार्यालयाचा मूळ उद्देश हा आहे की, राज्यातील बेरोजगार, सुशिक्षित, पात्रताधारक युवक, युवतींनी सेवायोजन कार्यालयात नोंदणी केल्यास त्यांना नोकरीची संधी उपलब्ध करुन द्यावी. पण आज परिस्थिती अशी आहे की, सेवायोजन कार्यालयात नोंदणी करुन 10-15 वर्षे होऊन देखील त्यांना रोजगाराची संधी किंवा नोकरीची संधी मिळालेली नाही. दरम्यानच्या काळात कोठेही नोकरीची संधी न मिळाल्यामुळे हे बेरोजगार तरुण एजबार होतात आणि नोकरीची संधी गमावून बसतात. माझी शासनाला अशी विनंती आहे की, ज्या युवक, युवकांनी शासनाच्या सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदणी केलेली आहे आणि ज्यांना एजबार होईपर्यंत नोकरीची संधी मिळालेली नाही, अशा बेरोजगार युवकांसाठी नोकरीची वयोमर्यादा शिथिल करावी. अशा प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे का ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अॅड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, संचालक, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाची एक वेबसाईट आहे आणि त्यावर महाराष्ट्र शासनाच्या हेल्पलाईनची माहिती देण्यात आली आहे. त्या ठिकाणी या हेल्पलाईनचा क्रमांक 18602660166, असा दिलेला आहे. आज सकाळी 9.00 वाजेपासून मी या क्रमांकावर सातत्याने फोन करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु, हा दूरध्वनी अस्तित्वात नाही. हा दूरध्वनी क्रमांक युवकांसाठी अतिशय महत्वाचा आहे. या माध्यमातून युवकांना माहिती मिळत असते. परंतु, हा दूरध्वनी बंद असेल तर ज्या बेरोजगारांना खरोखर गरज आहे, त्यांना त्याचा फायदा मिळणार नाही. या वेबसाईटवर असे लिहिले आहे की, 5 कर्मचारी चोवीस तास या हेल्पलाईनवर उपलब्ध असतील. पण जर ही हेल्पलाईनच बंद असेल तर हे 5 कर्मचारी त्या ठिकाणी काय करीत आहेत, त्या संदर्भात शासन काही कार्यवाही करणार आहे का ?

सभापती महोदय, सातत्याने आपण पाहतो की, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश आणि आजुबाजूची राज्ये त्या राज्यांमधील युवकांना स्टार्टअप इंडस्ट्रिसाठी मदत करीत आहेत. कौशल्य विकासाच्या माध्यमातून पदवीधर मुलांना स्टार्टअप इंडस्ट्रि सुरु करण्यासाठी, एखादा लघुउद्योग सुरु करण्यासाठी ती राज्य सरकारे प्रोत्साहन देत आहेत. गोवासारखे राज्य बेरोजगारांना 1200 रुपये बेरोजगार भत्ता देत असतील तर आपल्या राज्यानेही 1500 रुपये बेरोजगार भत्ता देणे गरजेचे आहे. हा भत्ता म्हणजे त्या मुलांसाठी प्रोत्साहनपर रक्कम राहील. माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासन युवकांना स्टार्टअप इंडस्ट्रिसाठी मदत करणार का आणि 1500 रुपये बेरोजगार भत्ता देणार आहे का ?

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मी फक्त दोन प्रश्न आपल्या माध्यमातून विचारणार आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यातील शासकीय सेवायोजन कार्यालयांचा कोणताही आधार राज्यातील युवकांना वाटत नाही, ही वस्तुस्थिती आहे. युवक पदवीधर होतात, सेवायोजन कार्यालयात नोंदणी करतात पण त्यांना कोणत्याही प्रकारचा रोजगार मिळत नाही. बेरोजगार

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.अनिल सोले........

युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या, नवीन संधी उपलब्ध करुन देण्याच्या शासनाच्या काही योजना आहेत का ?

सभापती महोदय, कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून बेरोजगारांना 3 वर्षपर्यंत बेरोजगार भत्ता देण्याची योजना शासन आखणार आहे का ?

सभापती महोदय, विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून, विशेष करुन, सामाजिक न्याय विभागांसारख्या विभागांअंतर्गत असलेल्या महामंडळांकडून बेरोजगार युवकांनी केलेल्या अर्जांना कशा प्रकारे ट्रिटमेंट दिली जाते, त्यांचे अर्ज कसे रिजेक्ट केले जातात, याची आपल्याला कल्पना आहे. अशा ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या योजना शासन आखणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आजच्या भारताचा डेमोग्रॅफिक डिव्हिडंड लक्षात घेता या देशाकडे महासत्ता होण्याच्या दृष्टीने बघितले जाते. कारण, या देशातील तरुणाई. तरुणांची संख्या आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या 40 टक्क्यांपर्यंत आहे.

...k-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.........

सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. गोवा सरकार प्रत्येक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना 1200 रुपये देते, असे त्यांनी प्रकर्षाने सांगितले. मी या संदर्भात माहिती घेतली आहे. पैसे द्यावे लागतात किंवा द्यावे लागत नाहीत, याबाबत मी बोलणार नाही. परंतु, आपण गोवा सरकारचे स्पेसिफिक उदाहरण दिले. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, तेथे अशा प्रकारचा भत्ता आजमितीला दिला जात नाही. आपण सोईसुविधांच्या बाबतीत आणि पाहिजे तर पदवीधर उमेदवारांची डिग्री 3 वर्षासाठी जामीन म्हणून ठेवावी, परंतु त्यांना 5 लाख रुपयायंपर्यंत कर्ज उपलब्ध करुन द्यावे, अशी सूचना केली. केंद्र शासनाची मुद्रा बँकेची योजना अस्तित्वात आहे, याची आपल्याला देखील कल्पना आहे. ज्याद्वारे आपण युवा-शिशू योजना सुरु केली आणि 5 लाख रुपयांपासून तर 10 लाख रुपयांपर्यंत म्हणजे ज्यांच्याकडे भागभांडवल नाही किंवा ज्यांचा बिझनेस अस्तित्वात आहे त्यांना पुढे आणावयाचे असेल तर 10 लाख रुपयांपर्यंत आणि 5 लाख रुपयांपर्यंत तर नॉन रिफंडेबल कर्ज देण्याची तयारी सुरु आहे. यासाठी बजेट आहे. आपण बोलताना माननीय पंतप्रधानांचा उल्लेख केला आहे. आपल्या राज्यात रोजगार व स्वयंरोजगार खाते अस्तित्वात होते. आपण मागील 15 वर्षातील या खात्याचे बजेट बघितले तर आपल्या लक्षात येईल की, आपण मागील एका वर्षात या खात्यासाठी 350 कोटी रुपयांचे बजेट ठेवले आहे. आपण दिनांक 15.1.2015 रोजी कौशल्य विकास खाते अस्तित्वात आणले. आपण तेथून आज पर्यंतचा प्रवास बघितला तर ज्या खात्याला पूर्वी 15-20 कोटी रुपयांचे बजेट होते त्या खात्यासाठी आपण 350 कोटी रुपयांचे बजेट ठेवले आहे. आपण यादृष्टीने विचार करतो. त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे, याची शासनाला आणि तुम्हाला देखील माहिती आहे. तुम्हाला आणि मला बाहेर फिरताना सारख्याच परिस्थितीला फेस करावे लागते. एखाद्या गावात गेल्यानंतर आपल्या लक्षात येते की, त्या गावातील लोक शिकलेले आहेत. मी तर त्याही पुढे जाऊन असे म्हणेन की, बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षणाची देखील अट घालण्यात येऊ नये. तुम्ही आणि मी मराठवाडा व विदर्भातील आहोत. शेतकऱ्यांच्या मुलांना पोटाला

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.........

चिमटा घेऊन इयत्ता 8 वी, 10 वी किंवा 12 वीमध्ये शिक्षण सोडावे लागले असेल, परंतु त्यांच्यामध्ये प्रतिभा असेल तर 6 महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर त्यांना चांगली संधी उपलब्ध होऊ शकते. म्हणून केवळ पदवीधर तराणांनाच नाही तर आमचे उद्दिष्ट असे आहे की, सन 2022 पर्यंत साधारणतः राज्यातील 4 कोटी मुलांना आपण प्रशिक्षण द्यावयास पाहिजे. एका मुलासाठी 10 ते 12 हजार रुपये खर्च करत, त्याचे शिक्षण कितीही असले तरी त्याचे कौन्सिलिंग करावयाचे, त्याची ॲपटीट्युड टेस्ट घ्याची, त्या टेस्टनंतर त्याचा कल बघायचा आणि त्याच्या असणाऱ्या शिक्षणाला देखील रिक्गनिशन द्यावयाचे. म्हणजे रिक्गनिशन ऑफ लर्निंग आणि त्याचे करीअर कौन्सिलिंग करत त्याला व्हर्टिकल एक्सेसवर पुढे जायचे असेल तर त्याच्या मॉड्युल्स करुन त्याचे ग्रेड 1, ग्रेड 2, ग्रेड 3 असे करुन शिक्षण घेत त्याला पुढे सुद्धा नेता येईल.

सभापती महोदय, मला सांगण्यास आनंद होतो की, आम्ही यावर्षी देखील उद्दिष्ट ठेवलेले आहे. आम्ही 2 लाख युवक-युवतींना प्रशिक्षण देणार आहोत. मी दोन महिन्यांपूर्वी परदेशात गेलो होतो. तेव्हा आपण यूएनडीपी सोबत करार केलेला आहे. मागील 15 दिवसापूर्वी त्याचा एमओयू झाला आहे. आपण पुढील 3 वर्षात महाराष्ट्रातील 1 लाख युवतींना युनायटेड नेशन्सकडून प्रशिक्षण देण्याचे ठरविले आहे आणि त्याचे प्रावदान देखील केले आहे. आपल्या असे लक्षात येते की, एखाद्या संस्थेत किंवा दवाखाना असेल तर तेथे आपल्याला जास्तीत जास्त महिला काम करताना दिसून येतात. कारण, त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्या तेथे काम करतात. आपण त्या महिलांच्या घरी प्रवेश केला, त्या महिलेचे थोडे कौन्सिलिंग केले तर असे लक्षात येते की, त्या महिलेच्या घरातील कर्त्यापुरुषाला व्यसन लागलेले असते. ती माऊली स्वतःचे घर सांभाळून नवऱ्याची देखील काळजी घेते. आम्ही राज्यातील एक लाख युवतींना पुढील 3 वर्षात रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देऊ आणि त्यांचे कौन्सिलिंग देखील सुरु झाले आहे. आम्हाला 1 लाख युवतींना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. आम्ही आज 2 लाख युवतींच्या रोजगाराचे मॅपिंग केले आहे. त्यासाठी जेथे हॉस्टेल पाहिजे त्याचे देखील मॅपिंग सुरु झाले आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.........

14 आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी आपण अधिकचे काही करु शकतो काय, असा आपण प्रश्न उपस्थित केला आहे. आपणा सर्वांना कल्पना आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत सखोल अभ्यास करुन प्रत्येक दृष्टीने फक्त रोजगार नाही. आपण असेही बघितले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी प्रमुख कारण जर कोणते असेल तर ते त्या कुटुंबावर आलेले आकस्मात आजारपण हे आहे. आजारपणावर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करावा लागतो. म्हणून आपण 14 जिल्ह्यांसाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अटींची शिथिलता करुन जे हॉस्पिटल पुढे येत असेल आणि ते हॉस्पिटल सर्व अटींची पूर्तता करीत असेल तर कोणताही निकष न लावता आपण कोणतेही हॉस्पिटल इम्पॅनल करतो. त्याच धर्तीवर आपण सर्व योजनांचे कन्व्हर्जन करुन व त्यामध्ये व्हिझीबल चेंजेस करुन जलयुक्त शिवार योजना राबवावयाची आहे. सर्वच विभागांमधून वेगवेगळ्या योजनांवर खर्च करणे बरोबर होणार नाही. मग तो अल्पसंख्याक विभाग, सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग असेल किंवा शिक्षण विभाग असेल, अशा प्रत्येक विभागातून आपण त्यासाठी थोडे पैसे खर्च करतो. परंतु, व्हिझीबल चेंजेस दिसत नव्हते. ज्या पद्धतीने जलयुक्त शिवारामध्ये आपण हे व्हिझीबल चेंजेस पाहू शकलो, त्याच पद्धतीने आपण रोजगार व स्वयंरोजगाराचे कौशल्य आणि उद्योजकता विभागात या सर्व डिपार्टमेंटला कन्व्हर्ज करीत कोठे तरी व्हिझीबल चेंजेस दिसावयास पाहिजेत म्हणून या वर्षापासून प्रयत्न करीत आहोत. म्हणून आज जरी या खात्याचे बजेट 300 ते 350 कोटी रुपये असले तरी येत्या दोन-तीन वर्षात आम्ही ते बजेट 1 हजार कोटी रुपयांच्यावर घेऊन जाऊ असा आम्हाला विश्वास आहे. आम्ही प्रत्येक बेरोजगाराला प्रशिक्षण देऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सेवायोजन कार्यालयाबाबत सांगितले आहे. त्यांनी जी गोष्ट सांगितली ती बरोबर आहे. मी या संदर्भात प्रत्येक महिन्याला आढावा घेतो. माझी नाराजी यासाठी आहे की, महाराष्ट्र रोजगार वेब पोर्टलने ज्या पद्धतीने काम करावयास पाहिजे त्या पद्धतीने ते काम करीत नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी सांगितले की, त्यांनी आज सकाळी फोन केला होता. परंतु, त्यांचा फोन लागत नव्हता. हे काम 5 लोकांकडे जरी दिले गेले असले तरी ज्या प्रमाणे रेसी प्रोकेशन पाहिजे ते त्या पद्धतीने होत नाही. मी सांगू इच्छितो की, यामध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. या गोष्टीला टॉलरन्स नाहीच. जे 5 लोक यासाठी जबाबदार असतील ते पगार घेऊनही काम करीत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याचे निदेश मी आजच देतो.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 12 वाजून 10 मिनिटांपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी सेवायोजन कार्यालयात रोगाराची नवीन संधी आणि 3 वर्षे भत्ता या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. माझे असे मत आहे की, 1000 ते 1200 रुपये दिल्याने माणूस उभा राहू शकत नाही. ज्या पद्धतीने काम करावयास पाहिजे त्याच पद्धतीने आपल्याला पुढे जावे लागेल. त्याला रोज 300-400 रुपये खर्च येत असेल, हे मला मान्य आहे. परंतु, आपण जर याच पैशातून त्याला कायम स्वरुपी सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याची संधी उपलब्ध करुन देऊ शकत असाल तर 1000 ते 1200 रुपये (...अडथळा...) आपण पहिल्यांदा आयटीआयला निदेश दिले की, तुम्ही तुमच्या परिसरात फिरुन पहावे आणि डिमांड सप्लाय काय आहे, स्किल गॅप ॲनलिसिस करा, मायक्रो लेव्हलवर जाऊन स्किल गॅप ॲनलिसेस करा आणि त्या एरियात ज्या उद्योगाला चालना असेल, जेथे नोकरीच्या मिळणाची संधी उपलब्ध असेल तेथे तुमचे जे रुटीन कोर्स आहेत त्याला फाटा देऊन टेलर-मेड कोर्सेस तयार करावेत. मग तो कोर्स 10 दिवसांचा असला तरी चालेल. परंतु, तो रोजगार उपलब्ध करुन देणारा असला पाहिजे.

सभापती महोदय, मी ज्यावेळी न्युयॉर्कला होतो त्यावेळी माझ्या असे लक्षात आले की, तेथील आजुबाजूच्या कम्युनिटीमध्ये जाऊन त्या कम्युनिटी कॉलेजेसचा अभ्यास केला जातो. तेथे जेवढे उद्योग आहेत त्यांना लागणाऱ्या मनुष्यबळाचा कोर्स प्रत्येक वर्षी रिव्ह्यू घेऊन तयार केला

..5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.........

जातो. तो कोर्स 10 दिवसांपासून तर 6 महिन्यांपर्यंतचा असतो. आम्ही यावर्षी असाही विचार करीत आहोत की, व्हर्टिकल डेव्हलपमेंटसाठी हे कोर्सेस करावयाचे असतील तर याचे क्रेडिट पॉईंट देखील आपण द्यावेत. जेणेकरुन एका कोर्सचे 10 क्रेडिट पॉईंट्स जमा झाले तर तो तिकडे काम करेल आणि प्रशिक्षण देखील घेईल. तो सकाळी काम करीत असेल, तो सायंकाळी प्रशिक्षणासाठी गेला आणि हे क्रेडिट पॉईंट जर आपण वाढवत 100 पर्यंत नेले तर त्याने कोणते प्रशिक्षण घेतले हे बघून आपण त्याला डिग्री देण्याचे देखील काम करु. जेणेकरुन आज तो 5-7 हजार रुपये पगारावर काम करीत असेल तर त्याला प्रशिक्षणानंतर चांगला पगारही मिळेल आणि माझ्याकडे डिग्री आहे असे सन्मानाने सांगता देखील येईल.

सभापती महोदय, मी आपल्याला छोटे उदाहरण देतो. एका हॉस्पिटलमध्ये 3-4 महिने एक्स-रे टेक्निशियनच्या हाताखाली काम करणारा मुलगा त्या टेक्निशियनपेक्षा चांगला एक्स-रे काढायला लागला हे माझ्या लक्षात आले. त्यावेळी आम्ही असा विचार केला की, त्या परिसरात आपण त्याला कोणता कोर्स देऊ शकतो. परंतु, संधी उपलब्ध नव्हती. तो गाडी चांगला चालवित होता. परंतु त्याच्याकडे लायसन्स नव्हते. यासाठी आम्ही एका करस्पॉंडन्स कोर्सचे त्याला सर्टिफिकेट मिळवून दिले आणि आता तोच मुलगा मुंबई येथील एका चांगल्या हॉस्पिटलमध्ये 30 हजार रुपये पगारावर नोकरी करीत आहे. तो फक्त इयत्ता आठवी पास आहे आणि त्याचे रिक्गनिशन ऑफ लर्निंग केले आणि त्याला सर्टिफिकेट दिले. तुला एवढे येते, हे तुझे सर्टिफिकेट आहे आणि त्या सर्टिफिकेच्या आधारावर त्याला व्हर्टिकल ॲक्सेसवर जाण्याचे मोड्युल्स, त्याचे ग्रेड्स सुद्धा या वर्षभरात आम्ही तयार करु. सन्माननीय सदस्यांनी चांगले प्रश्न उपस्थित केलेले आहेत. याबाबत काही करावयाचे असेल तर याचा पिरियॉडिकल रिव्ह्यू घेण्यासाठी आपण राज्यातील सातही पदवीधर आमदारांबरोबर प्रत्येक महिन्याला एक बैठक घेऊ.

..L-1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

मी तर असे म्हणतो की, या गोंष्टीला चालना देण्यासाठी सर्व बाबींचा आढावा घेऊन प्रत्येकाच्या थॉट प्रोसेसला पुढे नेण्यासाठी याचा फायदा होईल.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय,...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण आपणाला या दोन्ही अर्धा तास चर्चा संपवायच्या आहेत, अर्धा तास चर्चेचे गांभीर्य लक्षात घ्यावे. अर्धा तास चर्चा ही पाऊण तासावर गेली आहे यासाठी काही तरी कालमर्यादा असली पाहिजे, अर्धा तास चर्चेवर जास्त प्रश्नोत्तरे होत नाहीत. उलट मला असे वाटते की, मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिले आहे, आपण जो प्रश्न विचारला त्यापेक्षा जास्त उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी एका वाक्यात प्रश्न विचारावा.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सुंदर उत्तर दिले आहे त्याबाबत मी त्यांना धन्यवाद देतो. सरकारचे धोरण आपण सांगितली आहे. यामध्ये मला एक दोन शंका आहेत, गोव्याचा आपण उल्लेख केला आहे, कदाचित माझी माहिती बरोबर नसेल, परंतु बिहार रिटर्न जाहीर केले आहे, मी बरोजगारांना भत्ता देण्याचा मुद्दा उपस्थित केला होता, त्यासाठी आपण अत्यंत सोईस्करपणे त्या मुद्याला बगल दिली आहे. आपण मुद्रा बँकेचा उल्लेख केला. परंतु मुद्रा बँकेचे हेड ऑफिस व त्याच्या शाखा कोठे आहेत याची मला माहिती नाही. या बँकने आतापर्यंत किती तरुणांना कर्ज दिले, याचे उत्तर मला देण्यात यावे. प्रशिक्षण देण्याचा आपण उल्लेख केला ही योजना अत्यंत चांगली आहे, परंतू प्रशिक्षण केंद्रे शासनाचे अनुदान लाटणाऱ्या बोगस संस्था होऊ नयेत. आपण एक्सरे टेक्निशियनचा उल्लेख केला हा अपवाद असू शकतो. ज्या मुलांकडे जे स्कील आहे त्याला सर्व व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी. तथापी ते आजूबाजूच्या आयटीआयमध्ये जातील किंवा कोठेही प्रशिक्षण घेतील. सरकारच्या मेहरबानीवर बेरोजगारांनी किती वर्षे जगायचे, आपण हेल्पलाईन सुरु करण्याचे सांगितले आहे. उपरोक्त प्रश्नांबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा जो कन्सर्न आहे तोच शासनाचा देखील आहे. गेल्या काळात ज्या व्हीटीपी रजिस्टर झाल्या होत्या त्यांनी अतिशय बोगस काम केले हे सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातू लक्षात आले आहे. मी कोणाच्याही वैयक्तिक व्हीटीपीवर बोलत नाही. ज्या व्हीटीपींनी बोगस कामे केली आहेत त्यांची चौकशी सुरु आहे. शासनाने रिक्गनिशन ऑफ लर्निंगचे टेंडर केले आहे, मी उदाहरण दिले त्याप्रमाणे अनुभवाने लोक शिकतात. एखादे हॉस्पीटल एक्स-रे विभागासाठी दहा मुले घेऊन त्यांना शिकवित असतील तर अशा व्हीटीपीमध्ये जाऊन नुसते प्रमाणपत्र घेण्यापेक्षा ते शिक्षण आणि प्रशिक्षण जास्त कामाचे आहे. एका तालुक्यातील जळंमकर नावाचा वेल्डर आमच्याकडे आहे, त्याच्याकडे वेल्डिंगचे काम दिल्यानंतर सहा महिने वेटींग करावे लागते, मी त्याला विनंती केली की, तुझ्याकडे असे काय कौशल्य आहे की, लोक तुझ्याकडे सहा महिने वेटींग करतात, तु सुध्दा 10 मुले घेऊन व्हीटीपी रजिस्टर करुन घे. जेणेकरुन हे मुले शिकल्यानंतर तुझ्यासारखे चांगले काम करतील. याबाबत शासन अतिशय ओपन आहे. याबाबतीत कोठेही टॉलरन्स राहणार नाही. असिस्टंट डायरेक्टर यांच्याकडून सखोल अभ्यास करुन व चौकशी करुन त्यासंदर्भातील आढावा घेऊन व्हीटीपी रजिस्टर करण्यात येतील.

--------

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील खरेदी व्यवहारात झालेला गैरव्यवहार.

**मु. शी.** :पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील खरेदी व्यवहारात झालेला गैरव्यवहार यासंबंधी डॉ नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रते :-

"पिंपरी-चिंचवड महापालिकेमधील नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले असणे, सदर श्रवणयंत्राकरिता २५ नग श्रवणयंत्रे खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला असतांनाही मेसर्स प्राईम सर्जिकल अँड फार्मा या ठेकेदाराने बाजारात एक श्रवणयंत्र जास्तीत जास्त ७ हजार रुपयांना उपलब्ध असतांनाही श्रवणयंत्रांच्या एका नगासाठी १३ हजार ४०० रुपये दर सादर करणे, उक्त ठेकेदाराने २५ नग श्रवणयंत्रे खरेदी करण्यास व त्यापोटी येणाऱ्या ३ लाख ३५ हजार रुपयांचा खर्चाला मंजूरी देण्याचा प्रस्ताव समितीपुढे सादर केला असणे, सदर श्रवणयंत्रे गैरव्यवहार प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई होणे गरजेचे असणे, याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील खरेदी व्यवहारात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असणे, या रुग्णालयातील लागणारी हायपरबोलीक ऑक्सिजन थेरपी (एचबीओटी) यंत्रणा ७० लाख रुपयांची पावणेतीन कोटींना खरेदी करणे, क्षयरोग तपासणी यंत्रणा २४ लाखांची ७२ लाखांना खरेदी करणे तसेच स्वाईन फ्लू रुग्णांसाठी खरेदी केलेल्या व्हेंटिलेटरची खरेदीसुध्दा तिप्पट दराने म्हणजेच नऊ लाखाचे व्हेंटिलेटर २४ लाखांना खरेदी करणे, तसेच औषधे खरेदी दामदुप्पट दराने करणे, सदर खरेदी मध्ये कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार केलेला असणे, सदरहू खरेदी करतांना विदेशी सांगून देशी यंत्रणा खरेदी करुन महापालिकेची फसवणूक केली असून उपरोक्त दोन्ही प्रकरणाबाबत दोषी व्यक्तींविरुध्द चौकशी करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांना सारखेच अधिकार आहेत, दोन्ही अर्धातास चर्चेसाठी सभापती महोदयांनी अनुमती दिली व त्यासाठी वेळ दिला त्यामुळे मी सर्वप्रथम त्यांचे आभार मानते. हा प्रश्न परिघावरुन परिघावरती चालला आहे. मोठ्या प्रमाणात न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून धोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही, अशा घटकांबाबतची माझी अर्धातास चर्चा आहे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही आशिया खंडातील अतिशय श्रीमंत महानगरपालिका गणली जाते. या महानगरपालिकेत आरोग्य विषयक ज्या यंत्रसामुग्री विकत घेतल्या आहेत, त्यासंदर्भातील मी काही उदाहरणे देते, गेल्या तीन वर्षामध्ये आरोग्य व भांडार विभागाने ज्या खरेदी केल्या आहेत, यामध्ये ऑक्सिजन थेरपी, एचबीओटी यंत्रणा, 70 लाख रुपयांची खरेदी पावनेतीन कोटी रुपयांना करण्यात आली आहे. क्षयरोग तपासणी यंत्रणा 24 लाख रुपयांची खरेदी 72 लाख रुपयांना करण्यात आली. स्वाईन फ्लू रुग्णासाठी लागणाऱ्या व्हेंटीलेटरची खरेदी तिप्पट दराने म्हणजे 24 लाख रुपयांना करण्यात आली आहे.

सभापती महोदय, नगर विकास राज्यमंत्री, गृह राज्यमंत्री असून ते स्वत: प्रॅक्टीस करणारे डॉक्टर आहेत, श्रवणयंत्राच्या संदर्भात या महानगरपालिकेने कहर केलेला आहे. सात हजार रुपयांना श्रवणयंत्र उपलब्ध आहेत. श्रवणयंत्राचे स्पेसिफिकेशन बायोमेडिकल अभियंता यांनी असे सांगितले होते की, श्रवणयंत्रासाठी चार चॅनेल आणि आठ बॅन्ड सुविधा असाव्यात. यामध्ये जे ठेकेदार आले त्यामध्ये एकाने चार चॅनेल, दुसऱ्याने दोन चॅनेल आणि चार बॅन्ड तिसऱ्या ठेकेदाराने चार चॅनेल आणि चार बॅन्ड अशा प्रकारे पुरवठा करण्यात येईल असे सांगितले. एकाही ठेकेदाराने चार चॅनेल आणि आठ बॅन्डची सुविधा उपलब्ध करुन दिली नव्हती. तरी देखील एका कंपनीकडून 13,400 रुपयांना एक याप्रमाणे 25 श्रवणयंत्र खरेदी करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला होता. ही अर्धा तसा चर्चा लागेपर्यंत जवळपास सहा महिने उलटून गेली आहेत. गेल्या तीन महिन्यांची मी उदाहरणे मांडली आहेत, आम्ही विरोधी पक्षात असताना सभागृहात क्षयरोग यंत्राच्या संदर्भात चौकशी लावण्यात आली होती. त्या विषायाची चर्चा सभागृहात लागण्यासाठी दोन वर्षे लागली होती. महानगरपालिकेतील चुकीच्या व्यवहारा संदर्भात आम्ही राज्यस्तरावर प्रश्न उपस्थित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

करतो, त्याची चौकशी त्याच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून केली जाते. ही गंभीर बाब आहे, त्या अधिकाऱ्याचे व इतरांचे साटेलोटे असते असे चित्र आपण प्रत्येक महानगरपालिकेत पाहतो.

सभापती महोदय, नगर विकास मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या प्रकरणाची चौकशी वरिष्ठ स्तरावर झाली पाहिजे, दुसरे मला खेदाने म्हणावेसे वाटते की, नगर विकास विभागाचे बरेचसे अधिकारी आमच्या चांगल्या ओळखीचे व स्नेही आहेत, मला कोणावरही हेत्वारोप करायचे नाही. त्यांचे काही शहरांवर खूप प्रेम आहे. त्यामुळे त्या भागातील चौकशी आली की, दोन ते तीन महिन्यात क्लिनचिट त्या महानगरपालिकेला मिळते. प्रत्येक अधिकाऱ्याला जेलमध्ये पाठविण्याची आमची अपेक्षा नाही. जे कर्नबधीर लोक आहेत त्यांची श्रवणयंत्र चांगली आहेत की नाही, हे त्यांना कळणार नाही, कारण त्यांनी कधी तरी ऐकले असते, हे श्रवणयंत्र चांगले आहे किंवा नाही हे ते सांगू शकत नाही. फक्त 25 श्रवणयंत्र आहेत, परंतु शितावरुन भाताची परीक्षा केली जाते. मी महानगरपलिकेत तीन वर्षातील गैरप्रकार सांगितलेला आहे, व्हेंटिलेटर किंवा इतर मोठ्या वस्तुंच्या खरेदीमध्ये गैरव्यवहार झाला आहे. राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला व अनेक हॉस्पीटल यांना निधी दिला जातो. या महानगरपालिकांमध्ये जी खरेदी होते त्याचे स्टॅण्डर्ड पाळले जात नाही, गुणवंत्ता नियंत्रण होत नाही. या चर्चेच्या निमित्ताने मंत्री महोदयांकडे मी अशी मागणी करते की, गेल्या तीन वर्षात यशवंतराव चव्हाण हॉस्पीटलची व आरोग्य विभागाची चौकशी वरिष्ठ स्तरावरुन केली पाहिजे. त्याचा अहवाल आल्यानंतर दुसऱ्या परीक्षकाची आवश्यकता नाही. कारण मेडिकल योग्य पध्दतीने केले किंवा नाही हे स्वत: नगर विकास मंत्री हे त्यासंदर्भातील ॲथॉरिटी आहेत, त्यामुळे या सर्व विषयांची चौकशी करुन जे जबाबदार असतील त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल काय ?

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई यांनी या अगोदर देखील या विषयाच्या संदर्भात तारांकित प्रश्न विचारला होता त्यांना त्याचे लेखी उत्तर आलेले आहे. त्यानंतर त्यांनी हा विषय अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेच्या अपंग कल्याणकारी योजनांमधील आरोग्याच्या उपकरणाच्या खरेदीबाबत भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहाराबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. हा प्रश्न श्रवणयंत्राचा असला तरी यापूर्वी 2007 पासून झालेल्या खरेदीतील भ्रष्टाचाराचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. जी श्रवणयंत्रे विकत घ्यावयाची होती त्याबाबत अशी माहिती आहे की, बेसिक रेटची माहिती घेण्यासाठी एकच कोटेशन आले व त्यामध्ये त्यांनी रेट नमूद केले होते. आपण म्हणाले ते सत्य आहे की, बायो मेडिकल इंजिनिअरिंग यांच्याकडून ओपिनियम घेतले. त्या ओपिनियमध्ये त्यांनी असे म्हटले होते की, एकच ओपिनियम आलेले आहे तर आणखी काही काळ थांबून बेसिक रेटसाठी एक ओपिनियम घेतले पाहिजे. असे लक्षात आले की हे ओपिनियन दिल्यानंतर रिओपिनियन घेतले गेले.

...M-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

त्यामध्ये त्यांनी स्पष्ट लिहिले होते की, अत्यावश्यक असेल तरच या एका पार्टिकडून खरेदी करावी. आवश्यकता वाटली, ती का वाटली याबद्दलची चौकशी निश्चितपणे केली जाईल. आरोग्य अधिकाऱ्यांनी यामध्ये प्राॲक्टिव्हली जाऊन काही रोल प्ले केला का याची माहिती घेऊन तसे आढळले तर चौकशीनंतर कारवाई करु.

सभापती महोदय, जून्या खरेदीबद्दल उल्लेख केला आहे. साधारणतः व्हीसीएममध्ये झालेल्या खरेदी आहेत. 2012 मध्ये एचबीओटी मशीन घेतली त्याबद्दल 24 लाखाचे मशीन 2 कोटी रुपयांना घेतले असा आरोप होता. त्याबद्दलची तक्रारी होती, त्याची चौकशी सुध्दा झाली. त्यामध्ये डॉ.जगदाळे दोषी आढळले. त्यांच्या निवृत्तीवेतनातून आगामी 10 वर्षापर्यंत 10 टक्के कपातीची शिक्षा झालेली आहे. त्यानंतर श्री.गायकवाड व राजशेखर अय्यर यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. 2012 मध्ये चौकशी सुरु झाली. चौकशीला वेळ लागत असेल तर ती लवकरात लवकर करुन कारवाई करण्यासाठी फॉलोअप घेतला जाईल. टी.बी. बॅक मशीनबद्दल विचारणा केली होती. 24 लाखाऐवजी 72 लाखांना मशील विकत घेतले, त्याची सुध्दा चौकशी 2013 मध्ये सुरु झाली. त्याबाबत डॉ.जगदाळे, डॉ.अय्यर व डॉ.नागकुमार या तिघांची चौकशी स्थानिक पातळीवर चालली असेल तर आपण सांगितल्याप्रमाणे सखोल व पारदर्शक चौकशी होण्यासाठी महापालिकेचे अधिकारी चौकशी करतात, त्यापेक्षा विभागीय आयुक्तांकडे ही चौकशी देऊ, हे जाहीर करतो.

व्हेंटिलेटरबद्दल उल्लेख करण्यात आला. हे मशीन 9 लाखाऐवजी 24 लाखांना विकत घेतले, त्याबद्दल तक्रार नाही. परंतु व्हेंटिलेटरची तक्रार यामार्फत झाली असे गृहित धरुन चौकशी निश्चितपणे केली जाईल. त्यासोबत सर्व खरेदीबाबत मी स्वतः त्या क्षेत्रात 20 ते 25 वर्षे काम करीत असल्यामुळे निश्चितपणे मी सांगू शकतो की, एखादे मशीन प्रायव्हेट हॉस्पिटलला, रुबी किंवा पूना असेल, विकत घ्यायचे असेल तर त्या प्रक्रियेमध्ये तीन कंपन्या पुढे येतात, त्यांच्यासमोर स्पर्धा होते. श्रवणयंत्राची बाजारातील किंमत काय आहे, याबद्दल कोणीही अनभिज्ञ नाही, हे मला निश्चित माहित आहे. याची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करुन ही सर्व चौकशी स्थानिक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

पातळीवर व्यवस्थित होत नसेल तर उच्चस्तरीय चौकशी करू. प्रकरण किती लाखाचे आहे हे म्हटलेले नाही. हे व्हिसलबोअर होत लोकांच्या आरोग्य विषयक निगडित अडचणी असतात, प्रश्न असतात त्याबाबत निश्चितपणे तडजोड होणार नाही. यासाठी गाईडलाईन्स घेताना सीव्हीसी असेल, डी.एस.अँड टी. असेल, महापालिकेच्या कोणत्याही खरेदीसाठी काही धोरण ठरवू शकतो का, जेणेकरुन पारदर्शकरित्या या गोष्टी खरेदी करण्यात येतील यासाठी सुध्दा साकल्याने विचार केला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत समाधानकारक उत्तर दिलेले आहे. मला अतिशय आनंद होतो. त्याच्या तपशीलात जाऊन त्यांनी माहिती दिलेली आहे. त्यांनी राजकीय इच्छाशक्ती चांगल्याप्रकारे व्यक्त केली. गृह विभागामध्ये संपूर्ण संगणकीकरण करीत असताना पोलीस ठाण्यात तक्रार आली तर ताबडतोब मेलवरुन किवा व्हॉटस् ॲपवरुन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळते. वैद्यकीय स्वरुपांची यंत्रे खरेदी करावयाची असतात त्याची माहिती मेलवरुन वरिष्ठ स्तरावर कळली पाहिजे. महापालिकेचे विकेंद्रीत अधिकार केंद्रीत करण्याचा प्रश्न नाही. परंतु जी खरेदी होते ती दुप्पट, तिप्पट किंमतीने होते. मला असे दिसते की, There is a method in their madness. दुप्पट, तिप्पट किंमत लावली जाते. त्यामध्ये लक्ष्मीदर्शन आणि समाधान प्राप्ती होत असावी. म्हणून माझी सूचना आहे की, त्यांच्यावर नियंत्रण करण्याऐवजी देखरेख करुन कोणत्या किंमतीला कोणती अवजारे किंवा यंत्रे विकत घेतली जातात, कोणते टेक्नीक वापरतात त्यावर देखरेख करणारा नगरविकास विभागामध्ये कक्ष असेल तर खरेदी झाल्यावर आपण सगळे म्हणतो. त्यामधून अधिक व्यवस्था लागलेली असते. त्या अगोदरच आपल्याला प्रतिबंधात्मक पाऊल उचलता येईल. तसे करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कन्सर्न व्यक्त केला की, अशा प्रकारची खरेदी होत असताना पोलीस खात्यामध्ये तक्रार आल्यानंतर मेलद्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळू शकते. ही स्वायत्त संस्था आहे. हे राज्यभरासाठी होऊ शकत नाही. त्यांचा त्यांचा अधिकार आहे. कारण ही ऑटोनॉमस बॉडी आहे. या प्रकरणी आपण तारांकित प्रश्न विचारल्यानंतर शासन स्तरावरुन दखल घेऊन आम्ही खाली विचारणा केली, त्यातून

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

हे सर्व उघड झाले. म्हणून आपण शासन स्तरावर काही करता येईल का यासाठी विचार करू. श्रवणयंत्राबाबत मी आधीच सांगितले आहे. आपल्या प्रश्नानंतर ज्या काही खरेदी झाल्या त्या आयुक्तांनी नंतर रद्द केल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत होणाऱ्या खरेदीबाबत अशा प्रकारचे काही धोरण आखता येईल का, याचा सुध्दा विचार केला जाईल.

------

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.06 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील अंगणवाड्यांना वीज पुरवठा करण्याबाबत**

**(1) * १२०४७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटीललःल** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणारे जव्हार तालुक्यातील ३०५ व मोखाडा तालुक्यातील २२९ अंगणवाड्यांना माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत वीज जोडणी न दिल्याने अंधारातच अंगणवाड्यांचे कामकाज चालू आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अंगणवाड्यांना सन २००८-२००९ मध्ये जलशुध्दीकरण यंत्रे देण्यात आली असून देखभाल अभावी नादुरुस्त असल्याने बालकांना दुषित पाणी प्यावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही, पालघर जिल्ह्यातील बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जव्हार तालुक्यातील ३०५ अंगणवाड्या तसेच मोखाडा तालुक्यातील २२९ (१७८ मोठ्या अंगणवाड्या व ५१ छोट्या अंगणवाड्या) अंगणवाड्याकरीता नवीन वीज जोडणीसाठी संबंधित एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी किंवा संबंधित ग्रामपंचायतमार्फत तथा संबंधित पंचायत समितीमार्फत कोणताही मागणी अर्ज महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय तथा विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या उप विभागाकडे प्रलंबित नाही.
(2) सन २००८-२००९ या कालावधीत अंगणवाडी केंद्रांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविणेत आले नाही. अंगणवाडी केंद्रांना ग्राम पंचायत मार्फत मेडीक्लोर देण्यात आले आहे. सदर मेडीक्लोरचा वापर अंगणवाडीत पाणी शुध्दीकरणासाठी करण्यात येतो. त्यामुळे बालकांना दुषित पाणी पिण्याचा प्रश्नच उद्‌भ ावत नाही.
(3), (4) व (५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12047....

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, येथे जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे ते माझ्या मूळ प्रश्नाला बगल देणारे आहे. ते उत्तर समाधानकारक नाही. जव्हार व मोखाडा तालुक्यातील अंगणवाड्यांना वीज जोडणी दिली आहे किंवा नाही यासंबंधातील प्रश्न विचारला होता. तशी मागणी प्रकल्प अधिकारी किंवा ग्रामपंचायतीतर्फे करण्यात आली नाही अशा आशयाचे उत्तर देण्यात आले आहे. हा 100 टक्के आदिवासी भाग आहे. येथे 1993 मध्ये बालमृत्यूचे प्रकरण झाले होते. या आदिवासी भागातील ग्रामपंचायती स्वतःहून वीज जोडण्या घेण्याइतपत सक्षम नाहीत. पावसाळ्यात आणि अन्य वेळी देखील त्या भागात अंधार असतो म्हणून तेथे वीज जोडणी असणे आवश्यक आहे. परंतु, आज पर्यंत तेथे प्रकल्प अधिकारी किंवा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून कुठेच वीज जोडण्या घेतल्या गेलेल्या नाहीत. जिल्हा परिषदेकडून पाणी शुद्धीकरणासाठी यंत्रे दिली जातात. पण विद्युत जोडणी नसल्यामुळे ती यंत्रे देखील त्यांना दिली गेलेली नाहीत. एक विशेष बाब म्हणून त्या 100 टक्के आदिवासी भागामध्ये शासनातर्फे वीज जोडणी दिली जाईल काय, त्यांची विजेची बिले भरण्यासाठी ग्रामपंचायत सक्षम नसल्यामुळे प्रकल्प अधिकाऱ्याच्या माध्यमातून ती बिले भरली जातील काय ?

श्री.चंद्रकांत बावनकुळे : सभापती महोदय, कुठल्याही ठिकाणी विद्युत जोडणी द्यायची असेल तर विद्युत कायद्याप्रमाणे संबंधितांनी अर्ज केला पाहिजे. तो अर्ज अंगणवाडी सेविकेन केला पाहिजे, ग्रामपंचायतीने केला पाहिजे, प्रकल्प अधिकाऱ्याने केला पाहिजे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला पाहिजे. यासंबंधी कोणाचाही अर्जच नाही. अंगणवाडी सेविकेपासून ते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यापर्यंत कोणीही येथे विद्युत जोडणी देण्यासाठी अर्ज केला तर विद्युत जोडणी देण्यात येईल. कारण विद्युत मिटरला कोणाचे तरी नाव द्यावे लागते. शेवटी विद्युत बिलाची वसुली करावी लागतेच. अंगणवाडी, शाळा यांना कायद्याने वेगवेगळे टेरिफ आहे. आज आमच्याकडे कनेक्टीव्हीटी आहे. मला तेथे विद्युत जोडणी देण्यास अडचण नाही. अर्ज केल्यानंतर एक महिन्याच्या आत सर्व कनेक्शन्स देण्यात येतील. ..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12047....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आता आपण सगळ्या अंगणवाड्यांचे संगणकीकरण करीत आहोत. वीज नसेल तर त्या प्रोग्रॅमलाही महत्त्व राहणार नाही. हा अर्ज अंगणवाडीच्या सेविकेने करायचा किंवा ग्रामपंचायतीने करायचा हा जेवढा महत्त्वाचा विषय आहे तेवढेच बिल कोणी भरायचे हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. बालविकास विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनीच विद्युत जोडणीसाठी मागणी करून सर्व अंगणवाड्यांना वीज जोडणी द्यावी व ही समस्या खऱ्या अर्थाने सोडवावी.

**सभापती :** मंत्री महोदय, यात क्रॉस सबसिडी करता येत असेल तर आपण संबंधित विभागाच्या मंत्र्यांसोबत बसून ती देण्याचा प्रयत्न करावा. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी या प्रश्नाद्वारे जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय योग्य आहे असे मला वाटते. तेव्हा याचा आपण विचार करावा.

श्री.चंद्रकांत बावनकुळे : सभापती महोदय, विद्युत जोडणीसाठी संबंधित खात्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, दुर्गम भागातील असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत, शाळा, अंगवाड्या येथील रस्त्यांना इलेक्ट्रीफिकेशन करून देण्यासंबंधीचा कार्यक्रम मध्यंतरी महाराष्ट्र शासनाने आखलेला होता. त्या कार्यक्रमांमध्ये येथे वीज जोडणीचा कार्यक्रम व्हावयास पाहिजे होता. तो झाला नाही. परंतु, भविष्यात या सर्व गोष्टी व्हाव्यात अशी माझी विनंती आहे.

श्री.चंद्रकांत बावनकुळे : सभापती महोदय, हा प्रश्न ऊर्जा खात्याचा नाही. वीज जोडणी मिळण्यासाठी कोणी तरी अर्ज केला पाहिजे हा मुद्दा आहे. बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी वीज जोडणीसाठी अर्ज केला पाहिजे. आमची कनेक्टीव्हीटी रेडी आहे. माझ्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे. अर्ज केल्यानंतर 30 दिवसाच्या आत कनेक्शन्स देण्यात येतील. यासाठी अर्ज कोणी करायचा हे महिला बाल कल्याण विभागाला ठरवावे लागेल.

o-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:12047....

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, भविष्यात लोड शेडींग वाढणार आहे.अंगणवाडयांना सोलर सिस्टीम बसविण्याची व्यवस्था केली जाणार आहे काय ? अशा प्रकारची व्यवस्था केली तर अंगणवाडीतील कंप्युटर, प्रोजेक्टर किंवा पंखे आणि बल्ब सोलरवर चालू शकतील यासंदर्भात भविष्यात कंपल्शन केले जाणार आहे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी अंगणवाडयांना सोलर सिस्टीम बसविली जाईल काय असा प्रश्न विचारला आहे. आता राज्याची ऑफ ग्रिड सोलर पॉलिसी येत आहे. यापूर्वी 14400 मे.वॅटची ग्रिडची डपॉलिसी होती. आदिवासी भागातील अंगणवाडीच्या छतावर सोलर पॅनल बसवून वीज उपलब्ध करुन देता आली तर यासंदर्भात आदिवासी विभागाने अंगणवाडयांना रुफ टॉप करण्यासंदर्भात प्रस्ताव दिला तर त्यास मान्यता देण्यात येईल.

**सभापती :** या विषयाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांची भावना व्यक्त केलेल्या आहेत. या वीज मीटर बसविण्याच्या संदर्भात अर्ज करता येईल परंतु त्या विजेचे पैसे कोणी भरावयाचे ?वीज बिलाचे पैसे भरण्यासंदर्भात त्या त्या विभागाने जबाबदारी उचलली पाहिजे. समजा महिला बालविकास विभाग असेल. आदिवासींच्या उन्नतीसाठी बजेटच्या 9 टक्के पैसे दिले जातात.यामध्ये बरेचसे पर्सनल बेनिफिट्स असतात त्यामुळे त्यातून हे दिले जावे. त्यामुळे यासंदर्भात तिन्ही विभागांनी एकत्र बसून पॉलिसी तयार केली तर या प्रश्नाला न्याय देता येईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे :सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात बैठक घेतली जाईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. राज्यातील किती अंगणवाडयांमध्ये वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे, किती अंगणवाडयांना वीज पुरवठा करण्यात आला नाही ? ज्या ठिकाणी वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आला नाही, त्या ठिकाणी वीज पुरवठा कशा प्रकारे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, राज्यातील किती अंगणवाडयांना वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे याची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सन्माननीय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सदस्यांनी दोन तालुक्यांच्या संदर्भात प्रश्न विचारला असता तर त्यासंदर्भातील सर्व प्रश्नांची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी संपूर्ण राज्याचा प्रश्न विचारला असल्यामुळे त्याचे उत्तर आता तरी देणे शक्य नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, वीज जोडणीच्या संदर्भात आमच्याकडे अर्ज न आल्यामुळे आम्ही वीज जोडणी देऊ शकलो नाही.खरे म्हणजे हा प्रश्न सोडवणे खूप सोपे आहे. आपल्या भागातील किती अंगणवाडयांना वीज नाही यासंदर्भात एकात्मिक बालविकास अधिकाऱ्यांना यासंदर्भात आढावा घ्यावयास सांगितला तर त्यासंदर्भात आपल्याला तातडीने वीज पुरवठा करता येईल.

सभापती : मंत्री महोदय, आपण जी बैठक घेणार आहे त्या बैठकीमध्ये हा विषय सुध्दा घेण्यात यावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अंगणवाडी सेविका अर्ज करीत बसल्या तर ते शक्य नाही. मोखाडा, जव्हार या ठिकाणी मोठया प्रमाणात कुपोषण आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यांच्या गरजा काय काय आहेत त्या उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत, अधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे अंगणवाडयांना वीज जोडणी करुन दिली जाईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, राज्यातील आयुक्तांनी राज्यातील प्रधान सचिवांनी अंगणवाडयांना वीज पुरवठा करण्याच्या संदर्भातील भूमिका आमच्या विभागाला कळवली पाहिजे. यासंदर्भात आपली तसेच सन्माननीय सदस्यांची सूचना लक्षात घेऊन यासंदर्भात मी स्वत: आढावा घेतो. या बैठकीमध्ये सर्वांना बोलावून अंगणवाडयांना वीज पुरवठा कसा उपलब्ध करुन दिला जाईल यासंदर्भात निश्चितपणे निर्णय घेतो.

**सभापती** : संबंधित विभागाच्या मंत्र्यांना एकत्र बोलावून हा विषय संपवून टाका.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून झालेले अपघात***

***(२) * ११९७५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूरर:र सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

***(१) राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी गेल्या १५ दिवसात वीज पडून झालेल्या अपघातांमध्ये एकूण ४१ जण ठार झाल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,***

***(२) असल्यास, नाशिक, औरंगाबाद, नांदेडमध्ये प्रत्येकी ४, अहमदनगर-५, जालना, यवतमाळ आणि उस्मानाबाद-३, परभणी-७, लातूर व नागपूर प्रत्येकी २ आणि वर्धा जिल्हयात एकाचा वीज पडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,***

***(३) असल्यास, गोंदिया जिल्ह्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास बरबसपुरा, पालडोंगरी व खामखुर्डा या गावातील २ महिला व एका शेतकऱ्याचा वीज पडल्याने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,***

***(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,***

***(५) असल्यास, वीज पडून झालेल्या अपघातांमध्ये मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना ा शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,***

***(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?***

***श्री. दिलीप कांबळे,श्री. एकनाथराव खडसे, यांच्या करिता : (१) राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत एकूण १०९ व्यक्तींचा वीज पडून मृत्यू झालेला आहे.***

***(२) सदर कालावधीत प्रश्नातील नमूद जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.***

| ***जिल्हा*** | ***मृतांची संख्या*** |
|---|---|
| ***नाशिक*** | ***०५*** |
| ***औरंगाबाद*** | ***१०*** |
| ***नांदेड*** | ***०७*** |
| ***अहमदनगर*** | ***०८*** |
| ***जालना*** | ***०४*** |
| ***यवतमाळ*** | ***०६*** |
| ***उस्मानाबाद*** | ***०९*** |
| ***परभणी*** | ***०८*** |
| ***लातूर*** | ***०५*** |
| ***नागपूर*** | ***०६*** |
| ***वर्धा*** | ***०१*** |

***(३) होय.***

***(४) होय.***

***(५) वीज पडून मृत झालेल्या व्यक्तींच्या पात्र वारसांना निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे.***

***(६) प्रश्न उद्‌भवत नाही.***

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, वीज पडून झालेल्या मृत्यूंची संख्या दर वर्षी वाढतांना आपल्याला दिसत आहे. वीज पडून मृत्यू झाला तर त्यावर काही उत्तरच नाही असे आपण मानतो. परंतु आयआयटी मुंबई मधील श्री.रवि सिन्हा आणि लातूरचे पर्यावरण विषयक तज्ज्ञ श्री.अतुल देऊळगावकर हे 2006 पासून उंच लोखंडाचे मनोरे केले तर त्या ठिकाणी विजा आकृष्ठ होतात व

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:11975...

डॉ.नीलम गोऱ्हे .....

त्या 2 ते 3 परिसरातील लोक विजा पडण्यापासून वाचू शकतात. त्यांचे असेही म्हणणे आहे की, देवळावर झेंडा लावण्यासाठी लोखंडी खांब लावलेला असतो व त्या खांबामुळे अर्थिंग झाल्यामुळे त्याच्या आसपास विजा पडत नाहीत. उंच लोखंडी खांब बसविण्यासाठी केवळ 2-3 हजाराचा खर्च येतो व अशा प्रकारे लोखंडाचे उंच मनोरे बसविले तर जीवित हानी सुध्दा वाचू शकेल.

सभापती महोदय,परदेशात डॉप्लर रडारच्या माध्यमातून आसपासच्या परिसरात वीज केव्हा पडणार आहे याची माहिती लोकांना 3 ते 4 तास अगोदर मिळू शकते. त्यामुळे डॉप्लरसारखी यंत्रणा विकत घेण्याच्या संदर्भात शासन काही विचार करणार आहे काय ?वीज प्रतिबंधक उंच लोखंडी खांब बसविण्याच्या संदर्भात मुंबई आयआयटीचे श्री.रवि सिन्हा आणि लातूरचे पर्यावरण विषयक तज्ज्ञ श्री.अतुल देऊळगावकर यांच्या बरोबर बैठक घेऊन काही उपाययोजना केली आहे काय ? तसेच डॉप्लर रडार आपल्याकडे बसविले जातील काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सूचना केल्या प्रमाणे मुंबई आयआयटीचे श्री.रवि सिन्हा आणि लातूरचे पर्यावरण विषयक तज्ज्ञ श्री.अतुल देऊळगावकर यांच्या बरोबर लवकरच बैठक घेण्यात येईल. विशेषतः राज्यातील ग्रामीण भागातील प्रशासकीय इमारती आहेत त्या ठिकाणी अशा प्रकारचे मनोरे बसविण्याची कार्यवाही करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, लाईटनिंग डिटेक्शन सेन्सर यंत्रणा 10 कोटी रुपये खर्च करुन आपण बसवली आहे काय ?जर ही यंत्रणा बसवली असेल तर त्या यंत्रणेचा फिडबॅक आपल्याला काय मिळाला आहे ? तो फिड बॅक मिळण्यासाठी आपल्याकडे प्रशिक्षीत अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? उस्मानाबाद, परभणी, औरंगाबाद येथे वीज पडून मृत्यू होण्याच्या संख्येत वाढ झाली आहे त्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, उस्मानाबाद, परभणी, औरंगाबाद येथे 10 कोटी रुपये खर्च करुन लाईटनिंग डिटेक्शन सेन्सर यंत्रणा बसवली आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी उपस्थित केलेला असून या प्रश्नाची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अलिकडच्या कालखंडात वीज पडण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे हे संशोधनाअती दिसून आले आहे. त्यामुळे वीज पडून मृत्यू होण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. पूर्वीही आणि आताही राज्य सरकारच्या माध्यमातून शासकीय, व खाजगी इमारतींचा प्लॅन मंजूर करीत असताना लाईटनिंग कंडक्टर बसविण्याच्या संदर्भात कम्पल्शन करण्याचे शासनाने आदेश काढलेले आहेत. शासकीय, निमशासकीय व खाजगी इमारतींवर लाईटनिंग कंडक्टर बसविण्यासाठी शासन जागृती करीत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्यानुसार इंडियन इन्स्टीटयूट ऑफ ट्रॉपिकल मेटॅलॉजी (आयटीआयएम) पुणे यांनी सॅटेलाईटद्वारे वीज कोठे व केव्हा पडू शकणार आहे याची माहिती 30-40 मिनिटे अगोदर मिळू शकेल अशी यंत्रणा विकसित केली आहे.या माहितीचा अंदाज 1-2 कि.मी. क्षेत्रात मिळू शकेल परंतु ही वीज याच घरावर पडेल अशी माहिती मिळू शकणार नाही. सॅटेलाईटच्या माध्यमातून याच्यापुढचे संशोधन सुरु आहे.

P-1/.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11975...

श्री.एकनाथराव खडसे.......

त्यासाठी कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग द्यावे लागेल. जिल्ह्यातील महसूल यंत्रणेला ट्रेनिंग देण्याचे काम सुरु केलेले आहे. ही वीज नेमकी कुठे पडणार आहे सॅटेलाईच्या माध्यमातून समजल्यावर नेमका कोणता स्पॉट निवडावा, गुगल मॅपच्या माध्यमातून तो स्पॉट कसा आयडेन्टीफाय करावा आणि तेवढ्या कमी कालावधीमध्ये गावापर्यंत निरोप कोणत्या माध्यमातून द्यावा या संदर्भातील ट्रेनिंगची व्यवस्था आपण करीत आहोत.

**सभापती :** आपण ग्लोबल वॉर्मिंगबद्दल बोललात. ग्लोबल वॉर्मिंग हे कदाचित वीज पडण्याचे कारण असू शकेल. नुकतीच पॅरिस येथे् आंतरराष्ट्रीय परिषद झाली. त्या परिषदेमध्ये माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोंदी यांनी अत्यंत हिरीरिने अशी आक्रमक भूमिका घेतली. वर्तमानपत्रांतील बातम्यांवरुन असे कळते की, त्या ठिकाणी काही ॲग्रीमेंट झालेल्या आहेत. त्या दिल्ल्ी आणि आपल्यापर्यंत पोहोचतील. परंतु मला स्वतःला असे वाटते की, आपल्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या आणि त्या संदर्भात करावयाची व्यवस्था याबाबत लोकप्रतिनिधींना जागरुक करणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा या विषयाच्या संदर्भात आपणास आवश्यक वाटत असेल तर आगामी काळात एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे किंवा परिषद घ्यावी असे मला स्वतःला वाटते्. त्या संदर्भात आपण उचित कार्यवाही करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय,आपण अतिशय चांगली सूचना केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात आपणास वि.स.पागे संसदीय प्रशिक्ष्ण केंद्राच्या माध्यमातून दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य आणि या विषयातील तज्ज्ञ यांची एक परिषद आयोजित करता येईल. आपण एक चांगली सूचना केलेली आहे. जगाने त्याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे. त्यामध्ये आपलेही योगदान असले पाहिजे. या चर्चेच्या माध्यमातून आपणास जे मार्गदर्शन होईल त्यातून नवीन कायदे करता येतील काय किंवा काही नवीन अंमलबजावणी करता येईल याचा याची तपासणी करता येईल.

---------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवल्याबाबत

**(3) * १११०६ श्रीमती शोभाताई फडणवीसस:स** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०१४-१५ या वर्षात ५० टक्के पेक्षा कमी पीक आणेवारी असतांना सुध्दा या वर्षात ३२१३ शेतकऱ्यांनी राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत विमा भरुनही सदर विम्याच्या लाभापासून त्याना वंचित ठेवण्यात आल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर तालुका ५० टक्के पेक्षा कमी आणेवारी असतांना शेतकऱ्यांना विम्याच्या लाभा पासून वंचित ठेवण्याची कारणे कोणती आहेत,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**प्रा.राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे यांच्यकरिता :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या मूल तालुक्यातील ५६१२ शेतकऱ्यांनी रुपये ३२.०९ लाख विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ४१ शेतकऱ्यांना रुपये ६७,४६०/- इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली असून माहे जून व जुलै, २०१५ मध्ये ती संबंधित बँकामार्फत लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

पीक विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारी नुकसान भरपाई ही पीक आणेवारी / पैसेवारीच्या आधारे दिली जात नाही. सदर नुकसान भरपाई ही भारतीय कृषी विमा कंपनीने निश्चित केलेल्या विशिष्ठ सुत्रानुसार दिली जाते.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुका हा धानाचा तालुका आहे. सोयाबीन उत्पादक 41 शेतकऱ्यांना 67 हजार 460 रूपयांची नुकसान भरपाई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १११०६

श्रीमती शोभा फडणवीस...

देण्यात आलेली आहे. सोयाबीन पिकाचा विम्याचा हेक्टरी हप्ता 602 रुपये आहे. त्या बदल्यात शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी 100 रुपये 19 पैसे इतकी रक्कम मिळाली आहे. उत्तरामध्ये नमूद केले आहे की, नुकसान भरपाई ही भारतीय कृषी विमा कंपनीने निश्चित केलेल्या विशिष्ट सुत्रानुसार दिली जाते. माझा प्रश्न आहे की, सोयाबीन पीकासाठी कोणते सूत्र आहे आणि धानाच्या पिकासाठी कोणते सूत्र आहे ? आणेवारी नसेल तर भारतीय कृषी विमा कपंनी कशाच्या आधारावर नुकसान भरपाई देते, त्यांचे कोणते सूत्र आहे ? शेतकरी कोणत्या सुत्रानुसार हप्ता भरतात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, 40 टक्क्यांवर नुकसान झाले असेल तरच हा पीक विमा लागू होतो. जेवढ्या प्रमाणात नुकसान झाले असेल तेवढ्याच प्रमाणात पीक विमा लागू होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, आम्ही विम्यापोटी जास्त रक्कम भरतो पण त्या बदल्यात नुकसानभरपाई कमी मिळते. पीक विमा काढण्याची एक सूत्र आहे. ते मी आपणास सांगतो. नुकसान भरपाई बरोबर उंबरठा उत्पादन वजा वर्षाचे सरासरी उत्पन्न भागिले उबंरठा उत्पन्न गुणिले विमा संरक्षित रक्कम या सूत्रानुसार किंमत ठरविली जाते. जर शेतकऱ्यांचे जास्त नुकसान झाले तर त्यांना जास्तीची नुकसान भरपाई मिळते. शेतकऱ्यांना वरील सूत्रानुसार विम्याची रक्कम मिळते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, येथेच शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. कारण दरवर्षी उंबरठा उत्पन्न बदलत असते. आम्हाला हेक्टरी उंबरठा उत्पन्न 7.72 क्विंटल धान दिलेले आहे. आम्ही चांगल्या कंपनीचे बियाणे वापरतो, रासायनिक खते टाकतो आणि मेहनत घेऊन कमीत कमी हेक्टरी 10 क्विंटल उत्पन्न काढतो. मागील वर्षी आमचे 30 टक्के नुकसान झाले. आमचे उंबरठा उत्पन्न 7 क्विंटल दाखविले असेल तर येथील शेतकऱ्यांना आयुष्यभर नुकसान भरपाई मिळणार नाही. आम्हाला 10 वर्षापूर्वी नुकसान झाल्यानंतर नुकसान भरपाई मिळत होती. परंतु आता जे नवीन धोरण काढलेले आहे त्यामध्ये आम्ही विमा कंपनीची भर करण्याचे काम आम्ही करीत आहोत. शेतकऱ्यांना नुकसानीपोटी काहीच भरपाई मिळत नाही. आम्ही विमा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १११०६.....

श्रीमती शोभा फडणवीस...

रकमेपोटी 602 रुपये भरायचे आणि नुकसानीपोटी आम्हाला फक्त 100 रुपये मिळत आहेत. आपण सांगत आहात की, भारतीय विमा कंपनी ठरवून देईल त्याप्रमाणे नुकसान भरपाई मिळणार. आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर धानाचे उत्पादन किती आहे याची आम्ही माहिती घेतली. त्यामध्ये 31.12 क्विंटल इतके उत्पन्न व्हावयाला पाहिजे असे त्यामध्ये म्हटलेले आहे. आपण आम्हाला 7 क्विंटलवर आणत असाल तर माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, एक तर आम्हाला विमा कंपनीचे हप्ते भरु देऊ नका किंवा यामध्ये बदल करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका शासन घेणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस जे सांगत आहेत ते बरोबर आहे. सन 2014 मध्ये खरीप हंगामामध्ये चंद्रपूर जिल्ह्यात 62 हजार शेतकऱ्यांनी विमा काढला होता. 62 हजार शेतकऱ्यांनी 4 कोटी 13 लाख रुपये इतक्या रुपयांचा हप्ता भरला होता. या 4 कोटी 13 लाख रुपयांपैकी 20 कोटी 44 लाख रुपयांचा हप्ता चंद्रपूर जिल्ह्यातून देण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मूल तालुक्यातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. शेतकऱ्यांनी जो विमा हप्ता भरलेला आहे त्या तुलनेत श्‍तकऱ्यांना कमी रक्कम मिळालेली आहे. त्या शेतकऱ्यांना 5 हजार 612 इतकी रक्कम मिळालेली आहे....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्हाला सोयाबीन पिकाच्या विम्याची रक्कम मिळालेली आहे. आम्हाला धानाच्या विम्याची रक्कम मिळालेली नाही. सोयाबीनचा हप्ता 602 रुपये भ्रला आणि नुकसानीपोटी आम्हाला फक्त 100 रुपये मिळालेले आहेत. आम्हाला धानाच्या विम्याची रक्कम मिळालेली नाही. आमची आणेवारी 30 टक्केच्या खाली होती. आमच्या बाजूच्या तालुक्याला नुकसान भरपाई मिळते तर मग आम्हाला का मिळत नाही म्हणून आम्ही आम्ही बँकेत, जिल्हाधिकारी कार्यालयात चौकशी केली. माननीय पालक मंत्र्यांना पत्र दिले. आम्हाला नुकसान भरपाई मिळालेली नाही म्हणून हा प्रश्न येथे आलेला आहे. आम्हाला सोयाबीन पिकासाठी विम्याचे पैसे मिळालेले आहेत.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११९०६.....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांची स्पेसिफीक तक्रार असेल तर आपण बैठक घेऊन चौकशी करावी. राज्यभर उंबरठा उत्पन्नाबाबत तक्रारी आहेत.

प्रा.राम शिंदे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि इतर तपशीलवार माहिती दिलेली आहे त्यामध्ये काही चुकीची माहिती असेल तर संबंधितांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपल्याकडे पीक विम्याच्या संदर्भात वेगवेगळे समज आहेत. काही लोकांना असे वाटते की, दुष्काळ जाहीर केला तर विम्याचे पैसे मिळाले पाहिजेत. आणेवारी आणि विम्याचा काही संबंध नाही. विमा कंपनीने आपणास उंबरठा सूत्र घालून दिलेले आहे आणि सूत्रानुसार विम्याची रक्कम मिळते. उंबरठा उत्पन्न म्हणजे चालू वर्षाचे सरासरी उत्पन्न. आपण धान आणि गहू पिकाची मागील तीन वर्षाची सरासरी धरतो. उंबरठा उत्पन्नाच्या संदर्भात दहा कापणीचे प्रयोग करण्यात आले.

........ Q-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11106....

श्री.एकनाथराव खडसे....

त्यांची सरासरी काढल्यानंतर ज्या ठिकाणी अपेक्षित उत्पन्नाप्रमाणे 100 टक्के उत्पन्न आले तर त्या ठिकाणी नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही. त्यांनी ठरविलेल्या सूत्रानुसार 99 टक्के उत्पन्न आले आणि 1 टक्के घट आली तर अशा वेळी जेवढी घट झाली असेल तेवढीच नुकसान भरपाई देण्यात येईल. त्या ठिकाणी शून्य टक्के उत्पादन आल्यास 100 टक्के नुकसान भरपाई देण्यात येईल, अशा प्रकारचे ते सूत्र आहे. या सूत्रामध्ये काही बदल करावा काय, हे बघू.

सभापती महोदय, कमी कालावधीत येणाऱ्या पिकांसाठी वेगळी पध्दत अवलंबवावी अशी विनंती विमा कंपन्यांकडे केली आहे. या विमा कंपन्या केंद्र सरकारचा अंगिकृत उपक्रम आहे. त्यामुळे या बाबतीत त्यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल आणि या कार्यपध्दतीमध्ये आणखी काही सुलभता आणता येईल काय, या बाबत काळजी घेत आहोत. इतर काही पिकांच्या बाबतीत या वर्षी बदल करण्यात आला आहे. फळ पीक विमा योजना, अन्य पीक योजनेच्या संदर्भात किंवा हवामानावर आधारित पीक विमा योजना असे अनेक विषय आहेत. या संदर्भात सध्या चार प्रमुख विमा कंपन्या या कामी पुढे आल्या आहेत. या कंपन्यांसोबत चर्चा करुन जी कंपनी अधिकाधिक नुकसान भरपाई देईल त्या कंपनीसोबत करार करण्यात येतो. परंतु अनेकदा असे घडते की, एका बाजूला विमा कंपन्या जास्त नुकसान भरपाई देण्यास तयार असतील तर दुसऱ्या बाजूला त्यात जास्तीत जास्त अटी व शर्ती समाविष्ट करण्यात येतात. त्यामुळे फळ पीक विम्याच्या संदर्भात उष्णतामान किती असावयास पहिजे, केळी पिकासाठी उष्णतामान किती असले पाहिजे याचा विचार केला जातो. पूर्वीच्या पध्दतीनुसार सलग तीन दिवस 45 डिग्री उष्णतामान असेल तरच नुकसान भरपाई देण्यात येत होती. परंतु सलग तीन दिवस 45 डिग्री उष्णतामान राहत नाही आणि त्यामुळे मदत मिळत नाही. त्यामुळे हे उष्णतामान 45 अंशावरुन 40 अंशावर आणण्यास कंपन्यांनी मान्यता दिली असून त्यांनी तसा करार केला आहे. तसेच हवामानाचा वेग ताशी 55 कि.मी. असेल आणि त्यामुळे नुकसान झाले तरच नुकसान भरपाई दिली जाते. परंतु अनेकदा असे होते की, एका भागात हवेचा ताशी 55 कि.मी. वेग असला की त्या भागात नुकसान होते, परंतु त्याच्या बाजूलाच असलेल्या गावांमध्ये हा वेग ताशी 55 कि.मी. नसला तरी, त्या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11106....

श्री.एकनाथराव खडसे....

पिकांचे नुकसान होते. परंतु त्या ठिकाणी हवेचा ताशी 55 कि.मी. वेग नसल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मिळत नाही. त्यामुळे हा वेग 55 कि.मी. वरुन 50 कि.मी. पर्यंत खाली आणण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे. वास्तविक पाहता हा वेग 45 कि.मी. पर्यंत खाली आणण्याचा आमचा आग्रह होता. परंतु ते शक्य झाले नाही. तसेच दुसरी बाब अशी की, एखाद्या भागात 65 मि.लि. पाऊस झाला तरच नुकसान भरपाई देण्यात येईल. शिवाय हा पाऊस सलग तीन दिवस झाला पाहिजे. सलग तीन दिवस 65 मि.लि. पाऊस झाला नाही तर नुकसान भरपाई मिळत नाही. त्यामुळे एक दिवस जरी 65 मि.लि. पाऊस झाला तरी त्या ठिकाणी नुकसान भरपाई देता आली पाहिजे, असा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, वादळ आणि गारपीट झाली असेल तर त्या ठिकाणी एवढ्या प्रमाणात पाऊस पडू शकत नाही. वास्तविक पाहता यामध्ये शेतकऱ्याचे नुकसान झालेले असते. त्यामुळे गारपीट आणि वादळामुळे नुकसान झाल्यास त्या ठिकाणी हवेचा वेग लघात घ्यावा, पावसाचा वेग लक्षात घेऊ नये, असे सुचविले आहे. त्यामुळे आता विमा कंपन्या पुढे येण्यास सुरुवात झाली आहे. या सूत्रानुसारच विमा कंपन्यासोबत करार करुन, पुढील वर्षापासून नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यात खरीप हंगामात 5612 शेतकऱ्यांनी विम्याची रक्कम भरुनही केवळ 41 शेतकऱ्यांना रु.67,460/- नुकसान भ्ंरपाई देण्यात आल्याबाबतचा प्रश्न विचारला आहे. सभागृहाचे नेते आणि माननीय कृषी मंत्र्यांनी या प्रश्नाला अतिशय सुंदर उत्तर दिले आहे. मूल तालुका हा जसा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा आहे तसाच तो माननीय मुख्यमंत्र्यांचा सुध्दा आहे. कारण माननीय मुख्यमंत्र्यांची शेती त्या तालुक्यात आहे.

सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, राज्यातील शेतकऱ्यांचा फायदा होण्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनीचे जे निकष आहेत त्यामध्ये आपल्या राज्यापुरते फेरबदल करण्यात येतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11106....

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी असे विचारले आहे की, भारतीय विमा कंपन्यांचे जे निकष आहेत त्यामध्ये आपल्या राज्यापुरते स्पेसिफिक बदल घडवून आणण्याची शासनाची तयारी आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पीक विमा उतरवित असताना निविदा काढली जाते. विमा कंपन्या त्या प्रक्रियेत सहभागी होत असतात. राज्यात एकच दर आणि नियम असतील असे नाही. परिस्थितीनुसार ज्या कंपन्या सरकारच्या अटी व शर्ती स्वीकारतील त्यांना काम दिले जाते. या वर्षी वेगवेगळ्या पीक विम्याच्या संदर्भात विमा कंपन्यांना आवाहन केले होते. त्यानुसार चार कंपन्या पुढे आल्या आहेत. या चारही कंपन्या केंद्र सरकारच्या अंगिकृत व्यवसायातील आहेत. ज्या कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ देता येईल आणि त्यांच्याकडून कमीत कमी अटी व शर्ती घालता येतील त्यांच्याशी टायअप केला जाईल. आम्ही सुचविलेल्या काही सुधारण त्यांनी मान्य केल्या आहेत. आपल्या राज्यात फळबागासाठी वेगळी विमा योजना आहे. खरीप हंगामातील गहू वा इतर पिकांसाठी वेगळी योजना आहे. म्हणजेच रब्बी आणि खरीप पिकांसाठी वेगवगळ्या योजना आहेत. तसेच विम्याचे हप्ते सुध्दा वेगवेगळे लागू केले जातात. त्यानुसार त्या शेतकऱ्यांना लाभ दिला जातो.

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारलेला आहे. पिकाची आणेवारी असो, पीक विमा असो किंवा अपघात विमा असो. या संदर्भातील विमा उतरविल्यानंतर विम्या कंपन्यांना फायदाच होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, याबद्दल दुमत असण्याचे कारणे नाही.

सभापती महोदय, अपघात विम्याच्या बाबतीत काय अनुभव आला त्याचे मी एक उदाहरण देतो. यवतमाळ जिल्ह्यातील दत्तात्रय चंद्रभानजी बुटले या शेतकऱ्याचे अपघाती निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी यवतमाळ येथे मदतीसाठी प्रकरण दाखल केले. मी या प्रकरणाची माहिती घेतली असता, तेथील अधिकाऱ्यांनी या व्यक्तीच्या विम्याची फाईल गहाळ झाल्याचे सांगितले. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अशा प्रकारे विमा कंपनी किंवा आपल्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असेल तर या बाबतीत आपण काय उपाययोजना करणार आहात आणि संबंधित शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11106....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या राज्यात या वर्षापासून आतापर्यंत शेतकऱ्यांचे अपघात झाल्यास, अंगावर झाड पडून शेतकरी मृत्युमुखी पडल्यास, झाड तोडताना, बैलावरून पडून मृत्यू झाल्यास किंवा रस्त्यावरुन जाताना अशा विविध कारणांमुळे अपघाती मृत्यू झाला तर त्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयाला संरक्षण देण्याची कोणतीही योजना अस्तित्वात नव्हती. परंतु माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी मागच्या वर्षी अपघात विमा योजना सुरु केली. त्याच धर्तीवर राज्य सरकारने या वर्षापासून स्व.गोपीनाथरावजी मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु केली आहे. राज्यातील 1 कोटी 37 लाख खातेदार शेतकऱ्यांचा विमा काढण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. त्यानुसार सर्व खातेदार शेतकऱ्यांच्या विम्याचा हप्ता राज्य सरकारने आपल्या तिजोरीतून भरला आहे. त्यामुळे 1 कोटी 37 लाख शेतकऱ्यांपैकी कुणाचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्या व्यक्तीच्या कुटुंबीयाला 2 लाख रुपयांचे विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय लागू करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता विम्याचा हफ्ता भरण्याची गरज नाही. कारण राज्य सरकारने त्यांच्या विम्याचा हप्ता अगोदरच भरलेला आहे. त्यामुळे यापुढच्या काळात शेतकरी कोणत्याही अपघाताने मृत्युमुखी पडल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास, त्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयाला 2 लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण देण्यास सुरुवात केली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी यवतमाळ येथील घटनेचा उल्लेख केला. त्यांनी या घटनेची माहिती मला द्यावी. या संदर्भात निश्चितपणे चौकशी करुन त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना योग्य ती मदत करण्याची भूमिका सरकारकडून घेतली जाईल.

------

**जायकवाडी प्रकल्पातील औरंगाबाद, अहमदनगर व बीड जिल्ह्यातील धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

*(४) * **११८०७** श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) जायकवाडी प्रकल्पातील औरंगाबाद, अहमदनगर व बीड जिल्ह्यातील धरणग्रस्तांना सन १९७१ च्या शिफारशीनुसार ३ महिन्याचे आत जमीन वाटप करण्याचे आदेश लोक आयुक्त यांनी दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१३ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सदर आदेशाप्रमाणे शासनाने आजपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, उक्त आदेशाप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने संबंधित आधिकाऱ्यांवर कारवाई करुन प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) असल्यास, टेंभापुरी, लिंबेजुळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावासह २३ गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आली नसल्याने सदर गावातील प्रकल्पग्रस्त शेतकरी माहे मार्च, २०१५ पासून ठिय्या आंदोलन करत आहेत, हे ही खरे आहे काय,*
*(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यासह पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री.दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता* **:** (१) हे खरे आहे.
*(२) व* (३) *जायकवाडी प्रकल्पाच्या बाबतीत जे प्रकल्पग्रस्त भूसंपादन मोबदल्याच्या रकमेपैकी* ७५% *रक्कम शासनाकडे जमा ठेवणार नाहीत ते पर्यायी जमीन मिळण्यास पात्र असणार नाहीत, याबाबत* १९७४ *सालीच कळविण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयानेही प्रदीर्घ विलंबाने जमीन मागणी बाबतच्या रिट याचिका खारीज केल्या आहेत.*

*तसेच विधी व न्याय विभागामार्फत सन २०१२ मध्ये जायकवाडी प्रकल्पग्रस्तांचे मुदतबाह्य जमीन मागणी अर्ज विचारात घेऊ नयेत हे कळविले होते. याशिवाय कालबाह्य व भूसंपादन मोबदल्याच्या नियमानुसार ठरलेली रक्कम कापून न दिलेले प्रकल्पग्रस्त पर्यायी जमीन मिळण्यास पात्र असणार नाही असे मा.महाअधिवक्ता यांनी कळविले आहे.*

*या बाबींमुळे लोकायुक्तांच्या उपरोक्त निर्णयावर कार्यवाही करता आलेली नाही.*
*(४) व* (५) *अंशत: खरे आहे,*

*श्री सुभेदार मेजर सुखदेव बन यांनी निवेदन दिले होते व तसेच तेथे ठिय्या आंदोलनही चालू होते. या संबंधाने जायकवाडी प्रकल्प टेंभापूरी प्रकल्पांतर्गत बाधित प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणीबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे बैठका झाल्या आहेत.त दिनांक १२/०५/२०१५ रोजी मा. राज्यमंत्री (म. व पु.) यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येऊन योग्य त्या कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.*
*(६) प्रश्न उद्‌भवत नाही.*



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "माननीय उच्च न्यायालयानेही प्रदीर्घ विलंबाने जमीन मागणी बाबतच्या रिट याचिका खारीज केल्या आहेत." महोदय, जायकवाडी प्रकल्प करण्याचा निर्णय 1965 पूर्वी घेण्यात आला होता. त्यावेळी भूसंपादनाचा कायदा अस्तित्वात नव्हता. त्या काळात जायकवाडी प्रकल्पासाठी केवळ साध्या कागदावर शेतकऱ्यांचे अंगठे घेऊन, राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्या लोकांना या बाबत काहीच माहीत नव्हते. त्यांना आज त्या जमिनीचा काहीच उपयोग होत नाही.

..आर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807....

श्री. अमरसिंह पंडित ....

सभापती महोदय, आपण एक कायदा केला आहे. मी माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांचे अभिनंदन करेन. ना भूतो, ना भविष्यती असा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत कोणीही घेऊ शकले नाही. काल त्यांनी महसुली तंटे निकाली काढण्याच्या संदर्भात एक मार्गदर्शक सूचना काढली आणि त्यानुसार त्यांनी हे तंटे निकाली काढण्याच्या संदर्भात 30 दिवसांच्या आत निर्णय करणे या संदर्भात खाली कळविले आहे. त्यांनी खूप धाडसी निर्णय घेतला आहे. उद्योग विभागाने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आहेत, मात्र तेथे कोणतेही उद्योग उभे केलेले नाहीत, त्या जमिनी परत त्या शेतकऱ्यांना ज्या रकमेला घेतल्या, 10-15 वर्षांपूर्वीच्या असल्या, आजच्या किंमती वाढल्या असतील तरी, त्याच रकमेत परत त्या शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय त्यांनी केलेला आहे. जायकवाडीच्या धरणाकडे मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील, आशिया खंडातील सर्वांत मोठे मातीचे धरण म्हणून पाहिले जाते. सभापती महोदय, फार जमिनी आहेत, तेथपर्यंत पाणीही पोहचत नाही, त्या जमिनी परत करण्याचा विचार करावा. 25 वर्षांपासून तंटे, वाद-विवाद सुरू आहेत. माझी नम्र विनंती आहे की, दुष्काळी भागातील लोकांना जमिनी परत देताना जो निकष लावला, उद्योग विभागाच्या जमिनी परत देताना जो निकष लावला, तोच निकष जायकवाडी, टेंभापुरी अशा अनेक ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना जमिनी परत देण्याच्या संदर्भातील निर्णय घेताना लावणार का, तसा निर्णय करणार का, जमिनी परत करताना सर्व प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात हा निर्णय लागू करण्याच्या संदर्भात शासनाची भूमिका राहील का ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण बुडीत क्षेत्रातील की लाभ क्षेत्रातील जमिनींबाबत बोलत आहात ?

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, दोन्हींबबाबत बोलत आहे. लाभ क्षेत्र डाऊनस्ट्रिमला जाईल.

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, भूसंपादनाचा कायदा सन 1894 चा आहे. फक्त पुनर्वसनाचा कायदा सन 1976 नंतरचा आहे. सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे की, शासनाने काल अन्य जमिनीच्या संदर्भात निर्णय केला त्याप्रमाणे किंवा तो निर्णय

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807....

श्री. दिलीप कांबळे ....

धरणग्रस्तांच्या संदर्भात लागू करणार का ? मला वाटते की, केवळ जायकवाडीचा हा विषय नाही तर राज्यातील अनेक प्रकल्पांच्या संदर्भात असे तंटे प्रलंबित आहेत. शासन या संदर्भात लवकरच निर्णय करेल.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, तुमच्याकडे प्रलंबित रिट आहेत हे मान्य आहे. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे, उत्तरही पिनपॉईंटेड द्यावे. शासन निर्णय करेल असे फक्त सांगू नका. आम्ही स्पष्ट सांगितले आहे. आपण शेतकऱ्यांच्या जमिनी उद्योगांसाठी घेतल्या होत्या, त्या परत केल्या आहेत, त्याच धर्तीवर या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी देण्याबाबत, जेथे जमिनी उपलब्ध आहेत तेथील म्हणत आहे. आमचा असा आग्रह, अट्टाहास नाही की, कोणत्या तरी जमिनी त्यांना उपलब्ध करून द्याव्यात. ऑफस्ट्रिमवर उपलब्ध जमिनीच्या संदर्भात या धर्तीवर निर्णय करता येईल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. उद्योगांसाठी घेतलेल्या जमिनीच्या संदर्भात सूचना केली आहे. सभागृहात कालच निर्णय करण्यात आला आहे की, औद्योगिक प्रयोजनासाठी जमिन्या घेतल्या असतील आणि त्यांचा वापर 10 वर्षे केला नसेल तर त्या जमिनी त्यांच्या मूळ मालकाला मूळ किंमतीवर परत द्याव्यात. सोबत हाही निर्णय घेतला होता की, एनए पोटेंशियल जमिनी आहेत तेथे जमीन खरेदी करीत असताना शेतकरी असलाच पाहिजे अशी अट आता शिथिल करण्यात आली आहे. राज्यात जमीन खरेदीसाठी शेतकरी असला पाहिजे ही अट आपण रद्द केली आहे. आता हा कायदा पुढच्या कालखंडात लागेल. जायकवाडीचे धरण झाले त्या काळात पुनर्वसनाचा कायदा नव्हता. पुनर्वसन कायदा सन 1976 ला झाला, त्याच्या अगोदर शेतकऱ्यांची जमीन गेलेली आहे. कायद्याच्या अनुषंगाने जर पर्यायी जमीन द्यायची असेल तर त्यांनी ठेव ठेवली पाहिजे. भूसंपादनाची रक्कम देत असताना काही विशिष्ट रक्कम आपण राखून ठेवतो, त्याच्याऐवजी पर्यायी जमीन देतो हा आपला कायदा आहे. या शेतकऱ्यांनी अशा स्वरूपाची कोणतीही ठेव त्या काळात सरकारकडे ठेवली नव्हती. ज्यांनी या संदर्भत अशी मागणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807....

श्री. एकनाथराव खडसे ....

केली होती, त्या काही शेतकऱ्यांच्या संदर्भात विचार केला. पण ज्यांनी मागणी केली, ठेव ठेवली नव्हती, सरकारने यांच्याविरूद्ध निर्णय दिला, त्या निर्णयाच्या विरूद्ध ते माननीय उच्च न्यायालयात गेले. माननीय उच्च न्यायालयाने त्यांचे अपिल खारीज केले. नियमाच्या बाहेर सरकार हे देऊ शकत नाही असे सांगितले. माननीय सर्वोच्च न्यायालयानेही ते नाकारले तरीही सरकारने त्यांना देता येईल का यासाठी विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला. सर्व काही बरोबर असले तरी त्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांना आपल्याला हे देता येईल का हे पहावे यासाठी विचारणा करण्यात आली. मात्र विधी व न्याय विभागाने या संदर्भात नकार दिलेला आहे. त्यामुळे आपल्याला यांना ज्यांच्याकडून सन 1962-65 च्या काळात जमिनी घेतल्या आहे त्यांना आता पर्यायी जमीन देणे शक्य नाही.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न चांगलेच जाणून आहेत. मला फक्त एक मुद्दा स्पष्ट करायचा आहे. आपल्याकडे गाळपेरा नावाची गोष्ट असते. जमिनी गेल्या तरी ज्यावेळी ते पाणी खाली जाते, त्यावेळी त्या जमिनी शिल्लक राहतात. 8 महिने शेती करण्याची परिस्थिती निर्माण होते, त्या क्षेत्रात शेती करतो त्याला गाळपेरा म्हटले जाते. अनेक ठिकाणी हे गाळपेरा मोठ्या प्रमाणात झाले आहेत, तेथपर्यंत पाणी पोहचत नाही. सभापती महोदय, असेही ते जमिनी कसत आहेत, त्यांना कर्ज मिळण्यासाठी दुसरा मार्ग नाही, बँकेचे लोन घ्यायचे असते. आता देखील ते शेती करीत आहेत. वर्षांनुवर्षे ते शे्ती करतात. परंतु त्यांना कर्ज मिळू शकत नाही, कारण 7/12 त्यांच्या नावाने नाही. ते गाळपेऱ्यात शेती करतात असे दिसत आहे. जमिनी अशाही त्यांच्याच ताब्यात आहेत. ते ऑफस्ट्रिममध्ये शे्ती करीत आहेत हेही तुम्हा-आम्हाला मान्य आहे. माझी तुम्हाला एक नम्र विनंत आहे की, त्यांना एक संधी द्यावी. विधी व न्याय विभागाने लिहिले असेल, मला मान्य आहे. पण कायदेशीरित्या यातून मार्ग काढण्याची एक संधी आपण द्यावी. आपण काल परवा लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात बोलताना सांगितले. उल्हासनगरमध्ये लोकांनी जमिनींवर अतिक्रमण केले आहे, संपूर्ण राज्यात अतिक्रमण केले आहे, पुण्यातील प्रकरणे आहेत. शासनाने राज्यातील अतिक्रमणाची सर्व प्रकरणे नियमानुकूल केली

ता.प्र.क्र.11807....

श्री. अमरसिंह पंडित ....

आहेत. आज शेतकरी केवळ संघटीत नाही म्हणून हे होऊ शकत नाही का ? विधी व न्याय विभागाने तुम्हाला मार्गदर्शन दिले आहे की, तसे देता येणार नाही. शासन म्हणून मार्ग काढणार की नाही ? गाळपेऱ्यात कसत असणाऱ्या जमिनी त्यांना परत देण्याच्या संदर्भात सरकारने पुनर्विचार करावा.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. मी सांगू इच्छितो की, त्यांना पूर्ण संधी देण्यात आली होती. हा कायदा लागू नव्हता तरीही त्या शेतकऱ्यांना अशा स्वरूपाची ठेव ठेवावी म्हणून सन 1974 नंतरही कळविण्यात आले होते. आता असा नवीन कायदा आपल्याकडे सन 1976 ला लागू केला आहे. सांगण्यात आले होते की, तुम्हाला आवश्यकता असेल तर तुम्ही अजुनही ठेव भरू शकता. आपला सन 1976 चा कायदा मंजूर झाल्यानंतर परत कळविले होते. त्यांनी त्या काळात प्रतिसाद दिला नाही म्हणून नावे वगळण्यात आली. हे खरे आहे की, बऱ्याच ठिकाणी गाळपेर जमिनी आहेत. बॅकवॉटरमुळे पाणी येत राहते, बॅकवॉटरमुळे काही वेळा मोठ्या प्रमाणात संपादित केलेल्या जमिनीपर्यंत पाणी जाते किंवा त्याच्या पलीकडे पाणी जाते. बऱ्याचदा 100 टक्के धरण भरले नाही तर जमिनी मोकळ्या राहतात किंवा पूर आला की पाण्याखाली जातात, ओसरला की, मोकळ्या राहतात. मोकळ्या जमिनींवर पेरण्याच्या संदर्भात शेतकऱ्यांची वारंवार मागणी होती. सन्माननीय सदस्यांनी तीच मागणी केली आहे की, अशा जमिनी किमान त्यांना पेरण्यासाठी, उत्पन्नासाठी तरी दिल्या पाहिजेत नाही तरी या जमिनी त्यांच्याकडे आहेतच. जमिनी संपादित केलेल्या असल्यामुळे त्या जमिनी आज त्यांच्या नावाने करता येणार नाहीत. कारण जमिनी नावावर केल्या आणि कधी तरी त्या पाण्याखाली गेल्या तर परत नुकसानभरपाई अशी मागणी पुढे येईल. परंतु अशा जमिनी पेरण्याच्या संदर्भात एक स्वतंत्र धोरण शासनाचे आहे, त्या धोरणानुसार जर मागणी केली की, एवढी जमीन मला पेरण्यास द्या तर त्या तात्पुरत्या खंडाने ....

**सभापती** : 11 महिन्यांनी देतात.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, 11 महिन्यांच्या म्हणजे तात्पुरता खंड. काही ठिकाणी असे आहे की, पावसाळा संपल्यानंतर फक्त त्यांना रब्बीसाठीच परवानगी देता येते. गहू, हरभरा, करडई, सूर्यफुल यासाठी तशी परवानगी देणाचे धोरण शासनाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11807..........

श्री.एकनाथराव खडसे........

त्यानुसार त्यांनी अर्ज केला, तो धोरणानुसार असेल तर जो शेतकरी तात्पुरत्या स्वरुपात पेरणीसाठी जमीन मागेल त्यांना परवानगी दिली जाईल.

------------

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत***

*(५) * ११७८३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ७२४९ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत ॲड. जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन आरक्षण देण्यात येईल, अशी घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी ॲड जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय,*
*(३) तसेच, या समाजास जाणीवपूर्वक डावलण्याचा प्रकार केल्याने राज्यातील मुस्लिम समाजात निर्माण झालेली असंतोषाची भावना दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) शासनाकडून मुस्लिमांना देण्यात आलेल्या आरक्षण रद्द करण्यात आल्याने मुस्लिम समाज मुख्य प्रवाहापासून दूर झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,*
*(५) असल्यास, राज्यातील मुस्लिम समाजाला ८ टक्के आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,*
*(६) नसल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?*

*श्री. एकनाथराव खडसे : (१) होय,*
*(२), (३), (४) व (५) सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी दिलेल्या ५% आरक्षण देण्यात आले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ अंतरिम निर्णय दिला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत उक्त कालावधीतील शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला. तरीही ॲड.जनरल यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यावर तो विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल.*
*(६) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, मागील वर्षभरापासून वेगवेगळ्या आयुधाच्या मदतीने सभागृहातील सर्व सदस्य या विषयाबाबतची विचारणा सरकारकडे करीत आहेत आणि प्रत्येक आयुधाच्या माध्यमातून विचारण्यात आलेल्या या प्रश्नाला, प्रत्येक वेळी सरकारकडून अशाच प्रकारचे छापील उत्तर दिले जात आहे.

सभापती महोदय, अध्यादेशाचे दिनांक 23/12/2014 पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे ते व्यपगत झाले, असे सरकारने म्हटले आहे. अध्यादेश व्यपगत होत असेल तर ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे, हे शासन सांगणार का ?

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, उच्च न्यायालयाने मान्य केलेल्या शिक्षणातील आरक्षण हे सरकार देणार आहे का ?

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११७८३........

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण लागू केल्यानंतर त्या दरम्यान ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे, ज्या ज्या व्यक्तिंनी आरक्षणाचा लाभ घेतलेला आहे, त्यांना सरकारने संरक्षण दिलेले आहे. आज हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे या संदर्भात, या सभागृहात अधिक बोलता येणार नाही.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, ऑर्डिनन्स लॅप्स झाल्यामुळे आपण शिक्षणातील आरक्षणाची अंमलबजावणी करु शकणार नाही. उच्च न्यायालयाने या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा स्टे दिलेला नाही. हायकोर्टाने असेही सांगितलेले नाही की, ऑर्डिनन्सचे कायद्यात रुपांतर करु नका. असे असताना ऑर्डिनन्स लॉ करण्याबाबत या शासनाची काय भूमिका आहे ?

सभापती महोदय, या शासनाने ॲडव्होकेट जनरल यांचा ओपिनियन मागितला आहे. मुस्लीम आरक्षणाबाबत, शिक्षणाच्या आरक्षणाबाबत त्यांच्याकडून कोणता ओपिनियन मिळाला आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण द्यावे, ही सरकारचीही भूमिका आहे. या संदर्भातील अध्यादेश काढत असताना त्याच दरम्यान मराठा समाजालाही आरक्षण मिळावे, हे समोर आले. राज्य सरकारची ही भूमिका आहे की, कोणतेही आरक्षण घटनेच्या कसोटीवर टिकले पाहिजे. आरक्षण दिले पण ते न्यायालयात टिकले नाही तर त्यासाठीच निर्णय घेतला, तो टिकला नाही, हे जाणुनबुजून केले, असा ठपका येऊ शकतो.

सभापती महोदय, यापूर्वी मराठा आरक्षणाचा आणि मुस्लीम आरक्षणाचा निर्णय घेतला गेला. परंतु, मराठा आरक्षणाच्या संदर्भात उच्च न्यायालयाकडून स्टे दिला गेला. आता मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भातील बाब न्यायप्रविष्ट आहे. सरकारने ॲडव्होकेट जनरल यांचेकडून अभिप्राय मागितले होते. त्यांनी असे सांगितले आहे की, "In view of the interim order dated 14.11.2014, five per cent admission made in the Government owned and Government aided educational institutions during the subsistence of the said ordinance will not be affected by lapsing the ordinance. The appointments

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११७८३........

***श्री.एकनाथराव खडसे.......***

made between the date of coming into force of the ordinance....". ऑर्डिनन्स जीवंत असताना जे प्रवेश झाले आहेत त्यांना प्रोटेक्शन दिलेले आहे. मराठा आरक्षणाच्या संदर्भात घटनेत आहे किंवा नाही, यासाठी स्टे दिला गेला तसा मुस्लीम आरक्षणाच्या बाबतीत होता कामा नये, घटनेच्या दृष्टीकोनातून सर्व बाबींची तपासणी करुन या संदर्भात राज्य सरकार निर्णय घेईल.

सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून प्राप्त झालेल्या ओपिनियनबाबत काही आक्षेप घेण्यात आले होते. राज्यघटनेनुसार धर्माच्या नावावर कोणालाही आरक्षण देता येणार नाही. यापूर्वी तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये अशाच प्रकारचा निर्णय टिकलेला नाही. अशा परिस्थितीत निर्णय घेत असताना तो टिकला नाही तर बरोबर होणार नाही. मुस्लीम समाजात जो मागासलेला वर्ग आहे त्यांना शिक्षणात आरक्षण देता येईल का, याची तपासणी राज्य सरकार करीत आहे. या संदर्भात राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे. आम्हाला मुस्लीम समाजाला आरक्षण द्यावयाचे आहे. केवळ घटनेच्या चौकटीत राहून आणि निकषात बसेल या दृष्टीकोनातून ते करावयाचे आहे.

ॲड.राहुन नार्वेकर : सभापती महोदय, कोर्टात टिकले नाही की, या शासनालाच आरक्षण टिकवायचे नाही, हा मुद्दा आहे. जेव्हा ऑर्डिनन्स कोर्टात चॅलेंज झाला तेव्हा कोर्टाने शिक्षणामध्ये मुस्लीम आरक्षण अबाधित ठेवले आहे. कोर्टाने कोणत्याही प्रकारचा स्टे दिलेला नसताना शासनाची मर्जी नसल्यामुळे त्या ऑर्डिनन्सचे कायद्यात रुपांतर केले गेले नाही, असा माझा या शासनावर थेट आरोप आहे. असत्य असेल तर मंत्री महोदयांनी याबाबतची भूमिका स्पष्ट करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शासनाची भूमिका ही आहे की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेली 65 वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. तो ऐरणीवर कधी आला नाही. त्याबाबतचा निर्णय 65 वर्षात होऊ शकला नाही. तो एका वर्षात किंवा एका दिवसातही होऊ शकतो. परंतु, त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात चॅलेंज दिले गेले आणि ते आरक्षण नाकारले गेले तर योग्य होणार नाही. निव्वळ राजकारणासाठी आरक्षण, ही या सरकारची भूमिका नाही. आरक्षण

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११७८३........

श्री.एकनाथराव खडसे........

दिल्यानंतर ते टिकले पाहिजे, निकषात बसले पाहिजे, ही या सरकारची भूमिका आहे. घटनेच्या निकषात बसवून आरक्षण द्यावयाचे आहे, त्या दृष्टीकोनातून अभ्यास सुरु आहे आणि त्या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्न करीत आहोत. तुमची प्रामाणिक इच्छा असती तर ही वेळ आमच्यावर आली नसती. तुम्ही निर्णय घेऊन मोकळे झाला.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भात शासनाची काय नियत आहे व त्यांची काय इच्छा आहे, हे जगजाहीर आहे. मागील वर्षभर हा प्रश्न सातत्याने सभागृहात मांडला जात आहे आणि सातत्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे उत्तर सरकारकडून दिले जात आहे. न्यायपालिकेची जी भूमिका असेल, निदेश असेल त्याचे पालन केले जाईल, उच्च न्यायालयाचा स्टे असल्यामुळे, अडचण असल्यामुळे न्यायपालिकेच्या आदेशाची आम्ही वाट बघत आहोत, असे सरकारतर्फे सांगितले जात आहे. परंतु, हायकोर्टाने स्पष्ट निदेश दिले आहेत की, मुस्लीम समाजाला शिक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण दिले पाहिजे. शिक्षणासाठी आरक्षण देऊ नये, असे हायकोर्टाने म्हटलेले नाही आणि त्याबाबत स्टे देखील दिलेला नाही. यानुसार बिल न आणता या विषयामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे म्हणून बिल आणले गेले. मराठा समाजाला आरक्षण मिळाले, त्याबाबत आम्ही अभिनंदन करतो, त्याचे स्वागत करतो आणि केलेलेही आहे. पण मुस्लीम समाजाला शिक्षणामध्ये आरक्षण दिले पाहिजे व तेही बिल आणले पाहिजे. पण ते शासनाने केलेले नाही. यावरुन शासनाची भूमिका सिध्द झाली आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण मुस्लीम समाजाला शिक्षणात दिलेल्या आरक्षणाचे तंतोतंत पालन करणार का, शिक्षणात 5 टक्के आरक्षण देण्याचे न्यायालयाचे निदेश आहेत, डायरेक्टिव्हज् आहेत, त्याबाबत शासन बिल आणणार आहे का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या सरकारची भूमिका स्वच्छ व स्पष्ट आहे. या ठिकाणी असे नाही की, 60 वर्ष सत्तेमध्ये राहिल्यानंतर ऑर्डिनन्स काढला गेला. आपल्याला कायदाही करता आला असता.

...T-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11783.........

श्री.मुझफ्फर हुसैन : सभापती महोदय, मागील 60 वर्षात सच्चर समिती स्थापन झाली. मायनॉरिटी डिपार्टमेंट्स तयार झाले. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी हजारो कोटी रुपये देण्यात आलेले आहेत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आरक्षण का नाही दिले ? यांची नियत साफ नाही. तुमची नियत साफ नव्हती. म्हणून तुम्ही 60 वर्षात आरक्षण दिले नाही. मतांसाठी या समाजाला फक्त झुलवत ठेवले. मतांसाठी मागे फिरविले.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या समाजाला मागास कोणी ठेवले, सच्चर समितीचे निष्कर्ष काय आहेत, हा समाज मागील 50 वर्षात पुढे का गेला नाही, हा समाज कोणामुळे मागे राहिला ? आमची भूमिका स्वच्छ आणि स्पष्ट आहे.

**सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 10 मिनिटांनी 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एका वेळी एकाच सन्माननीय सदस्याने बोलले तर मी तुमचे म्हणणे ऐकून घेऊ शकतो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 46 अन्वये मला निवेदन करण्यास परवानगी द्यावी.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज पुढे जात आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे निवेदन झाल्यानंतर मी आपले म्हणणे ऐकून घेतो. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** शासकीय जमीन प्रदानाच्या संदर्भातील नियम निश्चित करणे.

**मु.शी.:** शासकीय जमीन प्रदानाच्या संदर्भातील नियम निश्चित करण्यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त प्रकल्पांना तसेच, राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना शासकीय प्रकल्प राबविताना जमिनीची वेळोवेळी आवश्यकता भासते आणि सध्याच्या प्रचलित पद्धतीमध्ये सदर जमीन प्रदान करण्याबाबत असलेल्या तरतुदीमुळे बराच कालापव्यय होतो. म्हणजे, एखादे सबस्टेशन बांधावयाचे असेल, प्रोजेक्टला जमीन द्यायची असेल किंवा अन्य कारणासाठी जमीन द्यायची असेल तर प्रत्येक वेळी प्रकरण मंत्रालयापर्यंत येते. ते प्रकरण वर्षानुवर्षे रखडते आणि त्या प्रकल्पाची किंमतही वाढत जाते. अशा कालखंडात केंद्र शासन असो किंवा राज्य शासन असो. शेवटी, सरकार टू सरकारच प्रस्ताव देत असताना मंत्रालयाच्या परवानगीची त्यासाठी आवश्यकता नसावी. यामध्ये कालापव्यय होतो. सदर बाब टाळण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे नियम 1971 मध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटली आणि या अनुषंगाने राज्य सरकारने असे ठरविले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे नियम 71 यामध्ये शासकीय जमीन प्रदानाच्या संदर्भातील नियम निश्चित करणे. राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना शासकीय प्रकल्प राबविताना शासकीय जमिनीची वेळोवेळी आवश्यकता भासते. सध्याच्या प्रचलित पद्धतीमध्ये शासकीय विभागांना जमीन प्रदान करण्यासाठी असलेल्या तरतुदीमुळे बराचसा कालापव्यय होतो. त्यामुळे प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण न होता विलंब होऊन प्रकल्प खर्चात प्रचंड वाढ होण्याची शक्यता निर्माण होते. सदर बाब टाळण्यासाठी राज्य शासनाच्या विभागांना शासनाच्या मंजूर प्रकल्पाकरिता आवश्यक निर्वादरित्या उपलब्ध असलेली जमीन जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर मंजूर करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे नियम 71 च्या पोट नियम 6 च्या सुधारणेमध्ये तरतूद करण्यात येत आहे. सदर जमीन राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना सारा माफीने महसूल मुक्त प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून हा निर्णय घेण्यात येत आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

यापुढे केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त प्रकल्पांना आवश्यक शासकीय जमिनीची मागणी राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी संबंधित जागेचे भोगवटा मूल्य वसूल करून सदर जमीन केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयास प्रदान करण्यास सक्षम राहणार आहे.

प्रा.जनार्दन चांदूरकर (बसून) : सभापती महोदय, शेतकऱ्यांना जमिनीचा भाव काय मिळणार आहे ? आपण लॅन्ड ॲक्विझिशन कायद्यानुसार रेट देणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझे निवेदन पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देईन.

सभापती महोदय, अशा जमिनीचे क्षेत्रफळ नागरी महानगरक्षेत्रामध्ये 1 हेक्टरपेक्षा जास्त व नागरी महानगरक्षेत्राबाहेर 5 हेक्टरपेक्षा जास्त असल्यास जिल्हाधिकारी यांनी सदर जमीन प्रदानापुर्वी विभागीय आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

..U-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

सभापती महोदय, पूर्वी या जमिनी 15 वर्षाच्या कराराने दिल्या जात होत्या, क्रीडांगणासाठी 15 वर्षे व अन्य कामासाठी 15 वर्षे लीजने जमिनी दिल्या जात होत्या. यापुढे लीजचा कालावधी 15 वर्षाऐवजी 30 वर्षे करावा अशा स्वरुपाचा निर्णय शासनाने घेतला आहे, आजपासून जिल्हाधिकारी यांना आम्ही अधिकारी देत आहोत, त्यामुळे मंत्रालयात किंवा मंत्री यांच्याकडे येण्याची गरज नाही. जिल्हाधिकारी या जमिनी हस्तांतरण करण्यास सक्षम असतील व शासनाच्या नियमानुसार जे मूल्य ठरविले असेल ते मूल्य किंवा भोगवटा मूल्य घेऊन जिल्हाधिकारी जमीन खालच्या पातळीवर हस्तांतर करतील. एक हेक्टर ते पाच हेक्टरपर्यंत जमीन हस्तांतर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत, पाच हेक्टरच्यावर जमीन हस्तांतरण करायची असेल तर जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी. प्रस्ताव पाठवावे असे नाही, परंतु कोणाचे तरी नियंत्रण असायला पाहिजे म्हणून अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन लवकर निर्णय होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. ही महत्वाची बाब आहे की, ज्यावेळी आपण 15 वर्षासाठी जमीन लीजवर देत होतो, त्यावेळी कायम बांधकाम करण्यासाठी तेथे परवानगी मिळत नव्हती. त्यामुळे 15 वर्षे लीजचा कालावधी 30 वर्षे वाढविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

-------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** शासकीय जमिनी व शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या सदनिका हस्तांतर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करणे.

**मु.शी.:** शासकीय जमिनी व शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या सदनिका हस्तांतर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करणे यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, शासकीय जमिनी सरकारी गृहनिर्माण संस्थांना प्रदान करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल व सरकारी जमिनीची विल्हेवाट अधिनियम 1971 मध्ये वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रक निर्ममित करुन धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या शासकीय भूखंडावरील इमारती मधील सदनिका तसेच या इमारती मधील वाणिज्जिक व औद्योगिक वापरातील जागेची विक्री हस्तांतरण करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी शासन निर्णय व धोरण निश्चित केले आहे,

सभापती महोदय, एखादा फ्लॅट हस्तांतर करायचा असेल किंवा आपल्या सोसायटीमधील फ्लॅट विकायचा असेल किंवा ती मालमत्ता कायमस्वरुपी हस्तांतरीत करायची असल्यास असे प्रस्ताव मंत्रालयापर्यंत येतात व एखादा व्यवहार झालेला असतो, परंतु मंत्रालयापर्यंत येत असताना त्यासाठी 1 ते 2 वर्षे विलंब लागतो. त्यामुळे हे व्यवहार रद्द देखील होत असतात. या संदर्भात राज्य सरकारला असे वाटते की, हे व्यवहार लवकर झाले पाहिजेत, परवानगी तेथेच मिळाली पाहिजे, कमी कालावधीत मिळाली पाहिजे, सन 2015 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 4 हा शासन राजपत्रात 3 मार्च 2015 रोजी प्रकाशित केला आहे. यामध्ये नवीन 37 (अ) कलमाचा समावेश करुन सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी मंजूर करण्यात आलेल्या शासकीय भूखंडावरील इमारती मधील सदनिकाच्या हस्तांतराविषयी परवानगीसाठी प्रस्ताव आता जिल्हाधिकारी स्तरावरुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-3

VVK/ ST/ AKN/ 13:20

श्री.एकनाथराव खडसे....

शासनाकडे प्राप्त होत आहेत, प्रशासकीय कामात सुलभता आणावी हा धोरणाचा भाग म्हणून अनेक बाबतील अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात येते आहे, त्यामुळे राज्य शासनाच्या शासकीय जमिनीवरील इमारती मधील सदनिका हस्तांतर करण्यास परवानगी देण्याच्या संदर्भात शासनाच्या अधिकाराचे प्रत्यायोजन जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर करण्यात येत आहे. वरळी येथील अनेक आमदारांचे आम्ही फ्लॅट पाहिले आहेत, खूप वेळ आणि विलंब त्यामध्ये लागत होता. आता मंत्रालयात असे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी यांना सक्षम करण्यात येत आहे. हे सर्व हस्तांतर करण्याचे अधिकार आज पासून जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 11783 बाबत**

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरु असताना शेवटी प्रश्न क्रमांक 11783 पुकारण्यात आला होता.(..अडथळा..) आमचे ऐकून घ्यावे, तुम्हाला मुस्लिम समाजाबाबत प्रेम नाही काय, हा प्रश्न पुकारण्यात आल्यावर यावर चर्चा सुरु होती. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी असा प्रश्न विचारला की, 5 टक्के शिक्षणामध्ये आरक्षण देण्याचा मुद्दा कोर्टाने मान्य केल्यामुळे त्याबाबत शासनाने विधेयक का आणले नाही. त्यासंदर्भातील अध्यादेश का काढण्यात आला नाही. हा विषय पूर्वी या सदनात उपस्थित करण्यात आला होती, त्यावेळी सभागृहाचे माननीय नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी असे सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत आम्ही हायकोर्टाचा मान राखू व या संदर्भात कायदा करू. त्यांनी असा कायदा केला नाही, म्हणून आमच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा व याच अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसाच्या अगोदर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत उत्तर द्यावे, म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा अशी आमची विनंती आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, बरोबर एक वर्षाचा कालावधी होत आहे, तेंव्हा पासून न्यायालयाने सरकारची कोणतीही अडवणूक केली नाही. पाच टक्के आरक्षण शिक्षणात द्यावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर आपण सिनिअर आहात, आपणाला मंत्री व्हायचे आहे. या आरक्षणाला कोर्टाने कोणतीही हरकत घेतलेली नसताना....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारताना आपण सिनिअर आहात, आपण मंत्री होणार आहात, ते मंत्री झाल्यावर आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत निवेदन केले पाहिजे, अशी आमची मागणी आहे. आपण निर्णय द्यावा हा प्रश्न राखून ठेवा.

**उप सभापती** : मी निर्णय दिलेला आहे, आपण खाली बसा मी आपले ऐकून घेतले आहे. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे, आता प्रश्न राखून ठेवता येणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे सभात्याग करतात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2015          ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )          U-5

VVK/ ST/ AKN/          13:20

**पृ.शी.:** पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेस मान्यता देण्याबाबत.

**मु.शी.:** पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेस मान्यता देण्याबाबत यासंबंधी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे निवेदन.

श्रीमती पंकजा मुंडे (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करते :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** "सुकन्या" योजनेचा शासन निर्णय अधिक्रमित करुन "माझी कन्या भाग्यश्री" योजना सन 2016-17 या आर्थिक वर्षापासून लागू करण्यास दिनांक 06 डिसेंबर, 2015 रोजी मंत्रिमंडळाने दिलेली मान्यता

**मु.शी.:** "सुकन्या" योजनेचा शासन निर्णय अधिक्रमित करुन "माझी कन्या भाग्यश्री" योजना सन 2016-17 या आर्थिक वर्षापासून लागू करण्यास दिनांक 06 डिसेंबर, 2015 रोजी मंत्रिमंडळाने दिलेली मान्यता याबाबत माननीय महिला व बालकल्याण मंत्र्यांचे निवेदन

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बालकल्याण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे :-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे.....

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गेल्या दहा वर्षामध्ये मुलींचे प्रमाण प्रचंड कमी झालेले आहे. 1962 पासून 2014 पर्यंत आपल्याकडे मुलींचे प्रमाण भीषण कमी झालेले आहे. त्यामुळे स्त्रीचा जन्म लोकांनी स्वीकारावा यासाठी अतिशय संवेदनशीलता ठेवून स्त्रीला फक्त जन्माला घालायचे नसून बेटी बचाओ, बेटी बढाओ व बेटी पढाओ ही कन्सेप्ट घेऊन योजना तयार केलेली आहे. यात केवळ तिच्या जन्माला डिपॉझिट न करता तिला शिक्षणासाठी, तिला आहार देण्यासाठी, ती ॲनिमिक राहू नये, ती वीक राहू नये, वीक ब्रीड होऊ नये, तिच्या गर्भाची चांगली वाढ व्हावी, जेणेकरुन एक चांगली जनरेशन जन्माला यावी, अशा सगळया गोष्टींचा विचार करून महाराष्ट्राची ही प्रभावी योजना डिझाईन केली आहे. ती मी सभागृहासमोर मांडली आहे.

---------------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी निवेदन करणेबाबत**

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, कोकणातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत मंत्री महोदय आज निवेदन करणार आहेत. आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. कोकणातील शेतकरी त्यांच्या निवेदनाची वाट पहात आहेत.

**उप सभापती** : मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी निवेदन करण्याची तयारी दाखविली की लगेच मी संधी देतो.

------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** विदर्भातील नझूल जमिनींच्या भाडेपट्टयाचे नूतनीकरण करणे

**मु.शी.:** विदर्भातील नझूल जमिनींच्या भाडेपट्टयाचे नूतनीकरण करणे यासंबंधी माननीय महूसल मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, मागील आठवड्यामध्ये शासकीय जमिनीवर असलेल्या जवळजवळ 2.70 कोटी अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याची भूमिका सरकारने घोषित केली होती.

सभापती महोदय, विदर्भामध्ये महसूल जमिनीऐवजी नझूल जमिनी आहेत. या नझूल जमिनी मोठया प्रमाणावर शहरामध्ये आहेत आणि यापूर्वी महाराष्ट्रामध्ये सामील व्हायच्या आधी सी.पी.ॲण्ड बेरार कायद्यानुसार या जमिनी काही धारकांना देण्यात आल्या होत्या. प्रामुख्याने या साऱ्या जमिनी व्यापारी प्रयोजनासाठी आणि औद्योगिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या होत्या. या जमिनी वर्ग 2 च्या आहेत. त्यांना मालकी हक्क नाहीत. त्यांना मालकी हक्क मिळावा अशी मागणी बऱ्याच वर्षापासून सरकारकडे होती. म्हणून राज्य सरकारने असा निर्णय घेतला की, नागपूर आणि अमरावती विभागातील तत्कालीन मध्य प्रांत आणि बेरार भागात त्यावेळी लागू असलेल्या जमिनी महसूल अधिनियमान्वये शासनाने निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या नझूल जमिनी संदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या आदेशामध्ये सुसूत्रता आणणे, सदर जमिनींच्या भाडेपट्टयाचे नूतनीकरण करणे, शर्त भंग नियमित करणे, अन्य बाबींच्या अनुषंगाने सुधारित व सर्वंकष धोरण निश्चित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

सभापती महोदय, नागपूर, अमरावती भागातील नझूल जमिनींच्या भाडेपट्टयाचे दिनांक 28.12.2011 व 1.8.2014 च्या शासन निर्णयान्वये नूतनीकरणानंतर निर्धारित होणारे नझूल भाडेपट्टयाचे दर मूळ दरापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. मागचा निर्णय घेतला त्यामध्ये नझूल भाडेपट्टा करीत असताना, लिज वाढवून देत असताना ती जी किंमत आहे ती किती तरी पटीने जास्त आहे अशी तक्रार सरकारकडे आली आहे. त्यामुळे याला प्रतिसाद मिळाला नाही. मोठया प्रमाणात जमिनीच्या किंमतीचा प्रमाणात जमिनीचा दंड वसूल केला जात असल्यामुळे नूतनीकरणाला प्रतिसाद मिळाला नाही. परंतु लिज संपली. या ठिकाणी 1.8.2014 च्या शासन निर्णयानुसार

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

नूतनीकरणानंतर निर्धारित होणाऱ्या नझूल भाडेपट्टयाचा दर मूळ दरापेक्षा किती तरी पटीने जास्त असल्यामुळे भाडेधारकांमध्ये भाडेपट्टयाचे नूतनीकरणाबद्दल उदासिनता आणि अनास्था असल्याची बाब समोर आली.

सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसुलाच्या संदर्भात नझूल जमिनीचा भाडेपट्टा नूतनीकरण करताना व समन्यायी भाडे निर्धारित करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ॲक्टनुसार महाराष्ट्र अधिनियम, 2012 अन्वये कलम 37(अ) समाविष्ट करण्यात आले असून सदर तरतूद दिनांक 3 मार्च, 2015 पासून अंमलात आल्याची बाब विचारात घेता औद्योगिक आणि वाणिज्यिक प्रयोजनाबरोबर अन्य प्रयोजनाच्या नझूल भाडेपट्टयाच्या अनुषंगाने यापूर्वीचे शर्त भंग, भविष्यातील शर्त भंग, वापरात बदल, विनापरवाना हस्तांतरण इत्यादी तद्नुषंगिक बाबींचे धोरण निश्चित करणे आवश्यक झाले होते. त्या अनुषंगाने 28.10.2015 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या संदर्भात साकल्याने विचार करुन नझूल जमिनीच्या भाडेपट्टयाचे सुधारित दर निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक 22.12.2011 च्या मत्रिमंडळ निर्णयाचा परिमर्श घेऊन..........

.....डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

दिनांक 1.8.2014 रोजी शासन निर्णय अधिक्रमित करून नझूल जमिनींच्याबाबत सर्वंकष सुधारित धोरण आखण्यात येणार आहे. यामुळे भुईभाड्याचे दर सध्या लागू असलेल्या दरा पेक्षा एकपंचमांश होणार आहेत. आता दहा रूपये दर असेल तर तो दोन रूपयांवर आणण्याचे ठरले आहे. त्यामध्ये राज्य सरकारने चार पंचमांश सूट देण्याचे ठरविले आहे. यात कमीतकमी दर आकाराला जाईल. म्हणजे दिलेल्या भाडेपट्टयाच्या नूतनीकरणाच्या आकाराचे भुईभाडे हे चालू शीघ्र सिद्ध गणकाच्या दराच्या 0.10 टक्के या ऐवजी 0.02 टक्के इतके होणार असून वाणिज्यिक, औद्योगिक, हजार चौरस फुटापेक्षा कमी असणाऱ्या भूखंडाचे भुईभाडे चालू शीर्घ सिद्ध गणकाच्या दराच्या 0.15 टक्के या ऐवजी 0.03 टक्के इतके होणार आहे. अशा प्रकारे नझूल भूखंडाचे सध्याचे दर सध्याच्या चालू दरापेक्षा एक पंचमांश होणार असल्याने नागपूर विभागातील 24908, अमरावती विभागातील 10528 अशा 35436 नझूल भूखंड धारकांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळणार आहे. सदर धोरणानुसार भाडेपट्टयाचे दर योग्य व समन्यायी निर्धारित करण्यात येत असल्याने भाडेपट्टा नूतनीकरणास चांगला प्रतिसाद मिळून शासनास महसूल प्राप्ती होईल. त्याच प्रमाणे विदर्भातील नझूल भूखंड धारकांना त्यांच्या भूखंडाचे संपूर्ण मालकी हक्क देण्याबाबत नझूल भूखंड धारकांकडून शासनास विनंती करण्यात येत होती. नझूल भूखंड लीजवर देण्यात आलेले आहेत, भाडे तत्त्वावर घेण्यात आलेले आहेत, काहींनी हस्तांतरण करून घेतलेले आहेत, काहींनी नियम बाह्य हस्तांतरण केलेले आहे, काहींनी शर्तभंग केला म्हणून ते सरकार जमा करावे असे आदेश दिलेले आहेत, काहींनी वाणिजिक वापराकरिता, औद्योगिक वापराकरिता भूखंड घेताना ते निवासी वापरासाठी वापरले आहेत तर काहींनी निवासी वापरासाठी भूखंड असताना वाणिज्यिक वापरासाठी वापरले आहेत या सर्व अटींचा ज्यांनी ज्यांनी भंग केला अशा नझूलधारकांनी जमीन मालकी हक्काने देण्यासंबंधी शासनाला विनंती केली आहे. विदर्भातील नझूलच्या जमिनीवर आणखी काही अतिक्रमण असेल ते सार्जनिक रस्ते किंवा अन्य कामांना अडथळा आणणारे नसेल तर त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

जमिनी लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर दिलेल्या नझूल जमिनी फ्री होल्ड (भोगवटादार वर्ग-1) करण्यासंबंधी सर्वंकष अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याचा आता आपण हा निर्णय घेतलेला आहे. या जमिनी फ्री होल्ड करावयाच्या आहेत. पण त्यासाठी पद्धती काय असली पाहिजे, त्यांच्याकडून किती दर आकारायचा हे निश्चित करावयाचे आहे. हे सर्व नाममात्र दरामध्येच आपल्याला करावयाचे आहे. यासाठी सरकारने प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून या समितीमध्ये अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी नामनिर्देशित केलेले वित्त विभागाचे प्रधान सचिव/सचिव दर्जाचे अधिकारी, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, अमरावती विभाग व महसूल विभागाचे उप सचिव हे सदस्य असतील. विदर्भातील जेवढ्या म्हणून नझूलच्या जमिनी आहेत, भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनी आहेत त्यांना फ्री होल्ड देण्यासंबंधातील हा निर्णय आहे. या समितीने जमिनीचा दर वगैरे ठरवून त्या जमिनी कोणत्या पद्धतीने द्यावयाच्या आहेत याची विहित पद्धती तीन महिन्याच्या आत राज्य शासनाला कळवायची आहे. त्यामुळे मार्च महिन्यांच्या आत त्या जमिनी फ्री होल्ड करण्यासंबंधी राज्य सरकार निर्णय घेईल.

.......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** कोकण विभागात अवकाळी पावसाने आंबा व काजू पिकांचे झालेल्या नुकसानी संदर्भात मदत वाटपात येत असलेल्या अडचणी

**मु.शी.:** कोकण विभागात अवकाळी पावसाने आंबा व काजू पिकांचे झालेल्या नुकसानी संदर्भात मदत वाटपात येत असलेल्या अडचणी याबाबत माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी या सभागृहात आणि विधान सभेच्या सभागृहात सातत्याने मागणी होत होती. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देत असताना त्यांना मोठ्या प्रमाणावर पैसा दिला नाही अशी सातत्याने मागणी होत होती. त्याला काही कारणे आहेत. तेथील 7/12 उताऱ्यावर 10 जणांची, 5 जणांची, 25 जणांची नावे आहेत. उताऱ्यावर नावे असल्यामुळे प्रत्येकाची सहमती घेऊनच नुकसान भरपाई द्यावी लागेल. कोर्टाचे सक्सेशन प्रमाणपत्र घेतल्याशिवाय त्याला ती नुकसान भरपाई देता येत नव्हती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्कम पडून आहे. सदर रक्कम तेथील शेतकऱ्यांना देता आलेली नाही. अजूनही नुकसान भरपाईची 80 टक्के रक्कम देणे बाकी आहे. येथून आम्ही पैसा दिला आहे. पण जिल्हा स्तरावरून निधी वाटप करण्यासाठी अडथळे येत आहेत. ते अडथळे दूर करण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे. रायगड जिल्ह्यातील 21636, रत्नागिरी जिल्ह्यातील 46977, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 17707 बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आलेली आहे. कोकणातील आपदग्रस्त शेतकऱ्यांना निधी वाटप करण्यासाठी खालीलप्रमाणे अडचणी येत होत्या :-

...4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

जमिनीच्या 7/12 च्या उताऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर सह हिस्सेदार असून बहुसंख्य हिस्सेदार असून त्यापैकी बहुसंख्य हिस्सेदार बाहेरगावी किंवा बाहेर देशामध्ये रहात असल्यामुळे त्यांचे बँक खाते क्रमांक आपल्याला मिळू शकलेले नाहीत.

एकाच कुटुंबातील सामाईक खातेदारांच्या बाबतीत सुद्धा प्रत्येकाचे बँक खाते क्रमांक मिळणे आवश्यक असल्याने आणि प्रत्येकाची सहमती घेणे हे अत्यंत अवघड झाल्यामुळे त्याला पैसा मिळालेला नाही.

काही क्षेत्रात कुळ दाखल असून अद्याप कूळ कायद्या कलम 32 (ग) अनुसार जमिनीची विक्री न झाल्याने त्या व्यक्ती अद्याप भोगवटादार सदरी आलेल्या नाहीत. अशा मिळकतीच्या मालकांना व कुळांना नुकसानीचे कोणत्या प्रमाणात वाटप करावे याबाबत शासनाचे कोणतेही आदेश नाहीत. जमीन आपली असते पण ती कुळांना दिलेली असते, कुळ लागलेले असते परंतु ती जमीन भाड्याने घेतलेली असते. अशा स्वरूपात नुकसान कोणाला द्यावे हा प्रश्न आहे.

काही क्षेत्रात आणेवारी निश्चित नाही. एका जमिनीवर दोन भिन्न कुटुंबांची नावे आहेत. अशा ठिकाणी हिस्सा निश्चित करण्यात आलेला नाही.

एका तलाठ्याकडे साधारणपणे 4 ते 5 गावे असतात. एका गावामध्ये 8 ते 10 वाड्या असल्याने त्या वाड्यातील अंतरही जास्त असल्याने खाते क्रमांक जमा करण्यास अडचणी येतात.

बहुतांशी खातेदार दुपारी शेतात जात असल्याने सकाळी लवकर घरी जाऊन बँक खातेदार क्रमांक घेणे अडचणीचे होते.

यात अडचणी आल्यामुळे राज्य सरकारने असा निर्णय घेतला आहे की, सन 2015 मध्ये झालेल्या नुकसानीचे जे पंचनामे करण्यात आलेले आहेत त्यामध्ये प्रस्तुत पिके नेमकी कोणी केली आहेत याबाबत खात्री करणे गरजेचे राहील. अशी खात्री करताना संबंधित तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, त्या गावाचे सरपंच व लगतचे वहिवाटदार यांच्या स्वाक्षरीने पंचनामे करून आपदग्रस्त शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात यावी.

उपरोक्त याद्यांचे ग्रामसभेत वाचन करण्यात यावे. त्याचप्रमाणे या यादीस ग्रामपंचायत किंवा तलाठी चावडीच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देण्यात यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडेस...

उक्त यादीबाबत कोणास हरकती उपस्थित करावयाच्या असतील तर त्या 15 दिवसांच्या आत उपस्थित कराव्यात. जर कोणाच्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर ही यादी अंतिम करण्यात यावी. त्याप्रमाणे मुदत वाटपाची पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तावित यादीवर हरकती उपस्थित झाल्यास त्या हरकतीवर निर्णय घेण्यासाठी मंडळा अधिकारी, कृषी अधिकारी यांची समिती गठीत करून समितीस अधिकार देण्यात यावेत.

सदर समितीने हरकतीबाबत सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उपलब्ध कागदपत्रे व पंचनाम्याच्या अभ्यास करून निर्णय घ्यावा. अशा हरकतीवर सर्व सहधारकांची संमती सादर करणे बंधनकारक करण्यात यावे. क्षतीपूर्तीबंध बंधपत्र घेण्यात यावे. वाटपासंबंधात जाहीर प्रगटन करण्यात यावे.

रायगड जिल्ह्यातील 21636, रत्नागिरी जिल्ह्यातील 46977, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 17707 बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यात येईल अशा स्वरूपाचा निर्णय घेतल्यामुळे आता जो पैसा थांबलेला आहे तो पैसा ज्याच्या त्याच्या खात्यामध्ये जमा करण्यामध्ये सुलभता येईल.

....

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:** तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 11 डिसेंबर 2015 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहसमोर ठेवीत आहे.

**उप सभापती :** दिनांक 11 डिसेंबर 2015 ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**उप सभापती** : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवरील माझा निर्णय सचिव वाचून दाखवतील.

**सचिव :** आज दिनांक 18 डिसेंबर 2015 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री. धनजंय मुंडे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, विक्रम काळे यांनी सकाळी 9.43 वाजता तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जयंत पाटील, अमरसिंह पंडित, शरद रणपिसे, सतीश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम कळो, ख्वाजा बेग, बाबाजानी दुर्राणी, प्रकाश गजभिये, राजेंद्र मुळक, रामहरी रूपरवर, हरिसंग राठोड, जोगेद्र कवाडे यांनी सकाळी 9.50 वाजता .......

X-1........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव.....

"अमरावती जिल्ह्यातील धारणी येथून जवळच असलेल्या एका शाळेत शिकणाऱ्या तीन अल्पवयीन आदिवासी मुलींवर चार युवकांनी अपहरण करुन बलात्कार केल्याची खबळजनक घटना दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी घडणे, मुलींवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे निर्माण झालेले असुरक्षिततेचे वातावरण, गुन्हेगांरावर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता" या विषयाबाबत म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास मा.सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराच्या तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सदरहू विषय समाविष्ठ नसल्यामुळे ही सूचना माननीय सभापती महोदयांनी नाकारली आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आम्ही दिलेली नियम 289 अन्वयेची सूचना आपल्या नियमात बसत नसेल तर आपण ती नाकारु शकता. परंतु या विषयाच्या बाबत शासनाने निवेदन करावे असे आदेश आपण शासनाला द्यावे अशी विनंती आहे. आताच महिला व बालविकास मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही महिलांना संरक्षण देत आहोत, महिलांसाठी अनेक कल्याणकारी योजना करीत आहोत. अशा पध्दतीने महिलांवर अन्याय आणि अत्याचार होत असेल तर त्यासंदर्भात शासनाला निवेदन करण्यास सांगावे अशी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती :** ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेनुसार शासनाने या विषयामध्ये लक्ष द्यावे एवढी मी या निमित्ताने विनंती करतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांचा सन 2013-14 या वर्षाचा वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती :** वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2011-12 व 2012-13 या वर्षाचे अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती :** अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन 2012-13 या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती :** वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2013-14 या वर्षाचा सतरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहामसोर ठेवतो.

**उप सभापती :** वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2014-15 या वर्षाचा चव्वेचाळीससावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती :** वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.भाई गिरकर (समिती सदस्य) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समिती पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती :** माझ्याकडे दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजीच्या सूचना :-

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "घाटाव (ता.रोहा जि.रायगड) येथील एमआयडीसी परिसरातील केमिकल कंपन्यांमधून होणाऱ्या वायू गळतीमुळे कर्मचाऱ्यांचा झालेला मृत्यू व नागरिकांचे आरोगय धोक्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "राज्यातील अन्न सुरक्षा योजनेंतर्गत आत्महत्याग्रस्त 14 जिल्ह्यातील नागरिकांना स्वस्त दराने धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "मुंबई शहर व सागरी किनारपट्टीच्या सुरक्षिततेबाबत कठोर उपाययोजना राबविण्याची गरज" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी "राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत प्राथमिक व माध्यमिक केंद्रीय आश्रमशाळांना वर्गवारीनुसार अनुदान देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवदेन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नाशिक जिल्ह्याला मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यामधून वगळण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सचिव ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांनी "महालक्ष्मी (मुंबई) येथील साईबाबा नगर, को.ऑप.हौ.सो. च्या पुनर्वसन कामात झालेला गैरकारभार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामराव वडकुते यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामराव वडकुते यांनी "कळमनुरी पंचायत समिती (जि.हिंगोली) येथील उप विभागीय अधिकारी श्री.के.एन.संद्री हे विविध विकास कामे करण्यास टाळाटाळ करीत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "नागपूर येथील बालगृहातील विद्यार्थ्यांना अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांची बिले थकित असल्यामुळे त्यांचेवर आलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, यांनी "महाजनको कंपनीने पॉलिमर रॉलर्स प्रॉडक्टच्या खरेदी निविदांमध्ये केलेली अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील विविध कामांवर अंकुश ठेवण्यासाठी निर्माण केलेल्या अधिकाराचे पालन होत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी**

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुंबईचे पाच एंट्री पॉईन्ट व मुंबई-पुणे एक्सप्रेसवेच्या संदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता. त्योवेळेस सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी अशी माहिती दिली होती की, अपर मुख्य सचिव श्री. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नियुक्त केली असून त्या समितीला 3 महिन्यांची मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती त्यांनी त्यावेळी दिली होती. दि. 30 जुलै, रोजी या समितीची मुदत संपणार होती. आता या समितीची मुदत ऑक्टोबर, 30 पर्यंत असेल. परंतु अद्यापपर्यंत या समितीचा अहवाल आलेला नाही. या समितीला तुम्ही मुदतवाढ दिली की, देणार आहात असा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

सभापती महोदय, मागच्या आठवड्यात विधानसभेत सार्वजनिक उपक्रम मंत्र्यांनी एका उत्तरामध्ये पुणे एक्सप्रेसवेच्या टोलची मुदत वाढ सन 2018-2019 पर्यंत राहील असे उत्तर दिल्यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे सभापती महोदयांच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात स्पष्टीकरण करावे अशी विनंती करतो.

श्री.चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, राज्यातील सार्वजनिक बांधकामाचे 53 आणि एमएसआरडीसीचे 12 असे 65 टोल नाक्याचा निर्णय मार्चच्या अधिवेशनात घेण्यात आला होता. त्यातून फक्त मुंबई-पुणे सुपर एक्सप्रेस हायवे, मुंबई एन्ट्री पॉईंट आणि कोल्हापूर इतक्याच टोलच्या बाबतीत निर्णय राहिला होता. कोल्हापूरच्या टोलला आपण गेल्या पाच महिन्यापासून स्टे दिला आहे. काही करुन हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्याचा निर्णय केला जाणार आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवे यावर नव्याने काही बांधकामे अपेक्षित आहेत. यामध्ये 6 लेनचे रुपांतर 8 लेन मध्ये करावे असा विषय आहे तसेच बायपासचे काही विषय आहेत. जेथे दरडी कोसळतात त्या ठिकाणी 8 कि.मी. लांबीचा बोगदा तयार करावयाचा आहे, जेणेकरुन गाड्या बोगद्यातून जातील. दरडी कोसळण्याच्या संदर्भात खूप प्रयत्न करुनही आपण यशस्वी झालो नाही. यामध्ये मोठा खर्च अपेक्षित असून त्या खर्चाचा अंदाज येत नाही. त्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेच्या बाबतीत या कारणाने मुदत वाढवित आहोत परंतु रोज काही तरी नवीन निघते. बाकीच्या टोलनाक्यावर 35 टक्के छोटी वाहने आणि 65 टक्के मोठी वाहने ये-जा करीत असल्यामुळे आर्थिक गणित जमले.

...7...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

परंतु मुंबई एन्ट्री पॉईंटमध्ये 85 टक्के छोटी वाहने आणि 15 टक्के मोठी वाहने असे गणित आहे. त्यामुळे द्यावी लागणारी दरवर्षाची रक्कम वाढते. एक तर टोटल बायबॅक असल्यामुळे ते शक्यच नाही. निदान छोट्या वाहनांना सूट देता येईल का हे बघतांना मुंबई एन्ट्री पॉईंटमध्ये छोट्या वाहनांची संख्या जास्त असल्यामुळे परतावा जास्त प्रमाणात येतो. परंतु वेगवेगळ्या ऑप्शनाच्या संदर्भात शासन विचार करीत आहे. वेगवेगळ्या आकडेवारीच्या बाबतीत शासन विचार करीत असल्यामुळे उशीर लागतो आहे. ऑक्टोबरला संपलेली समितीची मुदत 31 डिसेंबर पर्यंत वाढवण्यात आली असून त्यापेक्षा ती अधिक वाढवली जाणार नाही. साधारणतः जानेवारी महिन्यामध्ये याचाही निर्णय पुर्ण करावयाचा आहे. जसा डिसेंबर महिन्यात कोल्हापूरच्या टोलचा निर्णय घेण्यात येणार आहे तसाच निर्णय जानेवारी महिन्यामध्ये यासंदर्भात देखील घेण्यात येणार आहे व तसे शासनाने नक्की ठरवलेले आहे.

-----

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**उप सभापती :** आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

देशाचे तत्कालीन कृषी मंत्री आदरणीय श्री. शरदचंद्र पवार यांच्या 75 व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी दिल्ली येथील आयोजित सत्कार सोहळ्यास देशाचे आदरणीय राष्ट्रपती महोदय, आदरणीय उप राष्ट्रपती महोदय, आदरणीय पंतप्रधान तसेच कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनिया गांधी, कॉंग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष माननीय श्री.राहूलजी गांधी तसेच विविध राज्याचे माननीय मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री तसेच या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते.

Y-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे.....

या सोहळ्यामध्ये आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या 50 वर्षाच्या राजकीय व सामाजिक योगदानाबद्दल त्यांच्या कार्याचे कौतुक करुन आदरणीय श्री.शरद पवार यांचे योगदान देशासाठी आणि पर्यायाने महाराष्ट्र राज्यासाठी किती महत्वाचे आहे याबाबत आपल्या आठवणी व अनुभव सर्व देशवासियांना सांगितले. त्यानंतर दिनांक 12 डिसेंबर, 2015 रोजी अशाच स्वरुपाचा कार्यक्रम मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला देशाचे तत्कालीन गृहमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, महसूल व कृषी मंत्री माननीय श्री.एकनाथराव खडसे, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, शिवसेना पक्षाचे पक्ष प्रमुख माननीय श्री.उद्धव ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचे पक्ष प्रमुख माननीय श्री.राज ठाकरे तसेच राज्यातील मंत्री गण व राज्यातील उद्योगपती उपस्थित होते व त्यांनी आदरणीय श्री.पवार साहेबांच्या विकासाबाबतच्या योगदानाबद्दल आपापल्या आठवणी व अनुभव सांगितले व आदरणीय श्री.पवार साहेबांचे कौतुक केले.

आदरणीय श्री.पवार साहेब राज्याचे चारवेळा मुख्यमंत्री होते. त्यांनी केंद्र शासनात संरक्षण मंत्री तसेच कृषी मंत्री पद भूषविले होते. त्यांनी आपल्या परीने देशाच्या विकासात निश्चितपणे भ्र घातलेली आहे. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे हे योगदान तसेच महाराष्ट्र राज्याची संस्कृती विचारात घेऊन शक्य झाल्यास नागपूर येथे किंवा मुंबई येथील विधानमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात दोन्ही सभागृहाच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबईतील एका चित्रपटगृहात राष्ट्रगीत सादर होत असताना एक कुटंब बसून राहिले म्हणून देश्ाचा अपमान झाल्यामुळे त्या कुटुंबाला चित्रपटगृहातून इतर लोकांनी बाहेर हाकलून दिले, परंतु मुळात राष्ट्रगीत ते देखील चित्रपटाच्या पडद्यावर सुरु असताना उभे रहायला हवे असा कोणताही कायदा व नियम नसणे, तसेच प्रत्येक चित्रपटगृहात चित्रपट सुरु होण्यापूर्वी राष्ट्रगीताला मानवंदना करणे हे सक्तीचे केल्यावरही शासनाने अशाप्रकारचा कोणताही कायदा केला नाही. राष्ट्रगीत म्हणू पाहणाऱ्यास रोखण्याचा प्रयत्न झाला तर मात्र तो राष्ट्रगीताचा अपमान ठरतो. तसेच एखाद्या समारंभात राष्ट्रगीत प्रत्यक्ष गायले जात असेल आणि उपस्थितांनी उभे राहून मान वंदना दिली नाही तर तो राष्ट्रगीताचा अपमान ठरतो. परंतु हा नियम चित्रपटांच्या पडद्यावर अप्रत्यक्षपणे वाजविल्या जाणाऱ्या राष्ट्रगीता प्रसंगी लागू व्हावा किंवा होऊ नये म्हणून कायद्यात योग्य ती तरतूद करण्यात यावी, अशी शिफारस या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"श्री.शेख आलम शेख हानिफ यांनी मुदत कर्ज मिळण्याकरिता मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडे रितसर अर्ज केला होता. त्या अनुषंगाने श्री.शेख यांचे मुदत कर्ज प्रकरण क्र. M/YEO/T/6040हे दिनांक 3 जुलै, 2009 रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर झाल्याचे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे श्री.शेख यांना धनादेश क्रमांक 187128 (रू 1,42,500/-) हा मे.गोयंका ऑटामोटर्स या नावाने तयार आहे असेही कळविण्यात आले होते. सदर धनादेश स्वीकारण्याकरिता श्री.शेख कार्यालयात गेले असता सदर धनादेशामध्ये दुरूस्ती करुन मे.गोयंका ऑटोमोटर्स या ऐवजी मे.वर्मा ट्रॅक्टर्स अँड बॅटरीज यवतमाळ या नावाने धनादेश बनवून आपणास लवकर पाठविण्यात येईल असे दिनांक 21.1.2011 रोजी सांगितले. तद्‌नंतर तब्बल एक वर्षांनी दिनांक 22.1.2012 रोजी त्यांना आपल्या कर्ज प्रकरणाची फाईल गहाळ झाली आहे असे कळविण्यात आले. तद्‌नंतर आजपर्यंत सदर कर्ज प्रकरणावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. कृपया या प्रकरणाची आपल्या स्तरावरुन सखोल चौकशी करुन श्री.शेख आलम हानिफ यांच्यावरील अन्याय दूर करावा, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी उप विभागांतर्गत नागभीड तालुक्यातील तळोधी, वाढोणा, नांदेड, सावरगाव, लखमापूर परिसरातील शेतजमिनी सन 1970-72 नंतरचे खरेदी हक्काने शेतकऱ्यांनी खरेदी करणे, सदर शेतजमिनीची रजिस्ट्री करुन त्याची फेरफार नोंद नियमानुसार करण्यात येणे, सदर शे्तजमिनीतील काही जमिनी या वर्ग-1 आणि वर्ग-2 च्या असून सदर शे्तजमिनीवर तेव्हापासून कब्जा व वहिवाट असताना शासनाने आता सदर जमिनी सरकार जमा करण्याबाबात बऱ्याच शेतकऱ्यांना नोटीस पाठविलेली आहे. सदर जमिनीवर शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेतलेला असून, त्यात विहिरी, बोअरवेल, पीक कर्ज यासारख्या सरकारी योजना देखील घेतलेल्या आहेत. परंतु आता शासनाने सदर जमिनी सरकारी जमा करण्याकरिता शेतकऱ्यांना नोटीसा देऊन शेतकऱ्यांची थट्टा चालविली आहे. त्यातच सरकारने जबरदस्तीने काही जमिनी आपल्या नावे करण्याचा प्रकार सुरु केला असल्यामुळे सदर परिसरातील शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय, सदर परिसरातील शेतकऱ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने खरेदी हक्काच्या जमिनी परत करण्याची आवश्यकता यावर शासनाने उचित कार्यवाही करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या निमित्ताने शासनास करीत आहे."

सभ्ापती महोदय, माझा दुसरा एक औचित्याचा मुद्दा आहे.

"चंद्रपूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व त्यांचे कुटुंबनिवृत्ती वेतनधारक मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या वेतनश्रेणी संबंधात समस्या प्रलंबित आहेत. जिल्हयात 1520 सेवानिवृत्तीधारकांना वेतनश्रेणी मंजूर केलेली असून गेल्या तीन वर्षात फक्त 150 सेवानिवृत्तीधारकांना त्याचा लाभ मिळालेला आहे. उर्वरित 1370 सेवानिवृत्तधारक वेतनश्रेणी पासून वंचित आहेत. जिल्हयातील पंचायत समिती स्तरावर सेवानिवृत्तीधारकांच्या प्रलंबित समस्यांवरील कार्यवाही संथ गतीने होत असल्याने बरेच सेवानिवृत्तधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना त्याचा लाभ मिळण्यापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे त्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मिळाव्या यासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे निधीची भरघोस तरतूद केली जाते. असे असतानाही राज्याला 1400 शाळांमध्ये अद्यापि पिण्याचे पाणी व 2100 शाळांमध्ये शौचालय नसल्याचे समोर आले आहे. केंद्र शासनाने जिल्हास्तरावर सर्व शिक्षा अभियान सुरु केले. या अभियानाचा उद्देश विद्यार्थ्यांना शिक्षणाचा हक्क मिळावा या सोबतच शाळेमध्ये मूलभूत सुविधा प्राप्त व्हाव्यात असा आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळांना इमारती, शौचालये, पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, संरक्षक भिंत आदी सुविधा पुरविल्या जात आहेत की नाही याचा अहवाल शासनास सादर करावयाचा असतो. शासनाच्या निधीचा विनियोग कशाप्रकारे होतो यासाठी अनेकदा सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातच वर म्हटल्याप्रमाणे गंभीर बाबी समोर आल्या आहेत. शासनाच्या सर्व शिक्षा अभियानानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाचा हक्क त्यासोबत शाळांमध्ये मूलभूत सुविधा विनाविलंब प्राप्त होण्यासाठी शासनाने खास मोहीम हाती घेऊन पूर्तता करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

----------

.........Z-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई मालाड पश्चिमेकडील लिंकिंग रोड या परिसरातील भूमी क्लासिक ही सुमारे 257 रहिवाशांची वसाहत आदिवासींच्या नावे असलेल्या भूखंडावर बांधण्यात येणे, सदर जमीन ही आदिवासींच्या नावे असल्याने तो भूखंड विकासकास विकता येत नसल्याची कल्पना असताना अन्य भूखंडाच्या बिगर शेती आदेशाचा वापर करुन विकासकाने सदर भूखंडावरील घरे विकणे, सदर घोटाळा प्रकरणी माननीय महसूल मंत्री यांनी सदर भूखंड सरकार जमा करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त यांना देऊन अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, या बाबत तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमाद्वारे शासनास करीत आहे."

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यात सत्तेत आलेल्या शासनाने वीज दर कमी करण्याची घोषणा करणे, मात्र पूर्वीचे दर जास्त असतानाही शासनाने माहे जून, 2015 पासून 5.72 ते 12 टक्क्यांनी दरवाढ केल्याने ग्राहकांना जवळपास दुपटीने विजेची बिले भरावी लागणे, अगोदरच अवर्षण, दुष्काळ यांच्यात शेतकरी भरडला जात असताना ग्राहकांना वीज बिले वाढवून येणे तसेच विदर्भाच्या जनतेवर महाराष्ट्र सरकार विजेचा बोजा वाढवित असणे, सतत विजेचे दर विदर्भाच्या जनतेवर अन्याय करीत असणे, तसेच वीज प्रकल्प विदर्भात आहेत. शिवाय कोळसा विदर्भाचा, जमीन विदर्भातील शेतकऱ्यांची, पाणी विदर्भाचे, प्रदूषण विदर्भाला, विदर्भाच्या बाहेर जाणाऱ्या विजेची गळती व विजेच्या चोरीचा बोजा विदर्भावर पडत असल्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेला असंतोष व निराशेची भावना, या बाबत विद्युत नियंत्रक मंडळाने वाढ केलेले विजेचे दर कमी करण्यात यावे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे."

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त. : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कालच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरजी यांच्या 125 व्या जयंती निमित्त सभागृहामध्ये संविधानावर चर्चा करण्यात आली. सर्वांनी त्या चर्चेमध्ये भाग घेताना अन्यायाच्या विरोधात लढताना डॉ.बाबासाहेबांच्या टॉलरेंट बिहेवीयर विषयी त्यांचे कौतुक केले. परंतु सत्ताधारी बाजूने त्या टॉलरेंट बिहेवीयरमधून बोध घेतल्याचे दिसत नाही. ज्या प्रकारे केंद्रामध्ये आमच्या आदरणीय नेत्या, काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनीयाजी गांधी आणि उपाध्यक्ष माननीय श्री.राहुलजी गांधी यांच्या विरोधात सूडबुध्दीने कारवाई करण्याचा प्रयत्न होत आहे. त्याच अनुषंगाने राज्यात सुध्दा पॉलिटीक्स ऑफ वेंडेटाच्या निमित्ताने सरकार कारवाई करीत आहे. महोदय, मुंबईतील असोशिएटेड जरनल्स यांनी रितसर परवानगी देऊन, पूर्वीच्या सरकारने सर्व संमती देऊन ॲलोटमेंटच्या बातीत सूडबुध्दीने वागून, इनटॉलरंट बिहेवीयरच्या माध्यमातून कारवाई करण्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे या कारवाईचा मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून निषेध करतो.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यात एस.टी. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पगार हे इतर शासकीय व इतर महामंडळातील कर्मचाऱ्यांपेक्षा अत्यंत कमी असणे, या कमी पगारामुळे एस.टी.कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली असणे, त्यामुळे एस.टी.कर्मचारी हे शेतकऱ्यांप्रमाणे कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करीत आहेत. नुकतेच एस.टी.महामंडळातील 4 कर्मचाऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या असणे, या घटनामुळे राज्यभरातील एस.टी.कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, एस.टी.कर्मचाऱ्यांच्या पगारात 25 टक्के वाढ करण्यात यावी, यासाठी इंटक या संस्थेने दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी बेमुदत संप पुकारणे, एस.टी.कर्मचाऱ्यांच्या या गंभीर प्रकरणाकडे शासनाने त्वरित लक्ष घालून एस.टी.कर्मचाऱ्यांच्या पगारात जास्तीत जास्त वाढ करून दिलासा देण्याची आवश्यकता आहे, अशा या अतिशय महत्त्वाच्या विषयावर मी सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

---------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"कोंडेतड, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील अर्जुना नदीवर पुलाचे काम सुरु होऊन ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे गरजेचे असणे, तथापि, निधी अभावी पुलाचे फक्त 3 पीलर उभे असणे, पुलाकरिता साडेतीन कोटी रुपयांची आवश्यकता असणे, अर्जुना नदीच्या एका बाजूला शहरातील नगर परिषदेचा प्रभाग क्रमांक 3 व दुसऱ्या बाजूला क्रमांक 2 असणे, मात्र या दरम्यान रहदारीसाठी पूल नसणे, परिणामी जून ते जानेवारी या 8 महिन्यात नदीतील पाण्यामुळे होडीने वाहतूक करावी लागणे, पावसाळ्यात नदीला 3 ते 4 वेळा महापूर येणे, या कालावधीत शहरवासीयांना जीव मुठीत धरुन होडीने वाहतूक करावी लागणे, यामध्ये शाळेत जाणारी लहान मुले, महाविद्यालयातील मुले/मुली, ज्येष्ठ नागरिक, आजारी महिला व पुरुष यांचा समावेश असणे, परिणामी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार निधीची मागणी करणे, मात्र अद्याप सदर निधी मंजूर न होणे, यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, अशा या अतिशय महत्त्वाच्या विषयावर मी सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. "

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे. : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई येथील विमानतळाला छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि व्ही.टी. रेल्वे स्टेशनला छत्रपती शिवाजी टर्मिनल असे नाव देण्यात आले आहे. या दोन्ही नावांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे एकेरी उल्लेख करणे बरोबर नाही. अशा प्रकारे एकेरी उल्लेख करणे म्हणजे शिवाजी महाराजांचा अवमान करणे आहे. म्हणून मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करु इच्छितो की, शासनाने केंद्र शासनाला, तसेच रेल्वे प्रशासन आणि एयरपोर्ट ऑथॉरिटी यांना या संदर्भात महाराष्ट्राच्या भावना कळवून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ व छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशन, असे नामकरण करण्यास सांगावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे."

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मांडलेला मुद्दा अतिशय योग्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख एकेरी असेल तर ते नक्कीच निषधार्ह आहे. त्यामुळे राज्य सरकारने सन्माननीय सदस्यांनी जी दुरूस्ती सुचविली आहे ती दुरूस्ती अंमलात आणण्याबाबत तातडीने केंद्र सरकारसोबत पत्र व्यवहार करावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान होईल असा उल्लेख त्यामध्ये नसावा. तो उल्लेख कसा असावा हे मी सांगण्याऐवजी राज्य सरकार या बाबत योग्य तो निर्णय घेईल. मात्र या बाबतचा निर्णय घेण्याची प्रक्रिया माननीय मंत्र्यांनी त्वरित पार पाडावी किंवा त्यास चालना द्यावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सनमाननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्याकडून हा विषय नीट समजून घेईन. हा प्रकार त्या ठिकाणी उच्चार करताना होतो की काय.....महोदय, या संदर्भात केंद्र सरकारकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यात येईल. कारण हे दोन्ही विषय केंद्र सरकारशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यांच्यासोबत पत्र व्यवहार करून पाठपुरावा करण्यात येईल.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक) या संघटनेने प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता संप मागे घेणे

**मु.शी.** : महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक) या संघटनेने प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता संप मागे घेणे, या संबंधी परिवहन मंत्र्यांचे निवेदन

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

( चर्चा पुढे सुरू ....

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने सन 1978 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य प्रकाशित करण्याचा निर्णय घे्णे त्यासाठी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती गठीत करणे, या समितीच्या वतीने आतापर्यंत डॉ. बाबासाहेबांच्या भाषणांचे व लेखनाचे 22 खंड प्रकाशित करणे, या प्रकाशित ग्रंथांपैकी डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेले "ॲनिहिलेशन ऑफ कास्ट" या इंग्रजी ग्रंथाच्या "जाती व्यवस्थेचे निर्मूलन" या एकेकाळी गाजलेल्या व वादळी ठरलेल्या मराठी भाषांतराच्या 40 हजार प्रति विक्रीसाठी उपलब्ध करू न देता विक्रीविना शासकीय गोदामात धूळ खात पडून असल्याची बाब अलीकडेच निदर्शनास येणे, सदर ग्रंथाच्या प्रती अद्याप बाजारात उपलब्ध करून न दिल्यामुळे जनतेला या विचारधनाच्या वाचनापासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांच्या मनात निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सदर ग्रंथ बाजारात त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने मौलाना अब्दुल कलाम आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती केली. गेल्या अनेक वर्षांपासून अधिकृत अध्यक्षांची नेमणूक झालेली नाही. सीएमडीची म्हणजेच मुख्य व्यवस्थापकांची देखील नेमणूक झालेली नाही. सध्या तात्पुरता कार्यभार श्रीमती अत्तार यांच्याकडे देण्यात आलेला आहे. त्या मॅडमकडे कोणत्याही प्रकारची पात्रता नाही. त्यांच्याबद्दल अनेक प्रकारच्या तक्रारी आहेत. एखाद्याला सेवेत कायम करायचे असेल तर पैशाचा व्यवहार केल्याशिवाय कायम करणार नाही अशी अनेक प्रकारची प्रकरणे, दलालांची नेमणूक त्यांनी केली आहे. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून शासनाला माझी विनंती आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब सभागृहात उपस्थित आहेत. अल्पसंख्याक खात्यावर देखरेख करणारे ते माननीय मंत्री आहेत. मौलाना अब्दुल कलाम आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांची नेमणूक होणे गरजेचे आहे. येथील श्रीमती अत्तार मॅडमनी अनेक प्रकारचे गैरव्यवहार केले आहेत. अल्पसंख्याकांमध्ये मुसलमानांच्या सोबत बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन येतात. कर्मचारी वर्गाला देखील त्रास देण्याचा, ब्लॅकमेल करण्याचा त्या प्रयत्न करतात. माझी शासनाला विनंती आहे की, श्रीमती अत्तार मॅडमला ताबडतोब बडतर्फ करावे आणि त्यांच्या जागी योग्य प्रकारचा अधिकारी देऊन गरीब लोकांचे भले करावे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, तत्कालीन शासनाने सन 2005 मध्ये राज्यात डान्सबार बंदीचा कायदा लागू केला. आर.आर.पाटील साहेबांनी मोठा निर्णय घेतला. या निर्णयामुळे राज्यातील जनतेत समाधानाचे वातावरण पसरलेले असताना दिनांक 15.10.2015 रोजी माननीय उच्च न्यायालयाने डान्सबार बंदी उठविण्याच्या दिलेल्या निकालामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, डान्सबार बंदी बाबतची शासनाची भक्कम बाजू न्यायालयात शासनाने न मांडल्यामुळे माननीय उच्च न्यायालयाने डान्सबार बंदी उठविण्याचा दिलेला निर्णय, यात बराच आर्थिक व्यवहार झाल्याचा व्यक्त होत असलेला, संशय, राज्यतील डान्सबारवर पुन्हा बंदी आणण्यासाठी विधिमंडळात नवीन कायदा पारित करून डान्सबारबंदीच कायम ठेवण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा अशी माझी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांनी यावर खूप मोठे आंदोलन केले होते.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंदराव पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोयना. कोयना धरणामुळे सन 1959 मध्ये कराड तालुक्यातील विजयनगर व मुंढे येथे पुनर्वसन करण्यात आलेल्या लोकांच्या संदर्भात हा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कराड तालुक्यातील मुंढे व विजयनगर येथे कोयना धरणामुळे पुनर्वसन झालेल्या लोकांना अल्पशा जमिनी दिलेल्या आहेत. दिलेल्या जमिनीपैकी काही जमीन 220 केव्ही सब स्टेशन व 420 केव्ही सबस्टेशन यांकरिता संपादन करण्यात आल्या. तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी त्यावेळी पुनर्वसनाची जमीन घेऊ नये असा मुद्दा दिलेला असताना देखील उपयुक्त प्रकल्प असल्यामुळे शासनाचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक झाली, त्या बैठकीत ज्या कुटुंबाच्या जमिनी संपादित केल्या जातील, त्या प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरीत सामावून घेण्याचा करार झाला. सदर करारानुसार 60 टक्के लोकांना नोकरीत सामावून घेतलेले आहे. परंतु अद्याप उर्वरित काही लोकांना सामावून घेतलेले नाही. माझी या संदर्भात विनंती आहे. गेल्या 20-25 वर्षांपूर्वी लोकांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत, कोयना धरणात जमिनी गेल्या आहेत, पुन्हा प्रकल्पासाठी 3-4 वेळा जमिनी गेलेल्या आहेत. ज्यांच्य जमिनी गेल्या आहेत त्यातील काही लोकांना घेतले आहे. मी त्या प्रकल्पग्रस्तांपैकी एक प्रतिनिधी म्हणून त्यावेळी काम केले आहे. ती मंडळी वारंवार माझ्या घरी येऊन सूचित करत आहेत. माझी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती आहे की, एमएसईबी महामंडळाला या संदर्भात आदेश व्हावेत की उर्वरित लोकांनाही नोकरीमध्ये सामावून घ्यावे.

----

..5

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कार्ला, लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील पांडवकालीन श्री एकवीरा देवीचे मंदिर अनधिकृत ठरविल्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, लाखो लोकांचे देवस्थान असलेले श्री एकवीरा देवीच्या देवस्थानाला एका तहसीलदाराने अनधिकृत ठरविले आहे.

....2B

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त.........

शासनाने त्याबाबत सूचना केली होती. या मुद्याव्दारे हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा आहे की, नेमकी याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? जर शासनाला याबाबत माहिती नव्हती तर मग त्या तहसीलदारांवर आणि जिल्हाधिकाऱ्यांवर, जे हा निर्णय घेण्यामध्ये सामील झाले आहेत, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्रमांक 8519/2006 या प्रकरणी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे, नियमित करणे, स्थलांतरीत करणे या संबंधातील गृह विभागाच्या शासन निर्णय दिनांक 5 मे, 2011 अन्वये करावयाच्या कार्यवाही संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी निष्कासित, नियमित, स्थलांतरीत करावयाच्या अनधिकृत धार्मिक स्थळांची माहिती मागविली होती.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या सरकारचा उल्लेख केला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा निर्णय सन 2011 मधील आहे, मागील सरकारच्या काळातील आहे. (अडथळा...) सन्माननीय सदस्यांनी सत्य ऐकण्याची तयारी ठेवली पाहिजे. जे आहे ते कोर्टाचे आहे व त्याच तारखा मी सांगत आहे. मी काही वेगळे सांगत नाही.

सभापती महोदय, ही यादी मागील सरकारने मागविली होती. त्या अनुषंगाने मावळ तालुक्यातील वनपरिक्षेत्र अधिकारी, वडगाव यांचेकडून 21, वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचेकडून 15 व मंडल अधिकारी, कार्ला यांच्याकडून 1, अशी एकूण 37 अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी नियमितीकरण या वर्गवारी खाली जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे प्राप्त झाली होती. जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक 26/10/2015 रोजीच्या पत्रामधील नमूद कालबध्द कार्यक्रमानुसार मावळ तालुक्यातील नियमित करावयाच्या 37 अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. आता आपले सरकार आल्यानंतर सर्व मंदिरे नियमित करता येतील का, या संदर्भात दिनांक 26/11/2015 रोजी कळविलेले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांनी वेहेरगाव तालुका मावळ येथील डोंगराच्या पायथ्याशी गावालगत असणाऱ्या राखीव वन गट नंबर 347 मधील एकविरा देवीच्या मंदिराचा यादीमध्ये समावेश केला असून सदर

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.......

मंदीर पुरातन असल्याने नियमित करण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे. सदर मंदीर खाजगी वनक्षेत्रात आहे, नियमित करण्यासंबंधी कार्यवाही करता येईल, असे अभिप्राय नुकतेच प्राप्त झाले आहेत. मावळ तालुक्यातील प्रसिध्द करण्यात आलेली 37 अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी नियमितीकरणासाठी जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्तावित करण्यात आली असून यापैकी कोणतेही धार्मिक स्थळ निष्काषित किंवा स्थलांतरीत करण्यासाठी प्रस्तावित नाही. प्रस्तुत प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्तरावर सुरुआहे. आता या संदर्भात निष्काषित करण्याची कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

------------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील श्रीरामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना बंद पडल्यामुळे 50 गावांचा पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न याबाबत श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 17 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील दुष्काळी भागाचा हा प्रश्न आहे. आपण या निवेदनात कबूल केले आहे की, सन 1995 च्या आदेशान्वये पाणी उचलण्यास निर्बंध घातल्यामुळे सदर योजना बंद पडली. आपण जर ही योजना कार्यान्वीत केली तर 14 गावांना पाणी पुरवठा होऊ शकेल. माझी अशी विनंती आहे की, कमी पैशात कर्ज सेटल होणार असेल तर तसा प्रयत्न शासन करणार आहे का आणि ही योजना ताब्यात घेणार का ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या उपसा जलसिंचन योजनेचे बँकेकडे मुद्दल व व्याज असे एकूण र.148.09 कोटी थकित आहेत. सन्माननीय सदस्यांची अशी सूचना आहे की, सरकारने हे पैसे भरुन योजना ताब्यात घ्यावी.

सभापती महोदय, यामध्ये प्रामुख्याने दोन अडचणी आहेत. ज्यावेळी ही योजना बंद पडली त्यावेळी नाथसागर जलाशयातून पाणी लिफ्ट करण्यास परवानगी मिळाली नाही. त्यामुळे आता ही योजना सरकारने जरी ताब्यात घेतली तरी ती पाण्याअभावी सुरु करता येईल का, याबाबतचा अभ्यास आपल्याला करावा लागेल. ज्या मुद्यावर ही योजना बंद पडली तो मुद्या आता आणखी भीषण झाला आहे. त्याचप्रमाणे रू.148.09 कोटी एवढया रकमेच्या अगेंस्ट बॅक किती रकमेला सेटल होईल, यासाठी बँकेबरोबर आपल्याला चर्चा करावी लागेल. परंतु, पहिल्या मुद्याचे काय करणार, हे अनुत्तरीतच आहे.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, फक्त पिण्याच्या पाण्यासाठी ही योजना सुरु करावी.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन बँकेची रक्कम किती कमी येऊ शकेल ते बघु. नाथसागर जलाशयातून पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल का, तेही बघु.

------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** पैठण-औरंगाबाद या 50कि.मी.रस्त्याचे चौपदरीकरण तातडीने करणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 26 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, पैठण येथे आपण सुध्दा गेला असाल. त्या ठिकाणी जायकवाडी धरण आहे, संत एकनाथांचे मंदीर आहे, संत ज्ञानेश्वर उद्यान आहे. त्यामुळे पर्यटक मोठ्या संख्येने त्या भागात येत असतात. औरंगाबाद ही मराठवाड्याची राजधानी आहे. तसेच ते एक ऐतिहासिक शहरही आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद-पैठण या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहती आहेत, मोठमोठे उद्योग त्या रस्त्याला लागून आहेत. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर वाहनांची रहदारी असते. औरंगाबादहून पैठणला निघालो तर आपल्याला जीव मुठीत धरुन जावे लागते. कारण, कधी अपघात होईल, हे सांगता येत नाही. मोठमोठे कंटेनर, ट्रक्स यांची मालवाहतुक या रस्त्यावरुन होत असते. त्यामुळे हा रस्ता चौपदरी होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही औरंगाबादचे लोकप्रतिनिधी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. सन 2007 पासून आतापर्यंत दोन वेळा या प्रकल्पासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. दोन्ही वेळा निविदा रद्द केल्या गेल्या. तेव्हा पासून आतापर्यंत 140 कोटी रुपयांचा हा प्रकल्प 259 कोटी रुपयांवर गेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रकल्पाची किंमत वाढून सुध्दा आणि प्रकल्प मंजूर होऊन 8 वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी ठोस असे उत्तर निवेदनातून दिलेले नाही. औरंगाबादकर आणि पैठणकरांच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असलेल्या औरंगाबाद-पैठण रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरु करण्याबाबत कोणती ठोस पावले हे शासन उचलणार आहे ?

सभापती महोदय, औरंगाबाद-नगर नाका ते दौलताबाद टी पॉईंट रस्त्याबाबतही प्रश्न आहे. धुळे ते सोलापूर रस्ता नॅशनल हाय-वे मधून घेतला आहे व त्याचे काम सुरु आहे.

...CC-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.......

त्या रस्त्याला जोडणारा नगर नका ते दौलताबाद टी पॉईंट रस्ता आहे. आपण सांगितले की, या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी आम्ही तरतूद केली आहे. परंतु, त्याचे देखील चौपदरीकरण करणे गरजेचे आहे. कारण, तेथून हा रस्ता मुंबईकडे जातो. तेथून हा रस्ता वेरूळ, अजिंठा आणि धुळे या रस्त्याला जोडला जातो. त्यामुळे नगर नाका ते दौलताबाद टी पॉईंट पर्यंतच्या पोर्शनचे चौपरीकरण करणे गरजेचे आहे. तो रस्ता अरुंद असल्यामुळे तेथे अपघात होतात. आपण सांगाल की, वाहने चुकीच्या पद्धतीने चालविल्यामुळे अपघात होतात. परंतु, शासनाला अशा प्रकारे उत्तर देऊन चालत नाही. म्हणून औरंगाबाद ते पैठण आणि दौलताबाद पर्यंतच्या रस्त्याचे चौपरदीकरण करणे या दोन्ही कामांबाबत शासन कोणते ठोस पाऊल उचलणार आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी औरंगाबाद-पैठण रस्त्याच्या संदर्भात जे सांगितले ते बरोबर आहे. औरंगाबाद-पैठण रस्त्याच्या कामाच्या संदर्भात दोन वेळा निविदा जाहीर झाल्यानंतर सुद्धा कोणताही विकासक त्या रस्त्याचे काम करण्यास तयार होत नव्हता. शेवटी, तिसऱ्या वेळी मात्र एका विकासकाला आपण वर्क ऑर्डर दिली. तोपर्यंत लहान वाहनांना सूट देण्याबाबतचे टोलचे नवीन धोरण तयार झाले. त्यामुळे त्या विकासकानेच माघार घेतली आणि हे काम आता मला करणे शक्य होणार नाही, असे सांगितले. सुरुवातीला दोन वेळा तर कोणी टेंडर भरण्यास पुढे आले नाही आणि मध्यंतरीच्या काळात किंमतही वाढली. तिसऱ्या वेळी टेंडर भरले आणि ज्यावेळी वर्क ऑर्डर देण्याची वेळ आली त्यावेळी तो विकासक म्हणाला की, नवीन धोरणाप्रमाणे मी हे काम करु शकणार नाही. हा रस्ता महत्वाचा आहे. आम्ही राज्यातील असे काही रस्ते काढले, त्यांचे अंदाजपत्रक नव्याने तयार केले. त्यामध्ये या रस्त्याचा समावेश आहे. आम्ही 4 हजार कोटी रुपयांची ॲन्युईटी घोषित करतो की, त्यामध्ये 7 वर्षाचे पेमेंट असेल. पहिले दोन वर्षे पेमेंट नाही. कारण, ते काम पूर्ण होण्यासाठी तेवढा कालावधी जातो. नंतर 5 वर्षाचे 20-20 टक्क्याचे चेक त्याला ॲडव्हान्समध्ये द्यायचे. त्याचा फायदा असाही होईल की, 7 वर्षाचा मेन्टेनन्स करणे त्याला आपोआप सक्तीचे होईल. ज्यावर्षी तो मेन्टेनन्स



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील........

करणार नाही त्यावर्षी त्याचा 20 टक्क्याचा चेक पास होणार नाही. या ॲन्युईटी बेसिसवर आपण 4 हजार कोटी रुपये किंमतीची कामे घोषित करीत आहोत. त्यामध्ये हा रस्ता घेतलेला आहे. अधिवेशन संपल्यानंतर 7-8 दिवसात या क्रांतिकारी निर्णयाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळेल. त्यातून असे होईल की, पुढील 4 वर्षात 16 हजार कोटी रुपये किंमतीच्या रस्त्यांची कामे आपण घोषित करु शकतो. त्यामध्ये हा रस्ता नक्की घेतलेला आहे. दरम्यानच्या काळात त्या रस्त्याच्या मेन्टेनन्ससाठी 20 कोटी रुपये बाजूला काढले आणि त्याचे टेंडर निघाले आहे. त्यामुळे जे मिनिमम मेन्टेनन्स आहे, म्हणजे खड्डे पडले तर ते बुजविणे, हे नक्की होईल. यासाठी आपण बजेटमध्ये 20 कोटी रुपये घेतले आहेत.

सभापती महोदय, सोलापूर-औरंगाबाद-वेरुळ-धुळे याही रस्त्याच्या कामाचे टेंडर निघाले, वर्क ऑर्डर दिली आणि कामही सुरु झाले आहे. दिनांक 29.10.2016 पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. परंतु, आपण सहापदरी म्हणत आहात...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदय ज्या रस्त्याचा उल्लेख करीत आहेत तो रस्ता शहराच्या बाहेरुन गेलेला आहे. त्या रस्त्याला जोडणारा नगर नाका ते दौलताबाद टी पॉईंट पर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण व्हावे, अशी आमची मागणी आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, म्हणजे तो नगर नाका ते दौलताबाद रस्ता आहे. आपण याचाही सकारात्मक विचार करु.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. आपण मघाशी सांगितल्याप्रमाणे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद तातडीने करण्यात यावी. तसेच, तेथे एक टोल नाका होता. आपण त्याला सूट दिलेली आहे. परंतु, तो रस्ता मोठ्या प्रमाणावर खराब झालेला असताना देखील माल वाहतूक करणाऱ्या ट्रकसाठी टोल लावला जातो. तो रद्द करण्याबाबत आपण निर्णय घेणार आहात काय ?

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जे टोल सुरु झालेले आहेत ते काही ना काही कामे पूर्ण झाल्यानंतरच सुरु झालेले आहेत. मूळात म्हणजे 75 टक्के काम पूर्ण झाल्याशिवाय टोल सुरु करण्यास परवानगीच दिली जात नाही. टोल सुरु झाला म्हणजे काम झाले असेल आणि काळाच्या ओघात ते काम खराब झाले असेल. ज्या रस्त्यांवर मोठ्या वाहनांसाठी टोल आहे त्यातून मिळणारा टोल आणि छोट्या वाहनांसाठी आपण कॉम्पेन्सेशन देतो. म्हणून त्या विकासकाने रस्त्याचे मेन्टेनन्स करणे बंधनकारक आहे. कारण, त्याला पाहिजे ती अमाऊंट मिळाली आहे. मोठ्या वाहनांची अमाऊंट त्याला मोठ्या वाहनांच्या टोलच्या माध्यमातून मिळाली आणि छोट्या वाहनांची अमाऊंट आपण दरमहा आरटीजीएसद्वारे देतो. त्यामुळे आपण त्या विकासकाला नोटीस देऊ की, तुझा मूळ टोल कलेक्शनचा काहीच तोटा झालेला नाही. मोठ्या वाहनांचा टोल तो कलेक्ट करीतच आहे आणि छोट्या वाहनांचे पैसे आम्ही दरमहा आरटीजीएसने देत आहोत. त्यामुळे तुला रस्त्याचे मेन्टेनन्स केले पाहिजे. आपण त्याला अशी नोटीस देऊ आणि काम पूर्ण होईल हे बघू.

-------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** पुणे जिल्ह्यातील वानवाडी महिला सुधारगृहातून 38 महिलांनी केलेले पलायन याबाबत श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सुचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 11 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोतचे निवेदन छापावे.)

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, महिला सुधारगृहातून महिलांचे पलायन होणे ही नित्याचीच बाब झालेली आहे. ही विशिष्ट घटना आहे असे मी मानत नाही. आज सकाळी माननीय मंत्री महोदयांनी बेटी बचाओ बेटी पढाओ, महिलांच्या करणाकारी योजनांच्या संदर्भात काही निवेदने केली. अनैतिक व्यापारामध्ये ज्या महिला गुंतलेल्या आहेत त्या स्वखुशीने त्या व्यापारात जात नाहीत. गरिबीमुळे किंवा फसवणूक झाल्यामुळे त्या अनैतिक व्यापारात जातात. मी या सुचनेच्या निमित्ताने मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, अनैतिक व्यापारात गुंतलेल्या महिलांच्या कल्याणासाठी राज्य शासन एखादी सर्वंकष योजना तयार करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, देहविक्री करणाऱ्या महिलांसाठीच महिला सुधारगृहे आहेत. ज्यावेळी त्या महिला सुधार गृहात येतात त्यावेळी त्यांना अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच काही प्रशिक्षणही दिले जाते. महिला सुधार गृहातील काही महिलांना आयुर्वेद, योगासनांचे प्रशिक्षण देखील दिले जाते. परंतु, या पर्टिक्युलर केसमध्ये बांगलादेशी महिला होत्या आणि त्या महिलांना परत पाठविण्याची प्रोसिजर खूप मोठी आहे. त्यांचे रिपोर्टेशन करण्याची प्रोसिजर मोठी असल्यामुळे जास्त कालावधी लागला की त्या महिला खूप अॅजिटेड होतात आणि मग त्या महिला तेथे राहू शकत नाहीत. बऱ्याच वेळी देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांना केवळ अन्न, वस्त्र, निवारा अशा अल्पशा सुविधांमध्ये गुजारा करावा लागतो. म्हणून काही महिला सुधार गृहाच्या लाईफ स्टाईलशी स्वतःला बांधून घेऊ शकत नाहीत किंवा ज्या लोकांनी त्यांना या व्यवसायात आणलेले असते त्यांच्या दडपणाखाली त्या सदैव वावरत असतात. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडतात. अशा विशिष्ट महिलांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात आम्ही भविष्यात नक्की विचार करु परंतु, या पर्टिक्युलर विषयाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर या संदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे. सिसिटीव्ही फुटेजमध्ये सर्व प्रकार क्लिअर दिसत आहे. त्या महिला खूप आक्रमक झाल्या होत्या. त्यांनी फर्निचरचे नुकसान केले, टी.व्ही. वगैरे फोडले. त्यामुळे या प्रकरणी पोलिसांना त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितले आहे. तसेच, मागील दिड वर्षे तेथे सुरक्षा व्यवस्था होती. परंतु, आता तेथे सुरक्षा व्यवस्था नाही. त्याची देखील मागणी केलेली आहे आणि समिती गठीत करुन या पर्टिक्युलर प्रकरणाची चौकशी होत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील सूचना क्र.25 चे निवेदन आलेले नसल्यामुळे ही सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. तसेच, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांची सूचना क्र.25 आणि सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांची सूचना क्र.28 पुढे ढकलण्यात येत आहे.

------

..2D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक एक बाबत**

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला माननीय महसूल मंत्र्यांकडून मला उत्तर अपेक्षित आहे. महसूल मंत्री सभागृहात असते तर बरे झाले असते.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक एकला उत्तर देण्यासाठी मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सभागृहात मंत्री महोदय उपस्थित का राहत नाहीत ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेवरील कार्यक्रम काही वेळा पुढे मागे होतो, त्यामुळे मंत्री महोदयांना या सभागृहातून त्या सभागृहात जावे लागते. लक्षवेधी सूचना आपणाला सर्व घ्यावयाच्या आहेत, रात्रीचे 12 वाजले तरी आपण सर्व कार्यक्रम संपविणार आहोत,

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आज कामकाज चार वाजता संपविण्यात येणार आहे त्यामुळे लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री उपस्थित झाल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक 6 चर्चेला घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्यात आली आहे.

---------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.मु.शी.:** औचित्याचा मुद्दा

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी एक औचित्याचा मुद्दा तातडीने दिला आहे, तोपर्यंत मंत्री महोदय येतील. सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा आहे, संबधित खात्याच्या मंत्री महोदया सभागृहात उपस्थित आहेत, नागपूर येथील शासकीय बालगृहात रेशन बंद झाल्यामुळे तेथे राहणारी 200 पेक्षा जास्त मुले चार दिवसांपासून उपाशी आहेत, या मुलांकडे आपल्या विभागाचे लक्ष नाही. नागपूर बालगृहात 200 पेक्षा जास्त मुले अन्नावाचून उपाशी राहणे, कंत्राटदाराने अन्नपुरवठा न करणे, वसतीगृह बंद करणे, कंत्राटदाराचे अन्न पुरवठ्याचे 50 ते 60 लक्ष रुपयांचे देयक थकीत असणे, यामुळे तेथील वसतीगृह आर्थिक अडचणीत येणे, नागपूर जिल्ह्यातील शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागामार्फत शासनाने चार बालगृह उभारण्यात येणे, या विभागाअंतर्गत संचालक शासकीय मुला-मुलींच्या बालगृहाच्या कंत्राटदाराचे पैसे थकित असणे, कंत्राटदाराने 10 डिसेंबर, 2015 पासून धान्यपुरठा बंद केल्याने मुला मुलींवर आलेली उपासमारीची पाळी, यामध्ये महिला व बाल कल्याण विभागाने लक्ष द्यावे, त्या मुलांना जेवण देण्याची व्यवस्था करावी. या विषयाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी या विषयात लक्ष घालावे.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई कांदिवली समता नगर परिसरात दामुनगर झोपडपट्टीत लागलेली भीषण आग.

**मु.शी.** : मुंबई कांदिवली समता नगर परिसरात दामुनगर झोपडपट्टीत लागलेली भीषण आग यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,मुझफ्फर हुसैन सय्यद, सुभाष झांबड, विजय ऊर्फ भाई गिरकर, धनंजय मुंडे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई कांदिवली समता नगर परिसरात असलेल्या दामु नगर झोपडपट्टीत लागलेल्या भीषण आगीत दोन जणांचा दुर्देवी मृत्यू होणे, तसेच १ हजार घरे जळून खाक झाल्याची धक्कादायक माहिती दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी निदर्शनास येणे, या आगीमध्ये सिलेंडरचे एकामागोमाग स्फोट झाल्याने या आगीने भीषण स्वरूप धारण करणे, या दुर्घटनेत अनेकजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर शताब्दी रूग्णालयात भरती करण्यात येणे, समता नगर परिसरात झोपडपट्टी ही दाट वस्तीमध्ये विखुरलेली असल्याने अग्नीशमक दलांना पोहोचण्यास आणि आग विझविण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कुर्ला येथे आगीच्या दुर्घटनेनंतर झोपडपट्टी भागाचे सर्वेक्षण करण्याचे काम महानगरपालिकेकडून करण्यात येत असता अचानक बंद केल्यामुळे मोठ्या प्रमाणात मुंबईसारख्या ठिकाणी अनेक स्फोट होऊन नाहक लोकांचा बळी जात असल्याने याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर गंभीर घटना दुर्देवी असून मुंबईसह राज्यात अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणात अनेक ठिकाणी स्फोट होऊन अनेक जण मृत्यु



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

पावले, या घटनेची सखोल चौकशी करून सदर घटनेतील मृतांच्या वारसांसह जखमी असलेल्या लोकांना आर्थिक मदत देण्याबाबत व वाढत्या आगीच्या घटनेला आळा बसण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया "

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मागील वर्षात राज्यात अशा प्रकारे अनेक झोपडपट्टीमध्ये संशयास्पद आगी लागण्याचे प्रकार वाढत आहेत, मूळ प्रश्न असा आहे की, या आगी लागतात की, लावल्या जातात, मी स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे, या विषयाबाबत मंत्री महोदयांशी माझी यापूर्वी चर्चा झाली आहे, शासनाने चौकशी करुन ही आग लागली की, लावली गेली याबाबत चौकशीत काही निष्पन्न झाले आहे काय ? या झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी एसआरए स्कीममधून विशेष बाब म्हणून शासन करणार काय ? शासनाने या लोकांना अतिशय कमी म्हणजे फक्त 3000 रुपये मदत दिली आहे, त्यामुळे त्या गोरगरीबांची थट्टा शासनाने मदतीच्या मार्फत केली आहे, असे मला वाटते. माणुसकीच्या तत्वानुसार शासन मदतीच्या बाबतीत काही रक्कम वाढवून देईल काय ? या आगीमुळे त्यांचे आयुष्य उध्दवस्त झाले आहे, याला जोडून एक प्रश्न असा आहे की, समता नगर, दामु नगर मध्ये आग लागली त्याच प्रमाणे मागील काळात विक्रोळी येथील पार्कसाईड येथे 17 ऑक्टोबर, 2015 रोजी, सिलेंडर स्फोट होऊन आग लागली होती, तेथील स्थानिक रहिवाशी कै.संतोष महादेव शिंदे या तरुणाने आगीत अडकलेल्या लोकांना वाचविताना स्वतःचा जीव गमविला आहे. त्याची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे, त्यामुळे शासन या व्यक्तीच्या वारसांना मदत देणार का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी समता नगर येथे जी आग लागली त्याबाबत चौकशी केली व त्यामध्ये काय निष्पन्न झाले असा प्रश्न विचारला आहे, सदर आगीची चौकशी झालेली आहे, इलेक्ट्रीसिटीच्या शॉर्टसर्कीटमुळे आग लागली असे चौकशीत निष्पन्न झाले आहे, ही आग शॉर्टसर्कीटमुळे लागली असली तरी त्या आगीत झोपडीतील सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे ती आग वाढत गेली व आगीने उग्ररुप धारण केले. दुसरा प्रश्न असा होता की, विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्यात येणार आहे काय ? सदर जागा ही डोंगराळ भागाची आहे, एक किलोमीटर परिसरात ही झोपडपट्टी बसलेली आहे, ती जागा संजय गांधी उद्यान आणि पर्यायाने वन विभागाच्या अखत्यारित येत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी कायद्याची तपासणी केल्याशिवाय पुनर्वसन करता येणार नाही. आपण जी सूचना केली ती जेथे पोहचवायची आहे तेथे पोहचवून विशेष बाब म्हणून काय करता येईल याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

जाईल. या झोपडपट्टीमध्ये 1206 पात्र कुटुंबे आहेत, त्यातील 9 कुटुंबाबातत डिस्पूट आहे, उर्वरित 1186 कुटुंबीयांना मदतीचे वाटप झाले आहे. आताच्या नियमाप्रमाणे 3800 रुपयांची मदत करण्यात आली आहे. परंतु अशा झोपडपट्या उभ्याच राहू नयेत, याचा देखील आपणाला विचार करावा लागेल, आताच्या नियमानुसार मदतीचे वाटप झालेले आहे. तरी देखील सन्माननीय सदस्य म्हणता त्या गोष्टींचा सहानुभूतीने विचार करुन एक विशेष बाब म्हणून (....अडथळा....)

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कायद्यामध्ये बदल करण्यासाठी हे सभागृह आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जे वाटप झालेले आहे ते कसे झाले असा प्रश्न विचारण्यात आला होतो, जी मदत झाली त्या मदतीची माहिती देण्यात आलेली आहे, याबाबत अशासकीय विधेयक येईल त्यावेळी सकारात्मक विचार करण्यात येईल.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अतिशय महत्वाच्या विषयाकडे सदनाचे लक्ष वेधले आहे, मुंबईत वारंवार दोन महिन्यातून एका झोपडपट्टीत आग लागते. त्या आगीत अनेक लोकांचे संसार व जीवन उध्दवस्त होते, असे असताना हायराईज इमारती व स्ट्रक्चरसाठी फायर ऑडिट बंधनकारक करण्यात आले आहे.

...EE-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर.....

या झोपडपट्ट्यांमध्ये भारताचे नागरिक राहतात. असे असताना त्यांच्या जीविताची काळजी शासन का घेत नाही? या झोपडपट्ट्यांचे फायर ऑडिट केले जात नाही. झोपडपट्ट्यांसाठी फायर नॉर्म्स का तयार केले जात नाहीत?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारला आहे. 2-3 महिन्यापूर्वी मुंबईतील काळबादेवी येथे आग लागली होती. त्या परिसरात अतिशय चिंचोळे रस्ते असल्यामुळे फायर इंजिन जायला तेथे पुरेशी जागा नाही. एका बाजूने आत जाता येईल, परंतु बाहेर यायला रस्ता नाही. या संदर्भात माझ्या दालनात दोन बैठका होऊन चर्चा देखील झाली आहे. त्यावेळी हाच विचार केला की, आपले बंब मोठे आहेत आणि तेथे चिंचोळे रस्ते असल्यामुळे फायर इंजिन जायला पुरेशी जागा नसते, म्हणून यावर्षी असा निर्णय घेतला की, झोपडपट्ट्यांसाठी छोट्या कॅपॅसिटीचे बंब घेतले पाहिजेत. जी फॅक्ट आहे ती आपण बदलू शकत नाही. अशा प्रकारच्या वस्त्यांमध्ये छोटे रस्ते असतात, त्या रस्त्यांवर दोन्ही बाजूला अतिक्रमणे झालेली आहेत. यासाठी टेलरमेड उपाययोजना निर्माण केली पाहिजे. 3 हजार लीटर क्षमतेचे 17 बंब विकत घेण्याचा प्रस्ताव महापालिकेने तयार केला आहे. इतकेच नव्हे तर बॅक टू बॅक रिव्हर्स घेण्यासाठी त्रास होऊ नये. रिसेन्ट टेक्नॉलॉजीप्रमाणे मिक्स फॉर्ममध्ये स्प्रे करावयाचे म्हटले तरी इंटरनॅशनली, ग्लोबली ज्या काही टेक्नॉलॉजी उपलब्ध असतील तिचा सुध्दा विचार करु शकतो. आपल्याला चेसीस मिळेल, परंतु त्यावर बंब लावणे अशी परिस्थिती जगामध्ये नाही. आपल्याला स्पेसिफिक सोल्यूशन म्हणून त्याला टेलरमेड सोल्यूशन द्यावे लागेल. म्हणून 17 बंब घेत आहोत.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, शासनाकडून स्लम घोषित केली जाते. डिक्लेअर स्लम्स किती आहेत हे शासनाला माहिती आहे. अशा प्रत्येक स्लमचे फायर ऑडिट करून त्या वस्तीमध्ये जायला यायला जागा नसेल, ब्लॉकेजेस असतील, अरुंद रस्ते असतील तर नगरविकास विभाग वेळेत त्याची दखल घेऊन मार्ग काढू शकतो. माझी विनंती आहे, आपण प्रत्येक घोषित स्लमचे फायर ऑडिट करावे. प्रत्येक स्लमची रिक्वायरमेंट वेगळी आहे, स्पेसिफिकेशन वेगळे आहे. जर हे फायर ऑडिट केले तर मालमत्तेची व जीविताची हानी होणे रोखता येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : दोन महिन्यापूर्वी मुंबईमध्ये जी आग लागली होती तेव्हापासून हे निर्देश दिले आहेत की, ज्या काही नोटिफाईड स्लम्स आहेत, जेथे लोक राहतात त्यांना आपण नागरी सुविधा देतो तेथे आपली जबाबदारी आहे. अशा वस्त्या अधिकृत असो अथवा अनधिकृत असो, त्याचे सर्व्हे करुन, फक्त फायर ऑडिट न करता तेथे पिरियॉडीकली फायर ऑडिट झाले पाहिजे, यासाठी सुध्दा निर्देश देण्यात आले आहेत.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, या ठिकाणच्या झोपड्यांचे पुनर्वसन एसआरए अंतर्गत होणार आहे. एक हजार कुटुंबे विस्थापित झाली आहेत. पुनर्वसन करण्यासाठी शासनाचे प्रचलित नियम आहेत. मी विधानसभेचा सदस्य असताना वांद्रे पूर्व येथील झोपडपट्टीला आग लागली होती तेव्हा महाराष्ट्र शासनाने 500 झोपड्यांसाठी 8 कोटी रुपये निधी दिला होता. मानवतेच्या दृष्टीने हे शासनाचे कर्तव्य आहे. कांदिवली येथील आगीमध्ये ज्या कुटुंबांची घरे बेचिराख झाली त्यांना तात्पुरता निवारा देण्यासाठी वांद्रे येथील प्रकरणात ज्याप्रमाणे 8 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला, त्याच धर्तीवर कांदिवली येथील आग लागलेल्या झोपडयांचे पुनर्वसन करण्यासाठी निधी दिला जाईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देत असताना मी एसआरए संदर्भात बोललेलो नाही. परंतु विशेष बाब म्हणून मदत व पुनर्वसनासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सरकारमध्ये सामील असलेल्या एका पक्षाने ॲम्ब्युलन्स ट्रफिकमधून जाऊ शकत नाही म्हणून मोटार सायकलचा पर्याय सुचविला आहे, असे आम्ही वृत्तपत्रात वाचले होते. त्या पक्षाने सुचविल्याप्रमाणे आग लागल्यास फायर इंजिनऐवजी मोटार सायकलचा वापर करुन मदत केली गेली तर जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण होऊ शकेल. त्या पक्षाकडून योजना घेणार का?

डॉ.रणजित पाटील : याबाबत माहिती घेतली जाईल. आग लागल्यास मोटार सायकलवरुन पाणी घेऊन जाऊन तेथे काही मदत करता येईल असे काही माझ्या माहितीत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी फायर ऑडिटचा मुद्दा मांडला आहे. झोपडपट्टी उभी राहते, त्या ठिकाणी एखादे प्रेत बाहेर आणायचे असले तरी ते वाकडे करुन आणावे लागते. दामूनगर येथील झोपटपट्टीला आग लागली तेव्हा फायर इंजिन घटनास्थळी पोहोचण्यासाठी तेथील नालंदा बुध्द विहार तोडावे लागले. त्यानंतरच फायर इंजिन तेथे पोहाचले. परंतु तोपर्यंत आगीने रौद्र रुप धारण केले होते. मुंबईमध्ये झोपडपट्टया आणि टोलेगंज इमारती उभ्या राहतात. त्याकरिता अत्याधुनिक फायर यंत्रणेची आवश्यकता आहे. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून पाण्याची फवारणी केली तरी आग आटोक्यात आणता येईल. फायर इंजिनची शिडी 20 ते 22 मजल्यापर्यंत पोहोचू शकते. परंतु मुंबई शहरामध्ये 55 मजल्यापेक्षा अधिक उंचीच्या इमारती उभ्या रहात आहेत. 55 व्या मजल्यावर आग लागली तर कसे होणार? त्या दृष्टीने अत्याधुनिक फायर यंत्रणा उभी केली पाहिजे. झोपडपट्टयांचे मानवतेच्या दृष्टीकोनातून पुनर्वसन करणे आवश्यक आहे असे मला वाटते. दामूनगर येथील आगीमध्ये ज्यांची घरे बेचिराख झाली त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा, रोजगाराचा प्रश्न असल्यामुळे त्यांचे तातडीने पुनर्वसन झाले पाहिजे. तातडीने गृहनिर्माण धोरण तयार करण्यात येऊन मुंबईतील सर्व झोपडपट्टयांचे तातडीने पुनर्वसन करावे. अन्यथा आग लागते तेव्हाच फक्त चर्चा केली जाते. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मोटार सायकलचा उल्लेख केला. मुंबईतील अनेक झोपडपट्टयांमध्ये मोटार सायकल जायला सुध्दा रस्ता नाही ही वस्तुस्थिती आहे. अगदी चिंचोळे रस्ते असतात. त्यामुळे या वस्तीचे तातडीने पुनर्वसन करावे. मुंबईमध्ये नवीन झोपड्या उभारु न देता अस्तित्वात असलेल्या झोपड्यांचे गृहनिर्माण धोरण जाहीर करुन पुनर्वसन करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा कन्सर्न हायराईज इमारतीबाबत सुध्दा दिसून आला आहे. अस्तित्वात असलेल्या एनबीसीप्रमाणे विशिष्ट हाईटच्या इमारतींमध्ये नॉर्म्सप्रमाणे रिफ्युज फ्लोअर ठेवला जातो. विशिष्ट हाईटला गेल्यास नॉम्सप्रमाणे रिफ्युज एरिया आणि फ्लोअर सुध्दा ठेवतो. त्या इमारतीमध्ये त्यासोबत मी म्हटल्याप्रमाणे ऑडिट आणि विशेष बाब म्हणून मदत आणि पुनर्वसन या दोन गोष्टींचा निश्चितपणे विचार केला जाईल. हे सत्य आहे की, अशा प्रकारच्या झोपडपट्टीमध्ये मोटार सायकल जायला किंवा प्रेत बाहेर काढायचे असले तरी

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

कसरत करावी लागते. माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर आणि श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे या गोष्टीचा जोपर्यंत सर्व्हे आपण करीत नाही, फायर ऑडिट करीत नाही तोपर्यंत हे होत नाही. त्याप्रकारचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांना पूर्ण माहिती नाही. अपूर्ण माहिती घेऊन त्यांनी सभागृहाची दिशाभूल केली आहे. 1972 सालच्या दुष्काळात मराठवाड्यातील परभणी, जालना व बीड जिल्हयातील लोक दामूनगरचे रहिवासी आहेत. 2000 मध्ये वन विभागाने तेथील पक्की घरे तोडली. त्यामुळे 2000 ते 2015 पर्यंत प्लास्टिक व बांबूच्या आधारे घरे बांधून लोक तेथे रहात होते. ती जागा संजय गांधी नॅशनल पार्कची नाही. 7/12 उताऱ्यानुसार महापालिकेच्या डंपिंग ग्राऊंडसाठी 26 एकर जमीन ठेवली आहे. आम्ही 15 वर्षे त्या परिसरात काम करीत आहोत.

2एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

या जमिनीची मोजणी करावी असा सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे. सुदैवाने अजून पर्यंत जमिनीची मोजणी आणि सर्व्हे झालेला नाही. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सन 2000 मध्ये पक्की घरे तोडून लोकांचे सामान जाळून टाकले होते. ही 26 एकर जमीन मुंबई महानगरपलिकेची आहे. 7 डिसेंबर रोजी जी आग लागली होती ती फार भयंकर होती. त्यात सगळ्या झोपड्या जवळून खाक झाल्या आहेत. सकाळी आग लागली होती म्हणून सर्व लोक वाचले आहेत. रात्रीच्या वेळी आग लागली असती तर एकही माणूस जीवंत राहिला नसता. आम्ही हायकोर्टात जाऊन 33 हजार लोकांकडून सात-सात हजार रूपये भरले आहेत. त्यापैकी साडे-बारा हजार लोकांचे पुनर्वसन झालेले आहे. उर्वरित लोकांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया गेली 15 वर्षे सुरू आहे. सदर जमीन ही वन विभागाची नसल्यामुळे या लोकांचे पुनर्वसन येथेच झाले पाहिजे. पुनर्वसनाच्या प्रक्रियेला 15 वर्षे लागत आहेत आणि वेळ लागणार असेल तर तेथे ट्रान्झिट कॅम्प बांधणे आवश्यक आहे. आज त्या लोकांची अवस्था अत्यंत वाईट असून त्यांना जेवायला देखील मिळत नाही. दामू नगरच्या बाजूला असलेल्या लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील लोकांनी, एनजीओंनी या लोकांच्या जेवणाची व्यवस्था केली व त्यांना आठ दिवस कसे बसे जगवले आहे. आपले माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.मेहता साहेब तेथे येऊन गेले. त्यांनी सांगितले की, आम्ही तेथे उद्यापासून व्यवस्था करू. परंतु, पुढे कोणतीही व्यवस्था झालेली नाही. त्या लोकांना फक्त रूपये 3800/- चे चेक दिलेले आहेत. त्या लोकांचा भांडी-कुंडीसहीत सर्व संसार जळलेला आहे. त्यामुळे त्यांना किमान पन्नास हजार रूपयांची मदत त्यांचे घर उभे करण्यासाठी द्यावी, त्यांच्यासाठी ट्रान्झिट कॅम्प बांधावेत. तसेच त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया हे शासन लवकरात लवकर सुरू करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही जमीन कोणाच्या मालकीची आहे यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. पण रेकॉर्डवर अशी माहिती आहे की, ही जमीन वन खात्याची आहे. एकीकडे आपणच म्हणत आहात की, सन 2000 मध्ये वन खात्याने तेथील पक्की घरे तोडली होती. तेथील घरे वन खात्याने कशी काय तोडली आहे ? कारण कुठेना कुठे ही जमीन वन खात्याची आहे हे सिद्ध झाल्यामुळे तेथील घरे त्यांनी तोडली असणार. तसे नसते तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित कांबळे...

लोक कोर्टात गेले असते. ही जमीन कोणाची आहे या पेक्षा उघड्यावर पडलेल्या कुटुंबांना मदत देण्याचा आज खरा प्रश्न आहे. माझी अशी माहिती आहे की, आज तेथे टॉयलेट वगैरे बेसिक मूलभूत सुविधा आपण इन्स्टॉल केल्या आहेत. एक विशेष बाब म्हणून त्यांना अधिकची मदत देता येईल काय याचा सहानुभूतीपूर्वक विचार शासन करेल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, जेव्हा आग लागते तेव्हा सर्वजण जीव वाचविण्यासाठी पळून जातात. मी विक्रोळी येथील उदाहरण दिलेले आहे. दिनांक 17 ऑक्टोबर 2015 रोजी विक्रोळी पार्क साईट येथे आग लागली होती तेव्हा श्री.संतोष महादेव शिंदे हा तरूण स्वतःच्या जीवाची पर्वा न करता लोकांना मदत करत असताना स्वतःचा जीव गमावून बसला. आज त्याच्या कुटुंबाची परिस्थिती फार हलाखीची आहे. त्यामुळे त्याच्या कुटुंबाला शासन एक विशेष बाब म्हणून मदत करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची पूर्ण माहिती घेतली जाईल. त्यात सत्यता वाटली तर शासन त्यावर निश्चितपणे सकारात्मक कार्यवाही करेल.

......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सोलापूर जिल्ह्यात मातीपासून कुंभारी वीट व्यवसायावर घालण्यात आलेल्या जाचक अटी

**मु.शी.** : सोलापूर जिल्ह्यात मातीपासून कुंभारी वीट व्यवसायावर घालण्यात आलेल्या जाचक अटी यासंबंधी ॲड. रामहरी रुपनवर, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील मातीपासून कुंभारी विट बनविणारे सर्व विट उत्पादक हे गेल्या अनेक वर्षापासून कुठलेही केमिकल न वापरता पारंपारिक विट निर्मिती व्यवसाय करीत असणे, त्यासाठी रितसर महसूल विभागाकडे मातीची रॉयल्टी व विट उत्पादन करण्यासाठी जमिनीचा शेतसारा भरून व्यवसाय करीत असणे, या व्यवसायावर त्यांच्या कुटुबांचा उदरनिर्वाह असणे, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून इतर जिल्ह्यात नसलेल्या अनेक जाचक अटी घालून त्यांचा व्यवसाय बंद करण्यात आला असल्याचे माहे नोव्हेंबर, 2015 दरम्यान निदर्शनास येणे, त्यांना प्रदूषण मंडळाचा दाखला, चिमणी बसवा व ठराविक विटच तयार करा अशा जाचक अटी घालून त्यांचा व्यवसाय बंद केलेला असणे, त्यामुळे जिल्ह्यातील सुमारे एक लाख विट उत्पादक मजूर यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, परिणामी येथील विट उत्पादक व मजूर यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, याबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेऊन इतर जिल्ह्यांप्रमाणे व पूर्वीप्रमाणे मातीची रॉयल्टी घेऊन विट व्यवसाय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत तातडीची करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय, अकराव्या शतकापासून मातीच्या विटा कुंभार करीत आहेत. त्यांना महाराष्ट्रात वीट भट्टी सुरू करण्यासाठी महसूल विभाग परवानगी देते. महसूल विभाग त्यांच्याकडून मातीची रॉयल्टी घेते. हा नियम सर्वच जिल्ह्यांमध्ये आहे. मात्र, यामध्ये सोलापूर जिल्हा अपवाद आहे. सोलापूर जिल्हाधिकाऱ्याने एक फतवा काढला आहे की, वीट भट्टीला चिमणी बसविली पाहिजे. त्या चिमणीची किंमत दहा लाख रूपये आहे. वीट बनविणारे कुंभार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही अनेक निवेदने दिली, शासनाकडे निवेदने दिली. पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. आता शासनाकडून लेखी उत्तर आले आहे त्यात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक बाबींची तसेच केंद्रीय पर्यावरण विभागाने वीटभट्टयांच्या प्रदूषणाबाबत निश्चित केलेल्या मानकानुसार आवश्यक बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. कालच आम्हाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने पत्र दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात पारंपरिक पद्धतीने वीटभट्टयांचे स्थान, उद्योग उभारणी, प्रारूप 2015 ची अंतिम सूचना अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याने आपणास वीट भट्टी व्यवसाय करण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र, संमती पत्र देण्या विषयी सद्य:स्थितीत कोणतीही कारवाई करू शकत नाही. वीट भट्टीसंबंधी आमचे काहीच नियम नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. आम्ही निर्बंध घातले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. माझ्याकडे शासनाची देखील दोन पत्र आहेत. ती मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना देतो. दिनांक 12.12.2013 रोजी महसूल व वन खात्याच्या उप सचिवांनी एक पत्र दिले आहे. त्यात असे म्हटले आहे की, प्राधिकाऱ्यास तात्पुरते गौण खनिज उत्खनन परवानगी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे तात्पुरते गौण खनिज उत्खनन परवाना घेण्याबाबत पर्यावरण खात्याची अनुमती घेण्याची आवश्यकता नाही, तर पर्यावरण खाते म्हणते की वीट भट्टीसंबंधी आमचे कोणतेही धोरण नाही. त्यामुळे आम्ही संमती देऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही आपणास मानांकन देऊ शकत नाही. पण जिल्हाधिकारी म्हणत आहेत की, पर्यावरण विभागाकडून परवानगी आणावी. त्यामुळे त्यांनी वीट भट्टीचे धंदे बंद ठेवलेले आहेत. वीट ही मातीपासून तयार होते. सोलापूर

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर...

जिल्ह्यात 1 लाख वीट भट्टी कामगार आहेत. सातारा, पुणे येथे वीट भट्टया बंद नाहीत, मात्र सोलापूर येथील वीट भट्टया बंद आहेत. तेव्हा सर्व जिल्ह्यांमध्ये सारखा नियम असला पाहिजे. सातारा, पुणे येथे वीट भट्टया सुरू असतील तर त्या सोलापूरमध्ये सुरू कराव्यात. आज सोलापूर मधील कामगारांची उपासमार सुरू आहे. सगळ्या जिल्हयातून आमच्या जिल्ह्यात विटा येतात आणि आमच्या जिल्ह्यात विटा तयार करायच्या नाहीत हे बरोबर नाही. 50 विटा तयार करण्याची परवानगी आहे. एवढ्या विटा कधी तयार करतात काय ? इंडस्ट्रीयलमध्ये जी वीट तयार होते तिला बॉयलर लागतो. तो बॉयलर या विटांना लावावा ही जाचक अट आहे. गझनीच्या मोहम्मदच्या जाचक अटी नव्हत्या तेवढया जाचक अटी आता आहेत. तेव्हा सोलापूर जिल्ह्यात वीट तयार करण्यासाठी वीटभट्टीला परवानगी माननीय महसूल मंत्री देणार आहेत काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यासंबंधी सोलापूर जिल्ह्यातून वारंवार तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला होता. त्या अहवालानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी पर्यावरण आणि प्रदूषण यांच्या संबंधातील निकषाचे पालन होत नाही म्हणून बंदी घातलेली आहे असे राज्य शासनाला कळविले आहे. अन्य जिल्ह्यांमध्ये आहे त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामध्ये करता येईल काय अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. यासंदर्भातील बाब तपासून घेण्यात येईल. ही गोष्ट निश्चित आहे की, अशा स्वरूपाचे नियम अन्य जिल्ह्यांमध्ये लागू केले नसतील तर ते सोलापूर जिल्ह्यासाठी शिथिल करण्यात येतील. येथील किती वीट भट्टया, कोणत्या कारणांसाठी बंद आहेत हे तपासून पाहिले जाईल. निव्वळ पर्यावरण आणि प्रदूषणासाठी या वीट भट्टया बंद असतील तर कोर्टाचे निर्णय काय आहेत, अन्य निकष काय आहेत हे सर्व तपासून सोलापूर जिल्ह्यातील वीट भट्टीसाठी परवानगी देण्यात येईल.

..7

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय, आमच्या येथे न्यायालयीन अडचण काही नाही. प्रदूषण मंडळाने देखील कळविले आहे की, नियमच नाहीत. अकराव्या शतका पासून कुंभार विटा बनवित आहेत. त्यामुळे या विटांमुळे कसल्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. यात कसल्याही प्रकारचे केमिकल नसते, असे प्रदूषण मंडळाचे मत आहे. यासंबंधातील सर्व कागदपत्रे मी आताच दिलेली आहेत. तेव्हा या सर्वांचा विचार करून शासनाने सोलापूर जिल्ह्यामध्ये वीट भट्ट्या सुरू करण्यास परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे. वीट भट्ट्यांचा निम्मा सिझन संपत आला आहे.

GG-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मघाशी मी सांगितल्या प्रमाणे यासंदर्भात नक्कीच सहानुभुतीने विचार करुन शासन सोलापूर जिल्हयातील वीट भट्टया सुरु करण्यासाठी परवानगी देईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामहरी रुपनवर यांनी वीट भट्टयांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मातीपासून विटा तयार करण्याचा व्यवसाय कुंभार समाज करीत असतात. कुंभार समाज हा व्यवसाय वर्षानुवर्षापासून करीत आहे. हा व्यवसाय गृहउद्योगात सुध्दा मोडला जातो. सोलापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ प्रदूषणाच्या नावाखाली वीट भट्टी व्यवसाय बंद करण्यास सांगितले असून जोपर्यंत चिमणी बसवली जात नाही तोपर्यंत तुम्हाला वीट भट्टयांचा धंदा करता येणार नाही असे त्यांनी आदेश दिलेले आहेत. जर हे शासनाचे धोरण असेल तर ते फक्त सोलापूर जिल्हयासाठीच लागू आहे काय, हे धोरण इतर जिल्हयांना का लागू नाही ? प्रदूषण नियंत्रण महामंडळाने तसेच शासनाने वीट भट्टयांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे धोरण जाहीर केलेले नाही. केवळ सोलापूर जिल्हयामध्ये अशा प्रकारचे धोरण लागू करण्याचा अधिकार सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना कोणी दिले आहे ? त्यामुळे यासंदर्भातील उत्तर मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. सोलापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यानी वीट भट्टी बंद करण्याचे जे आदेश दिले आहेत ते आदेश रद्द करुन त्या ठिकाणच्या वीट भट्टया सुरु करण्याचे आदेश आपण किती दिवसात सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना देणार आहात ? सोलापूरचे जिल्हाधिकारी गरीब कुंभार समाजाच्या जीवावर उठलेला आहे. परंतु या सोलापूर जिल्हयामध्ये वेगवेगळया मार्गाने जे प्रदूषण होते ते प्रदूषण थांबविण्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले आहेत याची चौकशी मंत्री महोदयांनी करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा नियम फक्त सोलापूर जिल्हयासाठीच आहे असे काही नाही. संपूर्ण राज्यासाठी प्रदूषण नियंत्रण बोर्डाने काही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. यामध्ये शहराच्या 500 मीटर अंतरापर्यंत वीट भट्टी असता कामा नये असा नियम आहे. वीट भट्टयांच्या धुरामुळे कोणालाही त्रास होता कामा नये याची दक्षता घ्यावयास पाहिजे अशा प्रकारचे काही निकष आहेत. या निकषाचे कठोरपणे पालन करावयाचे की, नाही याचा निर्णय स्थानिक प्राधिकारी ठरवितात. पूर्वीच्या कालखंडामध्ये वीट भट्टया छोटया प्रमाणामध्ये असल्यामुळे फारसे प्रदूषण होत नव्हते. अलीकडच्या कालखंडात वीट भट्टीच्या धंद्यात निव्वळ कुंभार समाजच नाही तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

वीट भट्टयांनी आता व्यावसायीक स्वरुप धारण केलेले आहे. वीट भट्टयांमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण वाढत असून त्याचा जनतेला त्रास होतो आहे अशा प्रकारच्या तक्रारी वीट भट्टीच्या शेजारच्या नागरिकांकडून यावयास लागल्या आहेत. शक्यतो अशा प्रकारचे प्रदूषण टाळण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत असे राज्य सरकारच्या माध्यमातून वारंवार कळविण्यात आले आहे. हा निर्णय सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला असे नाही. परंतु सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कठोर स्वरुपाचे धोरण अवलंबविल्यामुळे त्या ठिकाणच्या वीट भट्टया बंद आहेत. या विषयाच्या संदर्भात आताच माझ्याकडे माहिती आलेली आहे त्यानुसार सोलापूरमध्ये काही वीट भट्टी मालकांनी चिमण्या बसविण्यास सुरुवात केली आहे. परंतु वीट भट्टीचा व्यवसाय करणाऱ्यांना थोडी संधी दिली पाहिजे म्हणून यावर्षी आपण जिल्हाधिकाऱ्यांना सांगणार आहोत की, पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी जी उपाययोजना करावयाची आहे त्याला टप्प्या टप्प्याने परवानगी द्यावी. हे सर्व एकाच दिवशी होईल असे शक्य नाही. तोपर्यंत या समाजाला वीट भट्टी सुरु करण्याच्या विशेष सूचना देण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सोलापूर येथील परंपरागत वीट भट्टीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी अतिशय चांगला निर्णय घेतला आहे. परंतु विविध प्रकारचे धंदे करणारे जे मोठे उद्योजक आहेत त्यांच्यावर देखील अशा प्रकारचा नियम लागू केला जाणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वीट भट्टीचा पारंपारिक व्यवसाय कुंभार समाज करीत असतो. परंतु दुसऱ्या बाजूला पर्यावरण व प्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. प्रदूषण होणार नाही याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे यासाठी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी पाऊल उचलले आहे. परंतु दुसऱ्या जिल्हयामध्ये वीट भट्टयांचा छोटा व्यवसाय करणाऱ्यांना काही कालावधी देण्यात आलेला आहे. काही कालावधीमध्ये टप्प्या टप्प्याने का होईना वीट भट्टयांचा धंदा करणाऱ्यांना चिमणी बसवावीच लागणार आहे. त्यामुळे तशी संधी त्यांना देण्यात येईल आता बंद पडलेला वीट भट्टीचा व्यवसाय तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यास परवानगी द्यावी असे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवनासाठी नागपूर येथील पटवर्धन मैदानाची जागा स्थलांतरित करणे.

**मु.शी.** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवनासाठी नागपूर येथील पटवर्धन मैदानाची जागा स्थलांतरित करणे यासंबंधी श्री. प्रकाश गजभिये, प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवनासाठी नागपूर येथील पटवर्धन मैदानाची जागा नागपूर महानगरपालिकेला शासनाकडून विनाविलंब हस्तांतरीत करण्यात यावी आणि प्रलंबित असलेल्या शताब्दी भवनाच्या निर्मितीस सुरुवात करावी अशी शासनाकडे 15 वर्षापासून मागणी करण्यात येत असून याबाबत शासनाने अद्याप त्यास मंजुरी न दिल्याने नोव्हेंबर, 2015 मध्ये मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही कार्यवाही न झाल्याने हिवाळी अधिवेशनात आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, यासंदर्भांत नागपूर महापालिकेने सभागृहात ठराव करुन त्यास दिलेली मान्यता, शासनाने पटवर्धन मैदानाची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी म्हणून नागपूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासकीय पत्राव्दारे शासनाकडे प्रस्ताव पाठवून व वारंवार स्मरणपत्रे पाठवून मंजुरी देण्याची केलेली मागणी, तसेच वारंवार मुख्यमंत्री यांचेकडे देखील केलेली मागणी, याकडे शासनाने हेतू:पूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक आंबेडकर जनतेत पसरलेला असंतोष व शासनाविरुध्द निर्माण झालेली संतापाची भावना, सदरचा भूखंड नागपूर महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच नागपूर येथे शाम हॉटेलला सुध्दा राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देऊन विकास करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जनशताब्दी भवनासाठी नागपूर येथील पटवर्धन मैदानाची जागा नागपूर महानगरपालिकेला शासनाकडून विनाविलंब हस्तांतरीत करावी व महानगरपालिकेने बांधकामास त्वरित सुरुवात करावी, यासाठी शासनाकडून त्वरित नाहरकत प्रमाणपत्र मिळावे याकरिता ही लक्षवेधी सूचना मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, गेल्या 23 वर्षापासून हा प्रश्न रेंगाळलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये नागपूर नगरीत त्यांचे जन्म शताब्दी भवन बांधावे अशी येथील आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचीच नाही तर शहरातील कार्यकर्त्यांची इच्छा होती. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, ज्यावेळेस आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवनाची मागणी केली होती त्यावेळेस आजचे मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेब हे त्यावेळेस नगरसेवक होते. विद्यमान आमदार माननीय श्री. सोले साहेब हे सुध्दा त्यावेळेस नगरसेवक होते. त्यावेळेपासून आजपर्यंत या मागणीला न्याय मिळालेला नाही. मी नगरसेवक होतो तेव्हापासून आम्ही ही मागणी सातत्याने रेटत आहोत. परंतु हे काम करण्यामध्ये शासनाचे आम्हाला सकारात्मक धोरण दिसलेले नाही. या विषयाच्या संदर्भात आम्ही माजी माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांना भेटलो होतो, तेव्हा त्यांनी 8 दिवसात नाहरकत प्रमाणपत्र देतो असे सांगितले होते, माजी कै.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख साहेबांनाही भेटलो होतो तेव्हा या विषयाच्या संदर्भात महानगरपालिकेत बैठक आयोजित करण्यात आली. कमिटीच्या अध्यक्षांचीही नेमणूक करण्यात आली. परंतु पुढे काहीही झाले नाही. 23 वर्षापासून आमच्या प्रश्नाला न्याय मिळालेला नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी का विलंब होतो हे आम्हाला काही समजत नाही. इंदू मिलचा प्रश्न आजपर्यंत सुटला नाही. आता आपल्या पक्षाचे मुख्यमंत्री आहेत, आपलेच आमदार आहेत. या प्रश्नावर प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांना बोलावे लागते ही खरी शोकांतिका आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात निवेदनात गोल गोल उत्तर देण्यात आलेले आहे. या उत्तरामध्ये सकारात्मक काहीच दिसत नाही तर सर्व नकारात्मक उत्तर आहे. दि.6 मे, 2015 मध्ये आमच्या महानगरपालिका आयुक्तांनी पत्र लिहिले असून त्या पत्राची कॉपी सुध्दा माझ्याकडे आहे. या 23 वर्षामध्ये बाबासाहेबांच्या स्मारकासाठी 100 च्या वर स्मरणपत्र लिहून झाले आहे. खरे म्हणजे हा बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा अपमान आहे. आज साहेबांनी या विषयाच्या संदर्भात निर्णय घेतल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. HH-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

नागपूरमधील नझूलच्या जमिनी मालकीच्या करण्याचे धाडस दाखविले त्याबद्दल मी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांचे अभिनंदन करतो. नागपूर येथील पटवर्धन मै्दान 15 वर्षासाठी लीजवर दिलेले आहे. त्यानंतर लीज वाढवावयाची होती. परंतु आता मला असे वाटते की, लीज वाढविण्याची गरज नाही कारण आज निर्ण्य झाला तर ती जमीन महानगरपालिकेला हस्तांतरित करता येईल.

सभापती महोदय, निवेदनात उच्च न्यायालयाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. शासनाने ती जमीन ताब्यात घ्यावी असा निर्णय माननीय उच्च न्यायालयाने दिलेला आहे. ती जमीन शासनाच्या ताब्यात आली तर ती जमीन आपणास मिळण्यास काही अडचण् नाही. माझा प्रश्न आहे की, शासन ही जमीन नागपूर महानगरपालिकेला किती दिवसांत हस्तांतरीत करणार आहे, तसेच या महिन्यात ना हरकत प्रमाणपत्र देणार आहे काय आणि या प्रश्नासंदर्भात आज निर्णय घेणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, महानगरपालिका क्षेत्रातील ही जमीन सन 1962 मध्ये नागपूर महानगरपालिकेला 15 वर्षाच्या लीजवर देण्यात आली होती. 1977 मध्ये ही लीज संपली. परंतु नागपूर महानगरपालिकेने ही लीज वाढविण्यासाठी शासनाकडे अर्ज केला नाही. त्यानंतर नागपूर महानगरपालिकेने 1992 मध्ये यशवंत स्टेडियम समोरील पटवर्धन मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी निमित्त भव्य सांस्कृतिक भवन, शोध भवन स्थापन करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील ठराव पारित केला. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दिनांक 31.7.2002 रोजीच्या पत्रान्वये नागपूर शहराच्या त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतीभवन-ऑडीटोरियमचे बांधकाम या जागेवर करण्याची परवानगी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना विनंती केली. या पत्राच्या अनुषंगाने सहाय्यक संचालक नगररचना, नागपूर व नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या अभिप्रायानुसार जिल्हाधिकारी यांनी दिनांक 12.8.2002 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस देण्यात आलेल्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणासक प्रस्तावित बांधकामाची परवानगी मिळण्याबाबत प्रस्ताव शासनास

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक 7.8.2006 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावामधील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळविले. सन 2002 मध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा प्रस्ताव शासनाकडे आला आणि शासनाने त्यांना चार वर्षानंतर म्हणजे 2006 मध्ये त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविले. दरम्यान या जागेचा वापर महानगरपालिकेतर्फे इतर प्रयोजनासाठी होत असल्यान्र माननीय उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्रमरंक 8/2010 दाखल करण्यात आली होती. माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 9.12.2010 रोजी अंतरिम आदेश पारित करुन शर्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले होते. महानगरपालिकेतर्फे शहरातीत नागरी सुविधा रस्ते, सिव्हरेज, अतिक्रमण, फूटपाथ वगैरे या संदर्भात वेळोवेळी उच्च न्यायालयाकडून निर्देश देण्यात आले. या निर्देशाच्या पूर्ततेसाठी सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. माननीय उच्च न्यायालाच्या अंतरिम आदेशानुसार ही जागा सरकार जमा का करण्यात येऊ नये याबाबत दिनांक 31 मार्च 2011 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने दिनांक 7.7.2011 रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला आहे.

सभापती महोदय, उच्च न्यायालयातील जनहित याचिका तसेच उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार विविध राजकीय / सामाजिक संस्थेकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन / शोध केंद्राच्या बांधकामाबाबत वेळोवेळी प्राप्त झालेली निवेदने, महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला खुलासा विचारात घेऊन जिल्हाधिकारी नागपूर यांनी सदर भाडेपट्टयाच्या नुतनीकरणाबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. भाडेपट्टयाचे नुतनीकरण या संदर्भात प्रत्येकवेळी चार वर्षे का लागली ? या संदर्भात शासनास पुन्हा अहवाल प्राप्त झाला. उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे आम्हाला भाडेपट्टा करता येत नाही असे नगर विकास विभागाने महसूल विभागाल कळविलेले आहे. या संदर्भात माननीय मुख्यंत्री महोदंयाकडे दिनांक 20.2.2015 रोजी बैठक झाली. त्यावेळी त्यांनी याचिका क्रमांक 8/2010 मधील निर्देश विचारात घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. त्यानुसार दिनांक 2 मार्च 2015 च्या पत्रान्वये त्यांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

कळविण्यात आले. आता या संदर्भात नागपूर, महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाल्यानुसार नियमानुसार उचित निर्णय घेण्यासंदर्भातील कार्यवाही संकल्पित आहे. या संदर्भात काही अडचणी आहेत. एक तर हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ही जमीन महानगरपालिकेला हस्तांतरित करावी किंवा सरकारने स्वत: तेथे भवन बांधावे, अशी सरकारची भूमिका आहे. या प्रकरणा संदर्भात न्यायालयीन बाबींचे पालन करुन आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल. तसेच या संदर्भातील सर्व त्रुटी दूर करुन हे काम करण्याच्या सूचना राज्य सरकार देईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी येथे जी भूमिका मांडली तीच मुळात आक्षेपार्ह आहे. सन 1991 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकराची जन्म शताब्दी देशभर साजरी करण्यात आली. कोणीही मागणी न करता नागपूर महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र पटवर्धन मैदानावर उभारावे अशाप्रकारचा ठराव केला आणि या कामासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद देखील केली. त्यानंतर ही जागा ताब्यात मिळण्यासाठी अनेक आंदोलने करण्यात आली, मोर्चे काढण्यात आले. आम्ही या जागेबाबत जिल्हाधिकारी, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडे विचारणा केली. तसेच महसूल व नगर विकास विभागाकडे विचारणा केली असता ही जागा नागपूर महानगरपालिकेला क्रीडा मैदानासाठी दिलेली आहे आणि त्याची लीज संपलेली आहे असे त्यांनी सांगितले. लीज संपल्यावर त्या जमिनीची मालकी सरकारकडे आली. हे मैदान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्यात यावे अशाप्रकारची वारंवार विनंती आम्ही केली. माननीय मंत्र्यांनी येथे हे प्रकरण न्यायालयात आहे असे सांगितले ते मी पहिल्यांदा ऐकत आहे. आजपर्यंत नागपूर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी वारंवार जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिली. जिल्हाधिकाऱ्यांनी वारंवार नगर विकास विभागाला आणि महसूल विभागाला पत्र लिहिली त्या संदर्भातील कागदपत्रे माझ्याकडे आहेत.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये दोन महत्वाचे मुद्दे आहेत. पहिला मुद्दा नागपूरच्या पटवर्धन मैदानावर डॉ.बाबासाहेबांचे शताब्दी स्मारक आणि संशोधन केंद्र व्हावे आणि दुसरा मुद्दा म्हणजे दिनांक 14 ऑक्टोबर, 1956 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी न भूतो न भविष्यती अशाप्रकारची धम्मक्रांती केली. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागपूर मधील श्याम हॉटेलमध्ये माईंसोबत चार दिवस राहिले होते. ते श्याम हॉटेलला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा द्यावा.

.........2I-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

माझी विनंती एवढीच आहे की, या विषयाच्या संदर्भात प्रत्यक्षात कार्यवाही करणे गरजेचे आहे. 1991 पासून हा विषय प्रलंबित आहे. त्या ठिकाणी शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्यासाठी आम्ही वारंवार पाठपुरावा करीत आहोत. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार या ठिकाणी उपस्थित आहेत. महोदय, हा राज्यातील जनतेच्या भावनांचा प्रश्न आहे. या सरकारने मुंबई येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे भूमीपूजन केले आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थीदशेत वास्तव्य करीत असलेले इंग्लंडचे घर खरेदी केले आहे. परंतु या सरकारला नागपूर येथील पटवर्धन मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्यासाठी 25 वर्षे लागतात, हे योग्य नाही.

सभापती महोदय, एका भव्य कार्यक्रमात माननीय श्री.नितीनजी गडकरी यांनी सांगितले होते की, पटवर्धन मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्यात येईल. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले हे नागपूरचे महापौर असताना त्यांनीही आश्वासन दिले होते. त्या कार्यक्रमाच्या वेळी स्टेजवर तत्कालीन आमदार आणि आताचे माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. सभापती महोदय, मागच्या सरकारने काय केले आणि काय नाही, हा विषय नाही. परंतु आता तुमच्या पक्षाचे सरकार आले आहे. राज्यातील जनतेने या शताब्दी भवन व संशोधन केंद्रासाठी तब्बल 25 वर्षे वाट बघितली आहे. राज्य सरकारने आता या जनतेचा अधिक अंत पाहता कामा नये. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार ती जमीन तातडीने ताब्यात घेऊन त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारेल काय ?

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे धम्मक्रांतीच्या वेळी नागपूर येथील शाम हॉटेलमध्ये चार दिवस मुक्कामी होते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार शाम हॉटेल धम्मक्रांती स्मृती केंद्र म्हणून जतन करणार काय आणि ही दोन्ही कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या विषयी राज्य सरकारची भूमिका सकारात्मक आहे. राज्य सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्त अनेक कामे व



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. मागच्या सरकारने त्यांच्या कालखंडात या गोष्टींचा विचार केला असेल किंवा नसेल, या वादात मी जात नाही. 1992 पासून आजपर्यंत ती जागा सरकारला मिळाली नाही, ही वस्तुस्थिती मात्र नाकारता येत नाही. परंतु त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र राज्य सरकारच्या माध्यमातून उभे करण्यास आम्ही तयार आहोत.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मी सन्माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छितो की, या प्रकरणातील न्यायालयीन अडचण दूर करुन....जर या प्रकरणात 100 टक्के न्यायालयीन अडचण नसेल तर राज्य सरकार या बाबतीत असलेल्या प्रशासकीय अडचणी दूर करुन त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्यासाठी निश्चितपणे पुढाकार घेईल. सभापती महोदय, या विषयी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली आहे. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर आणि मी उपस्थित होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी नगर विकास विभागाला सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही स्थितीत यातील अडचण दूर करुन, ही जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शताब्दी भवन आणि संशोधन केंद्रासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. या गोष्टी 25 वर्षात का झाल्या नाहीत, याच्या खोलात मी जात नाही. त्यामुळे मी पुनश्च सांगतो की, न्यायालयीन अडचण वगळता, या जागेच्या बाबतीत अन्य अडचणी असतील तर त्या दूर करुन ही जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शताब्दी भवन आणि संशोधन केंद्रासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

सभापती महोदय, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे माई साहेबांसमवेत नागपूर येथील शाम हॉटेलमध्ये धम्मक्रांतीच्या वेळी चार दिवस मुक्कामास होते. त्या ठिकाणी त्यांनी धम्मगुरु चंद्रमणी यांच्या हस्ते बुध्द धम्माचा स्वीकार केला. त्यामुळे ते हॉटेल स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांकडे प्रस्ताव आलेला आहे. मुळात राष्ट्रीय संरक्षित स्मारक घोषित करण्याचा अधिकार राज्य सरकारला नसून तो अधिकार केंद्र सरकारला आहे. त्यामुळे या संदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा लागतो. त्यानुसार माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सदरहू प्रस्ताव दि.20 जून, 2015 रोजीच्या टिप्पणीन्वये केंद्र सरकारकडे पाठविला आहे. या संदर्भात चर्चा झाली आहे. त्यामुळे शाम हॉटेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यासंदर्भात केंद्र सरकारसोबत पाठपुरावा करीत आहोत.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी स्पष्टपणे शासनाची भूमिका विशद केली आहे. पटवर्धन मैदानाच्या ठिकाणी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभे करण्याचा संकल्प शासनाने केल्याबद्दल मी माननीय मंत्री आणि सरकारचे अभिनंदन करतो. हा प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात पीआयएल बाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. मी सांगू इच्छितो की, नागपूरमध्ये यशवंत स्टेडीयम ही वास्तू आहे. त्या स्टेडीयममध्ये पूर्वी खेळांव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणावर इतर कार्यक्रम आणि मनोरंजनाचे कार्यक्रम होत होते. त्यामुळे पटवर्धन मैदानात शताब्दी भवन व संशोधन केंद्र उभारण्याबाबत हरकत घेण्यात आली. परंतु आता त्या स्टेडीयममध्ये मनोरंजनाचे कार्यक्रम न होता, ते स्टेडीयम केवळ खेळांसाठी वापरण्यास देण्यात येते. या प्रकरणी पीआयएल दाखल करण्यात आली होती. माझी विनंती आहे की, त्या पीआयएलचा अभ्यास राज्य सरकारने केला पाहिजे. पटवर्धन मैदानावर शताब्दी भवन व संशोधन केंद्र उभारण्याबाबतचा संकल्प नागपूर महापालिकेने केला होता. मी महापौर असताना 2013 मध्ये या संदर्भात समिती गठीत केली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांची भेट घेतली होती. त्यांनी या ठिकाणी शताब्दी भवन व सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा मानस जाहीर केला होता. परंतु ती जागा आम्हाला मिळाली नाही. त्यामुळे त्या ठिकाणी भव्य शताब्दी भवन व सांस्कृतिक केंद्र उभारण्याचे आमचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. मी माननीय महसूल मंत्र्यांना विचारु इच्छितो की, हा प्रश्न निकाली काढण्यासाठी आपण काही कालमर्यादा घोषित करु शकाल काय ? तसेच शाम हॉटेलच्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मृती स्मारक उभारण्याबाबतचा प्रस्ताव नागपूर महापालिकेने शासनाकडे पाठविलेला आहे. ती प्रायव्हेट पार्टीला लीजआऊट केलेली ती जागा आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत विचार-विनिमय करुन निर्णय घ्यावा लागेल. माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले की, शाम हॉटेलला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय स्मारक घोषित

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आलेला आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक

..4..



प्रा.अनिल सोले....

विचारतो की, केंद्र सरकारकडून सदरहू प्रस्तावावर कधीपर्यंत निर्णय घेण्यात येणार आहे ?

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, पटवर्धन मैदानाची जागा शताब्दी भवन आणि संशोधन केंद्रासाठी देण्याची बाब तपासून बघितली जाईल. शासनाने त्या ठिकाणी सदरहू बाधकाम करण्याचे 100 टक्के ठरविले आहे. किंबहुना सरकारने तसा निर्णय घेतला आहे. परंतु अगोदर त्या जागेच्या संदर्भातील सर्व अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या जागेच्या बाबतीत प्रशासकीय अडचणी असतील तर, ती बाब मंत्रिमंडळासमोर आणून, 'विशेष बाब' म्हणून निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या जागेच्या बाबतीत पीआयएल झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ही बाब मला तपासावी लागेल. न्यायालयाच्या अडथळ्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही अडथळे असतील तर, सरकार आपल्या विशेष अधिकारांचा वापर करुन ते अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहील. तसेच दुसरी बाब अशी की, शाम हॉटेल संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री श्री.विनोद तावडे प्रयत्न करीत आहेत. सरकार सुध्दा या प्रकरणी पाठपुरावा करीत आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून या प्रस्तावाला किती दिवसात मंजुरी मिळेल हे आजच्या घडीला सांगता येत नाही. परंतु केंद्र सरकारकडून या प्रस्तावाला लवकरात लवकर मान्यता मिळावी म्हणून सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे पाठपुरावा करण्यात येत आहे.

..2जे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

मला अपेक्षा आहे की, या वर्षामध्ये त्याचे भूमिपुजन व्हावे, या वर्षामध्ये त्याचे कामकाज करावे. श्याम हॉटेलची जागा खाजगी आहे. (अडथळा) खाजगी व्यक्तीला लिजवर दिले आहे. आज कायदा केला आहे. मालकीने त्याला देणार आहोत. खाजगी असो किंवा लिजवर असो, खाजगी असली आणि मालकीची जरी असली तरी कायद्याच्या दृष्टीकोनात ते बसत असेल तर आणि भूसंपादन करून आपल्या ताब्यात घ्यायची असेल तर शासन नियमाप्रमाणे ती ताब्यातही घेईल. आवश्यकता भासल्यास त्यासाठी लागणारा सर्व खर्च शासन तिजोरीमधून करेल.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी सांगितले की, गेली 23 वर्षे त्यांनी अनेक माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदने दिली आणि हा लढा ते लढत होते. पण एका बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी हा निर्णय घेतला, त्या बैठकीत मी होतो. दुसरी लक्षवेधी सूचना देखील श्याम हॉटेलची होती. दोन्ही प्रश्न त्यांनी सोडविले आहेत. माझी विनंती आहे. जन्मशताब्दी वर्षी म्हणजे सन 1991 ला हा प्रश्न सुरू झाला आणि तो प्रश्न मार्गी लागण्यासठी 125 वी जयंती यावी लागली. आता माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा गेलेला 25 वर्षांचा काळ विसरून ही जन्मशताब्दी दिनांक 14 एप्रिल, 2016 मध्ये साजरी करणार आहोत. माननीय सांस्कृतिक मंत्री श्री. विनोद तावडे यांनी जूनमध्ये पाठविलेले आहे आणि ते त्या संदर्भात पाठपुरावा करत आहेत. मी आपलेही अभिनंदन करतो. माननीय मुख्यमंत्र्यांचेही अभिनंदन करतो, कारण नागपूरकरांची गेली 25 वर्षांची श्याम हॉटेलची मागणी होती, तो प्रश्न आपण सोडवला आहे. दिनांक 14 एप्रिल, 2016 पूर्वी भूमिपूजन करावे व याचा निर्णय करावा अशी मी विनंती करतो आणि आपल्याला यासाठी धन्यवाद देतो.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांचे आभार मानतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी भवनासाठी अगोदर बैठक घेतली. आमच्याबरोबर देखील अनेकदा बैठका झाल्या. आपण तांत्रिक अडचण असे म्हणालात. पण मी सांगू इच्छितो की, त्यामध्ये तांत्रिक अडचण काहीही नाही. मी माझी माहिती देत आहे. माझी या संदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आता खाली बसावे. आता आपण पुढील लक्षवेधी सूचनेवर जाऊ या. इतका वेळ एक लक्षवेधी सूचना सुरूठेवायची का ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, ती जागा देण्यास तयार आहे. शासनाने ॲफिडेव्हिट सादर करावे. शासनाने ॲफिडेव्हिट सादर करून आपल्याकडे जागा घ्यावी आणि नंतर ती महानगपालिकेला हस्तांतरित करावी. आपण ते ॲफिडेव्हिट किती दिवसांत सादर करणार आहात ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, .... (अडथळा)

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतात. मी आपल्याला सांगितले की, आता बस करा, बोलणे बंद करा, त्यानंतरही आपण आपले बोलणे चालू ठेवणार असाल तर आपण या आसनाला मानत नाही असे समजून आम्ही येथून निघून जातो. तुमचेच चालू ठेवावे. आता माननीय मंत्र्यांनी प्रश्न सुटला असे सांगितले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुकंपा तत्वावरील नोकरी विकणारे उघडकीस आलेले रॅकेट

**मु.शी.** : मुंबई महानगरपालिकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुकंपा तत्वावरील नोकरी विकणारे उघडकीस आलेले रॅकेट यासंबंधी श्री. भाई गिरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"**मुंबई** महानगरपालिकेच्या सेवेत असताना मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातलगांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याऐवजी बनावट कागदपत्रांच्या आधारे १० ते`१५ लाख रुपयांना नोकरी विकणारे रॅकेट उघडकीस आले असणे, हे रॅकेट संपूर्ण घनकचरा विभागात पसरले असून, पालिका कर्मचारी, अधिकारी, दलाल यात सहभागी -असल्याचे निदर्शनास आले असणे, मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या पत्नी अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी जेव्हा महापालिकेच्या फेऱ्या मारत असत तेव्हा ादंरखेपेला फाईल क्लियर न हेणे, अमुक विभागात अडकली अशाप्रकारचे उत्तरे अधिकाऱ्यांकडून दिली जाणे, मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या पत्नी ऐवजी भलत्याच महिलेला बनावट कागदपत्रांच्या आधारे व संबंधित पोलिसांच्या विशेष शाखेचे ना- हरकत प्रमाणपत्र तयार करून नोकरीला लावत असणे, सदर दलाल अनुकंपा ातत्वावर नोकरी मागायला येणाऱ्या खऱ्या वारसांची दिशाभूल करण्याबरोबरच त्यांना पोलिसांकडून धमक्याही देत असल्याचे कळणे, याबाबत क्राईम ब्रांच युनिट ९ ला ामाहिती दिल्यानंतरही यावर काहीच कारवाई करण्यात न येणे, असे प्रकार मुंबई महापालिकेत सर्रासपणे घडत असल्याचे समोर येणे, याबाबत शासनातर्फे सखोललचौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची **प्रतिक्रिया.**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4

डॉ. रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई मनपाच्या वतीने अनुकंपा तत्वावर नोकऱ्या दिल्या जातात. मी सफाई कर्मचारी विकास महासंघाचे काम करतो. मी आरटीआयमधून माहिती मागविली. मुंबई मनपाच्या 24 वॉर्डामध्ये जे खरे वारसदार नाहीत, जे इतर भाषिक आहेत त्यांना त्यांचे नातेवाईक दर्शवून तेथे नोकरीला लावणारे दलाल तयार झाले आहेत. 10-15 लाख रुपये घेऊन बनावट स्टॅम्प तयार करून तेथे खरे वारसदार आहेत त्यांना बाजूला ठेवून दलाल मंडळी इतरांना नोकऱ्या देतात. मी निदर्शनास आणतो की, एका महिलेला पिटी केस म्हणून नोकरी न मिळाल्यामुळे तिने मुंबई मनपाच्या मुख्य कार्यालयासमोर स्वतःला पेटवून घेतले. अशा प्रकारचा हा कारभार आहे. केवळ एका डी वॉर्डामध्ये त्यांनी छापा घातला तेव्हा त्यांना कळले की, असे व्यवहार येथे होत आहेत. माझी विनंती आहे. आपण 5 वर्षांच्या संदर्भात म्हटले आहे. मी आपल्याद्वारे मागणी करतो. त्या महिलेने जाळून घेतले. जे खरे वारसदार आहेत ते आत्महत्या करतील, त्यांची मुले-बाळे उघड्यावर पडतील. त्यामुळे माझी मागणी आहे की, 24 वॉर्डामध्ये या संदर्भात क्लार्कपासून एचएसपर्यंत चौकशी करावी. हे मोठे रॅकेट आहे. आपण या सर्वांची चौकशी करून 24 वॉर्डामध्ये जे बोगस वारसदार नोकरीला लागले आहेत आणि ज्यांनी त्यांना 10-15 लाख रुपये घेऊन लावले आहे त्यांच्यावर कारवाई करणार का, गेल्या 10 वर्षांमध्ये हे व्यवहार चालले आहेत, त्या 10 वर्षांची चौकशी करणार का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न मांडला आहे. ते नेहमी सफाई कामगारांच्या प्रश्नांसाठी लढा देतात. सभापती महोदय, मूलभूत नैसर्गिक हक्क प्राप्त झाला आहे. सेवेत असताना मृत्यू होणे, मेडिकल ग्राऊंडवर निवृत्त होणे, स्वेच्छानिवृत्ती घेणे - सेवानिवृत्ती नंतर सुध्दा त्यांचा हक्क आहे. तेथे त्यांच्या कुटुंबातील कोणाला तरी अनुकंपा तत्वावर हक्काने नोकरी मिळते. एका वॉर्डमधील तक्रार क्राईम ब्रँचला प्राप्त झाली, त्यानंतर असे उघडकीस आले की, निश्चिपतणे तेथे काही तरी चुकीचे झाले आहे, गैरप्रकार घडलेला आहे. एका वॉर्डातून जवळपास 460 प्रकरण् आजमितीस उघड झाली आहेत. चौकशीवरून असे दिसते की, त्यामध्ये प्रथमदर्शनी एजंट आहेत आणि तेथील अधिकारी-कर्मचारी सुध्दा त्यामध्ये सामील आहेत. डी वॉर्डमध्ये प्रकरण झाले, त्यामध्ये

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ....

आतापर्यंत 9 लोकांचा पीसीआर घेतला आहे आणि यामध्ये जे लोक असतील म्हणजे जे अधिकारी, कर्मचारी असतील त्यांच्या संदर्भात आजच असे निदेश देण्यात आले आहेत की, सर्वांना निलंबित करण्यात यावे. सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, फक्त एका वॉर्डच्या संदर्भात कार्यवाही करून थांबून चालणार नाही. 24 वॉर्डामध्ये माहिती घेण्यात यावी, चौकशी करण्यात यावी. कारण असे लक्षात येते की, जे लोक या सर्व संज्ञेत बसतात पण ज्यांच्या वारसांना माहीत नाही, अज्ञानामुळे ते जात नाहीत किंवा ज्या लोकांच्या वारसांना पुढे नोकरी करण्याची इच्छा नाही अशा लोकांच्या संधींवर डल्ला मारत एजंट लोक चुकीच्या प्रकाराने लोकांना नोकऱ्या मिळवून देतात. पात्र नसतात अशा उमेदवारांनी नावे बदलून खोटी प्रमाणपत्रे लावून नोकऱ्या प्राप्त केलेल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. गेल्या 5 वर्षातील म्हणजे सन 2011 ते सन 2016 मधील सर्व 24 वॉर्डामधील याबाबतीतील चौकशी केली जाईल. काही चुकीचे आढळले तर दोषींवर कारवाई सुध्दा केली जाईल.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मुंबई मनपामध्ये चतुर्थश्रेणीच्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना पीटी केस तत्वावर नोकरी देण्यात येते. बऱ्याच वेळा नोकरी देताना बराच वेळ चौकशी करण्यात येते, पेपर वर्क करण्यात जाते. ए वॉर्डमधील एक केस आहे. जवळपास 4 वर्षे अप्लाय केल्यानंतरही त्या व्यक्तीला नोकरी मिळाली नाही. आम्ही पाठरपुरावा केल्यानंतर त्या व्यक्तीला नोकरी मिळाली. मुद्दा असा आहे की, अप्लाय करतात त्यावेळी त्यांचे वय 35-37 एवढे असते. परंतु प्रक्रियेमध्ये 4-5 वर्षे घालवली तर त्यांना जास्तीत जास्त 15-16 वर्षांची सेवा करावयास मिळते. माझी विनंती आहे की, शसनाने अशा प्रकरणात एक टाईम फ्रेम ठरवून अर्ज आल्यानंतर 6-8 महिन्यांत किंवा वर्षभरात ते डिसाईड करावे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, नुसते कालबध्द नाही तर अशा प्रकारच्या अनुकंपाच्या प्रकरणांमध्ये कोणी पात्र असणाऱ्या व्यक्तींच्या अज्ञानाचा फायदा घेऊ नये म्हणून संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सोबत बाकीचे सुध्दा वरिष्ठ



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ....

अधिकारी असतील अशी एक समिती गठीत केली जाईल. जेणेकरुन अशा पात्र व्यक्तींना अज्ञानामुळे कोणी वंचित ठेवणार नाही. सर्व डॉक्युमेंट्स कालबध्द मर्यादित वेळेत छाननी करुन पुढील कार्यवाही केली जाईल.

....K

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर : सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी एक उल्लेख केला आहे. पी.टी.केस होण्यासाठी चार ते पाच वर्षांचा कालावधी लागतो. दरम्यानच्या काळात संबंधित व्यक्ती गावी जातो आणि इकडे मात्र बोगस माणूस त्याच्या नावाखाली नोकरीत घुसतो. वास्तविक पाहता मागील 15 वर्षातील सर्व प्रकरणांची चौकशी करावी, अशा प्रकारची माझी मागणी आहे. कारण, एका वॉर्डातील चौकशी केल्यानंतर साधारणपणे 400 बोगस केसेस निदर्शनास आल्या. मुंबईतील सर्व वॉर्डांची चौकशी केली तर आणखी किती केसेस निघतील, हे आपण आता सांगू शकणार नाही.

सभापती महोदय, काही व्यसनाधिन लोक असतात. त्यांना पकडून एजंट त्यांच्याकडून स्वाक्षऱ्या किंवा अंगठे घेतात आणि प्रकरणे दाखल करतात. या सर्व प्रकरणात केवळ संबंधित लिपिक किंवा मुख्य लिपिक यांना जबाबदार धरून चालणार नाही तर खालपासून वरपर्यंत सर्वांना जबाबदार धरले पाहिजे. हे एक मोठे रॅकेट आहे.

सभापती महोदय, मी इतर विषयात आज जाऊ इच्छित नाही. सुलभ शौचालय आणि अन्य बाबींमध्ये देखील मोठे रॅकेटस् आहेत. तो विषय आज आपण बाजूला ठेऊ.

सभापती महोदय, वास्तविक पाहता मागील 15 वर्षातील सर्व प्रकरणांची चौकशी करावी, अशी मागणी मी करणार होतो. परंतु, किमान मागील 10 वर्षांतील प्रकरणांची तरी मंत्री महोदयांनी चौकशी करावी, अशी माझी विनंती आहे. मागील 10 वर्षात जे चुकीच्या पध्दतीने नोकरीला लागलेले आहेत आणि ज्यांनी त्यांना लावले आहे, त्या सर्वांवर शासनाने कारवाई करावी, अशी माझी मागणी आहे. यामध्ये 10-15 लाख रुपये घेतले जातात. एका एजंटच्या घराची झडती घेतली असता लाखो रुपये मिळाले. एवढेच नाही तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असलेली खोटी दस्तऐवजही मिळाली आहेत. हे एक मोठे रॅकेट असल्यामुळे गेल्या 10 वर्षातील सर्व प्रकरणांची चौकशी करावी. मी आर-साऊथ या वॉर्डमध्ये राहतो. टी वॉर्डमधील चौकशीत ही प्रकरणे आढळून आली. म्हणून माझी अशी विनंती आहे की, गेल्या 10 वर्षातील सर्व अनुकंपा तत्वावरील प्रकरणांची शासनाने चौकशी करावी आणि गरीब, गरजू लोकांना न्याय द्यावा.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या रॅकेटची कार्यपध्दती सांगितली आहे. पात्र व्यक्ती चार वर्ष बाहेर गेल्यानंतर दरम्यानच्या काळात अपात्र व्यक्ती येतात, चुकीची प्रमाणपत्रे दाखवून त्यांना नोकरी लावून देतात. पात्र उमेदवाराने अर्ज केल्यानंतर चार-चार वर्षे प्रकरण प्रलंबित ठेवायची आणि मधल्या काळात अपात्र व्यक्तीला लावून टाकायचे. चौकशी दरम्यान हे सर्वच उघडकीला येणार आहे. आपण मागील पाच वर्षातील प्रकरणांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. पाच वर्षातील प्रकरणांची चौकशी केली तर आपल्याला या एकूणच कार्यपध्दतीची व्याप्ती कळून येईल आणि त्यानंतर जर आपल्याला वाटले तर 10 वर्षाची देखील चौकशी करु केवळ कर्मचारीच नाही तर ज्यांच्या आस्थापनेखाली हे चालले आहे त्या वरच्या अधिकाऱ्यांची सुध्दा जबाबदारी असते. त्यामुळे चौकशी करुन कर्मचारीच नाही तर अधिकाऱ्यांपर्यंत जे जे या कडीमध्ये समाविष्ट असतील आणि ज्यांच्या ज्यांच्यावर रिस्पॉन्सिबिलिटी डायरेक्टली किंवा इनडायरेक्टली फिक्स होऊ शकेल त्या सर्व अधिकाऱ्यांवर देखील कारवाई होईल.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, चौकशी झाल्यानंतर संबंधितांना शिक्षा झाली पाहिजे. ज्यांनी खोटी कामे केली आहेत त्यांना शिक्षा झाली पाहिजे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. या ठिकाणी उत्तरात असे नमूद केले आहे की, कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर वारस उपलब्ध नसल्यास कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस वारसाहक्काने नोकरी देण्यात येते. माझा प्रश्न असा आहे की, ही नियुक्ती लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने देण्यात येते की, अनुकंपा तत्वावर देण्यात येते ? अशा प्रकारची नियुक्ती देण्याबात काही वेगळा निर्णय शासन घेणार आहे का ? माझी अशी मागणी आहे की, लाड समितीच्या शिफारशींप्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांना न्याय मिळतो व त्यामुळे शहरांची सफाई परिणामकारक होते. त्यामुळे ही कार्यपध्दती तशीच सुरु ठेवावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मला असा खुलासा करावयाचा आहे की, सफाई कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशी प्रमाणेच नोकरी, निवास, वैद्यकीय आणि इतर सर्व सुविधा दिल्या जातात. लाड समितीच्या शिफारशीनुसारच सर्व कामे होतात.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** मानवी अवयव प्रतिरोपण (सुधारणा) अधिनियम, 2011 (सन 2011 चा अधि.क्र.16) हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (1) नुसार राज्यासाठी अंगीकारण्याबाबत

**मु.शी.:** मानवी अवयव प्रतिरोपण (सुधारणा) अधिनियम, 2011 (सन 2011 चा अधि.क्र.16) हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (1) नुसार राज्यासाठी अंगीकारण्याबाबत या विषयावरील वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचा ठराव

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 106 अन्वये खालील ठराव मांडतो :-

ज्याअर्थी, भारताच्या सं वधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) नुसार, महाराष्ट्र  वधानसभेने व महाराष्ट्र  वधानपरिषदेने राज्यात मानवी अवयव  व ऊतिदान करणे, ती काढणे आ ण त्यांचे प्रतिरोपण करणे यासंबंधातील बाबींचे व त्यांच्याशी संबंधित  कंवा सहाय्यभूत व तदनुषंगिक सर्व बाबींचे कायद्याव्दारे, संसदेकडून  वनियमन करण्यात यावे, असा दिनांक १४ जुलै, ११९२ रोजी ठराव केला आहे;

आ ण ज्याअर्थी, त्यानंतर संसदेने रोगनिवारण  प्रयोजनांसाठी अवयव काढणे, साठवून  ठेवणे आ ण त्यांचे प्रतिरोपण करणे यांचे  वनियमन करण्यासाठी आ ण मानवी अवयवांच्या आ र्थक व्यवहारांसह प्रतिबंध करण्यासाठी आ ण त्यांच्याशी संबंधित किंवा  तदनुषंगिक बाबींसाठी, मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम १९९४ (१९९४ चा ४२) (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात  आला आहे) हा अधिनियमित  केला आहे;

आ ण ज्याअर्थी, सं वधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) अन्वये, गोवा, हिमाचल प्रदेश व पश्चिम बंगाल या राज्यांच्या  वधानमंडळांच्या सर्व सभागृहांनी मुख्य अधिनियम त्या राज्यांना लागू असताना, त्यामध्ये संसदेने कायद्याव्दारे सुधारणा करावी अशा आशयाचे ठराव पारित केल्याचा

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

परिणाम म्हणून, संसदेने, मानवी अवयव प्रतिरोपण (सुधारणा) अधिनियम, २०११ (२०११ चा १६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा अधिनियमित केला आहे;

आ ण ज्याअर्थी, सुधारणा अ धनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, सं वधानाच्या अनुच्छेद २५२ च्या उपखंड (१) अन्वये, त्याबाबतीत पारित केलेल्या ठरावाव्दारे सुधारणा अधिनियमाचा अंगीकार करणाऱ्या अशा इतर राज्यानांदेखील सुधारणा अधिनियम लागू असेल;

आ ण ज्याअर्थी; राज्यातील वास्त वक प्रकरणांमध्ये मानवी अवयवांचे प्रतिरोपण सुलभ करणे, मानवी अवयवांच्या व ऊतिंच्या आ र्थक व्यवहारांस प्रतिबंध करणे आ ण अज्ञान व मतिमंद असलेल्या व्यक्तींकरिता वशेष तरतुदी करणे शक्य व्हावे म्हणून सुधारणा अ धनियमाव्दारे सुधारणा केलेल्या मुख्य अ धनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तो महाराष्ट्र राज्यास लागू असताना, सुधारणा अधिनियमाचा अंगीकार करण्यात यावा, असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे;

त्याअर्थी, आता, सं वधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) नुसार, हे सभागृह याव्दारे असा ठराव करीत आहे की, संसदेने मंजूर केलेला मानवी अवयव प्रतिरोपण (सुधारणा) अधिनियम, २०११ (२०११ चा १६) या राज्यासाठी अंगीकारण्यात यावा.

सभापती महोदय, केंद्राने काही बदल केले आहेत आणि ते आपल्याला ॲडॉप्ट करावयाचे आहेत. मी महत्वाचे मुद्दे सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो.

सभापती महोदय, मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा सन 1994 मध्ये केंद्र शासनाने पारित केला. सदरचा कायदा राज्यामध्ये जसाच्या तसा लागू करण्यात आला. सदर कायद्यामध्ये अनुभवाअंती आलेल्या अडीअडचणी दूर करण्यासाठी केंद्र शासनाने त्यात सुधारणा करुन सदर सुधारित कायदा सन 2011 मध्ये पारित केला. सदरचा सुधारित कायदा जसाच्या तसा राज्यामध्ये लागू करण्याबाबत मी ठराव मांडला आहे. या ठरावातील तरतुदींची ठळक वैशिष्ट्ये मी आपल्या अनुमतीने सादर करतो.

सभापती महोदय, परदेशी रुग्ण व भारतीय अवयव दाता यावर बंधन आणण्यात आले आहे. मनोरुग्णांचे अवयव काढण्यास यामुळे प्रतिबंध येणार आहे. व्यक्ती मृत झाल्यानंतर कॉर्निया

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

डॉक्टरांनीच काढला पाहिजे असे नाही तर डॉक्टरांशिवाय तंत्रज्ञांना सुध्दा डोळे (अवयव) काढण्यास परवानगी मिळणार आहे. जवळच्या नातेवाईकांच्या व्याख्येमध्ये आजी-आजोबा, नात-नातू यांचा समावेश आता आपण केला आहे. लहान मुलांचे (मायनर) अवयव काढण्यास यामुळे प्रतिबंध येणार आहे. कायद्याअंतर्गत येणाऱ्या समितीस न्यायालयीन अधिकार मिळणार आहेत. जवळच्या नातेवाईकाचे अवयव रक्तगटामुळे जुळत नसल्यास अवयव स्वॅपसाठी किंवा अदलाबदलीसाठी मान्यता मिळणार आहे. शस्त्रक्रियेस मान्यताप्राप्त रुग्णालयाव्यतिरिक्त इतर रुग्णालयातून ब्रेन डेड रुग्णांचे अवयव काढण्यास मान्यता मिळणार आहे. अवयवाव्यतिरिक्त उती (टिशु) दानाचा कायद्यात समावेश आहे. अवयव प्रत्यारोपण समन्वयक नेमण्याचे निर्देश आहेत. अवयव स्विकारणारा राज्यात नसेल तर परराज्यात अवयव पाठविण्याची सुविधा मिळणार आहे. देश पातळीवर व राज्य पातळीवर अवयव दाता व प्रतिक्षेतील रुग्ण यांची राष्ट्रीय स्तरावर डेटा बँक करण्यात येणार आहे. अपराधीस शिक्षेच्या कालावधीत व दंडाच्या रकमेत वाढ करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, सन 1994 च्या कायद्यात बदल केले आहेत. आपण आणखी काही बदल करण्याचे केंद्र सरकारला सुचवित आहोत. सध्या आजी, आजोबा, नात आणि नातु हे जवळच्या नातेवाईकांच्या व्याख्येत आहेत. त्या ठिकाणी भाऊ, वहिनी, बहीण, मावस भाऊ, असे जी बाकीची नाती आहेत, ही सुध्दा यामध्ये समाविष्ट करावीत, असे आपण सुचवीत आहोत. कारण, मोठ्या प्रमाणावर नातेवाईक अवयव देण्यास तयार आहेत. पण कायद्यात बसत नाही त्यामुळे अनेकांचे प्राण जात आहेत. याचा सुध्दा आग्रह आपण धरीत आहोत. त्याबरोबरच सध्या स्वॅपिंगसाठी दोनच कुटुंबे गृहीत धरीत आहोत. त्याऐवजी पाच ते सहा कुटुंबांना स्वॅपिंग करता येऊ शकेल. तोही बदल करावा, असे आपण केंद्राला आग्रहाने सुचवीत आहोत.

सभापती महोदय, आता केंद्राने सन 2011 मध्ये जो बदल केला आहे तो आपण आपल्या राज्याला लागू करीत आहोत व तो ठराव मी सभागृहात मांडलेला आहे. सभागृहाने तो एकमताने संमत करावा, अशी मी विनंती करतो.

ठराव मतास टाकून एकमताने संमत झाला.

---------------

..LL-1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विशेष उल्लेखाच्या सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (शिक्षण) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब च्या पदोन्नतीची नस्ती मागील 2 वर्षापासून कार्यवाहीसाठी प्रलंबित असल्याने जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शिक्षकांवर अन्याय होत आहे. राज्यात गट शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी संवर्गातील सुमारे 50 टक्क्यापेक्षा अधिक पदे रिक्त असल्यामुळे शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी होण्यास अडचणी येत आहेत. मार्च, 2015 मध्ये सभागृहात शासनाने सदरची पदे पदोन्नतीने भरण्याचे आश्वासन दिले होते. पदोन्नतीसाठी सुमारे 268 शिक्षक पात्र असून शासनाकडून कार्यवाही न झाल्याने सुमारे 148 शिक्षक सेवानिवृत्त झाले असून पदोन्नतीसाठी सध्या फक्त 120 शिक्षक कार्यरत आहेत. किमान या 120 शिक्षकांना पदोन्नती पासून वंचित न ठेवता शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील ज्या शहरांची "स्मार्ट सिटी" योजनेत निवड करण्यात आली आहे त्यापैकी कल्याण-डोंबिवली शहरांचा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची प्रदूषित शहरे अशी ओळख निर्माण करणारा अहवाल स्काय लॅब ॲनालिटिकल लॅबोरेटरी या संस्थेने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त श्री.ई.रवीन्द्रन यांना ऑगष्ट, 2015 च्या शेवटच्या आठवड्यात सादर केला असणे, वालधुनी नदी प्रदूषित झाल्याची बाब मागील 5 ते 6 वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी शासनाच्या निदर्शनास आणून देत असताना आजमितीस वालधुनी नदीच्या परिसरात 88.99 टक्के वायू प्रदूषणाची नोंद झालेली असून, कल्याण बस स्थानक परिसरात आणि ठाकुर्लीतील खंबाळपाडा परिसरात 85 डेसिबल पर्यंत ध्वनिप्रदूषण होत असल्याचा धोका लक्षात येऊन या शहरातील वाढते वायू आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील )**

श्री.रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, श्री.तुकाराम विठ्ठलराव पाईकराव, श्री.शिवाजी धोंडबा पाईकराव, श्रीमती उकंडाबाई पुरबा नरवाडे हे मोजे येलकी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथील रहिवाशी असून सन 1970 पासून मौजे येलकी शेत सर्व्हे नं.19 व 30 मधील अतिक्रमित असून हे गायराण जमिनीवरील अतिक्रमित जागेवर राहत असणे, सदर जमिनीबाबत दिनांक 1 जून, 2014 रोजी उप जिल्हाधिकारी, तहसीलदार यांची जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक होऊन सदर जमिनीचे हस्तांतरण करण्यास परवानगी देऊन सदर बौद्ध समाजाच्या नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत सदर जमीन अतिक्रमण करुन राहिलेल्या नागरीकांच्या नावे करण्यात यावी, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे.

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबईतील शिवडीच्या टी.बी. रुग्णालयातील कामगार कर्मचाऱ्यांना टी.बी.ची लागण होण्याचे प्रमाण सातत्याने वाढत असून रुग्णालयात नोकरभरती बंद असल्याचा दावा कर्मचाऱ्यांकडकडून होत असणे, रुग्णालयासाठी 599 कर्मचारी मंजूर असून, आताच्या घडीला रुग्णालयात 175 ते 200 जागा रिक्त असणे, यामध्ये कक्ष परिचारीकांच्या 160 जागा मंजूर असून 90 जागा रिक्त असणे, सफाई कामगारांच्या 210 जागा मंजूर असून त्यापैकी 40 जागा रिक्त आहेत. क्षयरोगाचे रुग्ण असल्याने वॉर्ड स्वच्छ ठेवणे गरजेचे असून कामाच्या अतिरिक्त तणावामुळे येणारा थकवा व रुग्णांसोबत सतत संपर्क यामुळे टी.बी.ची लागण होण्याचे प्रमाण वाढत आहे. टी.बी.ची लागण कमी करण्यासाठी मनुष्यबळाची तातडीने आवश्यकता असून कर्मचाऱ्यांची तत्काळ भरती करण्याची आवश्यकता आहे, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात वाहनांची संख्या सर्वात जास्त आहे. दररोज हजारो नवीन वाहने रस्त्यावर येत आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील गर्दीत प्रचंड वाढ झाल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. परंतु, परिवहन विभागाचे नियम जुनेच असल्यामुळे त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. जनतेला काही सूचक माहिती देणे आवश्यक आहे. तसेच, नवीन नियमावली तयार करणे अत्यावश्यक आहे. यासाठी सरकारने एक कमिटी नेमून जनतेच्या व तज्ज्ञांच्या सूचना घेऊन त्याबाबत नवीन नियमावली तयार करावी, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाच शिफारस करीत आहे.

---------

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर पेपर मील मधून निघणारे रसायनयुक्त पाणी वर्धा नदीच्या पात्रात सोडल्याने नदीतील मोठ्या प्रमाणात मासोळ्यांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक 14.11.2015 रोजी घडली असणे, सदर पेपपर मिलचे रसायनयुक्त अशुद्ध पाणी नदीच्या पात्रात सोडले जात असल्याने सदर परिसरातील शेती पिकांचेही नुकसान होणे, त्यातच पशुधनावरही परिणाम होऊन त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे दिसून येणे, त्यातच नदीचे पाणी अशुद्ध होत असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन नागरीकांना आजाराचा सामना करावा लागणे, परंतु सदर प्रकरणाकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होत असलेले दुर्लक्ष, सदर प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्कता आहे, अशी मी शासनास विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गिरणी कामगारांना गिरण्यांच्या जमिनीवर घरे देण्यासाठी सन 2001 मध्ये कायदा करुनही अद्याप 1 लाख 40 हजार गिरणी कामगारांना न मिळालेली घरे, न्यू ग्रेट इस्टर्न, मातुल्य, मफतलाल, हिंदुस्थान अे आणि बी, वेस्टर्न इंडिया, व्हिक्टोरिया, क्राऊन, बॉम्बे डाईंग (वडाळा व लोअर परेल) श्रीनिवास मील या दहा गिरण्यांची जमीन म्हाडाच्या ताब्यात असूनही उक्त जागेवर एक वर्षाहून अधिक काळ झाला तरी म्हाडाला घरबांधणीचे आदेश न देणे,....

..2M-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

तसेच सेन्चुरी, रूबी वेस्टर्न इंडिया, प्रकाश कॉटन, भारत, स्वान या मिलच्या जागेवर घरे तयार असूनही अद्याप घरांचे न केलेले वाटप. जेवढा काळ निघून जाईल तशा घराच्या किंमती वाढणार असल्याने उक्त बांधकामाच्या वाढीव खर्चाबाबत शासनाने कोणताही ठोस निर्णय न घेणे, परिणामी सरकारच्या दिरंगाईमुळे वाढणाऱ्या घरांच्या किंमती, गिरणी कामगारांनी एम.एम.आर.डी.ए. ची घरे देणार असे घोषित करुनही आणि 10768 सदनिका उपलब्ध असूनही अद्याप त्याचे न केलले वाटप, घराच्या किंमतीबाबत शासनाने न केलेले स्पष्टीकरण, 15 जुलै, 2015 रोजी गिरणी कामगारांनी मोर्चा काढल्याने मोर्चाला माननीय मुख्यमंत्री यांनी डिसेंबर, 2015 मध्ये सोडत काढण्याचे दिलेले आश्वासन, तथापि, अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही न करणे यासंदर्भात शासनाची असणारी संदिग्ध भूमिका, गिरणी कामगारांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, या सार्वजनिक महत्वाच्या गंभीर विषयावर मी सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी ही बाब विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

**सभापती** : सरकारने नोंद घ्यावी व निवेदन करावे.

-----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मौजे मानोली, ता.मंगरूळपीर (जिल्हा वाशिम) येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत श्रीमती अलकाबाई लक्ष्मीकांत महाकाळ, सर्वश्री गौतम लक्ष्मण मनवर आणि नागोराव बळीराम सरोदे या तीन लाभार्थ्यांना सिंचन विहिरी बांधकाम व खोदकाम यासाठी अनुक्रमे दिनांक 28 जानेवारी व 7 फेब्रुवारी 2014 रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती मंगरूळपीर यांनी प्रत्येकी 3 लक्ष रुपये किंमतीस प्रशासकीय मान्यता देऊन दिनांक 4 मार्च, 2014 रोजी तिन्ही कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणे, तथापि प्रत्यक्षात श्रीमती अलकाबाई महाकाळ या लाभार्थ्याने जुन्याच विहिरीचे काम दाखवून शासकीय अनुदान पुर्णत: गडप केल्याचे तसेच श्री.गौतम मनवर या लाभार्थ्याने नवीन विहिरीचे कोणतेही काम न करताच शासकीय अनुदान गडप केल्याचे व त्याचप्रमाणे श्री.नागोराव बळीराम सरोदे या लाभार्थ्याने सन 2012-2013 मध्ये बांधकाम झालेल्या जुन्या विहिरीचे बांधकाम माहे एप्रिल, 2015 मध्ये केल्याचे दाखवून शासकीय अनुदानाचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केल्याचे दिनांक 1 सप्टेंबर, 2015 मध्ये निदर्शनास येणे, याप्रकरणी ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनुसार जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सविस्तर चौकशीचे आदेश, दिल्यानंतर संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी त्याप्रकरणी चौकशी करून आपला अहवाल दिनांक 15 ऑक्टोबर, 2015 रोजी जिल्हाधिकारी वाशिम यांना सादर करणे व सदर अहवालात, प्रकरणाधिन तीन्ही लाभार्थी तसेच अपहार करण्यास त्यांना सहाय्य करणारे तत्कालीन गट विकास अधिकारी, तांत्रिक अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती मंगरूळपीर व संबंधित तलाठी हे पूर्णत: दोषी असल्याचे नमूद करणे, त्यानुसार जिल्हाधिकारी वाशिम यांनी दिनांक 28 ऑक्टोबर, 2015 रोजी या सर्व संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणे परंतु शासन निधीचा अपहार करूनही त्या प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. तेव्हा शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित लाभार्थी अधिकारी कर्मचारी यांचेकडून केवळ अपहारित रकमांची

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे...

वसुली करणे एवढीच कारवाई न करता, त्यांचेविरुध्द तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूर शहरात शंभरावर हुक्का पार्लर असून हे हुक्का पार्लर सकाळी 10 ते पहाटे 3 ते 5 वाजेपर्यंत सुरु असून हुक्का पार्लरच्या आहारी 13 ते 27 वर्षापर्यंतची मुले गेली असून सदर हुक्क्याचे गणित त्याच्या पॉट नुसार ठरते, सुमारे 500 रुपये ते 15000 रुपयांपर्यंतचे पॉट सध्या नागपुरात उपलब्ध असून अनेक तरुण लाखो रुपयांच्या कर्जात डुबलेले असून कर्जबाजारी झालेले असल्याने सदर हुक्का पार्लर बंद करण्यात यावी, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास करीत आहे.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....5....

**पृ.शी.:** प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. XLIX OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 49 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 49 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एमआरटीपी ॲक्ट 1966 मध्ये भूसंपादना संदर्भातील प्रकरण सात आहे. त्यामध्ये जुन्या 1894 भूसंपादन कायद्याचा संदर्भ आहे. आता नवीन 2013 चा कायदा अस्तित्वात आल्यामुळे ते संदर्भ 2013 च्या नावाने घ्यावेत, म्हणजे 1894 काढून 2013 त्यामध्ये ॲड करावे इतका बदल यात करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, दुसरा बदल एमआरटीपी ॲक्ट 1966 च्या कलम 127 नुसार आरक्षण केलेल्या व आरक्षित असलेल्या भूभागावरील जमिनी 10 वर्षात संपादित केल्या नाही तर 127 ची नोटीस देऊन एक वर्षाचा कालावधी थांबवून परचेस नोटीस दिल्यानंतर एका वर्षानंतर ते व्यपगत समजून त्यामध्ये पुढे कारवाई करावी लागते. यासाठी वेळ कमी पडतो म्हणून 127 ची नोटीस दिल्यानंतर एक वर्षाचा कालावधी आता दोन वर्षाचा करीत आहोत, असे दोन बदल या कायद्यात करण्यात येत आहेत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्मानीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा प्रस्ताव आहे त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्मानीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांचा प्रस्ताव आहे त्यांनी तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 49 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक, 2015 विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल, त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल, तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल,

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या जमिनी घेणे किंवा शहरातील मोकळ्या जमीन धारकांच्या जमिनी घेणे यासंदर्भात गेली अनेक वर्षे देशभर आंदोलने चालू आहेत, काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी सन 2013 मध्ये केंद्र सरकारला भाग पाडून हा कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार जमीन मालकांना मोठ्या प्रमाणावर भरपाई मिळणार आहे, त्याचा अंतर्भाव आपुण या नवीन सुधारणेद्वारे करीत आहात, त्यामुळे मी आपले स्वागत करतो. यातील दुसरा भाग असा आहे की, डीपी 10 वर्षाचा असतो त्यानंतर एक वर्षाची परचेस नोटीस असते, ती आणखी एक वर्षे वाढवून दोन वर्षे करण्याचे प्रस्तावित केले आहे, सभापती महोदय, मी मंत्री महोदयांच्या हे निदर्शनास आणून देतो की, 10 वर्षाचा डीपी दहा वर्षात कधीच पूर्ण होत नाही. 15 ते 20 वर्षे डीपी निरनिराळ्या स्तरावर प्रलंबित राहतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.....

शासनाकडे प्रलंबित राहतो. मग तो जमीन मालक असतो त्याला त्या जागेवर काही करता येत नाही, ती जमीन विकता येत नाही. अशा चक्रव्यूहात तो जमीन मालक अडकतो. यापुढे 10 वर्षात डीपी प्लॅन झाला नाही तर एक वर्षाचा पर्चेस नोटीस कालावधी असा 11 वर्षाऐवजी 12 वर्षांचा कालावधी लागणार आहे. मंत्री महोदयांनी पूर्वीप्रमाणेच एक वर्षाचा कालावधी निश्चित करावा. अन्यथा मी सुधारणा सुचविल्याप्रमाणे सहा महिन्याची मुदत वाढवून 18 महिन्यांचा कालावधी करण्यात यावा.

सभापती महोदय, हा कायदा करताना नवीन भूसंपादनाच्या किंमतीमुळे जमीन धारकांचा फायदा होणार आहे, याचा उल्लेख केला आहे. हे करीत असताना खंड 5 मध्ये दोन परंतुक आहेत. त्यात म्हटले आहे की, "परंतु भूमी संपादन आणि पुनर्वसन करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेच हक्क अधिनियम 2013 च्या कलम 4 ते 15 (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपध्दती अशा जमिनीच्या संदर्भात लागू होणार नाही." 2013 चा नवीन भूसंपादन कायदा आहे, त्यात कलम 4 ते 15 ची जी कार्यपध्दती आहे ती वगळून आपण मान्य करीत आहात. कलम 10(3) मध्ये म्हटले आहे की, "जेव्हा जेव्हा पोटकलम 2 अन्वये बहुपीक असलेली सिंचनाखालील जमीन संपादित करण्यात येत असेल तेव्हा लागवडीयोग्य असलेल्या नापीक जमिनीचे क्षेत्र कृषी प्रयोजनार्थ विकसित करण्यात येईल अथवा संपादित केलेल्या जमिनीच्या मूल्याइतकी रक्कम अन्न सुरक्षा वाढविण्यासाठी, कृषी गुंतवणूक करण्यासाठी समयोचित शासनाकडे जमा करण्यात येईल." कलम 10(3) अन्वये जर ही जमीन जात असेल तर आपल्याला पाहिजे असल्यास फूड सिक्युरिटी विधेयकाबद्दल देशभरात चर्चा सुरु आहे, त्याला बाधा येता कामा नये आणि शेतीच्या इरिगेटेड जमिनीला बाधा येता कामा नये. ते आपण कलम 4 ते 15 मध्ये वगळले आहे हे मी निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती महोदय, माझा या विधेयकाला विरोध नाही. कोणत्याही परिस्थितीत फूड सिक्युरिटी, इरिगेटेड लॅण्ड, जमिनीचा हक्क आणि जमिनीच्या संदर्भात शेती उद्योगधंदा करावयाचा असेल तर त्याला जो कालावधी पाहिजे त्या पर्चेस नोटीसला 10 ते 12 वर्षे कालावधी लावता हे बरोबर नाही. या संदर्भात विचार करुन सभागृहाला माहिती द्यावी अशी विनंती करतो. संपादित

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे...

करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल 4 ते 5 पट मोबदला दिला जाणार आहे, त्यामुळे जमीनधारकांचा फायदा होणार आहे. मी या विधेयकाचे समर्थन करतो. परंतु मंत्री महोदयांनी मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत खुलासा करावा. मी या विधेयकाला सुचविलेली सुधारणा आणि विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याचा दिलेला प्रस्ताव मागे घेत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, डीपी प्लॅन हा 10 वर्षांचा नसून 20 वर्षाचा असतो. पूर्वी याला विलंब लागत असे. डीपी प्लॅन तयार होईपर्यंत 5-10 वर्षे निघून जायची. इलेक्शन काळ आणि न्यायालयीन खटल्याच्या संदर्भात स्टे कालावधी कण्डोन करुन डीम सॅक्शन करण्याचे विधेयक आणले आहे. आता वेळ लागणार असेल तर कमाल आणि किमान कालावधी निश्चित केला आहे. त्यानंतर तो जसा असेल तसा सॅक्शन करतो. डीम सॅक्शन करतो. प्रस्ताव खालून शासनाकडे येतो. म्हणून इरिगेटेड लॅण्ड वगैरे म्हटले आहे.

या बिलाची व्याप्ती केवळ शहरामध्ये जे प्लॉट असतात, ज्या जमिनी आपण संपादित करतो त्यामध्ये बाकी सगळे सारखे आहे. फक्त शहरामधील जे रिसेटलमेंट, रिहॅबिलिटेशन आहे,एखाद्या प्लॉटवर आपण आरक्षण टाकतो त्यासाठी जमीन घेण्यासाठी जी तडजोड आहे, ती स्थानिक प्राधिकरणाकडे असते. येथे इरिगेटेड जमिनीचा संबंध नाही. या विधेयकाची व्याप्ती एवढीच आहे की, 1894 चा जो संदर्भ होता तो 2013 चा यावा. बाकीच्या गोष्टी सारख्या ठेवून या शहरासाठी आर ॲण्ड आर त्यात घेतला नाही. कारण तेथे सुविधा शहर प्राधिकरणाने पुरवायच्या असतात. त्यासाठी त्यांचे नियोजन असते. ते डीपी प्लॅनमध्ये आरक्षण टाकतात आणि जमीन घेतात तेव्हा पैसे सुध्दा भरतात. 127 बद्दल आपण उल्लेख केला आहे. 10 वर्षानंतर एक वर्षाऐवजी दोन वर्षे कालावधी करावयाचा आहे. 10 वर्षे उलटल्यानंतर एखादा डीपी प्लॅन तयार होतो त्याचा डीपी होरायझन पुढील 20-25 वर्षाचा असतो. कारण पुढील लोकसंख्या गृहित धरुन ज्या काही पब्लिक ॲमेनिटीज लागतात त्याचे प्लॅनिंग आणि रोड मॅप तयार करुन पुढे लागणाऱ्या जागा आणि त्यावरील आरक्षणे ठेवली जातात. ती पुढील गरज असते. प्लॅन पुढचा असतो. परंतु 10 वर्षे किमान गेल्यानंतर एखाद्या जमीन मालकाला वाटले की, माझी जमीन आरक्षित केली, पण संपादित केली जात नाही, हा माझा हक्क आहे, तेथे तो 10 वर्षानंतर त्याला पर्चेस नोटीस देऊ शकतो

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

आणि खरेदीची सूचना त्याला एका वर्षानंतर देता येत होती. ती कालमर्यादा 1 वर्षाऐवजी 2 वर्षे केली आहे. याचे कारण असे की, या सगळयासाठी स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागते, जमिनीची मोजणी करावी लागते, अधिसूचना जारी करावी लागते, त्यानंतर निधीची पूर्तता करावी लागते. अशी प्राधिकरणे राहिली नाहीत, ज्यांच्याकडून तत्काळ निधीची व्यवस्था होईल. 75 टक्के पैसे भरल्याशिवाय तुम्हाला जमीन संपादित करता येत नाही. त्यामुळे निधीची जुळवाजुळव करताना वेळ लागतो. बऱ्याचदा तो निधी जमा होत नाही. ब-याच नगरपालिकांच्या असे सुध्दा लक्षात आले आहे की, ते मालकासोबत हॅण्ड इन ग्लोव्ह असतात. कारण मग ती जागा त्यांच्या घशात जाते. असे होऊ नये, ती जागा रिझर्व्हेशन अगेन्स्ट अकोमोडेशन घेता आली पाहिजे. स्थानिक प्राधिकरणाला टीडीआर आणि ॲमेनिटीज देऊन सुध्दा मत्ता उभी करता आली पाहिजे. म्हणून तो कालावधी 1 वर्षाऐवजी 2 वर्षाचा केला आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदय म्हणाले की, इरिगेटेड जमीन शहरी भागामध्ये कदाचित कमी असेल. परंतु शहराच्या अवतीभोवती असलेली गावे महापालिकेमध्ये समाविष्ट करावीत, यासाठी बिल्डर लॉबी मोठया प्रमाणात इरिगेटेड जमिनीचे व्यवहार करतात आणि मग शासनाला सर्व डेव्हलपमेंट करावी लागते. त्या इरिगेटेड जमिनीवरील जी गावे घेणार आहात किंवा घेण्याच्या मार्गावर आहात त्या संदर्भात माझा प्रश्न आहे.

डॉ.रणजित पाटील : माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार केला जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 10 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 49 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 49 संमत झाले आहे.

-----

...2ओ.1...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मातंग समाजाच्या मोर्च्यावर पोलिसांनी केलेल्या लाठीमारासंबंधी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. एक अत्यंत गंभीर अशी घटना घडली आहे. नागपूर नगरीमध्ये लोकराज्य आंदोलनांतर्गत मातंग समाजाच्या आलेल्या एका मोर्च्यावर पोलिसांनी आज दुपारी अमानुषपणे लाठीचार्ज केला आहे. या मोर्च्यात केवळ 300 लोक सामील झाले होते. कमी संख्येने असलेल्या मोर्च्याला पोलीस सांभाळू शकत नाही हे पोलिसांचे दुर्दैव आहे. जखमी लोकांना रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. अत्यंत भयानक असे फोटोग्राफ्स आलेले आहेत. आपण म्हणत असाल तर ते आम्ही दाखविण्यास तयार आहोत. या मोर्च्यावर ज्या पोलिसांनी लाठीचार्ज केला आहे त्यांची चौकशी करून त्यांना निलंबित करावे. मातंग समाजाच्या मोर्च्यावर पोलीस मोठ्या संख्येने तुटून पडले असून त्यांच्यावर लाठीचार्ज केला आहे. त्यामुळे जनतेमध्ये फार संभ्रम निर्माण आहे. तेव्हा यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये निवेदन करावे अशी मी विनंती करीत आहे.

**सभापती :** शासनाने गांभीर्य लक्षात घेऊन निवेदन करावे.

श्री.गिरीश बापट : होय.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 52 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महागनरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 52 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महागनरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम, नगर पंचायती यांच्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग जातीतील लोकांची निवडणूक लढविण्याची इच्छा असते तेव्हा त्यांना नामनिर्देशन पत्र भरावे लागते. त्या सोबत जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. बरेचदा असे होते की, इच्छा असणाऱ्या लोकांना ते प्रमाणपत्र लवकर मिळत नाही. सहा महिन्यांच्या आत

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

ते प्रमाणपत्र सादर करण्याची आपण त्यांना मुभा दिली होती. पण असे लक्षात आले आहे की, अनेकांना खोटे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे आता आपण भूतलक्षी प्रभावाने त्यांची निवडणूक रद्द करीत आहोत किंवा ती अवैध ठरवतो. पण अशा बोगस जात प्रमाणपत्राच्या प्रकारामुळे खऱ्या उमदेवारांना वंचित रहावे लागते. त्यामुळे थोडा जरब असावा, भीती वाटावी व जे खरे उमेदवार आहेत त्यांना संधी मिळाली पाहिजे म्हणून या विधेयकामध्ये आपण नवीन सुधारणा अंतर्भूत करीत आहोत. जर कोणी चुकीचे प्रमाणपत्र दिले आहे असे सिद्ध झाले तर येथून पुढे तो सहा वर्षे निवडणूक लढण्यास अपात्र ठरेल अशी तरतूद आपण या विधेयकात केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा प्रस्ताव आहे तो त्यांनी मांडावा

श्री.शरद रणपिसे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 52 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधान परिषदेची सहमत घेऊन विधान परिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीच्या प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरू करावे.

..5

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी या विधेयकाचे स्वागत करतो. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी यांच्या जातीचे खोटे दाखले घेऊन निवडणुकीला उभे राहण्याचे खूप प्रकार घडत आहेत. असे केल्याने आमचे कोण वाकडे करणार आहे, पाच वर्षामध्ये कोर्टात केस चालेल, त्याविरूद्ध हायकोर्टात जाऊ, सर्वोच्च न्यायालयात जाऊ अशी भूमिका काही व्यक्ती घेत असतात. दुर्दैव असे आहे की अशा व्यक्ती निवडून देखील येत असतात. एकदा जात पडताळणी समितीने बोगस जात प्रमाणपत्र असल्याचा निर्णय दिल्यानंतर ती संबंधित व्यक्ती सहा वर्षे निवडणूक लढविण्यासाठी बाद होणार आहे, अशी जी सुधारणा आपण करीत आहात त्याचे मी स्वागत करतो. यात शासनाचे देखील कर्तव्य आहे. एस.सी., एस.टी., ओ.बी.सी.यांचे जातीचे दाखले वेळेवर मिळत नाही. जात पडताळणी व्हायला सहा महिने, वर्ष लावतात. निवडणुका जवळ आल्या की, दोन लाख रूपये, चार लाख रूपये, पाच लाख रूपये तहसिलदार मागतात, जात पडताळणीचे अधिकारी मागतात. त्यानंतरच मग ते दाखला देतात. माझ्या या विधानाशी माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार सहमत आहे. तेव्हा जात पडताळणीसंबंधी सरकारने ठोस पावले उचलावित असे मला वाटते. जात पडताळणीचे दाखले योग्य प्रकारे कसे मिळतील हे आपण पहावे. यामध्ये माननीय नगरविकास राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे तज्ज्ञ आहेत. या विधेयकातील प्रकरण पाच मधील संकीर्ण यातील खंड 5 कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. येत्या एक दोन दिवसात सभागृहापुढे जी विधेयके आली आहेत त्यावरून सरकार आपला अधिकार कमी का करत आहे हे मला कळत नाही. सरकार विधिमंडळाचा अधिकार कमी करत आहे. खंड 5 मध्ये अडचण दूर करण्याचा अधिकार या शीर्षकाखाली नमूद केल आहे की, "या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम किंवा यथास्थिती, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधियिम, 1965 याच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले निदेश, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील" माझा

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

मुद्दा असा आहे की, कायदा करणे हे विधिमंडळाचे काम आहे. पण नोकरशाहींची एक प्रवृत्ती असते. ती म्हणजे ॲक्टच्या खाली रूल्स करायचे आणि त्या रूल्सच्या अंतर्गत सगळे अधिकार आपल्याला घ्यायचे. ते मंत्री महोदयांना देखील कागदपत्र दाखवत नाही. त्यांच्यासमोर ते काही ठेवत नाही. परस्पर ॲक्टच्या अंडर रूल्स करून आपणच प्रशासक आहोत, आपणच शासन आहोत या पद्धतीने नियम केले जातात, असा माझा अनुभव आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीश बापट आता सभागृहात उपस्थित आहेत. भारत सरकारकडे रेशनिंगचा विषय आला तेव्हा श्री.रफी अहमद किडवाई यांनी रेशनकार्ड असले पाहिजे असा आग्रह धरला. तेव्हा अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, सर, यह रूल्स में नही बैठता. तेव्हा श्री.किडवाई यांनी सचिवांना सांगितले की, सचिव साहब, सारे भारत वर्ष में रूल्स की कितनी किताबें होगी ? तो कहा गया कि 40-50 किताबें होगी. क्या वह किताबें हम दिल्ली में ला सकते है ? तो कहा कि हाँ ला सकते है. मान लीजिए कि वह किताबें हमने दिल्ली में लायी, उन किताबों को ट्रक में लोड किया, क्या वह ट्रक में लोड कर सकते है ? हाँ, लोड कर सकते है. फिर हम लोग कलकत्ता जा रहे है. आप और मैं एक कार में बैठे हैं और रूल्स की सारी किताबें हमारे पीछे है. क्या यह हो सकता है ? हाँ सर, हो सकता है. तो हम लोग कलकत्ता जा रहे है. सचिव महोदय, आपको तो मालुम है, आप आईएएस अधिकारी है. कलकत्ता जाना है तो हावड़ा ब्रीज क्रॉस करना होगा. हाँ सर, क्रॉस तो करना पड़ेगा. अपनी गाड़ी निकल गई. बाद में जब ट्रक आया, हावड़ा ब्रीज टूट गया और रूल्स की सारी किताबें गंगा मैय्या में डूब गई. अब क्या करना है ? तो कहा कि कुछ नहीं सर, रेशनकार्ड बनाना है.

PP-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे .......

म्हणून रुल्सच्या संदर्भात या संकिर्णमध्ये रुल्सचे अधिकार तुम्ही प्रशासकीय अधिकाऱ्यांना देत आहात. अधिकारी तुम्हाला माहिती दाखवत नाही, आपल्याकडून गुपचूप सही घेतात. तुम्हाला त्यांच्या बाबतीत काही समजत नाही. विधिमंडळाच्या कायदे करण्याच्या अधिकारावर तुम्ही गदा का आणता ? तुम्हाला जर काही करायचे असेल तर ते करण्याचे अधिकार या संकिर्णमध्ये घेतलेले आहेत. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, आपण विधिमंडळाचे अधिकार कमी करता कामा नये. आपणास जे काही करावयाचे असेल ते कायद्याद्वारेच करण्यात यावे अशी सुधारणा मी दिलेली आहे. मी सर्व मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपणास माझी सूचना पटत असेल तर ती मान्य करावी. जर ही सूचना आपणास मान्य नसेल आणि आमचा या विधेयकाला विरोध असला तरी हे विधेयक आपण मंजूर करणार आहात. अशावेळी आम्ही दुसरे काय करु शकतो ? शेवटी तुम्हाला जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो तुम्ही घ्यावा.

श्री.गिरश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांना मी सांगू इच्छितो की, कायदा बनविल्यानंतर त्याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यभर प्रभावीपणे व्हावी म्हणून रुल्स बनविले जातात. त्यानंतर ते रुल्स मान्यतेसाठी उप विधान समितीकडे येतात. त्या समितीने रुल्सच्या संदर्भात केलेला अहवाल विधिमंडळापुढे सादर केला जातो व त्यास मान्यता देण्यात येते. त्यामुळे आपले कोणतेही अधिकार कमी होत नाहीत. आपल्याला ही बाब मान्य नसेल तर आपण ती फेटाळू शकता. त्यामुळे कोणत्याही विषयाच्या अनुषंगाने कायदा करण्याचा अधिकार हा पूर्णत: विधिमंडळाचा आहे. कोणताही कायदा करण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना नसतो.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात मला जो अनुभव आलेला आहे तो मी आपल्याला सांगू इच्छितो विधिमंडळाची उप विधान समिती उपविधान समिती अस्तित्वात असताना सुध्दा अनेकदा रुल्स मान्यतेसाठी त्या समितीकडे न पाठविता परस्पर गॅझेटमध्ये प्रसिध्द केले जातात. त्यामुळे मी विधी व न्याय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून सांगितले की, यापुढे हे प्रकार सहन केले जाणार नाहीत. मी सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांच्या एका गोष्टीसाठी सहमत आहे की, दोन्ही सदनाची अप्रतिष्ठा आपल्या हातून होता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. रणपिसे साहेबांना मी सांगू इच्छितो की, उप विधान समितीचे अहवाल विधिमंडळासमोर येत असतात.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती......**

कोणत्याही कायद्यामागे रुल्स मेकींग पॉवर दिलेलीच असते. त्यामुळे रुल्स मेकींग कायद्याखाली झालेले रुल्स आपल्या समोर आल्याशिवाय ते अमलात येऊ नयेत. परंतु ते जर अमलात आले नाही तर कायद्याची अमलबजावणी करण्यास थोडा त्रास होतो असा माझा स्वतःचा अनुभव आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपण उप विधान समिती किती प्रभावशाली करतो त्यावर हे सर्व गणित अवलंबून असते. त्यामुळे आपण आपली सुधारणा मागे घेतली तर आपण पुढे जाऊ शकतो.

सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

श्री.शरद रणपिसे:सभापती महोदय, माझा प्रस्ताव मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**सभापती:** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 52 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 52 संमत झाले आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 53, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 53, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती :**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

**सभापती :**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

**सभापती :**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांचा प्रस्ताव आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा जो प्रस्ताव दिलेला आहे तो मांडू इच्छित नाही.

**सभापती :** आता सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, मी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला होता. तसेच या विधेयकाला सुधारणा दिलेली आहे. आपण म्हणत आहात की, याचा इफेक्ट केवळ या वर्षासाठी आहे. परंतु मी सुधारणा दिली आहे की, सन 2017-2018 पासून परंतु राज्य सरकारने नोव्हेंबर अखेरपर्यंतचा कालावधी गृहीत धरावा. सन 2017-2018 पासून पुढची जी वर्षे असतील ती यामध्ये काही ध्वनीत होत नाहीत. हे विधेयक एका वर्षापुरते आहे की, त्यानंतर लागू राहील हे कोठेही ध्वनीत होत नाही. जर हे विधेयक खरोखरच एका वर्षासाठी असेल तर मी माझी सुधारणा न मांडता ती मागे घेतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, बृहत आराखडा तयार झाला पाहिजे असा मुळ उद्देश विधेयक आणण्यामागील आहे. नवीन विद्यापीठ कायद्याच्या संदर्भात आपण सोमवारी चर्चा करणार असून त्यावेळी या विषयाच्या संदर्भात सविस्तर माहिती मिळेल. आपण ज्या प्रमाणे दर 10 वर्षाने शहराचा डीपी प्लॅन करतो तसाच शिक्षणाचा सुध्दा डीपी प्लॅन असला पाहिजे. खरे म्हणजे बृहत आराखडा त्या त्या विद्यापीठाने तयार केला पाहिजे. तसेच त्या बृहत आराखडयानुसार संबंधित महाविद्यालयांनी कोणत्या नवीन शाखा उघडावयाच्या आहेत त्यासंदर्भात परवानगी घेतली पाहिजे. परंतु गेल्या पाच-सहा वर्षापासून शिक्षणाच्या संदर्भात बृहत आराखडा तयार न करताच तो सादर केला जातो. त्यामुळे माजी कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बृहत आराखडा तयार करण्याच्या संदर्भात एक समिती गठीत केली होती. त्या समितीने अहवाल दिला. आपल्या कायद्या प्रमाणे नवीन कॉलेजेसच्या परवानगीचे अर्ज 31 ऑक्टोबरच्या आत आले पाहिजे. परंतु या विधेयकाच्या माध्यमातून ही मुदत दि. 31 डिसेंबर पर्यंत वाढवली होती. तेवढीच दुरुस्ती करण्यासाठी अध्यादेश काढण्यात आला होता. त्या अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर करण्यासाठी सदरहू विधेयक सभागृहापुढे मांडण्यात आले आहे. त्यामुळे मी पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने हे विधेयक विचारात घ्यावे.

**सभापती:** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 53 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 53 संमत झाले आहे.

------

Q-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** अधिवक्ता कल्याण निधी (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LXI OF 2015 (A BILL TO AMEND THE MAHARASHTRA ADVOCATES WELFARE FUND ACT, 1981.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ.रणजित पाटील ( विधि आणि न्याय विभाग) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 वि.स.वि.क्रमांक 61 - महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम, 1981 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-61 महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम, 1981 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सन 1981 साली वकिलांचा कल्याण निधी कायदा अस्तित्वात आला. तेव्हापासून जे वकील प्रॅक्टीस करतात त्यांच्यासाठी काहीतरी कल्याण निधी असावा आणि त्यांच्या सेवानिवृत्तीला काही तरी निधी जमा व्हावा यादृष्टीने त्यांच्याकडून वर्षाला 50 रुपये आणि प्रत्येक स्टॅम्प मागे दोन रुपये घेऊन अशाप्रकारे निधी जमा करण्यात येत होता. जेव्हा वकील सेवानिवृत्त व्हायचे त्यावेळी त्यांना 10 हजार रुपये मिळत होते. आपण या विधेयकामध्ये सुधारणा करीत असून आता वकिलांकडून एकाच वेळेला 10 हजार रुपये घेत आहोत. या सुविधेचा फायदा घेण्यासाठी प्रॅक्टीसचा कालावधी किमान 15 वर्षाचा असावा अशी अट घालण्यात आली आहे. जर कोणाला अपरिहार्यकारणास्त सेवानिवृत्ती घ्यावी लागली तर त्याची जी काही रक्कम जमा असेल ती सहा टक्के व्याजाने परत मिळेल. जर घटस्फोटित विवाहित मुलगी असेल तर ती सुद्धा यामध्ये लाभार्थी राहील. त्याशिवाय अपंगत्व, मृत्यू आल्यास वारसांना मदतीची तरतूद यात अंतर्भूत आहे. कल्याण निधीच्या ऑडीट कम्प्लायन्सबद्दल काही तरतूद नव्हती ती तरतूद करण्यात आलेली आहे. पूर्वी दोन रुपयांचा स्टॅम्प लावण्यात येत होता आता तो 20 रुपयांचा केलेला आहे. सभागृहाने हे विधे्यक मंजूर करावे, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** विधयेक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

**सभापती :** यानंतर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**सभापती :** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-61 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-61 संमत झाले आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LVII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 57-महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 57-महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये तुकडेबंदीचा कायदा आहे. या तुकडीबंदीच्या कायद्यान्वये एका विशिष्ट मर्यादेच्या खाली तुकडेबंदी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. हा हेतु कालही शुद्ध होता आणि आताही तसाच आहे. कोणालाही मोठ्या प्रमाणात जमीन विकत घेता येऊ नये म्हणून सिलिंगचा कायदा केला होता. त्यानंतर तुकडे कसण्यास योग्य नाही म्हणून तुकडे बंदीचा कायदा आला. नागरी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढत असल्यामुळे या कायद्यामध्ये काही सुधारणा करण्याचे सुचवित आहोत. अलीकडच्या काळामध्ये नागरीक्षेत्र आणि कृषी क्षेत्र बरोबरीने यावयास लागले आहे. जवळपास 50 टक्के क्षेत्र नागरीभागाने व्यापलेले आहे असे चित्र आहे. अशा स्थितीमध्ये शहराच्या लगत असलेल्या एन.ए.पोटेन्शिअल जमिनी डी.पी.प्लानमध्ये आहेत तर काही जमिनी रिजनल प्लानमध्ये आहे. आपण प्लान तयार करीत असताना त्यामध्ये रिझर्व्हेश्न ठेवलेले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

कोणती जमीन एन.ए करता येईल हे प्लानमध्ये समाविष्ट केलेले आहे. जेथे शेती होत होती ती जमीन एन.ए. करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे आणि ती त्या ठिकाणची गरज आहे. अशा ठिकाणची एक गुंठा, दहा गुंठे, वीस गुंठे जमीन कोणाला विकत घ्यायची असेल तर तुकडेबंदी असल्यामुळे ते विकत घेऊ शकत नाही. काहीजणांनी जमिनी घेऊन ठेवलेल्या आहेत तर काहींनी आपल्याच मालकीच्या जागेवर घरे बांधलेली आहेत. पिंपरी-चिंचवडचा प्रश्न नेहमीच येथे चर्चेला येतो. पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाची निर्मिती होईल असे सांगितले तेव्हा लोकांच्या नोंदी पेन्सिलने लिहून ठेवण्यात आल्या, त्याची पूर्ण नोंद झालेली नव्हती. त्या कालखंडामध्ये काही लोकांनी त्या जमिनी मालकी हक्काने विकत घेतल्या. आता त्या जमिनी एन.ए.ची परवानगी मागितली तेव्हा त्यांना ती परवानगी नाकारण्यात आली. कारण दोन हेक्टरची मर्यादा असल्यामुळे त्याच्या आत तुकडा पाडता येत नाही. त्यामुळे ही खरेदी बेकायदेशीर ठरली. आजही अशा जमिनींवर इमारती उभ्या आहेत किंवा वस्त्या करुन लोक राहत आहेत त्या अतिक्रमित ठरल्या आहेत. या लोकांना न्याय देण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक होते. तेव्हा राज्य सरकारने डी.पी.प्लान, आर.पी.प्लान किंवा ड्राफ्ट आर.पी.डी.पी.मध्ये शेतजमीन घ्यायची असेल तर ती कोणालाही घेता येईल अशी सुधारणा केलेली आहे. मी परवा देखील सभागृहात सांगितले की, अशा स्वरुपाची शेत जमीन घेत असताना तो शेतकरी असला पाहिजे ही अट आहे. शेतकरी असल्याशिवाय राज्यामध्ये जमीन घेता येत नाही. परंतु अशा ठिकाणी शेतकरी नसला तरी त्याला ती जमीन एन.ए.करायची असेल तर ती त्याला जमीन घेता येईल अशी दुरुस्ती सुचविण्यात आलेली आहे. नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील जमिनीच्या खंडाचा या माध्यमातून विकास करता येईल, ही त्या मागील कल्पना आहे. अशा स्वरुपाच्या जमिनी कोणी घेतल्या असतील किंवा त्यावर घरे असतील तर ती बेकायदेशीर ठरविलेली आहेत, ती रेग्युलराईज करण्याचा मार्ग यातून मोकळा होईल आणि त्यांना मालकी हक्काने परवानगी देता येईल हा या विधेयकाचा उद्देश आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** विध्‍यक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**सभापती :** विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**सभापती :** विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 57-महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानपरिषदेवी सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती :** आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव याबर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मी दिलेला आहे तसेच सुधारणाही दिलेली आहे. या दोन्हींवर एकत्रितपणे माझे विचार मांडतो.

सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी येथे सांगितले की, गरजू व्यक्तींना किंवा जे सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहेत त्या सामाजिक भावनेतून त्या लोकांना न्याय मिळाला यासाठी जमिनीचे एकत्रिकरण किंवा डिव्हीजन जे काही असेल ते करण्यास परवानगी दिलेली आहे,

........ 2R-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

मी सरकारच्या हेतूशी सहमत आहे. परंतु अलीकडच्या काळात शहर आणि शहराच्या आजूबाजूच्या जमिनी बिल्डरांनी बळकाविलेल्या आहेत. त्यांनी अशा जमिनींचे मोठ्या प्रमाणावर व्यवहार केलेले आहेत. आता पूर्वीसारखी घरमारक आणि भाडेकरु ही कन्सेप्ट राहिलेली नाही. आता बिल्डर लॉबी निर्माण झाली आहे. आता बिल्डर लॉबी एक-दोन इमारती नव्हे तर मेगा सिटी प्रोजेक्ट करीत आहेत. एवढेच नव्हे तर मोठमोठी नगरे निर्माण करीत आहेत. अशा प्रकल्पामध्ये गरीब आणि सर्वसामान्य जनता घर घेऊ शकत नाही. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, या विधेयकामुळे बिल्डर लॉबीचा फायदा होता कामा नये. त्यामुळे आमचा याच गोष्टीला विरोध आहे.

सभापती महोदय, अधिनियमामध्ये सुधारणा करीत असताना मोठ्या प्रमाणात जमीन असेल आणि त्या जमिनीचे division किंवा amalgamation केले तर ती जमीन स्थानिक स्वराज्य संस्थांना सार्वजनिक कामांसाठी उपयोगात आली पाहिजे, असा माझा हेतू आहे. मी निदर्शनास आणून दिलेल्या बाबींच्या अनुषंगाने आपल्या उत्तराने माझे समाधान झाले तर माझी काही हरकत राहणार नाही.

सभापती महोदय, SEZ चे काय झाले, हे आपण बघितले. आपण मला सांगा की, SEZ चा कोणता प्रकल्प झाला ? त्या ठिकाणी कारखानदारी उभी करावयाची होती. परंतु SEZ च्या संपूर्ण जमिनीवर आता मोठमोठे गृह प्रकल्प, मेगा सिटी उभ्या राहत आहेत. सभापती महोदय, राज्याच्या कारखानदारीमध्ये वाढ झाली पाहिजे, या राज्यात कारखानदर आले पाहिजे, परकीय गुंतवणूक आली पाहिजे या भावनेतून आपण SEZ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते आपल्याला शक्य झाले नाही, याचाही विचार माननीय मंत्र्यांनी करावा.

सभापती महोदय, ईस्ट इंडिया कंपनी कलकत्त्यामध्ये आली होती. त्या कंपनीने भांडवलदार आणि जमिनदारांना हाताशी धरुन, हळूहळू संपूर्ण देश काबीज केला. सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, आज बिल्डर लॉबी महानगरपालिका चालवित आहे. त्यांचा हळूहळू प्रत्येक क्षेत्रात प्रचार आणि प्रसार वाढत आहे. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे सामाजिक न्याय देणारे नेते आहेत, याची मला जाणीव आहे. माझ्या भूमिकेशी ते सहमत होतील. मी ज्या बाबी मांडल्या तसा या विधेयकाचा हेतू नसेल, हे मी मान्य करतो. परंतु कोणत्याही

परिस्थितीत या विधेयकाचा फायदा बिल्डर लॉबी, मेगा सिटी आणि मोठमोठ्या गृह प्रकल्पांना होता

..2..



श्री.शरद रणपिसे....

कामा नये. जर या विधेयकाचा फायदा झाला तर तो स्थानिक स्वराज्य संस्थेला, सर्वसामान्य लोकांना, गोरगरीब जनतेला आणि अल्प भूधारकांना झाला पाहिजे, एवढीच या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-57, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत मांडण्यात आलेल्या सुधारणा विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक आणण्यामागील उद्देश माननीय मंत्र्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे सांगितलेला आहे. fragmented holdings यावर नीटप्रकारे शेती करता येत नव्हती म्हणून त्या कालखंडात हा कायदा करण्यात आला होता. परंतु आता शहरीकरण वाढत असल्यामुळे वेळेनुसार त्या कायद्यात थोडा फार बदल करण्याची गरज आहे या मताशी मी संपूर्णपणे सहमत आहे.

सभापती महोदय, दिवसेंदिवस शहरीकरण वाढत आहे. ज्या ठिकाणी शहरीकरण वाढले आहे त्या ठिकाणी नगरपालिका किंवा महानगरपालिका निर्माण करण्यात आल्या. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून त्या ठिकाणी स्थानिक विकासाचे नियोजन करुन, गरजेनुसार तेथे विविध प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात आणि पर्यायाने त्या भागाचा विकास केला जातो. अशा प्रकारची तरतूद नगरपालिका आणि महानगरपालिकांपर्यंत ठीक आहे. पण यामध्ये land situated within the jurisdiction of a Special Planning Authority or a new Town Development Authority समाविष्ट केली तर, निश्चितपणे आजच्या घडीला ते राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने अतिशय घातक ठरेल. या अनुषंगाने मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. पिंपरी चिंचवड प्राधिकरणाचे उत्तम उदाहरण माननीय मंत्र्यांनी दिले. त्या ठिकाणचा विकास करीत असताना त्या भागात विविध विकासात्मक कामे झाली. त्या भागात शहरे, रस्ते, इमारती अशी विविध कामे करण्यात आलेली आहेत. त्या ठिकाणी हा कायदा अगदी व्यवस्थित फीट होतो.

सभापती महोदय, एमएमआरडीए ही स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे. या एमएमआरडीए रिजनची मर्यादा कुठपर्यंत आहे ? महोदय, मुंबई ते कर्जत, मुंबई ते पेण, मुंबई ते अलिबाग पर्यंत ही मर्यादा आहे. अलिबागमध्ये बरेचसे लोक शेती करतात. कर्जत, पेण, खालापूरमध्ये सुध्दा बरेचसे लोक शेती करतात. या ठिकाणी हा कायदा लागू केला तर लोक या कायद्याचा दुरुपयोग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर....

करुन तेथे जास्तीत जास्त जमिनी बळकावतील आणि जास्तीत जास्त holdings होऊन नुकसान होऊ शकेल. सभापती महोदय, एखाद्या कायद्याच्या अनुषंगाने सुधारणा करीत असताना किंवा नवीन कायदा करीत असताना, त्याचे काही फायदे-तोटे असतात. त्यामुळे कायद्याच्या फायद्या-तोट्याचे इव्हॅल्यूएशन करुन बॅलन्स ऑफ कन्व्हीनीयन्स बघितला तर हा कायदा निश्चितपणे नगरपालिकेपर्यंत लागू करणे योग्य आणि उचित ठरेल. परंतु हा कायदा स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटीच्या कम्प्लीक्ट ज्युरिसडिक्शनमध्ये अप्लाय केला तर, निश्चितपणे त्याचा फायदा न होता सामान्य जनतेचे नुकसान होईल, असे मला वाटते. त्यामुळे शासनाने आणि माननीय मंत्र्यांनी या संदर्भात योग्य तो विचार करुन निर्णय घ्यावा. त्यानंतर सुधारणांसह हे विधेयक मांडावे, अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-57, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत मांडण्यात आलेल्या सुधारणा विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काळाच्या ओघात अशा प्रकारचे विधेयक येणे गरजेचे होते. पूर्वीच्या कालखंडात तुकडे बंदी, तुकडे जोडीचा कायदा करणे आवश्यक होते. परंतु आता त्यामध्ये बऱ्याच अडचणी येत आहेत. त्यामुळे नवीन विधेयक आणणे आवश्यक होते. माननीय मंत्र्यांनी विधेयकाचा उद्देश सांगताना वारंवार शहरी भागाचा उल्लेख केला. परंतु ज्या ठिकाणी 25 हजाराची लोकसंख्या असेल आणि ती ग्राम पंचायत असेल तर त्या ठिकाणी सुध्दा हे झाले पाहिजे. राज्यातील जनतेचे असे म्हणणे आहे की, राज्य सरकारने तुकडे बंदी कायदा शहरापुरता केला आहे.

सभापती महोदय, गरीब लोकांना घरकुलासाठी 1 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. परंतु जर गरीबाकडे जागाच नसेल तर त्याने काय करावे ? अशा वेळी ते कुणाच्या तरी जागेवर बांधकाम करतात. परंतु कालांतराने ते घर ज्यांच्या मालकीची ती जागा असते त्यांच्या हक्काचे होते. त्यामुळे मी सुचवू इच्छितो की, त्या लोकांना घरासाठी एक गुंठा जागा घेण्यासाठी मदत केली पाहिजे आणि त्या ठिकाणी बांधलेल्या घराची मालकी त्यांच्या नावे झाली पाहिजे. त्यासाठी हे विधेयक आणणे आवश्यक होते.

सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी हे विधेयक आणण्यामागील उद्देश सांगताना वारंवार 'शहरी भाग' असा उल्लेख केला. त्यामुळे त्यांनी या संदर्भात खुलासा करावा, एवढीच या निमित्ताने विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-57, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियमात सुधारणा करण्यासाठी मांडण्यात आलेल्या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचे स्वागत करीत असताना काही गोष्टी मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो. सभापती महोदय, देशाच्या शेतीची दुरवस्था आणि दुर्दशा होण्यास महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीचे विभाजन होय. याचे मुख्य कारण म्हणजे sub-division आणि fragmentation होय. त्यामुळे जमिनीचे एकत्रीकरण करण्यासाठी, तुकडे बंदीचा कायदा करण्यात आला. परंतु जर ग्रामीण भागात ही पध्दती सुरु राहिली आणि तुकडे बंदीचा प्रकार बंद झाला तर पुन्हा शेतीचे छोटेछोटे तुकडे पडतील. त्या छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये ट्रॅक्टर सुध्दा फिरविता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होईल. नगरपालिका आणि महानगरपालिका हद्दीपुरते हे केले तर ठीक आहे. परंतु या हद्दीच्या पलीकडे अशा प्रकारच्या जमिनी असतील तर त्या ठिकाणी तुकडे पाडण्याची मुभा देता कामा नये, एवढेच या निमित्ताने सांगतो. या विधेयकाचे पुन्हा एकदा स्वागत करतो व माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने काही शंका उपस्थित करुन काही चांगल्या सूचना केल्या आहेत. हे विधेयक land holdings चे विधेयक नाही. बिल्डर मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी करुन त्या जमिनींचा दुरुपयोग करतील अशी भीती सन्माननीय सदस्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. महोदय, कोणी किती जमीन खरेदी करावी या बाबतचा land holdings आणि सिलिंगचा कायदा अस्तित्वात आहे. त्यामुळे या कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही होईल.

सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी विचारले की, या विधेयकाच्या अनुषंगाने नेहमी शहरी भागाचा उल्लेख केला जात आहे, मग ग्रामीण भागाचे काय ? सभापती महोदय, ग्रामीण भाग असो की शहरी भाग असो, मी मघाशी बोलताना सांगितले की, ज्या ठिकाणी डीपी प्लान आहे, आरपी प्लान आहे तो आपण तयार केलेला आहे. त्यामुळे डी.पी./आर.पी. प्लान किंवा ड्रॉप डी.पी./ड्रॉप आर.पी. यामध्ये एन.ए.पोटेन्शियल जमीन किती आहे, कोणती जमीन आहे, कोणती राखीव राहील या बाबी भविष्याच्या दृष्टीने आरपी-डीपीमध्ये नमूद केलेल्या असतात.

..2एस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

एनए पोटेंशियल जमीन आहे, ती जमीन घेत असताना, ती जमीन जोपर्यंत एनए होत नाही तोपर्यंत ती जमीन शेत जमीन म्हणून असते, अशा स्वरूपाची शेत जमीन घ्यायची असेल तर त्याला मर्यादा आहे, तुकडेबंदीची मर्यादा आहे. काही ठिकाणी एक हेक्टरची तर कोकणासारख्या ठिकाणी ती आणखीही कमी आहे. सामान्य माणसाला वापरासाठी 2 गुंठे, 4 गुंठे जमीन घ्यायची असेल तर तो घेऊ शकत नाही. कारण तुकडेबंदी आहे. सर्वसामान्य माणसाला जमीन घेता आली पाहिजे, त्याला तुकडा पाडण्याची परवानगी देता आली पाहिजे. काही ठिकाणी सब डिव्हिजन व लेआऊट मंजूर केल्याबाबत तुकडेबंदी शिथिलीकरण सुधारणा लागू केल्याने प्लॅन डेव्हलपमेंट होईल, असे घेतल्यानंतर रिझर्व्हेशन म्हणजे रस्ता आहे, ओपन स्पेस ठेवली आहे, त्यावेळी प्लॅन डेव्हलपमेंट होईल. पुढील काळात हे रेग्यूलराईज केल्यामुळे आता जी गुंठेवारी आहे, बेकायदेशीर खरेदी आहे त्याला यामधून आळा बसेल. मागच्या वेळी मी सांगितले होते की, राज्यामध्ये अशीही एक तरतूद आहे की, शेत जमीन घ्यायची असेल तर तो शेतकरी असला पाहिजे, शेतकरी नसेल तर त्याला जमीन खरेदी करता येत नाही. अनेकदा असे लक्षात येते की, शेतकऱ्याची जमीन शेतकऱ्यानेच घेतली पाहिजे. स्पर्धा दोन शेतकऱ्यामध्ये होते. तिसऱ्याला म्हणजे भांडवलदाराला ती जमीन घ्यायची असेल तर त्याला घेता येत नाही. कारण तो शेतकरी नाही. पण तिसरा जर त्यामध्ये आला तर शेतकऱ्याच्या शेत जमिनीला अधिक भाव मिळू शकतो. राज्यात मोठ्या प्रमाणात जमिनींवर घरांची बांधकामे झालेली आहेत. काही 2 तर काही 4 गुंठ्यांवर बांधकाम आहे. लोकांनी ते घेतले आहे, बांधकामे केली आहेत, आयुष्य काढले आहे. अशा नोंदी कायद्याच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळे बेकायदेशीर खरेदी किंवा बेकायदेशी बांधकामे अशा त्याच्या नोंदी आहेत. बेकायदेशीर असले तरी ते राहतात. घरे बांधली आहेत, वर्षांनुवर्षे राहतात. पण ते बेकायदेशीर आहेत. ते विकायचे असेल तर विकता येत नाही. दुसऱ्याने विकत घेतले तरी सब रजिस्ट्रार त्यामध्ये बेकायदेशीर असे लिहिता. त्यामुळे त्याचा उपयोग त्याला होत नाही. तारण ठेवता येत नाही. या जमिनींवर घरे बांधली आहेत किंवा ज्यांनी या जमिनी घेतलेल्या आहेत त्या नियमित करणे हा या मागचा हेतू आहे. आपल्याला या माध्यमातून अशांना संरक्षण देता येइल, त्यांचा मार्ग सुकर होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

काही अंशी दंड करून, काही अंशी पैसे भरून ही जमीन त्यांच्या मालकीच्या नावाने आपल्याला देता येईल ज्याला आपण फ्रीहोल्ड म्हणतो, त्याला देता येईल. हे करणे गरजेचे होते, आवश्यक होते.

सभापती महोदय, यामध्ये ग्रामीण भागही आहे. ग्रामीण भागामध्येही आरपी जाहीर केलेलाच आहे. जेथे अशा स्वरूपाचे आरपी आहेत अशा प्रत्येक ठिकाणी हा कायदा लागू होईल, त्यामुळे ग्रामीण किंवा शहरी असा विषय नाही. ग्रामीण भागात शहरही असू शकते, मोठी गावेही असू शकतात. त्या गावांचे प्लॅन टाऊन प्लॅनिंगच्या माध्यमातून तयार केलेले असतात, त्यामुळे यामध्ये ती सुध्दा भीती नाही की ग्रामीण भाग सोडून देणार का ? एमएमआरडीए क्षेत्रामध्ये त्यांची प्लॅनिंग ॲथोरिटी वेगळी आहे. त्यामुळे सर्व नियोजन, नियंयत्रण त्यांच्याकडे आहे. त्या दृष्टीने त्यांनी तेथे त्यांची उपाययोजना करायची आहे. विधेयक आणण्याचे प्रयोजन एवढेच आहे की, त्या छोट्या माणसाला त्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. अतिक्रमण काढून टाका आणि दिघ्याला झाले तसे हजारो घरे पाडून टाका तर ते होता कामा नये, हाच या मागील हेतू आहे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अगदी बरोबर सांगितले आहे की, शहरीकरणात जेथे खरोखर त्याचा त्रास होतो तेथे फ्रॅग्मेंटेशन हा कायदाच नसायला पाहिजे. फ्रॅग्मेंटेशन असेल तर ती जागा कोणाला घेताच येणार नाही, ती डेव्हलप करून शकणार नाही. आपण एमएमआरडीएबाबत सांगितले की, एमएमआरडीए स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटी आहे. एमएमआरडीएने प्लॅन बनविला आहे. एमएमआरडीए रिजनल प्लॅन बनविते. एमएमआरडीए युजर प्लॅन बनविते. पण जरी त्यांनी प्लॅन बनविला तरी फ्रॅग्मेंटेशनचा कायदा हा त्या क्षेत्रात पण लागू आहे. त्यामुळे एमएमआरडीए स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटी असेल तर त्या क्षेत्रात हा कायदा लागू नाही अशी परिस्थिती नाही. हा कायदा त्या क्षेत्रातही लागू आहे. माननीय मंत्र्यांनी याबाबतचा फक्त विचार करावा. उदा. अलिबागसारखा एरिया आहे, जेथे मोठ्या प्रमाणात आजही भात शेती होते, जेथे मोठ्या प्रमाणात आजही कष्टकरी जाऊन शेती करतात. फ्रॅग्मेंटेशनच्या कायद्याचे ऑब्जेक्टिव्ह काय आहे ? आब्जेक्टिव्ह हे आहे की, आपण फ्रॅग्मेंटेड लॅण्डवर शेती करण्यासाठी रोप देतो. आपल्याला ते एनकरेज करायचे नाही. फ्रॅग्मेंटेशनचा कायदा जर या क्षेत्रातून काढला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहुल नार्वेकर ....

तर फ्रॅग्मेंटेशन वाढेल, ते वाढल्यामुळे त्यावर शेती होणार नाही. मग असे असताना हे कितपत राज्यासाठी योग्य आहे, हे ठरविणे शासनाचे ऑब्जेक्टिव्ह असले पाहिजे. माननीय महसूल मंत्री हे कृषी विभागाचेही कामकाज सांभाळतात. त्यामुळे याचा परिणाम संपूर्ण राज्यावर किंवा त्या रिजनवर कसा पडेल याचा होलिस्टिक विचार केला आणि 0आपण जर का हे लेजिस्लेशन शहरी भागासाठी म्हणून म्युनिसिपल कॉर्पोरेशन आणि म्युनिसिपल कौन्सिलसाठी रेस्ट्रिक्ट केले तर त्याचा जास्त फायदा होईल असे माझे प्रामाणिक मत आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी मांडलेला प्रस्ताव मागे घ्यावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे का ?

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 57 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 57 संमत झाले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LXV OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT. AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 65 - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 65 - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, विधेयकातील कलम 63 एक-अ (1) मध्ये काही सुधारणा सुचविल्या आहेत. पहिली सुधारणा. मघाशी मी सांगितले की, राज्यात जो शेतकरी नाही अशांना शेत जमीन खरेदी करण्याचा अधिकार नाही.

....TT

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

औद्योगिक वापरासाठी शेतजमीन खरेदी करण्याबाबत कलम 63 मध्ये अगोदरची तरतूद अशी होती की, बिगर शेतकऱ्यांना पूर्व परवानगीने शेतजमीन खरेदी करण्याची तरतूद होती. मात्र, त्याला कालावधीचे बंधन नव्हते.

सभापती महोदय, औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन खरेदी करण्याबाबत उदाहरण म्हणून सांगतो की, एसईझेडसाठी हजारो एकर जमीन घेण्यात आली. उद्योग उभा करणार, रोजगार देणार, यासाठी शहरालगत हजारो एकर जमीन खरेदी करण्यात आली. पण प्रत्यक्षात उद्योग उभा राहिला नाही. दरम्यानच्या काळात जमिनीची किंमत वाढ गेली, मोठ्या प्रमाणावर वाढत गेली आणि अशा प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणूक झाली. नंतरच्या कालावधीत याच जमिनीचा वापर रहिवासी उपयोगाकरिता करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी होऊ लागली. त्यामुळे नेमके या संदर्भात काय करावे, असा प्रश्न निर्माण झाला आणि सरकारने यामधून असा मार्ग काढला की, 50 टक्के उद्योगासाठी आणि 50 टक्के रहिवासासाठी परवानगी दिली गेली. हे करीत असताना 4 एफएसआय देऊन टाकला. तो विषय आज या ठिकाणी चर्चेचा नाही. परंतु, या माध्यमातून भविष्यात असे होता कामा नये, शेतक-यांची फसवणूक होता कामा नये, ज्या प्रयोजनासाठी जमीन घेतली आहे त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर केला पाहिजे आणि यासाठी कालमर्यादाही घातली गेली पाहिजे, असा विचार झाला.

सभापती महोदय, औद्योगिक प्रयोजनासाठी अनेक ठिकाणी जमिनी घेतल्या गेल्या आहेत. या जमिनी घेतल्यानंतर त्या जमिनींचा वापर उद्योग उभा करण्यासाठी झाला नाही आणि त्या जमिनी तशाच पडून आहेत. एका बाजूला या जमिनी कसल्या जात नाहीत, त्या माध्यमातून शेतीचे उत्पन्नही बुडाले, उद्योगही उभा राहिला नाही आणि अशी टेंडन्सी निर्माण झाली की, उद्योगाच्या नावाने मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी करायची आणि किंमत वाढल्यानंतर चढ्या भावाने ती विकायची. 10 वर्षानंतर, 20 वर्षानंतर शहरांचा विस्तार होत जातो आणि जमिनींच्या किमतीही मोठ्या प्रमाणावर वाढतात. या माध्यमातून नफेखोरीला उत्तेजन मिळत होते. आमची जमीन अगदी थोड्या किमतीत खरेदी केली जाते आणि नंतर आम्हाला अशा प्रकारे लुटले जाते किंवा नागवले

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

जाते, अशा प्रकारची भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झाली होती आणि ती खरीही आहे. याला प्रतिबंध घातला पाहिजे, यासाठी आपण या विधेयकाच्या माध्यमातून कायद्यात दोन सुधारणा करीत आहोत.

सभापती महोदय, कलम 63 अनुसार उद्योगासाठी जमीन खरेदी करावयाची असेल तर यापूर्वी अशी तरतूद होती की, उद्योगासाठी 10 हेक्टरपेक्षा जास्त जमीन खरेदी करावयाची असेल तर उद्योग विकास आयुक्तांची परवानगी घ्यावी लागत होती. यामध्ये फार विलंब लागत होता. वर्ष-दोन-वर्षे परवानगीसाठी लागत होती व त्यामुळे त्रासही होत होता. यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत जाते, खर्चही वाढतो. त्यामुळे आपण पहिली सुधारणा अशी करण्याचे ठरविले आहे की, उद्योगासाठी 10 हेक्टरच्या वर जमीन घेत असताना उद्योग विकास आयुक्तांची परवानगी घेण्याची अट शिथिल करण्यात आली आहे. आता त्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे जावे आणि हवी असलेली जमीन त्यांना सांगावी.

सभापती महोदय, दुसरी सुधारणा अशी आहे की, ज्या प्रयोजनासाठी शेतकऱ्यांकडून जमीन घेतली गेली असेल त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होणे अपेक्षित आहे. उदाहरणार्थ, कोकाकोला कारखाना उभा करावयाचा आहे आणि ते प्रयोजन देऊन शेतकऱ्याची जमीन घेतली गेली असेल तर त्या जमिनीचा, त्याच प्रयोजनासाठी, 5 वर्षाच्या आत, वापर करावयाचा आहे. किंबहुना या पाच वर्षात उद्योगाचे काम त्याने सुरु केले पाहिजे. या पाच वर्षात त्यांने उद्योगाचे काम सुरुच केले पाहिजे, अशा प्रकारचे बंधन या माध्यमातून आपण आणले आहे. जर काही कारणासाठी, उदाहरणार्थ, पर्यावरणाचा दाखला मिळाला नाही, जैतापुरसारखी आंदोलने सुरु झाली, प्रदूषण नियंत्रण मंडळाचा परवाना मिळाला नाही, यासारख्या कारणांमुळे 5 वर्षाच्या कालावधीत उद्योगाचे काम सुरु करता आले नाही तर आणखी 5 वर्षांची मुदतवाढ तो मागू शकतो व पुढील पाच वर्षासाठी आपल्याला मुदतवाढ देता येईल. परंतु, असे करीत असताना रेडीरेकनरच्या 2 टक्के रक्कम त्यास सरकारकडे भरावी लागेल. त्या जमिनीची, त्यावेळी असलेल्या रेडीरेकनरच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

दराच्या 2 टक्के रक्कम सरकारकडे भरुन त्याला परवानगी घेता येईल. शासनालाही अशी मुदतवाढ जास्तीत जास्त पुढील 5 वर्षासाठी देता येईल. अशा प्रकारे 10 वर्षे झाल्यानंतरही त्याने उद्योग सुरु केला नाही तर सरकार ती जमीन परत घेईल. यापुढे जाऊन, 65 वर्षानंतर पहिल्यांदा आपण असा कायदा करीत आहोत की, जमीन सरकारजमा झाल्यानंतर ती मूळ मालकांना म्हणजे शेतकऱ्याला परत देण्यात येईल. असे करीत असताना असाही धोका होता की, 10 वर्षानंतर त्या जमिनीची किंमत वाढेल आणि तेवढे पैसे दिल्याशिवाय शेतकऱ्याला जमीन परत मिळविता येणार नाही. म्हणून अशी तरतूद करण्यात आली आहे की, 10 वर्षापूर्वी जमीन घेत असताना ज्या किमतीने ती जमीन घेतली गेली असेल त्याच किमतीत त्याला ती परत मिळविण्याचा अधिकार या कायद्यान्वये मिळणार आहे. समजा, एखादी जमीन 1 लाख रुपये एकर याप्रमाणे घेतली गेली असेल आणि 10 वर्षानंतर ती परत करण्याचा प्रसंग आल्यास त्याला 1 लाख रुपये एकर या दरानेच परत मिळविता येईल. तेवढी रक्कम त्याने भरल्यानंतर ती जमीन त्या शेतकऱ्याला परत मिळेल. अशा प्रकारे घेतलेली जमीन पुन्हा शेतकऱ्याला परत देण्याचा कायदा आपण या माध्यमातून करीत आहोत.

सभापती महोदय, आतापर्यंत जमीन भूसंपादित केल्यानंतर किंवा खाजगी वाटाघाटीने घेतल्यानंतर त्या जमिनीचा वापर झाला नाही तर ती मूळ जमीन मालकाला परत करण्याचा कायदा नव्हता. सर्वोच्च न्यायालयाचाही असा निर्णय आहे की, जर जमीन भूसंपादित केली असेल तर ती जमीन लिलावाव्दारे विकली पाहिजे. परंतु, आता आपण ज्या जमिनींच्या संदर्भात चर्चा करीत आहोत त्या जमिनी भूसंपादित नाहीत. त्या खाजगी वाटाघाटीने घेणार आहोत आणि त्या मूळ मालकांना परत देण्याची तरतूद करीत आहोत.

सभापती महोदय, या तरतुदीची अंमलबजावणी या कायद्यातील दुरूस्ती मंजूर झाल्यानंतर सुरु होईल. मागील काळासाठी ती लागू होणार नाही. जुन्या कायद्याप्रमाणे ज्या जमिनी खरेदी करण्यात आल्या आहेत, त्या जमिनींना ही तरतूद लागू होणार नाही, त्यांना जुनीच तरतूद लागू होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

सभापती महोदय, सक्तीच्या भूसंपादनानुसार शेतकरी स्वखुशीने जमिनी देत असताना त्यांना रेडीरेकनरच्या दराने त्या जमिनीचे दर देत होतो. त्या त्या भागातील रेडीरेकनरच्या किंवा खरेदी-विक्रीचा दराप्रमाणे शेतकऱ्याला भूसंपादनाचा मोबदला देत होतो. आता सरकारने असा निर्णय घेतला आहे की, अशा जमिनी संपादित करावयाच्या असतील आणि त्या जमिनी शहरी भागात असतील तर रेडीरेकनरच्या अडीच पट मोबदला द्यावा लागेल आणि ग्रामीण भागामधील जमीन संपादित करावयाची असेल तर ग्रामीण भागातील रेडीरेकनरच्या दराच्या पाच पट मोबदला शेतकऱ्याला द्यावा लागेल. आता शेतकऱ्याची जमीन मातीमोल भावाने कोणाला खरेदी करता येणार नाही.

सभापती महोदय, यामागे हेतू हा आहे की, दर वाढवून दिल्यामुळे शेतकरी भूसंपादनास सहज तयार होतील. आपण अशा अनेक केसेस पाहिल्या आहेत की, भूसंपादन करीत असताना अधिक दर मिळावा यासाठी ते न्यायालयामध्ये जातात. न्यायालयामध्ये कित्येक वर्षे खटला प्रलंबित राहतो. 5-10 वर्षानंतर न्यायालय निकाल देते आणि 1 लाख रुपये ऐवजी 2 लाख रुपये मोबदला मंजूर करते. या दरम्यान वेळ जातो, वकिलाला पैसे द्यावे लागतात आणि त्या माध्यमातून त्याला अपेक्षित असलेला मोबदला देखील मिळत नाही. त्यामुळे राज्य सरकारने असे ठरविले आहे की, शहरी भागात अडीच पट आणि ग्रामीण भागात पाच पट मोबदला आता द्यावा लागेल आणि त्यानंतर जमीन घेता येईल. या माध्यमातून शेतकऱ्याला मोबदला मिळेल आणि दुसऱ्या बाजूला उद्योगही उभे राहतील.

सभापती महोदय, एकंदर या विधेयकाच्या माध्यमातून आपण काही विधायक तरतुदी केल्या आहेत. उद्योगासाठी जमीन वापरली नाही तर ती परत द्यावी लागेल. विकास आयुक्तांची परवानगी आता घ्यावी लागणार नाही. त्याचप्रमाणे औद्योगिक वापराच्या प्रयोजनाखेरीज अन्य कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी विकावयाची असेल तर त्याबाबतीत हस्तांतरकास प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या पन्नास टक्के इतकर रुपांतर आकार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

किंवा भोगवटादार वर्ग-2 च्या जमिनीच्या बाबतीत ती जमीन ज्या किमतीला प्रथमतः खरेदी केली होती त्या किमतीच्या अठ्ठेचाळीस टक्क्यांइतकी अतिरिक्त रक्कम नजराण्याच्या ऐवजी जमा करावी लागेल आणि मुदतीत भरणा केला नाही तर 75 टक्के दंडात्मक रक्कम आकारता येईल. शेतकऱ्याला पैसे देता आले पाहिजेत, अशा प्रकारचा कायदा आपण करीत आहोत.

...UU-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे........

मला असे वाटते की, ही अत्यंत चांगली सुधारणा आहे. शेतकऱ्यांना मूळ किंमतीत जमीन परत देण्याची ही एक ऐतिहासिक सुधारणा आहे. जमीन घेतलेल्या भावात 10 वर्षापूर्वी जो भाव होता त्याच भावात देण्याची तरतूद आहे आणि त्याने जर मूळ किंमतीत ती जमीन परत घेतली नाही तर सरकार त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. या संदर्भातील नियम शासन तयार करणार आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आहे तो त्यांनी मांडावा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा आहे तो त्यांनी मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**सभापती :** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विशेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही सम्मिलित) अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 65 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 65 संमत झाले आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 42 मिनिटांनी सोमवार, दिनांक 21 डिसेंबर, 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही